''उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७–२०००''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

– संशोधक –
कविता कारभारी सुमन मते
(रजि.नं. ०२११४००२२७८)

– मार्गदर्शक –
डॉ. भास्कर दाजी धाटावकर

इतिहास विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

मार्च २०१९

CERTIFICATE OF THE SUPERVISOR

It is certified that work entitled – " उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व समाजिक इतिहास इ.स.१९४७–२००० " is an original research work done by Ms. Mate Kavita Karbhari Suman. Under my supervision for the degree of Doctor of Philosophy in Hisotry to be awarded by Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. To best of my knowledge this thesis.

- embodies the work of candidate herself.
- has duly been completed.
- fulfils the requirement of the ordinance related to Ph.D. degree of the TMV.
- up to the standard in respect of both content and language for being referred to the examiner.

Signature of the Supervisor

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी पीएच्.डी. पदवीसाठी संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मी विद्यापीठाची आभारी आहे. विद्यापीठात **''उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००''** हा विषय शोधप्रबंधासाठी निवडलेला आहे. हा शोधप्रबंध पूर्ण करताना मला उल्हासनगरातील स्थानिक श्री. नारायणदास एच. सुखेजाजी, श्री. घनश्याम बठेजा तसेच समाजसेवी श्री. मल्हारी भावार्थे ह्या मार्गदर्शक व्यक्ती त्यांच्या परिवाराचे सहकार्य लाभलेले आहे.

शोधप्रबंधासाठी सर्वप्रथम मार्गदर्शन केले ते माझे मार्गदर्शक डॉ. भास्कर धाटावकर, निवृत्त पुराभिलेख संचालक, त्यांनी प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले, सूचना दिल्या. त्यांच्या ह्या मार्गदर्शनामुळे मी प्रबंध पूर्ण करू शकले. त्याबद्दल सदैव मी त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करते.

इतिहास विभाग प्रमुख डॉ. नलिनी वाघमारे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत मुंबई मराठी ग्रंथालय विभाग, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई पुराभिलेखागार, आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर ग्रंथालय, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मोलाचे योगदान लाभले.

संशोधनासाठी प्रोत्साहन देणारे माझे वडील श्री. कारभारी बापू मते, आई सौ. सुमन कारभारी मते, संपूर्ण कुटुंबाचे देखील मी ऋण व्यक्त करते. त्याचप्रमाणे सतत मदत करण्यास तत्पर असणारा माझा भाऊ श्री. संजय कारभारी मते, माझे पती निलेश रमेश बळेल यांचे सहकार्य मिळाले, याबद्दल त्यांचेदखील मी ऋण व्यक्त करते.

पीएच्.डी. पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण करीत असताना माझ्या सहकारी मैत्रिणींनी आवश्यक ती माहिती व मदत केली, त्याबद्दल त्यांचे मी आभार मानते. टंकलेखनाचे प्रत्यक्ष काम करणाऱ्या सौ. वैशाली कदम तसेच टंकलेखनासाठी मदत करणाऱ्या सौ. शिल्पा कुलकर्णी मॅडम त्याप्रमाणे सौ गायत्री लोणी यांनी मुद्रितशोधनाचे काम केलेले आहे यांचे देखील मी

आभार मानते याशिवाय संशोधनात प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे मदत केलेल्या सर्वांचे मी आभार मानते.

अशाप्रकारे सर्वांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने मला शोधप्रबंध सादर करणे शक्य झाले, याबद्दल मी सर्वांचे आभार मानून ऋण व्यक्त करते.

(कविता कारभारी मते)

– अनुक्रमणिका –

अ.क्र.	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रमांक
१.	प्रस्तावना	०१ – १२
२.	उल्हासनगर शहर पार्श्वभूमी	१३ – ३५
३.	उल्हासनगरमधील सिंधी समाजाचे आर्थिक जीवन	३६ – ८०
४.	सामाजिक जीवन	८१ – १२४
५.	धार्मिक जीवन	१२५ – १४१
६.	राजकीय जीवन	१४२ – १६५
७.	समारोप	१६६ – १७३
	संदर्भग्रंथ सूची	१७४ – १८१
	परिशिष्ठ अ व ब	१८२ – २१९

प्रकरण–१

प्रस्तावना

ऋग्वेदामध्ये सर्वांत मुख्य व महत्त्वाची नदी म्हणजे सिंधू नदी होय. या नदीला अफगाण, वायव्य प्रांत, काश्मीर व पंजाब या प्रांतातून वाहणाऱ्या नद्या काही पश्चिमेकडून व काही पूर्वेकडून येऊन मिळतात.[१]

सिंधू नदी सरस्वती नदी पेक्षाही मोठी आहे. ही कैलास पर्वताच्या पश्चिमेकडील बाजूला उगम पावून तेथून प्रथम पश्चिमेकडे डोंगराळ खडकातून मार्ग काढून, पुढे हिंदुकुश पर्वतांमधून बाहेर पडून नंतर दक्षिण वाहिनी होऊन काश्मीरमधून खाली पंजाबात उतरली आहे. पंजाबात शिरल्यावर तिला पश्चिमेकडून व पूर्वेकडून अनेक नद्या येऊन मिळाल्या आहेत. पश्चिमेकडील नद्यांमध्ये कुभा, गोमती, कुरुमु, मेहालु इ. नद्या येऊन मिळाल्या आहेत.

(त्वं सिंधो कुभ या गोमती कुरुमुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे१०–७५–६) आणि पूर्वेकडून वितस्ता, परुष्पी, भरुद्वृधा, विपाश, शतदु इत्यादी नद्यांशी तिचा संगम झाला. या सर्व नद्या मिळाल्यावर ती पुढे प्रचंड अशी महानदी बनून खाली सिंधू प्रांतात उतरून नंतर समुद्रास जाऊन मिळाली आहे. तिचा प्रभाव सतत अखंडित असून मोठा वेगवान आहे. (अदब्धा सिन्धुपरसामपस्तमा १०–७५–७) ती जाताना वृषभाप्रमाणे गर्जना करीत जाते (सिन्धुर्यदेति वृषभो न रोरुवत १०–७५–३) ती युवतीसारखी सुंदर आहे. सुवसना आहे. सुवर्णालंकारांनी मंडित आहे. ती नित्य तरुणी आहे. ती सील नावाच्या गवताने विभूषित आहे आणि मधुवर्धक आहे. (स्वश्वा सिन्धु सुरथा सुवासा हिरण्ययी सुकृता वाजिनीवती ऊर्णावती युवतिः सीलमावत्युताधि वस्ते सुभगा मधुवृधम ।। (१०–७५–८)) अर्थात तिच्या प्रदेशातील लोकांना ती मोठी सुखदायक व उत्कर्षक झाली आहे.

(सिन्धुद्भिर्नो शर्म यंसत् ४–५–४६) आणि म्हणून वैदिक आर्यांनी तिचा महिमा मोठा म्हणून सांगितला आहे.[२] (महान्हस्य महिमा पनस्यते १०–७५–९) असे हे वेदात गायलेल्या सिंधूचे वर्णन आजही सत्य असेच आहे.[३]

सिंधू संस्कृतीच्या काळात शहराभोवती संरक्षण तटबंदी व खंदक असत. शहराभोवती दगडी अथवा लोखंडी तटबंदी बांधण्याची पध्दत किमान इ.स पूर्व २३५० वर्षे इतकी प्राचीन आहे. वेदान्तात तटबंदीच्या शहरांची उदाहरणे आहेत. तशीच रामायणातही आहेत. लंका व अयोध्या यांना तटबंदी होती. महाद्वारे होती, खंदक होते, असे वर्णन रामायणात वाल्मीकीने केले आहे. या सत्यस्थितीवरून दिसते की वाल्मीकी वेदाइतके प्राचीन निदान इ.स.पूर्व २३५० च्या सिंधू संस्कृती इतका तरी प्राचीन असला पाहिजे.[४]

महाभारतात अनेक प्रदेश व जनपदे याची नावे आढळतात. [५] त्यातील सिंधू–सौवीर असा संयुक्त उल्लेख करण्यात येत असला तरी सिंधु आणि सौवीर हे दोन वेगवेगळे प्रदेश आहेत. प्राचीन भारतवर्षाच्या वायव्येला तत्कालीन सिंधू देशाच्या लगत पूर्वेकडील प्रांताला सौवीर म्हणत. सिंधू झेलम या दोन नद्यांच्या मधील हा प्रदेश होता. सध्याचा सिंध प्रदेश हा पूर्वीही सिंधू प्रदेश म्हणून ओळखला जात असे. प्राचीन सिंधू देश भारताच्या वायव्य भागात आहे. तसाच सिंधू याच नावाने ओळखला जाणारा दुसरा एक प्रदेश भारताच्या उत्तर पूर्व भागातही होता. जयद्रथाचे सिंधू राज्य भारताच्या उत्तर पूर्व भागात प्रागज्योतिषपुर व मणीपूर यांच्या जवळपास ब्रह्मदेशाच्या सीमेजवळ होते. [६]

अर्जुनाने अभिमन्युचा अमानुष वधाचा सूड जयद्रथाच्या वधाने घेतला. हा जयद्रथ सिंधू–सौवीरचा राजा म्हणजे तो सिंधू देशाचा आणि सौवीर प्रदेशाचाही राजा होता. जयद्रथाचा उल्लेख महाभारतात 'सिंधुराज' म्हणून आलेला आहे. (महा. आश्वमेधिक पर्व ७७.११) तसाच तो 'सौवीराधिपती' आहे, असाही उल्लेख महाभारतात आलेला आहे. (महा. वनपर्व २६७.११) याशिवाय वनपर्वातच जयद्रथाचा उल्लेख 'सिंधुराज' व 'सौवीरराज' असा वेगवेगळ्या तीन ठिकाणी आलेला आहे. 'सिंधुना राजा' (२६४.६.११) 'सौवीरराज (२६५.१२) आणि 'पतिः सौवीरसिंधुनाम' (२६७.८) याशिवाय महाभारतात भीष्मपर्वाचे प्रारंभी भारतातील जनपदांची यादी दिली आहे. त्यातही 'सिंधु' नावाचे दोन वेगवेगळे देश (जनपदे) असल्याचा उल्लेख आहे. (महाभीष्मपर्व ९.४०:९.५३)[७]

महाकवी कल्हणकृत राजतरंगिणीमध्ये राजा हिरण्याक्ष याची कारकीर्द ३७ वर्षे ७ महिने झाली. त्याने हिरण्याक्ष वसविले (२८५) हे नगर सिंधू नदीच्या खोऱ्यात श्रीनगरहून गद्रबालकडे जाणाऱ्या राजमार्गावर रायनील येथे होते. [८]

ऋग्वेदामध्ये फक्त सिंधू नदीचा उल्लेख नाही तर उन्नती, सर्वांगीण समृध्दी व समृध्दता यांचा उल्लेख सिंधूदेश म्हणून केलेला आहे. म्हटले आहे की, 'सिंध प्रांतात घोडे, उत्तम प्रतीचे कापड, सोन्याचे दागिने, उत्तम प्रकारचे लाकूड, फुलांपासून मोठ्या प्रमाणात मध प्राप्त होते. अशी फुले, अशी संपन्नता सिंधू नदीजवळ होती. प्राचीन भारतातील रामायणातील कालखंडात सिंधू नदीजवळ होती. प्राचीन भारतातील रामायणातील कालखंडात सिंधू नदी आणि सिंधूदेश असा उल्लेख आहे. सिंधूदेश महाभारतातदेखील स्वतःची अशी एक प्रमुख स्थिती, स्थान निर्माण केलेला होता.

सिंधूदेश व सूफी पंथाचे सर्व धर्म व धर्मातील श्रध्दा यांचा आदर असलेला देश म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळातील मुख्य धर्म बुध्दीजम याचे अवशेष आणि सिंधी लोकांचा त्यावरील विश्वास आढळून येतो. यातून असे स्पष्ट होते की, सिंधू देश आणि सिंधी समाजावर त्या काळातील प्रभाव टाकणाऱ्या भेटी देणाऱ्या इतर प्रांतातील संस्कृतींचा समावेश प्रखरतेने दिसून येतो. सिंधूदेशाला भेटी देणाऱ्या परकीय आणि प्रवासी यांनी सिंधी संस्कृती आणि उन्नती ह्या भूभागाची प्रशंसा केली आहे. प्रो. पोपटी हिरानंदानी यांनी अलेक्झांडरचे मत सिंध प्रांताविषयी कथित केले आहे. ''सिंधी हे निरोगी आणि सौम्य (मवाळ) आहेत, त्यांना युध्द नको आहे, ते प्रेमळ आहेत.''

ऐतिहासिकदृष्ट्या हे वास्तव आहे की सिंधी लोक ज्याचे खऱ्या अर्थाने उत्तराधिकारी होते ती सिंधू संस्कृती. मोहनजो–दारो उत्खननात सिंधूदेश आणि सिंधी लोक यांचे स्पष्ट वर्णन आहे. मोहनजो–दारो संस्कृती ही ५००० वर्षांपूर्वीचे लोक सुसंस्कृत होते. शहराचे नियोजन आपले ज्ञान, थक्क करणारे आहे. शहराचे सामाजिक आणि आर्थिक जीवन, संस्कृतील बहुजिनसी होती. सिंधू संस्कृती किमान ५००० वर्षे जुनी तरीही आधुनिक शहर म्हणून आजही शहराला नियोजक म्हणून प्रेरणादायक आहे. अशा प्रकारे सिंधू नागरीकीकरण हे सुमेरियन आणि इजिप्त ह्या संस्कृतीच्या तपशिलावरून समजण्यास मदत होते.

भौगोलिकदृष्ट्या सिंधला खूप मोठा राजकीय इतिहास आहे. प्राचीन काळात परकीयांना भारतात येण्यासाठीचे ते जणू प्रवेशद्वार होते. सिंध हे व्यापाराचे केंद्र आणि संस्कृती, समृध्दी आणि प्रसिध्दी यामुळे परकीय याकडे आकर्षिले जात. सिंधी हे सुसंस्कृत, शांततापिय पण अल्पसंख्यांक समाज, ज्याने कधीही परकीय आक्रमणांना विरोध केला नाही. भौगोलिक, व्यावसायिक दृष्टीने भारतातील सिंधला महत्त्वाचे स्थान होते. शतकापासून सिंधने आंतरराष्ट्रीय व्यापारात आपले संबंध स्थापन केले. उत्खनन आणि पुराव्याच्या आधारे हे निश्चित सांगता येते की, सिंधी जगातील संस्कृती एक महान संस्कृतीचे केंद्र आहे.

इ.स. ७१२ ते १८४३ सिंध हा मुस्लीम सत्तेखाली होता. अरबांनी सिंधवर आक्रमण केले, त्या वेळी सिंधचा राजा दहिरसेन याचा पराभव महंमद–बिन–कासीमने केला. राजकीयदृष्ट्या सिंध हा प्रांत अनेक मुस्लीम राज्यकर्त्यांच्या वर्चस्वातून गेला आहे.[९] इंग्रजांनी सिंधवर विजय प्राप्त केल्यावर इंग्रजांच्या शासनकाळापर्यंत जैसलमेरमध्ये भट्टी भाटी रजपुतांचे शासन होते.[१०]

सध्या सिंध हे एक छोटे राज्य आहे. आर्य जेव्हा भारतात आले. आणि सिंधच्या किनाऱ्यावर उभे राहिले. तेव्हा आश्चर्यचकित झाले. एकदम मोठ्याने बोलले सिंधू. सिंधू या शब्दाचा अर्थ संस्कृत शब्द 'सिंध' या शब्दापासून झाला आहे. ज्याचा अर्थ समुद्र भारताला मूलत: सिंधुस्थान किंवा सिंधूंची भूमी संबोधतात.[११] सिंधू संस्कृती ३३०० इ.स. पूर्व ते १७०० इ.स. पूर्व पर्यंतचा कालखंड परिपक्व होता. जगातील प्राचीन सभ्यतेमधील एक महत्त्वाची प्रमुख संस्कृती आहे. ज्याचे मुख्य क्षेत्र दक्षिण आशियातील उत्तर पश्चिम क्षेत्रात प्राचीन (मिस्त्र) इजिप्त आणि (मेसोपोटेमिया) इराक या बरोबर आहे ह्या संस्कृतीला हडप्पा संस्कृती किंवा सिंधू सरस्वती संस्कृती नावावरू न ओळखले जाते. ह्या संस्कृतीचे क्षेत्र प्राचीन संस्कृतीमधील सर्वात मोठे क्षेत्र आहे.[१२]

शुभ 'ओम' मंत्र ज्याला पवित्र उच्चारण म्हटले जाते. प्रथम सिंध मधील एका मनुष्याने उच्चारले होते. सिंधी हिमालय आणि ट्रान्स हिमालय मोहिमाकडे जाणारे उत्साही शोधकर्ते होते आणि इ.स. पूर्व ५००० मधील गंगा द्रविडीयन, बांगला व इतर भागाकरिता त्यांनी मार्ग शोधून

काढ्ले. सिंधू नदीच्या काठी जगातील पहिली लिखित भाषा किंवा लिपी विकसित झाली. त्यांना त्यावरून ती भाषा बोलता येत असावी.[१३]

■ विषयाची निवड –

संशोधन प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे विषय निवड्णे. संशोधकाला कोणत्या विषयाचे संशोधन करायचे हे निश्चित करावे लागते. आपल्या अभ्यासाचे क्षेत्र आणि संशोधनासाठी निवड्ण्यात आलेल्या विषयाची वैशिष्ट्ये संशोधनात रूपांतरीत करावी लागतात.

विषय निवड्णे हे कार्य सुरूवातीला सोपे वाट्त असले तरी प्रत्यक्षात जेव्हा संशोधनाचा विषय संशोधक निवड्तो तेव्हा विषयाची निवड हीच संशोधकाला एक आव्हान असते. निवड्लेले संशोधन क्षेत्र संशोधनकर्त्याने का निवड्ले हे त्याच्या त्या विषयातील आवड यातून समजते.

संशोधनाचा विषय मांड्ताना संशोधन विषयाच्या कोणत्या पैलूंना महत्व द्यायचे हे संशोधकाला निश्चित करावे लागते. आपल्या संशोधनाची दिशाही निश्चित करावी लागते. विषय व दिशा निश्चित झाली की त्यासंबंधी असणाऱ्या विषयावर लक्ष केंद्रित करावे लागते. संशोधन मांड्णी करणे म्हणजे निवड्लेल्या विषयाची संशोधनक्षम मांड्णी करणे होय.

सदर संशोधन उल्हासनगमधील सिंधी समाज आर्थिक व सामाजिक जीवनाशी संबंधित आहे. 'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' संशोधन विषय आहे.

■ संशोधनाची उद्दिष्टे –

संशोधनाची सुरूवात ही समस्येचे निराकरण करण्यासाठी होत असते. समस्या सोड्वण्यासाठी सखोल व सूक्ष्म अध्ययन केले जाते. 'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' पुढील उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.

१) उल्हासनगर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.

२) सिंधी समाजाचे उल्हासनगरमधील उद्योगधंदे व व्यवसाय याबाबत माहिती मिळविणे.

३) उल्हासनगरातील शिक्षण व समाजसेवी संस्थांची कामगिरी जाणून घेणे.

४) उल्हासनगरातील सामाजिक व राजकिय जीवनाचा आढावा घेणे.

५) सिंधी समाजाची धार्मिक तेबद्दलच्या कल्पना व अध्यात्मिक महत्व सांगणे.

■ संशोधनाची व्याप्ती–

संशोधन हे विशिष्ट अनुभवाद्वारे समग्र विषयाचे सामान्यिकरण करीत असते. त्यामुळे संशोधक , संशोधन विषय, कालखंड या विषयीच्या मर्यादा संशोधनावर पडत असतात. सत्यता पडताळणे हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. म्हणून संशोधकाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. 'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' अभ्यास करताना अनेक मर्यादा पडतात.

- सिंध प्रांतातून सिंधी समाज काही प्रमाणात इतरत्र स्थलांरित झाला. जे काही सिंधी प्रांत सोडून आले ते भारतात व अन्य देशभर विखुरले गेले तरी माझा विषय फक्त उल्हासनगरमधील सिंधी समाजावर प्रकाश टाकतो.
- सर्वप्रथम उल्हासनगरातील स्थायिक झालेल्या व्यक्ती बोटावर मोजण्याइतपत शिल्लक आहेत. त्याची पूर्वीची पिढी हयात नाही. दुसरी व तिसरी पिढीतील व्यक्ती थोड्या प्रमाणात आहे नवीन पिढीला फारसा इतिहास माहीत नाही.
- संशोधनाचे स्वरूप वर्णनात्मक , मुलाखत चर्चात्मक प्रश्नावली व मौखिक स्त्रोतातून उपलब्ध करण्यात आली आहे.

■ संशोधनाचे महत्व–

'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' या संशोधनाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता आहे.

- या संशोधनामुळे उल्हासनगरमधील सिंधी समाजाचे योगदान सिद्ध होईल.

- उल्हासनगरमधील उद्योगधंदे व व्यवसाय याबाबत माहिती मिळेल.
- सिंधी समाजाचे सामाजिक जीवन व धार्मिक तेतील योगदान स्पष्ट होईल.
- उल्हासनगरमधील प्रसिध्द बाजारपेठेची माहिती उपलब्ध होईल.
- सिंधी समाजाने व्यवसायात समाजातील इतर व्यक्ती घटकांना रोजगार उपलब्ध करुन दिला या गोष्टी समोर येण्यास मदत होईल.

■ संशोधनाची गृहितकृत्ये –

संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे स्पष्ट होतात.

१) उल्हासनगरमधील सिंधी समाज व्यवसायात सतत कार्यशील आहे.

२) विपन्न आर्थिक अवस्थेतून संपन्नतेकडे वाटचाल झालेली आढळते.

३) समाजातील इतर घटकातील समाजाला रोजगार प्राप्त करून दिला

४) उल्हासनगरमधील दर्शनीय धार्मिक स्थळाची ओळख स्पष्ट होते

५) शिक्षण क्षेत्रात उल्हासनगरामधील सिंधींचे योगदान उल्लेखनीय आहे.

■ संशोधन पध्दती –

प्रस्तुत संशोधनाचा हेतू साध्य करण्यासाठी आणि दिलेली गृहीतके, सिध्द करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. विशेषत: लिखित व अलिखित साधनांचा आधार घेऊन संशोधन केले आहे. प्राथमिक साधनामध्ये समावेश असलेल्या प्रत्येक स्थळाला प्रत्यक्ष भेट देऊन माहितीचे संकलन केले आहे. यामध्ये प्रश्नावली, मुलाखत चर्चात्मक मौखिक स्त्रोत सर्वप्रथम उल्हासनगरात स्थायिक झालेल्या व्यक्ती समाजसेवी संस्थांचा समावेश आहे. दुय्यम साधनांमध्ये संदर्भ साहित्य, ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, गॅझेटियर, जर्नल इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

तथ्य संकलन –

प्रस्तुत संशोधनासाठी या अभ्यासविषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

प्राथमिक साधने–

प्रश्नावली, चर्चात्मक मुलाखत, जनगणना अहवाल, मौखिक स्त्रोत, समाजसेवी संस्था प्रत्यक्ष कागदपत्रे इत्यादी साधनांतून माहिती मिळवली.

मुंबई पुराभिलेखागार कार्यालयातून मिळालेली माहिती, आर्थिक व राजकीय संस्थांचे वार्षिक अहवाल व हस्तलिखिते, संशोधकाने मंदिरे व बाजारपेठा यांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली आहे.

विविध छायाचित्रे व फोटो, नकाशे इत्यादींचा वापर संशोधकाने केला आहे.

प्रश्नावली भरून घेणे, मुलाखती घेणे, चर्चा व भेटीतून माहिती मिळविणे, वर्तमानपत्रे, लेख याद्वारे माहिती मिळवली.

दुय्यम साधने–

दुय्यम साधनात संदर्भ साहित्य, वृत्तपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित साधने, राजपत्र, जर्नल यातून माहिती उपलब्ध झाली.

विविध संदर्भ पुस्तके तसेच विविध कार्यालये व संस्थांचे रेकॉर्डस्, विश्वकोष व संस्कृतीकोष खंड, एम.ए.चा प्रबंध वरील साधनांच्या सहाय्याने संशोधन अचूक करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यामुळे संशोधनाचे योग्य विश्लेषण व अचूक निदान करता आले.

साहित्याचे पुनर्विलोकन–

सिंधी समाज संस्कृती सिंधीचे जागतिक व्यापारातील महत्व यावर काही प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ झाले आहेत. त्यातून त्याची व्यवसायातील कौशल्य समजण्यास मदत होते. माझा प्रबंध विशेष करुन उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास हा आहे. उल्हासनगरमधील सिंधी समाजावर सविस्तर अभ्यास झालेला नाही. काही ग्रंथाचे पुनर्विलोकन प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आले आहे.

उल्हासनगर 'अ सोशोलॉजिकल स्टडी इन अर्बन डेव्हलपमेंट' टी. के. करूणाकरण (१९५८) यांनी समाजशास्त्र या एम. ए. प्रबंधातून उल्हासनगरची स्थळ व ऐतिहासिक पार्श्वभूमी छावणीची उपनगरातील स्थिती निर्वासितांचे पुनर्वसन, व्यवसाय, रोजगार, बेकारी, विशिष्ट कालखंडापर्यंत मर्यादित आहे.

'हमारा शहर उल्हासनगर' इतिहास उल्हासनगर का पुस्तक का पहला भाग (२०१२), पुस्तक का दुसरा भाग (२०१३) यामध्ये घनश्याम बठेजा यांनी सिंधपासून ते सिंधींच्या स्वातंत्र्य संग्रमातील कामगिरी उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर एक पासून ते कॅम्प नंबर पाच पर्यंत माहिती दिली आहे ही माहिती थोड्क्यात दिलेली आहे.

दादा वासवानी यांनी 'वुई द सिंधी' (२०१३) फाळणीनंतरच्या आठवणी, झुलेलाल देवाचे जीवन, सिंधी भाषा, लिपी, विवाहप्रथा, साहित्य, आहार, आध्यात्मिकता, सण, उत्सव, धार्मिकता यावर माहिती दिलेली आहे..

डॉ. माधवी वैद्य (२००९) यांनी 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र महाराष्ट्र साहित्य पत्रिकामध्ये सिंधी आणि मराठीमध्ये साम्य आहे. तसेच मराठीशी साधर्म्य असणारे किमान ५००० शब्द तसेच काही वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

लेखक लालसिंह हजारीसिंह अजवाणी (१९८२)यांनी सिंधी साहित्याचा इतिहास सिंधी भाषा व तिची परंपरा यामध्ये अनेक साहित्यकांनी केलेले भाष्य व्याकरणदृष्ट्या तिला सर्वोच्च स्थान आहे. सिंधी भाषा जुन्या प्राकृत भाषेला अधिक जवळची भाषा संस्कृत प्राकृत भाषांतील ती एक सर्वात जुनी भाषा आहे. अरबी–फारसी मातृभाषा असलेल्या लोकांच्या संपर्कामुळे सिंधी भाषा प्रामुख्याने अरबी व फारसी भाषांनी समृध्द केली.

'रिलीव्हन ऑफ किनेशन्स ट्रेड थेअरी विथ सिंधी इकॉनॉमी इंटरनॅशनल' या डॉ. पाठक मंजू लालवानी यांच्या ई–पब्लिकेशनमध्ये सिंधी अर्थव्यवस्था १५ व्या शतकापासून आहे, दक्षिण अशियातील व्यापारी म्हणून अतिशय प्रसिध्द आहेत. त्यांनी त्यांचा व्यापार अनेक देशात विस्तारला. सिंधमधील स्थलांतरीत सिंधी यांची अर्थव्यवस्था कोलमडली. परंतु

व्यापारातील आवड त्यांची निपुणता यामुळे आर्थिकदृष्ट्या व्यवस्थित स्वतःच्या प्रयत्नावर भारतातच नाहीत तर संपूर्ण जगभरात स्थिर आहे याबद्दल उल्लेख आहे.

अशा प्रकारे वरील ग्रंथातून सिंधी समाजाची विविध माहिती दिली आहे. तरी उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास यावर संशोधन झाले नाही म्हणून 'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' माहितीचा समावेश केला आहे.

प्रकरण योजना –

प्रस्तुत अभ्यासासाठी एकूण सात प्रकरणात विभागणी केलेली आहे. संशोधनाचा थोड्क्यात आढावा खालीलप्रमाणे आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन आराखडा सांगितलेला आहे. त्यात संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन मर्यादा, संशोधनाचे महत्व, तथ्य संकलन संदर्भीय संशोधन साहित्याचे, पुनर्विलोकन, प्रकरण नियोजन या टप्प्याची विस्तृत मांड्णी केलेली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये उल्हासनगरची ऐतिहासिक पार्श्वभूमी व स्थळ, हवामान, गावाचे उपनगरात स्थापना, छावणीचा विकास उपनगरात, उल्हासनगरचा संक्षिप्त विकास इत्यादीची विस्तृत मांड्णी केलेली आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये निर्वासित म्हणून स्थायिक झालेल्या निर्वासितांचे आर्थिक पुनर्वसन, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, आर्थिक जीवनात रेल्वे स्टेशनचे योगदान उल्हासनगरमधील बाजारपेठा, फर्निचर मार्केट, कापड व्यवसाय, जीन्स पॅन्ट कारखाना, इलेक्ट्रॉनिक वस्तू, दैनंदिन जीवनातील विविध वस्तू उद्योग व्यवसायातील महत्वाचे व्यावसायिक या सर्व मुद्यांच्या आधारे माहिती सांगितलेली आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये सामाजिक जीवनातील जातीय संरचना, आहार, शिक्षण, स्त्रियांचे स्थान, विवाहप्रथा पध्दत, पोषाख, सिंधी भाषा साहित्य याआधारे माहिती सांगण्यात आली आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये सिंधी संस्कृतीतील धार्मिक जीवनातील गोष्टीवर प्रकाश टाकलेला आहे. सूफी सिध्दान्ताचा प्रभाव हिंदू व मुस्लीम लोकांच्या भक्तीपंथात सरमिसळ झालेली दिसते. हिंदू व शीख धर्मातही सरमिसळ झालेली दिसते लोहाणा जातीतील बहुतेक लोक नानकशाही पंथाचे अनुयायी आहे. सिंधी हिंदूच्या, धार्मिक विधीच्या प्रारंभी गणेशपूजन केले जाते. उल्हासनगरात झुलेलाल यांचा जन्मोत्सव, चालिया महोत्सव, थदडी पर्व, जलपूजा महत्वाची आहे. उल्हासनगरात अनेक दर्शनीय स्थळाची माहिती विविध आश्रम यातून त्याची आध्यात्मिक प्रगती दिसून येते. मर्तिकप्रथा, हा महत्वाचा संस्कार केला जातो.

सहाव्या प्रकरणामध्ये उल्हासनगरमधील राजकीय जीवनातील प्रशासनव्यवस्था महानगरपालिकेचा कारभार यावर सविस्तर माहिती दिलेली आहे. केंद्र शासनाने सर्वप्रथम उल्हासनगर महानगरपालिकेची स्थापना केली. केंद्रशासनाकडून नगरपालिकेला सुरुवातीची पाच वर्षे अनुदान दिले जात होते. नंतर अनुदान बंद करुन स्थानिक प्रशासनाने विविध कर आकारण्यास सुस्वात केली. उल्हासनगर शहराला महानगरपालिकेचा दर्जा देण्यात आला. नगरपालिका, स्थानिक , कारभार पाहते. अवैध, बांधकाम, बेसुमार लोकसंख्या, रस्ते, वीज पाणी मूलभूत सोयी सुविधाचा अभाव असे अनेक प्रश्न आहेत.

सातव्या प्रकरणामध्ये 'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ.स. १९४७ ते २०००' यामध्ये संशोधकाने प्राप्त केलेल्या विषयासंदर्भातील निष्कर्ष उद्दिष्टनुसार प्रकरणात मांडलेले आहे.

– संदर्भ सूची –.

१. कोलगंडे रामचंद्र गोविंद – 'ऋग्वेद दर्शन' (ऋग्वेदात रंग समालोचन) प्रकाशक – रामचंद्र गोविंद कोलगंडे, श्री. आण्णासाहेब नवरे यांचा बंगला, शीव, मुंबई २२. पृष्ठ क्र.४४१

२. तत्रैव – पृष्ठ क्र. ४४६

३. तत्रैव – पृष्ठ क्र. ४४७

४. वर्तक डॉ. पद्माकर विष्णू 'वास्तव रामायण' प्रथम प्रकाशन शके १९०० शनिवार दि. ८ एप्रिल, १९७८, पृष्ठ क्र. १९९, २००

५. जोशी पं. महादेवशास्त्री 'महाभारत' (कथा, चरित्र आणि विवेचन), अनमोल प्रकाशन, पुणे २. द्वितीय आवृत्ती १९८९, पृष्ठ क्र. १२५

६. गाडगीळ अमरेन्द्र लक्ष्मण 'महाभारत–सर्वांगीण दर्शन' मासिक प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली शके १९११, सन १९८९, पृष्ठ क्र. ५१, ५२

७. तत्रैव – पृष्ठ क्र. ५२

८. कल्हणकृत 'राजतरंगिणी संस्कृत' ग्रंथ 'स्टिनकृत' इंग्रजी भाषांतर यावरून लेले माधवराव व्यंकटेश, प्रकाशक शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६, सदाशिव पेठ, व पुणे शहर १९२९, पृष्ठ क्र. १९

९. Pinjani Hema Ravi, Sindhi Resettlement in Ulhasnagar Historicity Research Journal ISSN 2393 - 8900 Volume - 3, Issue - 4, December 2016 पृष्ठ क्र.२

१०. बठेजा घनश्याम 'हमारा शहर उल्हासनगर २०१२' पुस्तक का पहला भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. १६

११. Vaswani Dada J. P., 'We the Sindhis' Sleek Advertising P. Ltd., June 2013, ISBN No. 978-81-927065-0-4 p.n. 18

१२. https://hi.m.wikipedia.org/wiki सिंधू घाटी सभ्यता

१३. Vaswani Dada J. P 3 नि p.n.18

प्रकरण–२ रे

उल्हासनगर शहर पार्श्वभूमी

१) उल्हासनगर शहर व ऐतिहासिक पार्श्वभूमी –

१९४७ मध्ये तात्कालीन गव्हर्नर जनरल माऊंटबॅटन यांच्या लक्षात आले की, देशाच्या समस्येचे निराकरण केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. ३ जून १९४७ माऊंटबॅटन योजनेअंतर्गत त्यांनी भारत व पाकिस्तान या दोन्ही देशातील नेत्यांना विश्वास दिला की, भारत आणि पाकिस्तान वेगळे होऊन हिंदू आणि मुस्लिम स्वत: निर्णय घेतील की, ते भारत आणि पाकिस्तानचा भाग असण्याचे ठरवतील. सिंधमधील राजकीय भेदभाव, सरकार धोरण, हिंदूविरुद्ध न्यायिक निर्णय आहे. कराचीमध्ये शहराच्या मॅजिस्ट्रेटचे पद नियुक्त झाले नाही. फक्त मुसलमान नियुक्त होऊ शकला नाही म्हणूनच ते रद्द करण्यात आले. असे प्रची प्रेस जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले. सामाजिक भेदभावाने सिंधीमध्ये तणाव निर्माण केला.[१]

इ.स १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली. त्याचा परिणाम असा झाला की, लाखभर हिंदू पाकिस्तान सोडून भारतात स्थायिक झाले. राज्यभरातून निर्वासितांचे पुनर्वसनासाठी अनेक कॅम्प उपनगरात वसविण्यात आले.[२] भारत सरकारने प्रांतीय केंद्र काठियावाड आणि राजस्थान, तसेच पुनर्वसित केंद्र चेंबुर, पवई, विरार, मुलुंड, बोरिवली आणि इतर ठिकाणी कॅम्प निवासस्थानाची सोय अंदाजे १५००० निर्वासित अशी केली होती.

इ.स.१९४८ मध्ये मुंबई प्रांतातील कल्याण या ठिकाणी १ लाख २९ हजार शरणार्थी सैनिकी तळ असलेल्या पाच कॅम्पमध्ये वसविण्यात आले. सिंधी हिंदू शरणार्थी मुंबई, राजस्थानमध्ये भारत आणि सर्वांत महत्त्वाचे सिंधींसाठी उल्हासनगर होते. संक्रमण शिबिर हे मूलतः ६००० सैनिकांसाठी होते. परंतु लोकसंख्या ८०,००० होती. संरक्षण मंत्रालयातर्फे २,१२६ बॅरेक बांधण्यात आले. सैनिकांसाठी त्यांना मूलभूत सुविधा वीज अंबरनाथ येथील ऑर्डनन्स कारखाना व पाणी बदलापूर धरणातून दिले जात.[३]

गव्हर्नर जनरल श्री. सी. राजगोपालचारी यांनी ८ ऑगस्ट, १९४९ रोजी उल्हासनगर हे नाव दिले. काही सिंधी निवासी ह्या जागेला 'सिंधुनगर' म्हणतात. उल्हासनगर हे नाव

'उल्हास' नदीच्या नावापासून ठेवले आहे.[४] ही नदी गावच्या उत्तरेच्या सीमेवर वाहते. उल्हासनगर म्हणजे 'आनंदाचे शहर' शासनाने असा विचार केला की विस्थापित लोक ज्यांनी त्यांना अतिप्रिय असणाऱ्या वस्तुचा त्याग केला, त्यांना नवीन घर, वाडी नवीन अर्थपूर्ण नाव मिळाल्यामुळे त्यांचे सांत्वन करण्यात आले.

२) स्थानिक ठिकाण –

उल्हासनगर हे शहर कल्याण तालुक्यात ठाणे जिल्ह्यात व मुंबईपासून ६० किलोमीटर दूर आहे. कल्याणपासून तीन मैल अंतरावर आहे. कल्याण हे मुंबईतील दूरचे उपनगर असल्यामुळे□ कल्याणमधून नियमित उपनगरीय रेल्वे सेवा उपलब्ध आहे. ह्या सोयीमुळे उल्हासनगर हे मुख्य रस्त्याशी जोडले गेले आहे. मुंबई–पुणे रोड दहा मैल अंतरावर शीळ रोडशी जोडले गेले आहे. ईशान्येकडील मध्यरेल्वेची शाखा इगतपुरी आणि आग्नेयकडील पुणे शाखा या शाखांनी कल्याणला एक महत्त्वाचे आगगाडीचे स्थानक आहे. याशिवाय कल्याण रेल्वे स्थानक हे उपनगर शहाड स्थानकासाठी तर मुंबई–इगतपुरी, विठ्ठलवाडी आणि उल्हासनगर व मुंबई–पुणे रस्त्याला जोडले गेले आहे. अंबरनाथ आगगाडी स्थानकदेखील उल्हासनगरपासून दूर नाही. कल्याण–बदलापूर रोड उल्हासनगर ह्या उपशहरातूनच जातो. ह्या शहरातील कल्याण–बदलापूर हा मुख्य रस्ता सर्वाधिक रहदारीचा आहे.[५]

३) विभाग आणि सीमा –

अधिकृत जमीन ३००० एकर छावणीसाठी ठेवली आहे. आणि अंदाजे चार मैल उत्तरेकडून पूर्वेकडे आणि एक मैल पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. ही जमीन उल्हास नदीशी उत्तरेला जोडली गेली आहे. उल्हास नदीच्या पलीकडे नानावटी तेल मील आणि नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन आहे. उल्हास नदी आणि कल्याण–मुरबाड रोड मधील जागेत लष्कर दुग्धव्यवसाय व शेती याने व्यापलेले आहे. पण ही जागा खाजगी उद्योगपतींना विकण्यात आली आणि बिर्लाने रेयॉन कारखाना सुरू केलेला हा 'सेंच्युरी रेयॉन कारखाना' म्हणून ओळखला जातो. ह्या कारखान्याच्या उत्तरेकडे आणि वायव्येकडे काही दुसरे कारखाने आहेत. जसे की भारतीय रंगद्रव्य सामान कारखाना, अमर रंगद्रव्य कारखाना अशा प्रकारचे कारखाने ही वस्ती उल्हासनगरच्या उत्तर–पश्चिम सीमेवरील औद्योगिक पट्टा म्हणून ओळखला जातो. दक्षिणेकडील

कल्याण–मुरबाड रोडवरील शहाड रेल्वे स्थानकाजवळील छावणी–१ दुसऱ्या एका कारखान्याला मंजुरी मिळाली होती आणि ह्या कारखान्याचे बांधकाम व इतर कामे १९५७ पासून सुरू झाले होते. उल्हास नदीच्या उत्तर पश्चिमेला सोनावला केमिकल्स लिमिटेड हा कारखाना वसलेला आहे. ह्या शहराच्या पश्चिमेकडे आणि ईशान्येकडील कल्याण–बदलापूर रोडवर काही सर्वेक्षण नंबर शेतीसाठी वापरले जात.[६]

४) हवामान स्थिती –

उल्हासनगरचे हवामान ६९^{0}F ते १०५^{0}F आणि ८० ते १२० इंच पाऊस जून ते ऑक्टोबरमध्ये पडतो.[७] विशेषतः उन्हाळ्यात संध्याकाळी उल्हासनगरमध्ये अतिशय आनंदी व शुध्द हवा असते आणि हे बऱ्याच लोकांसाठी आरामदायी शहर आहे. कडक हिवाळा नसतो. उन्हाळ्यात जरी उष्णता १०५^{0}F वर जात नसली तरी इथल्या लोकांना हा उन्हाळा थंड हवेमुळे जाणवत नाही. छावणीच्या आसपासच्या जागेचे ठिकाण अतिशय कोरडे असून थंड वातावरण आहे.[८] दहा वर्षात १८८१ पर्यंत पाऊस ८६ इंच साधारण पडतो.[९] पूर्वेकडील भाग हा खडकाळ आहे. भात हे प्रमुख धान्य पीक नमुद करण्यात आले आहे. ह्या व्यतिरिक्त नाचणी, चणा आणि इतर डाळी जसे वाटाणा, हिरवे चणे, काळे चणे इतर डाळी ह्या भागात पिकविले जात.

तंतुमय पिके, भाजीपाला आणि इतर बागेतील उत्पन्नसुध्दा उपलब्ध आहे. उल्हासनगरमधील किती प्रमाणातील जागा ही पिके पिकवतात याचा काहीही कागदोपत्री उल्लेख दिसत नाही. ह्या भागातील निवासी लष्कर प्रस्थापना छावणी प्रस्थापित करण्यासाठी प्राधान्य देत आहेत. पूर्वीच्या तपासणीचे ह्या जमिनीचे कागदपत्रे असे दर्शवितात की उल्हासनगरखालील जमिनी ह्या मुख्यतः खेडे व शेतीसाठी आहेत. [१०]

आता कालांतराने उपनगरात बदल झालेले आढळून येतात. शेतीच्या जमिनी विकल्या जाऊ लागल्या, त्या जागी वस्ती, अनेक इमारती उभ्या राहिल्या. हवामानातदेखील कमी–अधिक प्रमाणात अनपेक्षित बदल झालेला आढळून येतो. व्यवसाय–उद्योगधंदे व्याप्त असे उल्हासनगर दिसून आले.

५) गावाचे उपनगरात स्थापना व संक्षिप्त ऐतिहासिक रेखाटन (Village Constituting the Township and Their Brief Historical Sketch)

उल्हासनगर लहान गावात लष्कर आधिपत्याखाली छावणी म्हणून निवडण्यात आली. दक्षिणेकडील लष्कर नं. १४१३६/क्यु–३ ३१ ऑगस्ट, १९४३ ह्याचे पत्रक जे प्राप्ती विभाग मुंबई सचिव यांना पाठविण्यात आले. त्यात खालील बाबी दिसतात.

१. मुंबईमधील वास्तू कमी करणे. संकुलनामार्फत ठरविण्यात आले आहे की, कल्याणमधील कल्याण–अंबरनाथ रोडवरील उत्तर व दक्षिणेकडे २०,००० खाजगी परिसराचा वापर करणे.

२. उप–परिसर १६७.एल.सी.चे सेनापती ह्यांनी माहिती दिली, सूचना केली आहे की, स्थानिक दिवाणी प्राधिकृत योग्य बनविणे.

३. छावणी असलेले शहाड खेडे. गरज म्हणून सुरक्षित स्थळ आणि आरोग्य या गरजेचे निश्चित असलेली भातशेती यामुळे हा परिसर स्थापित होता. युध्दाच्या वेळी लष्करी अधिकारी अतिशय चांगली खुली जागा निवडतात. जी माणसाच्या आरोग्यासाठी योग्य असेल आणि हे निष्पन्न झाले की छावणीसाठीची जागा ही आरोग्याच्या दृष्टिकोनातून निवडली जाते.

उल्हासनगर उपनगर (Transit) संक्रमण छावणी निर्माण झाली आहे. कारण ते आरोग्यदायी क्षेत्र आहे.

मामलतदार कल्याण लष्करी अधिकारासाठी ही जागा क्षेत्रयोग्य नसल्यामुळे त्यांनी ह्या बदल्यात बदलापूर जवळील जागा निवडली आहे. त्याचे पत्रक नं. L.A.Q. M.R. 23 २७ सप्टेंबर, १९४३ ठाणे कलेक्टरला लिहिलेले त्यात नमुद करण्यात आलेले खालील काही मुद्दे आहेत.

संपूर्ण ११८० एकर मधून ४२१ एकर जमीन ही पिकासाठी आहे, तर २१ एकर जमिनीवर खेड्यातील इमारती बांधण्यात आल्या आहेत. ह्या जागेवर २ टँक १८ विहिरी व जवळपास २९१ इमारती आहेत. जवळपास १८९५ माणसे २८२ भाडेकरू ह्या सर्वांवर परिणाम

होता छावणी संपादन बेत करण्यात ह्या व्यक्तीची फक्त जमीनच घेतली जात नाही तर त्यांची घरेदेखील संपादन केली जातात. यापूर्वीच जवळपास २७ एकर जमीन लष्कर विभागाने कब्जा केलेला आहे. हे गृहीत धरण्यात आले की ह्या जागेवरील रस्ता हा खुला ठेवण्यात येईल. कारण, हा जाहीर लोकांसाठी कल्याण ते बदलापूरला जाणारा रस्ता आहे.

वरील पत्रक जे मामलेदार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेले आहे हे पत्रक अतिशय लक्षणीय आहे. हे पत्रक स्पष्टपणे निष्पाप गावकऱ्यांची भीती आणि धास्ती दर्शविते. ह्या गावकऱ्यांवर जमीन मागणीचा परिणाम झालेला दिसतो. हे गावकरी बहुधा असा विचार करत आहेत की लष्कर अधिकारी कदाचित लोकांचा रहदारीचा रस्ता बंद करतील. तथापि लष्करी प्राधिकरणाला तातडीची गरज होती आणि जिल्हाधिकाऱ्याकडून त्यांना हवी असलेली जागा अधिगृहीत करून घेतली. लष्करी प्राधिकरणाने कुठल्याही कामकाजाच्या आधीच जमिनीचा भाग व्यापून टाकला आहे.

तथापि ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी दुय्यम नियमानुसार अधिकार बहाल केले आहेत. नियम ७५ए बचाव भारतीय नियम अधिगृहीत Transit छावणीसाठीची जागा त्यातील नियम L.A.Q. 437: 12.11.1943 पुढील प्रमाणे आहेत –

१. अधिकृत मालमत्ता ही सुरू राहील. युध्द अवधित आणि सहा महिने आधी व नंतर.
२. कोणतेही बांधकाम जे अधिगृहीत केलेले आहे. सोडण्याच्या आधी हे बांधकाम तोडले जाते.
३. ती मालमत्ता जशी घेतली होती. त्याच परिस्थितीत, अवस्थेत वापस मालकाला दिली गेली पाहिजे.
४. जर एखादी मालमत्ता अधिगृहीत काळात नष्ट झाली तर त्याची योग्य भरपाई करावी लागेल.

लष्कर प्राधिकृत आणि प्राप्ती विभाग, मुंबई गोपनीय पत्रव्यवहार तपासणीत खालील मुद्दे प्रकट करण्यात आले आहेत. मुख्य छावणीची जागा ही लष्कर दुग्धव्यवसायासाठी वापरण्यास घेण्यात आली. दिवाणी अधिकृत ११/१२/१९४५ ह्यावेळी –

a. कच्च्या घरांच्या मालकांना ५0% बाजारभाव देणे आणि त्यांना इमारत तोडण्यास परवानगी देणे.

b. पक्क्या घराच्या मालकाला बाजारभाव आणि वार्षिक भाडे देण्यात येते.

c. गॅरिसन इंजिनिअर, कल्याण ह्यांनी विनंती केली की, जी झाडे लष्करी कारणासाठी तोडण्यात येणार आहेत, त्याची तंतोतंत यादी द्यावी.

वरील सत्य हे अधिगृहीत जमिनीच्या अवस्थेवर आहे. जमीन अधिकृत करतेवेळी अधिकाऱ्यांनी असा विचार केला की जमीन मालकाला परत देऊन त्याच्यातील शत्रुत्व थांबवावे. अखेरीस हा भाग कदाचित लहान शहरात परावर्तित होईल आणि पुन्हा एकदा पाकिस्तानातील व्यक्ती तेथे विस्थापित होतील. [११]

६) कल्याण संक्रमण शिबिर (Kalyan Transit Camp) –

कल्याण संक्रमण शिबिरात लष्कर अधिकाराखाली बांधकाम केलेल्या वास्तूचा कुठेही लिहून ठेवलेला रेकॉर्ड नाही. म्हणून अचूक सांख्यिक माहिती नाही.

प्रशासनाच्या सोयीसाठी लष्करी अधिकाऱ्यांनी सर्व क्षेत्र पाच वेगवेगळ्या छावणीत विभागले. छावणीत त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे बांधकाम केले आहे. ज्यात लष्कर व त्याचे अधिकारी राहतात. ह्या बांधकामात मोठ्या प्रमाणात खुले मोठे हॉल बनविले गेले आहेत. पण अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र खोल्या देण्यात आल्या आहेत. आतासुध्दा हे क्षेत्र ओटी (ओ.टी.ऑफिसर टेनामेन्टल) विभाग म्हणून ओळखला जातो. जसे विस्थापित व्यक्ती ह्या छावणीसाठी धाव घेतात अशा राहण्याच्या जागेची खूप जास्त मागणी आहे. साक्षर आणि प्रभावशाली व्यक्ती राहण्याचे ठिकाण मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. लष्करासाठी बांधलेली घरे रस्त्याला लागून आहेत. अत्यावश्यक सुखसोयीदेखील पुरविण्यात आल्या आहेत. २0,000 माणसांना आश्रय देण्याच्या दृष्टिकोनातून ही छावणी निर्माण करण्यात आली. हे विभाग अतिशय परिपूर्ण बनविण्यात आले आहेत. ते स्वपर्याप्त बनविण्यात आले. लष्करी अधिकाऱ्याने डेअरी फार्म, दवाखाने, पाणी, बचत, साठवणे, लाईट, बेकरी, नाट्यशाळा, पोहण्यासाठी तळे, अधिकाऱ्यांसाठी मंडळ, जलपानगृहे, दुकाने, धोबीघाट, साहित्य, भांडार, कॅन्टीन्स, खेळ मैदाने, शैक्षणिक संस्था, कृतिसत्र, कोठार भरणा इ. सर्व सुखसोयी पुरविण्यात आल्या आहेत.

लष्कर प्रमुखांनी पाच छावण्या वेगळ्या बनविल्या. ह्या छावण्या निर्वासित छावण्यांमध्ये स्थलांतरित केल्या आहेत. ह्या सर्व रेफ्युजी छावण्यांवर कॅम्प कंमाडरचे किंवा लष्कराच्या कमांडरचे नियंत्रण असते. छावणी नंबर ३ मधील लष्करी दवाखाना हा गावचा मध्य दवाखाना म्हणून बदल करण्यात आला आहे. छावणी तीन मधील Daily, Graphic Club दोन कामे करतात. हे राहण्यासाठी बांधले गेले असले तरी दोन महत्त्वाचे कार्यालय कार्यरत होते. त्याला ऑफिस बिल्डींग द हाऊसिंग बोर्ड, उल्हासनगर म्हणून ह्या इमारतीत पदवीधरांचे कार्यालय, उल्हासनगरचे ॲडमिनिस्ट्रेटर हे ह्या कार्यालयाचे चेअरमन आहेत. (I.E.M.E.) आय.इ.एम.इ. छावणी चारमध्ये व्यावसायिक ट्रेनिंग सेंटर चालविले जाते. ह्या बरोबर लष्कराने तयार केलेली छावणी नं. ५ ही शासकीय दवाखाना व शाळे□साठी वापरण्यात येत आहे. अशा प्रकारे बरेच बांधकाम जे लष्कराच्या मालकीचे आहे, त्याचा उपयोग त्यांनी लोकांना मदत करण्यासाठी केला आहे. त्यांनी निराधार लोकांना जागा, घरे दिली आणि बऱ्याच सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत, जे ह्या लोकांना गरजेचे होते. [१२]

७) संक्रमण शिबिर ते निर्वासित उपनगर (Transit Camp into Refugee Township)-

लष्करी संक्रमणाच्या छावणीत निर्वासित माणसे असली तरी त्यांना मुंबई शहरात राहण्याचे ठिकाण मिळावे, अशी इच्छा होती. मुंबई शासनाने पश्चिम पाकिस्तानातील निर्वासितांसाठी कायमचे स्थिर पुनर्वसन उल्हासनगर येथे तयार करण्याचे ठरविले. शासन पूर्णपणे निर्वासित लोकांचे कौतुक करते की जे व्यापारी आहेत व त्यांना मुंबई जवळ किंवा इतर ठिकाणी व्यावसायिक केंद्र त्यांना पुरवण्यात यावे. पण ते असह्य लाचार झाले. कारण मुंबई ही त्या वेळी खूप गर्दीची होती. किंवा मुंबईत खूप जास्त गर्दी झाली होती. म्हणून शासनाने ह्या लोकांसाठी नवीन उपनगर तयार करण्याचे ठरविले. ज्यात २ लाख इतकी माणसे राहू शकतील. व ती जागा होती कल्याण तालुक्यातील संक्रमण छावणी. ह्या उद्देशासाठी शासनाने ३००० एकर जमीन संपादन केली आणि गरजेनुसार प्रशासकीय मांडणी केली. ह्या उपनगराचे विकासाचे काम कृतीत उतरविण्यासाठी स्थानिक उपविभाग मुंबई ०४/०७/१९४९ रोजी झाली. अशा प्रकारे हे उपनगर मुंबई शासनाने प्रशासित केले आणि कल्याण तालुका ठाणे जिल्ह्यात प्रशासित केला. रहिवाशांमध्ये मुख्यत्वे व्यापारी आणि धंदा ह्या क्षेत्रातले असून त्यांना खेड्यात राहण्यात कुठलाही आनंद नव्हता. पण फक्त त्यांचा व्यापार व धंदा यासाठी मुंबईपासून

दूर असलेल्या गावात राहतात. म्हणून ते ह्या प्रयत्नासाठी खूप खूश नाहीत, म्हणून हे लोक राज्याच्या ह्या प्रयत्नाचे काहीही कौतुक करत नाहीत. जरी इतर छावण्यांशी तुलना करता कल्याण छावणीत त्यांना इतर छावणीपेक्षा जास्त आणि चांगल्या सुखसोयी आणि परिस्थिती पुरविण्यात आली आहे. ह्या परिस्थितीत हे नैसर्गिक होते की, हे उपनगर उभे करण्यासाठी साहाय्यता लांबविणे त्यांना शक्य नव्हते. त्यांना शासनाने उचललेल्या बऱ्याच पावलांविषयी चीड होती. ह्या सर्व परिस्थितीचा निकाल म्हणून त्यांच्यात खूप तणाव निर्माण झाला.[१३]

सिंधी समाजातील लोकांना जानेवारी १९४८ मध्ये मुंबई बंदरावर उतरविण्यात आले. काही दिवसांसाठी तेथेच ठेवण्यात आले आणि गुरुद्वारात जसे लंगर असते तशाच प्रकारे एका ठिक़ाणी पंगतीत बसून वरण, भात सरकारकडून मोफत दिले जात असे. लोकांना लोकल गाडीमध्ये भरून मिलिटरी कॅम्पमध्ये आणले. त्यावेळेस ट्रेन वाफेच्या इंजिनावर चालत होती. त्यावर चढून कल्याण कॅम्प (आजचे उल्हासनगर सेक्शन ३८/३९) मध्ये आणले गेले. जिथे आज साईबाबांचे मंदिर आहे, तिथे सर्वांना सोडून ज्यांना जी जागा मिळेल, तिथे राहायला सांगितले. हॉलसारखे लांबलचक बॅरेक होते. बॅरेकला बारदान लावून पडदे लावले होते. परिवार सदस्यांना घेऊन एका लाईनमध्ये राहत असे. आंघोळीसाठी पाणी बाहेरून आणावे लागे. पूर्ण कल्याण कॅम्प सिंधींसाठी खोलण्यात आला होता. सामान आणायचे असेल तर सिंधींना कल्याण, अंबरनाथ या ठिकाणी जावे लागत असे. आवश्यक वस्तू घेण्यासाठी प्रथम कॅम्प नं. ५ सुरू करण्यात आला. नंतर व्दितीय आणि चतुर्थ कॅम्प सुरू केला.

सरकारकडून सिंधींच्या परिवारातील प्रत्येक सदस्याला धान्य आणि भाजी मोफतमध्ये दिले जात असे. त्यासाठी रेशनकार्ड बनविण्यात आले. त्यावरून धान्य दिले जात असे. तेव्हा रेशन कार्यालयाचा नंबर एफ–४० हा होता. त्यावेळेस नेहरू चौक स्थित आज कामगार हॉस्पिटल या नावावरून ओळखले जाते तेथे रेशन कार्यालय होते.आणि आज हिल लाईन पोलीस स्टेशन कॅम्प नं. ५ होता. तेथे रेशन ऑफिस होते. तेथे कॅम्प कमांडरचे कार्यालय नंतर पोस्ट ऑफिस बनविले व पोस्ट ऑफिस बंद करून पोलिस स्टेशन बनविले आहे.[१४]

८) देखभाल भत्ता (Maintenance Allowance)–

अगदी सुरुवातीला जानेवारी १९५० पर्यंत मदत म्हणून देखभाल भत्ता निर्वासितांना दिला जात असे. अशा लोकांना तो दिला जात जे वृध्द, आजारी शारिरीक दृष्ट्या विकलांग आहेत. ते आपल्या शहरातील म्हणजेच पाकिस्तानातील स्थावर मालमत्ता सोडून भारतात आले, ज्यांना उदरनिर्वाहाचे साधन नाही. त्यांना १०० रुपयांपर्यंत मदत केली जात असे. परंतु रक्कम फक्त ८० हजार होती. एप्रिल १९५२–५३ पर्यंत आणि २३० कुटुंबांना हा देखभाल भत्ता दिला जात असे.

९) सदनिका वाटप आणि भाडे (Tenements Allocation and the Rent)–

सुरुवातीला पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांनी मिलीटरीचे बॅरेक आपल्या सोयीनुसार व्यापले होते. पण जेव्हा लोकसंख्या वाढली तेव्हा सरकारला काही निर्बंध घालणे भाग होते. १,१७५ बराकी १९४८ पर्यंत ८० हजार व्यक्तींची निवास व्यवस्था झाली. आता सरकारला नवीन व जुन्या सदनिका तयार करणे आणि त्यात खोल्या, त्याला लागून बाथरुम, प्रसाधन गृह, पाणीपुरवठा द्यायचा होता. ऑगस्ट १९४८ पर्यंत सदनिकांचा कोणताही मोबदला नव्हता. भाडे मोफत होते. पण नंतर १ रुपया ते ६ रुपर्यांपर्यंत भाडे आकारले जाणार होते आणि जास्तीत जास्त भाडे नवीन सदनिकेचे रुपये २९ असणार होते. अशा प्रकारे व्यवस्था लावण्यात आली.

१०) शिबिरातील दैनंदिन दिवस (Day to Day Camp Life) –

इ.स. १९५२ पासून समस्या, संघर्ष चालू होते. त्यांना अनेक सामाजिक अडथळे, त्रास सहन करावा लागला. पाणीपुरवठा समस्या होती. एक शौचालय १६ ते २० कुटुंबांना. पाण्याच्या टाकीची समस्या तर अतिशय त्रासदायक होती. झाकण निघालेले, दुर्गंधीयुक्त वास येत असे.

११) वैद्यकीय सुविधा (Medical Facilities) –

कॅम्प नंबर दोन मध्ये एक मध्यवर्ती रुग्णालय, त्यात २०५ खाटांची क्षमता होती. प्रसूती आणि टी.बी. रुग्णांसाठी विशेष वॉर्डची तरतूद होती. टी.बी. वॉर्डमध्ये ९० खाटा ज्या दाटीवाटीने होत्या. अतिरिक्त टी.बी. रुग्ण हे पुण्याला सरकारी उपचारांसाठी पाठविले जात.

टी.बी. विशेषज्ञ कॅम्पमध्ये नव्हते. अचानक आलेल्या ऑपरेशन केसेस हे ठाणे या तालुक्याच्या ठिकाणी पाठविले जात, जे २० मैल दूर होते.

याशिवाय सरकारने केंद्रीय रुग्णालय, अनेक धर्मादाय दवाखाने, मुंबईत जनहिताच्या दृष्टीने सिंधींनी सुरू केले. सिंधी सेवा समितीने होमिओपॅथिक रुग्णालय कॅम्प नंबर १ मध्ये आणि कॅम्प नंबर ३ मध्ये दोन आणखी रुग्णालये गरीब रुग्णांसाठी सुरू केली. [१५]

१२. संक्रमण शिबिरातील उपनगरातील स्थिती –

मुंबई शासनाने ह्या उपनगराला नाव देण्यापूर्वी ह्या निर्वासित लोकांचे मत पडताळून पाहिले, त्यांनी ह्या उपनगराला 'सिंधुनगर' असे नाव द्यावे, अशी इच्छा दर्शविली. पण मुंबई शासनाला कुठलाही असा मार्ग सापडला नाही की ज्याद्वारे ह्या लोकांची इच्छा पूर्ण करता येईल. उल्हासनगर उपनगर स्मरणिका मुंबई शासनाने प्रकाशित केली तेव्हा सी. राजगोपालचारी यांनी अशा स्मरणिकेचे अनावरण केले व त्यात सांगण्यात आले की जरी हे उपनगर २ लाख लोकसंख्येसाठी योजना असली तरी १ लाख ३० हजार माणसे इथे राहू शकतील. पुढे ह्या उपनगराची वाढ ही तेथील स्थायिक लोकांमुळे आणि यामुळे बरेच एकत्रित जाती इथे निर्माण झाल्या ह्या एकत्रित वेगवेगळ्या समाजामुळे मुंबई शासनाने ह्या उपनगराचे नाव 'सिंधूनगर' ठेवले नाही.

निर्वासित लोकांच्या काही नेत्यांनी काळा झेंडा प्रात्याक्षिके केली ज्यातून त्यांनी निर्वासित व्यक्तींचा राग व्यक्त केला आणि श्री. राजगोपालचारींची स्मरणिका बैठक अशांत केली, जी सोमवार दि. ८ ऑगस्ट, १९४९ रोजी होती. ह्या घटनेशी संबंधित काही नेते जेलमध्ये गेले, पण ते स्वस्त लोकप्रियता जिंकण्यात यशस्वी झाले आणि त्यातील काही जणांनी नंतर त्या लोकप्रियतेचा चांगलाच उपयोग करून घेतला.

ठाणे जिल्ह्यातील सेन्सस हॅण्ड्बुक नुसार (१९५३) जवळपास पाच शहरे आहेत. ते म्हणजे उल्हासनगर लोकसंख्या ८०,८६१ – कल्याण नगरपालिका ५८,९००, अंबरनाथ २१,४९८, डोंबिवली ८,१०६ आणि ठाणे नगरपालिका – ५०१५५. ह्या शहरी भागांमध्ये कल्याण आणि अंबरनाथ हे उल्हासनगरच्या जवळ आहेत.

कल्याण हे कल्याण तालुका, ठाणे जिल्ह्याचे मुख्य कार्यालय आहे. हे मुख्यालय मुंबईपासून ३३ मैल दूर वसलेले आहे आणि हे मध्य रेल्वेशी जोडले गेले आहे. ह्या शहरासाठी त्याची स्वतःची नगरपालिका आहे. कल्याण हे मुख्यतः मराठी बोलणाऱ्या हिंदूचे आहे. हे शहर व्यापार आणि इतर व्यावसायिक कामांसाठी बऱ्याचशा संधी उपलब्ध करून देते. कल्याणचे रहिवासी बऱ्याचदा उल्हासनगर, शहरात स्वस्त वस्तू खरेदीसाठी जातात, जे ते 'सिंधी बाजार' मधून खरेदी करतात. बरेचसे ह्या उपनगरातील सिनेमा घरात सिनेमा पाहण्यासाठी जातात.

कल्याणसारखेच अंबरनाथ नगरपालिकादेखील अतिशय जुना शहरी भाग मानला जातो. हा भागदेखील मुख्यतः हिंदू महाराष्ट्रीयन लोकांचा आहे. पण कंपनी भागात आणि इतर मोठ्या संपत्तीत सर्व प्रकारची माणसे दिसतात. उल्हासनगरहून बस किंवा रेल्वेने अंबरनाथला पोहोचू शकतो. ४५ मिनिटांत उल्हासनगरहून अंबरनाथ पायी अंतर आहे. अंबरनाथ येथील प्रसिध्द शिव मंदिर अंबरनाथ पालिकेच्या कक्षेत आहे. अंबरनाथ मधील लोक व व्यापारी मोठ्या प्रमाणात उल्हासनगरात स्वत दरात वस्तू विकत घेण्याच्या हेतूने जातात. ते सिनेमा पाहायला देखील जातात. अंबरनाथ येथील कंपनीत विशेषतः जे डिफेन्स मिनिस्ट्रीखाली येतात, त्या कंपनीमध्ये काही रहिवाशांना काम देण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे काही मॅनेजमेंट मुलाखती घेणाऱ्यांना असे वाटते की, सिंधी लोक टेक्निकल – तांत्रिक कामासाठी योग्य नाहीत. याशिवाय ते अतिशय उत्साही, त्यामुळे ते अशा नोकरीमध्ये थांबत नाही.[१६]

१३) छावणीचा विकास उपनगरात –

दुसरे महायुध्द इ.स. १९४५ मध्ये संपले भारताला इ.स. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारताची फाळणी झाली. पश्चिम पाकिस्तानातून शरणार्थी मोठ्या प्रमाणावर जमीन व मालमत्ता सोडून आले. त्या निर्वासितांचे पुनर्वसन करण्यासाठी उल्हासनगर, मुंबईच्या शेजारी असलेल्या उपनगरात एकत्र आणले. इ.स. १९४७–४८ मध्ये सरकारने त्यांच्या कल्याणासाठी, सुधारणेसाठी मोफत शिधा वाटप केली. १९४८ ते १९७१ पर्यंत केंद्र सरकारच्या योजनेनुसार विविध विभागात अधिकारी ह्या भागावर नियंत्रण करत होते.

संक्रमण शिबिराचा आराखडा म्हणून गृहनिर्माण करण्यासाठी हजारो कायम गृहनिर्माण करणे आवश्यक होते. १९४८ च्या अखेरीस नवीन नकाशा तयार करण्यात आला. हा नवीन नकाशा ह्या उपनगराचा सर्वांत पहिला मास्टर प्लॅन (आराखडा) होता.

१४) **नवीन उपनगर** (New Township) –

उल्हासनगर हे नवीन उपनगर दोन लाख लोकसंख्येसाठी ३००० एकर क्षेत्रात होते. हे क्षेत्र आठ विभागांमध्ये विभागले होते. प्रत्येक क्षेत्र हे सुविधा स्वतः सुधारणेत बाजारपेठा, शाळा, रुग्णालय, मनोरंजन, पोस्ट ऑफिस, बागा, सार्वजनिक हॉल यामध्ये विकसित करणे हे होय. ५३ एकर जागा ही राखीव ठेवण्यात आली. प्रशासकीय, न्यायालयीन आणि महापालिका कार्यालय स्थित होते. मुंबईच्या पश्चिमेला इगतपुरी बाजूला मोठ्या जमिनी उद्योग विकासासाठी होत्या.

दक्षिणेला ऑर्डनन्स कारखाना, अंबरनाथला १५० एकर जमिनीवर होता. ५४ एकर जमीन ही विशेष प्रकाश उद्योगासाठी राखीव होती. त्या वेळी छावणीत पाणीपुरवठा आणि ड्रेनेज व्यवस्था फक्त २५ हजार लोकसंख्येला पुरेसे इतकी होती. उद्योग आणि घरगुती वापरासाठी विद्युत ऊर्जा उपलब्ध करून दिली होती. आराखडा हा बॉम्बेतील उल्हासनगरला निसर्गतः मजबूत उपनगर व्हावे यासाठी तयार करण्यात आला. [१७]

१५) **उल्हासनगर** – १३ किलोमीटरवर वसलेले –

पहिले कल्याण मिलिटरी नावाने ओळखले जात हाते. ४.२.१९४८ ला मिलिटरी कॅम्प जो मागील तीन वर्षांपासून पडून होता, तो सिंधी शरणार्थींना खुला करून देण्यात आला. सरकारकडून सिंधी शरणार्थींना वसविण्यात आले तोपर्यंत सहा फूट उंच जंगली गवत उगवले होते. साप, विंचू येथे होते. मिलीटरी कॅम्पमध्ये इकडे–तिकडे जाण्यासाठी पायवाटेचा रस्ता बनविला होता. कल्याण कॅम्पचा भूभाग १९४८ मध्ये १३ किलोमीटर होता. शासन–प्रशासन अथवा राज्य सरकारने ह्या भूभागाला वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. १९३५ पर्यंत महाराष्ट्र आणि सिंधचा भूभाग बॉम्बे प्रांत म्हणून ओळखला जात होता.

१९३५ ला सिंध प्रांतातून बॉम्बे प्रांत वेगळा करण्यात आला. तोपर्यंत पाकिस्तान बनविण्याचे नावदेखील नव्हते. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी १५ वर्षात

पाकिस्तानचे नाव पुढे आले. इंग्रजांची फूट निती. नेत्यांचा स्वार्थ व इतर काही कारणे, त्यामुळे पाकिस्तान बनविण्यात आला. १४ ऑगस्ट १९४७ च्या सकाळी जो सिंधी समाज भारतीय होता तो १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री पाकिस्तानी झाला. भारताचा एक भूभाग पाकिस्तानात गेला.

पाकिस्तानची घोषणा केल्यानंतर हजारो परिवार सिंधी समाज ज्यांना जे सामान हातात येईल ते बरोबर घेऊन जाऊ लागले. काही भारतीय भूभागावर आले तेव्हा सामानाची लुटालूट, शरीरावरील दागिने काढून घेण्यात आले. मुले अनाथ झाली. एवढी कत्तल झाली, लूटमार झाली, जितक्या रेल्वे गाड्या पाकिस्तानातून भारतात येत होत्या त्यामध्ये माणसे कमी होती, मृत्युमुखी पडलेले लोकच जास्त होते. कराची बंदरावर जहाजावरून येणारे लोकांचे सामानदेखील काढून घेतले जात होते, एवढी लूटमार होत होती.

सिंधमध्ये असलेले जमीनदार, सावकार, शेती करणारे, व्यापारी, कोठीवाले, ज्यांची सोन्या–चांदीची दुकाने, व्यापारी त्यांचे नोकर होते ते जेव्हा भारतात आले तेव्हा त्यांना दोन वेळेस जेवणासाठी भारत सरकारच्या मेहेरबानीवर अवलंबून राहावे लागत असे. जमिनीमार्गे येणारे सिंधी समाजाचे लोक गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यात स्थायिक झाले.

समुद्रामार्गे आलेला सिंधी समाज मुंबई बंदरावर येऊन मुंबईतील इतर भागात स्थायिक झाला. असंख्य परिवार पुणे, कोल्हापूर, सोलापूर ह्यासारख्या शहरात स्थायिक झाले. सिंधी समाजाचे बहुसंख्य लोक उल्हासनगर (कल्याण मिलीटरी कॅम्प)द्वारे पाठविले जाऊ लागले. मुंबई बंदरावर उतरल्यानंतर सिंधी समाजाला मुंबई बंदरावर ठेवण्यात आले. तेथून उल्हासनगरला आणण्यात आले. अजून एक समस्या इथे होती. जंगली गवत सहा–सहा फूट उंच वाढलेले होते,त्यात साप, विंचूचे साम्राज्य होते. इतक्या अडचणी असतानादेखील सिंधी समाज राहण्यासाठी विवश होता.

मातृभूमीपासून दूर झालेले दुःखी सिंधी समाजाचे लोक बाहेर पडू लागले. कामाच्या शोधासाठी बाहेर जाऊ लागले. ह्या लोकांनी रु. २०/– प्रतिमहिना पिस्त्यांची टरफल काढणे यासारखा रोजगार मिळवू लागले. रुपये ७०–८० प्रति महिना पगारावर प्लॅस्टिकच्या

कारखान्यात नोकरी करू लागले. बऱ्याचशा लोकांनी छोटा–मोठा कामधंदा सुरू केला. रेल्वेत जाऊन फळे विकणे, खेळणी विकणे, बॅटरी विकणे (तेव्हा लाईट नव्हती) अशी कामे करू लागले. जे लोक रेल्वेत सामान विकत असत ते चालती रेल्वे पकडत असत. दांडा पकडून एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जात असत. माल विकण्याच्या गडबडीत कधी रेल्वेतून पडल्यामुळे हात–पाय तुटत असे. परंतु परिवाराच्या पालनपोषणाची जबाबदारी असे. काही लोक व्ही.टी.ला जाऊन तयार केलेला माल विकत असत. काही लोक व्ही.टी. ते धोबी तलाव लाकडाची छोटी–छोटी दुकाने बनवून तेथे माल विकत असत. तेव्हा मुंबईला जाण्यासाठी ठाण्यावरून ट्रेन बदलावी लागत असे. काही लोक मुंबईला जाऊन काम शोधत असत. जे काम मिळेल ते करत असत. सरकारने हळूहळू रेशन देणे बंद केले आणि ज्यांना गरज होती त्यांना रु. ७५० ते १५०० कर्ज दिले जात असे. ज्यातून ते लोक काही ना काही व्यापार करत असत. तेव्हा सिंधी समाज फुटपाथवर भाजी विकणे, कपडे विकणे, खेळणी विकणे,तसेच गोळ्या–चॉकलेट–बिस्कीटे विकत असत. अशाच गरजेच्या वस्तू फुटपाथवर घेऊन विकत असत. बरेचसे लोक जवळपासच्या गावात जाऊन सामान विकत असत. नवीन असल्यामुळे बोलण्यात समस्या होती. परंतु इशाऱ्याने समजून काम करत असत.

सिंधी समाज हळूहळू भाषा शिकला. स्वतःला रोजगार प्राप्त करत गेला. जनतेसाठी शहरात ह्याच काळात एस.टी., खाजगी बसेस आणून चालविण्यात आली. पाच नंबरवरून विठ्ठलवाडीपर्यंत बस चालू झाली. थोड्या अंतरासाठी त्यावेळेस एक आणे भाडे होते. आणि जास्त दूर अंतरासाठी दोन आणे भाडे होते. ह्या बसेस मागवल्या होत्या. बरोबर मोटुमल परसराम आणि बदलमल कांछामल यांनीदेखील बसेस चालविणे सुरू केले. सन १९६२ मध्ये श्री. परचो विद्यार्थीचे शहरात आमदार बनविल्यानंतर सरकारी बसेस चालवले गेले. तेव्हा पैसा आधा आणा, एक आणा, दोन आणा, चार आणा, आठ आणा किंवा रुपया चालत होता. **१ आण्याला १२ पैसे होते, १ रुपयाला १९२ पैसे होते**.

लोकसंख्या वाढत असल्यामुळे १९५० ते ५२ पर्यंत बॅरेक बनवले जात. ज्याला न्यू टेनामेंट नाव बॅरेक/ब्लॉक बी.सी. टाईप ब्लॉक, ए.सी. टाईप होते. जिथे येणाऱ्या जनतेसाठी खुले करण्यात आले. सन १९६५ मध्ये एस.डी.ओ. ऑफिस (प्रांत कार्यालय) पवई चौक बनवल्यानंतर बॅरेकोची सनद दिली गेली.

१९६५ च्या आधी ज्यांनी फ्लॅट आणि घर घेतले, त्यांना यू (U) नंबर देण्यात आला. उल्हासनगर न्यू टेनामेंट बनल्यानंतर छोटे-छोटे कॅम्प मुंबईच्या आसपास बसलेला सिंधी समाजा लोकांना उल्हासनगरमध्ये आणून स्थायिक झाले. ज्याला कुर्ला कॅम्प (मुंबई) जिथे आज कालीमाता मंदिर आणि गुरुनानक शाळा आहे. त्या चारही बाजूला वसवले गेले. आज त्याला 'कुर्ला कॅम्प' संबोधले जाते.

सिंधी समाजाचे लोक येण्याआधी मुंबईतील व्यापारावर गुजराती समाजाचे वर्चस्व होते. परंतु सिंधी समाज 'कमी नफा, जास्त विक्री' ह्या तत्त्वावर व्यापार करत असे. छोट्या-छोट्या उद्योगाबरोबर हळूहळू मोठ-मोठे कारखाने निर्माण केले. उल्हासनगर ह्या पूर्ण शहरात जिथे जाईल तिथे सिंधी समाजाची प्रत्येक व्यक्ती काही ना काही छोटे-मोठे काम करताना दिसेल. शाळेतून आलेली मुले आपल्या आई-वडिलांच्या कामात मदत करत होती.

१९४८ ते १९७० पर्यंत उल्हासनगर शहराचा विकास हळूहळू होताना दिसतो. परंतु शहराचा विकास व व्यापारात १९७० ते २००० पर्यंत प्रगती झालेली आढळते. बॅरेक जाऊन हळूहळू मोठ्या इमारती बनविण्यात आल्या. राहणीमानात फरक पडलेला दिसून येतो.

भारत देशात राहणाऱ्या संपूर्ण सिंधी समाजाला उल्हासनगर शहर एक हरिद्वाराच्या रुपात दिसतो. वर्षातून एकदा तरी सिंधी समाजाची व्यक्ती उल्हासनगर शहरात येऊ इच्छिते आणि येतेही. लग्नात लागणारे सामान उल्हासनगरात खरेदीसाठी पहिली आवड असते. म्हणून उल्हासनगरला 'मिनी भारत' व 'मिनी जपान' या नावाने ओळखले जाते ते देश आणि जगात.

इ.स.१९९० मध्ये उल्हासनगर शहरात ऑटो आल्या. इथे बनवलेले सर्व सामान देशात व अन्य देशात जाते. उल्हासनगरात बाहेरून अन्य राज्यातून कारागीर आले. उदा. बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश राज्यातून येऊन काम करत आहेत. आज देखील हे अविरत चालू आहे. उल्हासनगर शहरात बाहेरील राज्यातून आलेल्या कारागिरांची संख्या एक लाखापेक्षा अधिक आहे. म्हणून उल्हासनगर शहरात पूर्ण भारताचे दर्शन होते. परंतु शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या कारणामुळे मूलभूत सुविधांचा अभाव राहिला आहे.

उल्हासनगर शहरात छोटे लघुउद्योग, प्रत्येक घरात चालणारे गृहउद्योग, मोठे कारखाने यामुळे पूर्ण शहर औद्योगिक बनले. जिथे नजर पोहोचेल तेथे काही ना काही उद्योग, काम करत

असताना पाहायला मिळेल. संपूर्ण शहर औद्योगिक असूनदेखील ह्या शहराला औद्योगिक शहराचे स्थान नाही. एकतर बाहेरून आलेला सिंधी समाज ज्याने आपल्या मेहनतीने लाखो परिवाराचे पालनपोषण करून स्वावलंबी केले. कायमस्वरुपी चालणारे उद्योग स्थापन केले. ज्यातून निर्माण झालेल्या सामानाचा विक्रीसाठी उपयोग होतो. महाराष्ट्र राज्यातच नाही तर देशाच्या कोणत्याही राज्यात उल्हासनगरसारखे शहर दिसणार नाही. [१८]

१६) उल्हासनगर शहर वसाहतीमधील नागरिकांना सनद देणे या विषया संदर्भात संक्षिप्त माहिती –

उल्हासनगर शहर वसाहत हे छावणी क्र. १ ते ५ मध्ये विभागले आहे. सन १९४७ मध्ये भारताची फाळणी झाल्यामुळे पश्चिम पाकिस्तानातून निर्वासितांचा लोंढा भारतात आला. त्यांच्या राहण्यासाठी बॅरेक व इतर सुविधा उपलब्ध असल्यामुळे संक्रमण छावणी निर्वासितांना राहण्यासाठी उपयोगात आणण्याबाबत केंद्रशासनाने निर्णय घेतला.

केंद्रशासनाच्या निर्देशाप्रमाणे उल्हासनगर शहर वसाहतीमधील अतिक्रमणाचा सर्व्हे खात्यामार्फत सर्व्हे सन १९६६ ते १९७१ कालावधीत करण्यात आला व सदर सर्व्हे मध्ये एकूण ३०,७१४ अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली. सदर अनधिकृत बांधकामे २२७ सर्व्हेशिटांत दर्शविण्यात आली. विस्थापितांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत सनद देण्यासाठी शिफारस करण्या कामी छाननी समितीची नियुक्ती केली. उल्हासनगर शहर वसाहतींचा विकास आराखडा सन १९४७ मध्ये अंमलात आला.

सन १९४९ ते जुलै १९७१ पर्यंत उल्हासनगर शहर वसाहतींचे व्यवस्थापन केंद्र सरकारकडून निर्वासित मालमत्ता अधिनियम १९५० व निर्वासित इसम (भरपाई व पुनर्वसन) १९५४ मधील तरतुदीखाली करण्यात येत होते. केंद्रशासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनाने उर्वरित काम १ ऑगस्ट, १९७१ पासून संबंधित राज्य सरकारकडे सुपूर्द केले.

भारत सरकारने निर्वासित इसम कायदा १९५४ व तत्संबंधी कायदे रद्द केल्याबाबत अधिसूचना त्यांचेकडील दि. ६.९.२००५ चे राजपत्रात प्रसिध्द केली आहे. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक २००५ दि. ३.१०.२००५ अन्वये या पुढे निर्वासित इ. सन (मदत व पुनर्वसन) कायद्यांतर्गत कोणतीही नवीन सनद निर्गमित करण्यात येऊ नये, असे

आदेश दिलेले आहेत. त्या विरोधात इंटरनॅशनल सिंध पंचायत फेडरेशन यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ५२/०६ दाखल केली होती. त्यातील दि. १४.१२.२००६ रोजीच्या निर्णयानुसार सदर कायदे रद्द झाल्याने सदर दिनांकापर्यंत प्रलंबित असलेल्या प्रकरणी कार्यवाही निर्णयाविरुध्द केंद्र शासनाने मा. सर्वोच्च न्यायालय येथे स्पेशल लिव्ह अपील नं. ६७०३/२००८ दाखल केला असून मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २५.०२.२००५ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. त्याविरुध्द पुन्हा इंटरनॅशनल सिंध पंचायत फेडरेशन यांनी अर्ज केला असता माननीय सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन दि. २५.२.२००८ चे आदेश सुधारित करून जनरल क्लॉजेस ॲक्टच्या कलम ६ प्रमाणे कायदा निरसित होण्यापूर्वी प्रलंबित असलेली प्रकरणे निर्णयित करण्याचे आदेश केले. त्या आदेशात सनद द्यावी की नाही? याबाबत संदिग्धता असल्याने माननीय सर्वोच्च न्यायालयातील सरकारी अभियोक्ता श्री. खर्डे यांचे अभिप्राय मागितले असता त्यांनी सनद देता येणार नाही, असा अभिप्राय दिला आहे. सर्वोच्च न्यालयाच्या स्थगिती आदेशात अंमलबजावणीबाबत उल्लेख नसल्याने सध्या सनद देणेचे काम बंद आहे.

उल्हासनगर शहर वसाहतीमध्ये सनद देणेसाठी शिल्लक प्रकरणे.

कोपरी वसाहत ठाणेमध्ये सनद देणेसाठी शिल्लक प्रकरणे.

कोपरी कॉलनी – ठाणेबाबत माहिती –

कोपरी वसाहत, ठाणे ही निर्वासित वसाहत या कार्यालयाचे अधिपत्याखाली आहे. तेथील एकूण मिळकतीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे –

१) कोपरी वसाहतीची स्थापना सन १९५४ मध्ये करण्यात आली. कोपरी वसाहतीचे एकूण क्षेत्र १७.०७ एकर आहे.

२) एकूण सरकारी बांधकामे –

अ.क्र.	**बांधकामाचा तपशील**		**दिलेल्या सनदा**	**शिल्लक सनदा**
१.	२५ दुमजली इमारती (प्रत्येक इमारतीत ३६ खोल्या)	९०० खोल्या	८९५	५
२.	दुकाने	६० दुकाने	६०	–
	एकूण	**९६०**	**९५५**	**५**

– गोषवारा –

उल्हासनगर	एकूण	दिलेल्या सनदा	शिल्लक सनदा
यु./इ.नं.चे मिळकती	३०,७१४	११,६४८	१९,०६६
बॅरेक/ब्लॉक/दुकाने बाथरुम	२२,५००	२२,२४८	२५२
मा. जमाबंदी आयुक्त, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेले सनदा देण्याबातचे आदेश	४६	–	४६
एकूण	**५३,२६०**	**३३,८९६**	**१९,३६४**

कोपरी कॉलनी, ठाणे –

उल्हासनगर	एकूण	दिलेल्या सनदा	शिल्लक सनदा
यु./इ.नं.चे मिळकती	४०५	२१२ अनियमित १५३ प्रकरणे ३६५	४०
सरकारी बांधकामे	९६०	९५५	०५
एकूण	**१,३६५**	**१,६८५**	**४५**

१९

वरील तक्त्यांवरून असे स्पष्ट होते की, सरकारकडे असलेल्या बांधकामाचा तपशील व सनदांबाबत माहिती मिळते. जी बैठक ९.०२.२०११ रोजी मा. श्री. सहरिया साहेब, अतिरिक्त मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन यांचेकडे झाली, त्यामध्ये विधी व न्याय विभाग यांचे अभिप्राय मागविण्यात आले होते.

१७) तालुका मुख्यालय (Taluka Head Quarters) –

उल्हासनगर ह्या उपनगर तालुका मुख्यालयाचे उद्घाटन दि. २५ जानेवारी १९६९ रोजी महाराष्ट्र सरकारचे महसूल मंत्री कै. बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते झाले आणि कै. के. डी. बिजलानी हे पहिले उल्हासनगर तहसिलदार तालुक्याचे मुख्य होय.

उल्हासनगर नगरपरिषद २० ऑक्टोबर १९९६ रोजी महापालिका म्हणून घोषित झाली. पहिले महापौर श्री. गणेश चौधरी झाले. महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. कुमार आयलानी झाले. हळूहळू निर्वासित जे पाकिस्तानमधून आले त्यांनी उल्हासनगरात घरे घेतली. स्वतःला सिध्द करण्यासाठी व्यवसायाला सुरुवात केली. विस्थापित व्यक्तींनी आपल्या घरापासून चालत असलेल्या कुटीरउद्योगाला सुरुवात केली. कायमस्वरुपी औद्योगिक विकास केला. आणि पुढे लवकरच मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रांतर्गत समाविष्ट करण्यात आले.

१८) मनोरंजक उपक्रम (Recreational Activities) –

सिंधी चांगले अन्न, दागिने आणि कपडे यासाठी ओळखले जातात. किंबहुना ते नित्याचे आहे. पण छावणीत त्यांचे जीवन थोडे समाधानकारक होते. त्यांना आयुष्यात संघर्ष करावा लागला. त्या दिवसात कॅम्पमध्ये एक सार्वजनिक वाचनालय, कॅम्प नं. २ मध्ये फक्त पुरुषांसाठी, स्त्रिया ह्या गुरुद्वारा किंवा मंदिरात कथा, कीर्तन भजनासाठी जात. मुंबईशी संवाद, एकरुपता हे त्यांना अडचणीचे होते. फक्त ३२ बस होत्या. ते पण निर्वासितांनी स्वतः स्थापित केल्या. ह्या बसेसची व्यवस्था दररोजची नव्हती. अनियमितता होती आणि बस दुरुस्ती त्वरित करण्याची गरज होती. रेल्वेसेवा अर्धा तास अंतराने अशा गाड्या चालविल्या जात होत्या. पण अशा स्थितीतही सिंधी हिंदूनी आपली श्रध्दा, विश्वास गमवला नाही. वाईट परिस्थितीतही सामान्य जीवन हे निर्वासितांनी मान्य केले हे सर्व त्यांनी आपल्या प्रबळ इच्छाशक्तीवर केले.

उल्हासनगर उपनगराचा विकास आणि परिपक्वता प्रामुख्याने जेव्हा नगरपालिका स्थापन झाली सरकारने त्यांच्यासाठी स्थानिक स्वराज्य उपलब्ध व्हावे, यासाठी सुविधा दिली. १ ऑक्टोबर १९६० रोजी नगरपालिका स्थापन केली. सुरुवातीचे नगरपालिकेचे पहिले अध्यक्ष श्री. नेवेंद्रम विष्णुदास गुरुबाणी होते.[२०]

१९) उल्हासनगर संक्षिप्त विकास –

उल्हासनगर शहरात ८०% लोक मध्यमवर्गीय व गरीब आहेत. उल्हासनगरात कॅम्प नं. १ ते ५ मध्ये धर्मशाळा आहेत. ज्या कमी किंमतीत सुविधा देतात. तसेच या शहरात मंदिर, गुरुद्वारा, आश्रम, बौध्दमठ आणि मस्जिद आहेत. मंदिर व आश्रम कॅम्प नं. ५ मध्ये अधिक आहेत. मनोरंजनासाठी सिनेमा थिएटर आहे. उल्हासनगर शहराच्या जवळ पाच रेल्वे स्टेशन

आहेत. तीन रेल्वे स्टेशन विठ्ठलवाडी – १९५६, उल्हासनगर – १९५७, शहाड – १९५८ रेल्वे आणि अंबरनाथ तसेच कल्याण स्टेशन आहे. उल्हासनगर शहरातील नेहरू चौक जो शहरातील मध्य आहे, त्यापासून पाचही रेल्वे स्टेशन समान अंतरावर आहेत.

स.न.१९४८ मध्ये सरकारी बस येत होती. पण हळूहळू बस बंद झाली. कारण बस ही लांबलचक आणि रस्ते छोटे–छोटे होते. बस ही रोडवर फिरू शकत नव्हती. स्थानिक शासन प्रशासनाने काही गोष्टी गंभीर न घेतल्यामुळे नियमित अशा बसेस नाही. ऑटो सेवा नंतर उपलब्ध झाली. टूर, ट्रॅव्हल्स कार्यालय पुष्कळ आहेत. तीर्थयात्रेसाठीदेखील त्वरित खाजगी गाड्या उपलब्ध होतात.

शहरात व्यापारी व्यवहार तसेच ठेवी काढणे, ठेवणे यासाठी सर्व सरकारी बँका तसेच शाखा आहेत. तसेच को–ऑपरेटिव्ह बँक, नवजीवन बँक जिच्या मुख्य कार्यालयासहित पूर्ण उल्हासनगरमध्ये पाच शाखा आहेत. आणि अन्य को–ऑपरेटिव्ह बँका आहेत. शहरातील मुख्य पाणी पाठवण्याचे कार्यालय ५ नंबर कॅम्प स्थित प्रभाग गार्डनच्या जवळ मुख्य कार्यालय आहे.[२१]

२०) उल्हासनगरला ५० वर्षे पूर्ण झाली – सुवर्ण महोत्सव –

८ ऑगस्ट १९४९, ते ८ ऑगस्ट, १९९९ उल्हासनगर शहराच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाली. या सुवर्ण महोत्सवी एक वर्षाच्या आत ठाण्याचे आयुक्त टी. चंद्रशेखर हे आयुक्त उल्हासनगरला लाभले. महापालिकेच्या आयुक्तपदाचा, अतिरिक्त कार्यभार त्यांनी स्वीकारला. त्यांनी अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर उद्योग, व्यवसाय करचुकवेगिरी यावर पहिले लक्ष्य केंद्रित केले. रस्ते, पाणी, वीज ह्या मूलभूत सुविधा व्यवस्थित नव्हत्या. वीज आणि पाणी याबाबत तक्रारी होत्या.

उद्योग व्यापाराच्या क्षेत्रात आघाडीवर असलेले उल्हासनगर गुन्हेगारी क्षेत्रातही मागे नाही. गेल्या काही वर्षातील उल्हासनगरची भरभराट माफियांच्या माध्यमातून झाली. दहशत, पैसा आणि सत्तेच्या बळावर या शहराचे स्थानिक राजकारण स्थापनेपासूनच व्यक्तिकेंद्रित राहिले आहे. प्रशासन आणि कायदे यांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे.

उल्हासनगरमध्ये नियोजनाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनधिकृत बांधकामे, करचुकवेगिरी, बकाल झोपडपट्टी, शहरात फिरणारी डुकरे, मोकाट कुत्री, गाय, बैल यांमुळे त्या बकालीला एक

वेगळेच स्वरुप येते. या शहरालगतची उल्हास नदी, शहरातले छोटे–मोठे नाले, प्रचंड प्रदूषित आहेत. छोटे–मोठे कारखानदार औद्योगिक कचरा या नाल्यात फेकून देतात. प्रदूषणाचा शहराच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाचा विचार न करता हे शहर वाढतच आहे. उल्हासनगरीय लोकांची मुख्य तक्रार वाहतूक व्यवस्थेबद्दल आहे. गाड्या वेळेवर न येणे, न सुटणे तसेच माणसे वाहतुकीबद्दल आजही उदासीन आहेत. १९४९ ते १९९९ या ५० वर्षांच्या काळात या शहराची लोकसंख्या बेसुमार वाढली आहे.

गेल्या काही वर्षात सत्संगाचे कार्यक्रम वाढत आहेत. वृत्तीने धार्मिक असलेला सिंधी समाज अध्यात्माकडे वळला आहे. त्यातून दान, धर्म, सेवाभाव यांसारख्या गोष्टींतही अग्रेसर बनला आहे.[२२] पन्नास वर्षांपूर्वीचे हे संक्रमण शिबिर आज महानगर बनले आहे. राखेतून वर येणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे सिंधी समाजाने अथक परिश्रम केले. सिंधी प्रांतातून काही न घेता रिकाम्या हाताने आलेल्या सिंधी बांधवांनी या संक्रमण शिबिराची उद्योगनगरी केली. इथले वैशिष्ट्य म्हणजे सिनेमागृहे, विद्यालये आहेत. पण नाट्यगृह एकही नाही. या शहरात अमन, प्रभात, रिजंट, पॅरामाऊंट, सपना, अशोक अशी सात सिनेमा थिएटर्स आहेत. आणि त्यात पहाटेपासून शो ठेवले तरी तुडुंब गर्दी होईल, अशी येथील जनतेची सिनेमाची आवड दिसून येते.

सिंधी समाजाची संस्कृती पाच हजार वर्षे जुनी आहे. हा समाज धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व स्वास्थ्य क्षेत्रात आपले योगदान देत आहे. उल्हासनगर शहरात तर त्यांचे औद्योगिक योगदान अधिक आहे. असंख्य उद्योगात असंख्य माणसांना रोजगार दिला. त्यांची कोणत्याही वस्तूची बनविण्यात नक्कल करणे म्हणजे हातचा खेळ आहे. सिंधी समाज हा पहिला अखंड भारताचा नागरिक होता आणि आजही संपूर्ण देशामध्ये राहणारा सिंधी समाज भारतीय आहे.

शून्यातून विश्व निर्माण करणे ही काही साधी गोष्ट नाही. 'आकांक्षांना नाही अंत, प्रयत्नांना नाही सीमा' ह्या ध्येयाने प्रेरित झालेला हा समाज आपल्या अंगी असलेली मूलभूत मेहनत, चिकाटी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची क्षमता या समाजात दिसून येते. सिंधी समाजाची ओळख जी होते ती उल्हासनगरातूनच. त्यामुळे ह्या शहराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते.

– संदर्भ सूची –

१. Free Press Journal 14 July, 1947.

२. Karunakarn T. K., A Sociological Study in Urban Development, M.A. Thesis, University of Bombay, 1958 पृष्ठ क्र. १२

३. Pinjani Hema Ravi, Sindhi Resettlement in Ulhasnagar Historicity Research Journal ISSN 2393 - 8900 Volume - 3, Issue - 4, December 2016 पृष्ठ क्र. ६

४. Narkhede, 'S' Case Study, of Sindhi in Ulhasnagar 1989, पृष्ठ क्र. २३,

५. Office of the Mamlatdar, Kalyan

६. Karunakarn T. K., उ. नि. पृष्ठ क्र. १४

७. Government of Bombay Ulhasnagar Township Scheme, Souvenir, 1949, पृष्ठ क्र. ६

८. Vakil and Cabinetmaker "Government and Displaced persos" 1953, पृष्ठ क्र. ११९

९. Government of Bombay, District Gazetteer of the Bombay Presidency Vol - XIII, Part II, पृष्ठ क्र. ६८८

१०. Gazetteer of the Bombay Presidency, Vol XIII Part II, पृष्ठ क्र. ६८८, ६८९

११. Office of the Collector, Thana District.

१२. Karunakarn T.K., उ. नि. पृष्ठ क्र. २४, २५, २६

१३. Government of Bombay Ulhasnagar Township Scheme, Souvenir, 1949, पृष्ठ क्र. ६

१४. बठेजा घनश्याम 'हमारा शहर उल्हासनगर २०१२' पुस्तक का पहिला भाग, श्री प्रकाशन २०१२, पृष्ठ क्र. ३८, ३९

१५. Pinjani Hema Ravi उ. नि. पृष्ठ क्र. ९

१६. Karunakarn T. K. उ. नि. पृष्ठ क्र. ३६, ३७, ३८, ३९

१७. Pinjani Hema Ravi उ. नि. पृष्ठ क्र.६, ७

१८. बठेजा घनश्याम 'हमारा शहर उल्हासनगर २०१२' पुस्तक का पहला भाग, उ. नि. पृष्ठ क्र. A, B, C, D, E, F, G, H

१९. बठेजा घनश्याम 'हमारा शहर उल्हासनगर २०१३' पुस्तक का दुसरा भाग, उ. नि. पृष्ठ क्र. ४८, ४९, ५०, ५१

२०. Pinjani Hema Ravi, Sindhi Resettlement in Ulhasnagar Historicity Research Journal ISSN 2393 - 8900 Volume - 3, Issue - 4, December 2016 पृष्ठ क्र.१०

२१. बठेजा घनश्याम 'हमारा शहर उल्हासनगर २०१२' पुस्तक का पहिला भाग २०१२ उ. नि. पृष्ठ क्र. D, E

२२. कोचरेकर संजय 'पन्नाशीतली उल्हासनगरी' रविवार, नवशक्ती १५ ऑगस्ट, १९९९, पृष्ठ क्र. १

प्रकरण–३

'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचे आर्थिक जीवन'

प्रारंभी निर्वासित लोकांना राज्य आणि ऐच्छिक संस्थांनी तत्काळ निवासस्थान, वैद्यकीय मदत, कपडे इत्यादी उपलब्ध करून दिले. राज्याकरिता हे अतिशय कठीण कार्य होते. कारण त्यांच्याकडे तितकीशी पुरेशी यंत्रणा नव्हती. अनुभवी कर्मचारी यांचा अभाव होता. याशिवाय सरकारकडे यापूर्वी असा कोणताही अनुभव नव्हता. सरकारने निर्वासित छावणी शिस्तीत चालविण्याकरिता प्रशासन तयार केले. रिक्त बराकीसहित संक्रमण शिबिर त्या वेळी सरकारला खूप फायदेशीर झाले, परंतु अशा स्थितीत गोंधळ होणे स्वाभाविक आहे.

उल्हासनगरमध्ये आलेले निर्वासित हे सर्वप्रथम सरकारकडून मिळालेल्या सुविधांवर अवलंबून होते. त्यानंतर सरकारने त्याचे लक्ष बेघर लोकांना घर सोयी देण्याकरिता व कुपोषित लोकांना खाद्यपदार्थ व कपडे उपलब्ध करून देण्यात केंद्रित केले. उल्हासनगर उपनगरातील लोकांचे पूर्वीपासूनचे कौशल्य, उद्योग व्यवसाय होते. याआधारे त्यांना लाभदायक रोजगार मिळाला याचा परिणाम असा झाला की, सरकारकडून मिळालेल्या सुविधांवर ते निर्धारित नव्हते. सुरुवातीपासूनच ते सक्षम होते. त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तयारी सुरू केली होती. [१]

पाकिस्तानातून निर्वासित होऊन आलेल्या सिंधी लोकांमध्ये व्यापारी जास्त होते. शहरात जाऊन निरनिराळ्या वस्तूंची दुकाने सुरू केली. सुरुवातीला स्पर्धेसाठी कमी किंमतीत विक्री सुरू केली. सिंधमध्ये आयात–निर्यात उद्योग करणारे व्यापारी होते.

कराची, सक्कर, पंजाब आणि भारतातील शहरात त्यांचा व्यापार चालत असे. हिंदू व्यापारी सिंध मालमत्तेला मुकले असले तरी त्यांनी भारतात नव्याने आपला व्यवसाय चालू ठेवला. सिंधमधील अमील वर्गातील बहुतेक निर्वासितांना भारतातील निरनिराळ्या सरकारी खात्यात सामावून घेण्याची व्यवस्था सरकारने केली होती. तांत्रिक उद्योग करणाऱ्यांनाही भारतातील वाढत्या उद्योगधंद्यात पुरेसे काम मिळाले. त्यातून अनेकांनी आपापले लघुउद्योग सुरू केले.[२]

डॉ. यू. टी ठाकूर व्यक्त करतात की, ते एक कापड व्यापारी होते. एक ज्वेलर्स किंवा बँकर एक कन्फेक्शनर होते. हॉटेलचा मालक किंवा वस्तूचा विक्रेताही होते. पण आर्थिक संकटात सापडले आणि सामाजिक स्थितीतही घट झाली.[३]

उल्हासनगरातील सिंधी निर्वासित हे देखील व्यापारी समाजाचे. त्यांना वाटले की, कल्याण ही जागा त्यांच्या व्यवसायासाठी योग्य नाही. मुंबई हे निवासस्थान केले पाहिजे, जेथे त्यांच्या व्यापाराकरिता संधी उपलब्ध होईल, परंतु सरकार असाहाय्य होते. म्हणून त्यांना उल्हासनगरात व्यवसायासाठी, उद्योगासाठी समजविण्यात आले. सुरुवातीपासून इच्छा नसूनही रहिवाशांना उपजिविकेसाठी काहीतरी करावे लागले. याचा परिणाम असा झाला की काही दुकाने औद्योगिक केंद्र निर्माण झाले. हे उपनगर हळूहळू औद्योगिक क्षेत्रात एक केंद्र म्हणून सिध्द झाले.

सिंधी समाज हा मूळतः कष्टाळू आणि निसर्गतः उद्योगशील होता. दुकाने, सेवा केंद्रे उपलब्ध झाली. लहान उद्योग उत्पादन केंद्रांची संख्या वाढविली. रोजच्या रोज सरासरी दहा हजार लोकांचा मुंबईकडे प्रवास होत होता. काहींचा औद्योगिक कामाबद्दल, काही सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरी करण्याकरिता, शाळेत जाणारी मुले त्यांच्या मोकळ्या वेळेत कुटुंबाची उणीव भरून काढण्याकरिता काही जागेत काम करत. हातगाडी चालवित. मोठमोठ्या जंक्शनवर आगगाडीमध्ये सामान विकत.[४]

१) निर्वासितांचे आर्थिक पुनर्वसन (The Economic Rehabilitation of the Refugee)-

अनेक निर्वासित जे उद्योगात होते, जे सुरुवातीला आपल्या पायावर उभे राहण्यास सक्षम होते, त्यांनी भारतात आपले पहिले पाऊल उद्योगात टाकले. परंतु समस्या होत्या. निर्वासितांना सुविधा देणे, त्यातही दोन लाख व्यक्तींना जास्त अवधी न लावता इ.स. १९४८ पर्यंत चार महिने भारत सरकारवर पुनर्वसनाची थेट जबाबदारी होती. त्याबरोबर सोयी–सुविधा देणेही महत्त्वाचे होते. हे सर्व मुंबई सरकारच्या खांद्यावर आले.

सुरुवातीला निर्वासितांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मोफत जे रेशन दिले जात होते ते हळूहळू बंद केले. फक्त स्त्रिया, मुले, वृध्द आणि आजारी व्यक्तींना पुढे मदत

चालू ठेवली. निर्वासितांचे कायमचे पुनर्वसन ही समस्या मुंबई सरकारची होती. त्यासाठी काही उपाययोजना केल्या, त्या पुढील प्रमाणे –

१. कायम गृहनिर्माण तरतूद करणे आणि विस्थापित व्यक्तींना वसाहतीवर स्थापित करणे आणि उपनगर किंवा वसाहती वसविणे.
२. व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे.
३. प्रशिक्षित आणि कुशल कामगारांना रोजगार उपलब्ध करून देणे व केंद्र सुरू करणे.
४. व्यवसायासाठी कर्जाची आर्थिक मदत करणे. लहान उद्योगांसाठी अनुदान देणे.
५. व्यापारासाठी सुविधा निर्माण करणे, वस्तू उपलब्ध करून नियंत्रित दर आणि वीज पुरवठा करून लघुउद्योग शहरी भागात प्रस्थापित करून देणे,.
६. विस्थापित झालेल्या विद्यार्थ्यांनादेखील अभ्यासात पाठिंबा देण्यात आला.

या उपाययोजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे पुनर्वसन लवकर होईल. निर्वासितांचा आर्थिक पाया दृढ करण्यासाठी मदत होईल.

२) व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र (The Vocational Training Centre) –

पाकिस्तान हे विस्थापित शेतकी जमिनीवर स्थायिक होते. आणि पाकिस्तानातून ते भारतात आले, तेव्हा लहान उद्योजक, व्यापारी, कंत्राटदार इ. होते. शहरी नागरिकांची फार मोठी संख्या होती. विशेष प्रशिक्षण विविध पदांवर काम केले होते. काही रहिवाशांना विशिष्ट प्रशिक्षण न मिळाल्यामुळे ते असमर्थ होते. या वर्गाला व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे सरकारला आवश्यक वाटले. त्यामुळे लवकरच ऑक्टोबर १९४८ मध्ये मुंबई सरकारने लहान उद्योग व व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र उल्हासनगर येथे सुरू केले. सिंधी हिंदू प्रामुख्याने व्यापारी आणि व्यापारी समुदायाचे होते. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, अशा प्रकारे निर्वासितांना संधी प्रदान करून त्यांचे व्यवसाय कौशल्य, तांत्रिक फिल्ड यामध्ये रोजगार उपलब्ध करून देणे हा उद्देश होता. सुरुवातीला २२ प्रशिक्षक, ६५३ प्रशिक्षणार्थी होते. त्यानंतर अभ्यासक्रम कालावधी निर्वासितांना आधिक ज्ञान आणि सराव देणे यामध्ये वाढ करण्यात आली. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र अभ्यासक्रमांचा कालावधी ६ महिन्यांपासून १२ महिन्यांत बदलला. मार्च १९५०च्या अखेरीस १९५०० निर्वासितांना प्रशिक्षण केंद्रांवर विविध ठिकाणी पाठविण्यात आले.

प्रशिक्षणा व्यतिरिक्त निर्वासितांना व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रात रु. ३०/– पगार देण्यात आला. कुशल कामगार आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उत्पादन आणि प्रशिक्षण हेतूने या गोष्टीकडे लक्ष दिले.

औद्योगिक प्रशिक्षण केंद्र पुनर्वसन एक उपयुक्त साधन असल्याचे सिध्द झाले. छावणीच्या बाहेर त्यांना नोकरी सुरक्षित करण्यासाठी मदत केली, ती म्हणजे अकुशल कर्मचाऱ्यांना अल्प कालावधीसाठी अभ्यासक्रम प्रशिक्षण प्रदान करण्यात आले. रु, ३५०००/– एक रक्कम होती जी वेतन, प्रशिक्षणार्थी पगार आणि दरमहा वेतन निर्वासितांना वितरण केले. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्राव्यतिरिक्त एक काम केंद्र दोन विभाग सुरू करण्यात आले. उदा. सुतारकाम आणि कथील लोहाराचे दुकान. केंद्र खर्च १९५१ ते १९५२ च्या दरम्यान रु. १ लाख ६० हजार होता. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रातील माजी प्रशिक्षणार्थी कर्मचारी, माजी प्रशिक्षणार्थींना कर्ज आणि परवाना सुविधा व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र मदत करत असे. त्यांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी अशा प्रकारे निर्वासितांना व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र मदत करत असे.

३) सरकारी उत्पादन केंद्र (The Government Production Centre) –

इ.स. १९५० मध्ये एक उत्पादन केंद्र सुरू करण्यात आले. तो रोजगार माजी प्रशिक्षणार्थींना उपलब्ध होणाच्या दृष्टीने ते केंद्र व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र होते. ते पाच विभागामध्ये होते. त्यामध्ये कापड, सुतारकाम, लेदर, होजिअरी (फक्त महिला कामगारांसाठी) आणि शिवणकाम (पुरुष व महिला दोन्ही कामगारांसाठी) येथे जास्तीत जास्त वेतन रु. ७५/– दिले जात असे आणि किमान रु. २०/–. सरकारने मार्च १९५६ पर्यंत ५२३ लाख रुपये (पहिल्या पाच वर्षात म्हणजे १९५१–५२ ते १९५५–५६) व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे ९२ कोटी रक्कम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत प्रदान केली होती.

याशिवाय सरकारद्वारे आयोजित व्यवस्थापित उपक्रम लोकपरोपकारी संस्था आणि व्यक्तिगत संस्था 'राणे कार्य केंद्र संस्था' आणि 'राणे ॲन्ड सन्स' प्रशिक्षित रोजगार पुरुष

आणि महिला या दोहोंसाठी 'द सिंध सेवा समिती' आयोजित शिवण आणि भरतकाम वर्ग आहेत.[५]

प्रा. सी. एन. वकील आणि डॉ. पी. एच. कॅबिनेटमेकर यांनी सरकारी आणि विस्थापित व्यक्ती यामध्ये २७० कुटुंबांचा कमावता व्यवसाय देणारा तपशील दिला आहे, तो पुढीलप्रमाणे सांगता येईल. यामध्ये त्यांनी सुरुवातीचे म्हणजे विभाजनापूर्वीचे आणि नंतरचे कुटुंबातील व्यवसायाचे स्वरूप सांगितले आहे.

२७० कुटुंबांचे सर्व कमावणारे व्यवसायाचे स्वरूप (विभाजनापूर्वी व विभाजनानंतर)

व्यवसाय स्वरूप		**कमावणारे**	
कृषी आणि शहरी	**अवलंबून**	**विभाजनानंतर**	**विभाजनापूर्वी**
वसाहत	स्वतंत्र	०९	४८
उत्पादन	स्वतंत्र	५४	२४
	अवलंबून	३६	१२
वितरण	स्वतंत्र	१०८	१६९
	अवलंबून	२२	९
वाहतूक आणि दळणवळण	स्वतंत्र	–	–
	अवलंबून	१०	७
प्रशासकीय आणि कारकुनी सेवा		८९	७४
व्यवसाय		५४	५८
इतर सेवा		१६	०८
एकूण		**३९८**	**४०९**
निवृत्ती		०३	०४
बेरोजगार		२६	०१
कमावती संख्या एकूण		**४२७**	**४१४**

या तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, उल्हासनगर येथील विस्थापित समुदाय मुख्यतः व्यापारी वर्गातील आहे. प्रतिकूल वातावरणातदेखील स्थलांतरानंतर ते आपल्या क्षेत्रात कार्य करत राहिले. एक गोष्ट अतिशय लक्षणीय म्हणजे एक स्वतंत्र आणि अवलंबून दोन्ही उत्पादन व्यवसायात वाढ होते. उत्पादन आणि वितरण याबद्दल उल्हासनगर येथे सिंधी समाजाचा हळूहळू बदल निर्देशक दिसून येतो. हा व्यावसायिक दृष्टिकोन बदल तरुण पिढीमुळेदेखील दिसतो. तरुण पुरुष सदस्य तांत्रिक अभ्यासामध्ये अधिक स्वारस्य असलेला जाणवतो.[६]

सिंधी समुदायातील दोन मुख्य समुदायांमध्ये एक अमील हा वर्ग सुशिक्षीत होता. तो महसूल गोळा करणे व सल्लागार यासारखे कार्य करत असे. तर दुसरा समुदाय व्यापारी, सावकार, दुकानदार जो भाइबंद ओळखला जात. सिंधमध्ये हिंदू बनीया किंवा हिंदू सेठीया वर्ग म्हणून ओळखला जातो. जातिव्यवस्थेतून मुक्त होण्यासाठी सिंधचे हिंदू अपवादात्मक आहे. [७]

४) कामाचे तास–वेळ आणि अटी –

संपूर्ण उपनगर हे सकाळपासून (पहाटे पासून) ते रात्री उशीरापर्यंत सक्रीय आहे. जे मुंबई शहरात काम करतात ते पहाटे पाच वाजता उठतात. ते जवळजवळ पाच तास येण्या–जाण्याच्या प्रवासात घालवतात. सकाळी आणि संध्याकाळीसुध्दा गाडीमध्ये प्रवास करताना प्रचंड गर्दी आणि आसन पकडण्यासाठी कमालीची प्रतिस्पर्धा असते. काहीजण आसनाची सोय मिळविण्यात यशस्वी होतात. बाकी सगळे उभे राहतात. सहसा सकाळी ते ताजे व उत्साही असतात. पण संध्याकाळी ते दमल्यासारखे दिसतात. जे आसनाची सोय मिळवण्यात यशस्वी होतात ते चालू गाडीत डुलकी घेतात. काहीजण उभ्या–उभ्याच पत्ते खेळतात. गाणी म्हणणे यात स्वतःला व्यस्त ठेवतात. उपनगरामध्येच काम करणाऱ्या निर्वासितांच्या बाबतीत कामाच्या निश्चित वेळा किंवा अटी नाहीत. काही नोंदणीकृत सरकारी संस्था आणि शैक्षणिक संस्था सोडल्या तर इतर सर्व कामाच्या ठिकाणी मालकाची इच्छा आणि मागणी यानुसार काम करावे लागते.[८]

५) आर्थिक जीवनात रेल्वे स्टेशनचे योगदान –

रेल्वे अधिकारी यांनी ह्या उपनगरासाठी सुविधा देणे अत्यंत आवश्यक होत्या. सुरुवातीला प्रथम कल्याण रेल्वे स्थानक केवळ पहिले स्टेशन होते. उल्हासनगर निर्वासितांच्या

गरजा पूर्ण करण्यासाठी अंबरनाथ रेल्वे स्थानकाचाही लाभ होता. ते सोयीस्कर होते. जेम्स सायडिंग जे आज विठ्ठलवाडीने ओळखले जाते. प्रत्यक्ष उल्हासनगर उपनगराचा फायदा व महत्त्व हे कल्याण जंक्शनला झाला. दुसरे स्टेशन शहाड अशा प्रकारे पाच रेल्वे स्थानके सेवा देत हे एक अद्वितीय वैशिष्ट्य त्यात कल्याण, शहाड, उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ हे होय.

६) कल्याण जंक्शन –

कल्याण हे एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे. सर्व मध्य रेल्वे एक्सप्रेस व मेल ट्रेन हे जंक्शन पार करून जातात. निर्वासितांच्या हळूहळू गरजा पूर्ण करण्यासाठी वारंवार उपनगरीत मुंबई शहरातून गाडी येत असे. सुरुवातीला प्रथम कॅम्पच्या जवळ राहणाऱ्यांना कल्याण स्टेशनला येऊन सकाळी लवकर व रात्री उशिरा घरी परत पोहोचण्यासाठी बस सुविधेवर अवलंबून राहावे लागते.त्यामुळे कामाच्या ठिकाणी संध्याकाळी घरी येण्यासाठी मेहनत जास्त करावी लागते.

१९५४ च्या अखेरीस निर्वासितांची सक्तीची मागणी म्हणून शहाड आणि विठ्ठलवाडी स्टेशन पूर्णपणे विकसित झाले ते कल्याण–पुणे ह्या मार्गात आहे. आधुनिक धर्तीवर बांधण्यात आले. जानेवारी १९५७ च्या पहिल्या आठवड्यात आणखी एक स्टेशन उल्हासनगर म्हणून कार्यरत झाले. [९]

७) बँकिंग, वाणिज्य आणि संबंधित व्यवसाय –

जून १९५७ द सिंध नॅशनल बँक लिमिटेड कल्याण कॅम्प नं. ३ ही उपनगरातील सर्वात पहिली बँक जून १९५७ च्या पहिल्या आठवड्यात कॅनरा बँक लिमिटेड निर्माण झाली. उल्हासनगर शाखा जी कॅम्प नं. ३ येथे होती. द सिंध नॅशनल बँकेची स्थापना १९३५ मध्ये हैदराबाद (सिंध) येथे होती. आणि १९४९ नंतर ती तेथून उल्हासनगरला आली. ही अनुसूचित बँक नाही. ह्या बँकेची शाखा नाही. संयुक्त भांडवल कंपनी सिंधी व्यापारी यांसाठी प्रामुख्याने फायद्याची आहे. संचालक मंडळ बाहेरील उद्योजक जे सिंधी समाजाशी जुळलेले पण उल्हासनगर बाहेर राहतात. ही बँक सिंधींना जे कर्ज देते ते व्याजदर ९ ते १२ टक्के आहे. ही

बँक उल्हासनगरमधील व्यवसाय समुदायाला फायदेशीर आहे. कॅनरा बँकेची देखील उल्हासनगर शाखा हळूहळू सिंधींमध्ये नावारुपास आली.

बचत खाते सुविधा उपलब्ध आहे. चार पोस्ट कार्यालयांमध्ये आणि निर्वासितांचे नियमित पोस्ट कार्यालयात व्यवहार चालू आहेत. काही अनोंदणीकृत आणि अनधिकृत निर्वासित सावकार स्वतः व्याजावर पैसे उपलब्ध करून देतात.[१०]

८) रोजगार आणि बेकारी –

रहिवाशांची रोजगाराच्या संबंधित अचूक आकडेवारी उपलब्ध नाही. निर्वासित लोक सुरुवातीला बेरोजगारीबाबत गंभीर चिंतेत होते. निर्वासित लोकांमध्ये लाभदायक रोजगारास प्रोत्साहन देण्यासाठी सरकारी कार्यालये व रेल्वेमध्ये आरक्षण तसेच सोयीस्कर कर्ज मंजूर करणे आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे आणि उत्पादन केंद्रे तयार करून सरकार खास मदत प्रस्तुत करत होती. तसेच विशेष अधिकार देऊन सहकारी संस्था निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले.

उल्हासनगर जवळ असलेल्या अंबरनाथ येथे संरक्षण मंत्रालयाच्या संघटनेने विविध पदांमध्ये निर्वासित व्यक्तींना संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तांत्रिक व बिगर–तांत्रिक अशा दोन्ही रोजगारांमध्ये विस्थापित आहेत. सिंधी अधिकारी हे निरीक्षक वरच्या भागातील लिपिक, खालच्या विभागातील लिपिक कंपाऊंडर, शिपाई, स्टेनोग्राफर, संदेशवाहक मुलगा रखवालदार, लोहार, जोडकाम करणारा, वायरमन, टेलिफोन ऑपरेटर, विजेची जोडकाम करणारा इ. अशा प्रकारची कामे करतात. त्यापैकी बहुतांश हे बिगर–तांत्रिक रोजगारामध्ये आहेत. अनेक कारकुनी सेवेत असलेले सिंधी राजीनामा देऊन चांगल्या रोजगाराच्या शोधात निघाले.[११]

९) दुकाने आणि आस्थापना–

उल्हासनगर व्याप्त असलेले (सिंधी) लोक हे प्रामुख्याने व्यापारी वर्गातील होते. त्यामुळे प्रारंभी त्यांची पुनर्वसनाची गरज लक्षात घेऊन सरकारने त्यांना उपनगरात स्वतः क्रमवार व्यापार केंद्र स्थापन करून प्रोत्साहन दिले. त्यासाठी कर्जमंजुरी दिली. त्यांना व्यवसाय करण्यासाठी भाडेतत्त्वावर दुकाने उपलब्ध करून दिली. दुकाने काही मुख्य रस्त्यालगत होती, तर काही दुकाने तात्पुरती स्वरुपाची होती. सर्व प्रकारच्या ग्राहकोपयोगी वस्तू ह्या वाजवी दरात

उपलब्ध होत्या. शेजारील शहरी भागातील अनेक लोक खरेदी केंद्रे म्हणून उल्हासनगराकडे आकर्षित झाले. कारण माल तुलनात्मकरीत्या इतर ठिकाणापेक्षा स्वस्त उपलब्ध होता. उल्हासनगरात मुख्य खरेदी केंद्र हे एकतर मुख्य रस्त्यालगत लागून कॅम्प नं. १ व २ पर्यंत आहेत. सुरुवातीला व्यस्त खरेदी केंद्र हे एकतर मुख्य जंक्शन आणि पॅरामाऊंट सिनेमा कॅम्प नं. ३ आणि पोस्ट ऑफिस, कॅम्प नं. ४ च्या दरम्यान व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र दोन्ही रस्त्याच्या बाजूला खरेदी केंद्र आहे.

उल्हासनगर येथील सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन केंद्रात लहान उद्योग आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र व नारी सेवा सदन उत्पादन केंद्र संलग्न आहेत. लघुउद्योग आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र संलग्न उत्पादन केंद्र आणि प्रशिक्षण केंद्र संलग्न उत्पादन केंद्र आणि प्रशिक्षण केंद्र निर्वासितांसाठी सुरु केले. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट कायदा नोंदणीकृत काही कारखाने होते. ते विभागले आहेत. त्यात कापड उद्योग, सुतारकाम, चामड्याच्या वस्तूचे उद्योग, शिवणकाम, छपाईकाम, कथील, लोहाराचे दुकान, मोटार मेकॅनिक, फिटर, टर्नर, धातू ओतण्याचा कारखाना इ. निर्वासितांच्या पुनर्वसनाचा तो एक उपाय होता. नारीसेवा सदनातर्फे सुईकाम, भरतकाम, पापड बनविणे, हातमाग, इ. उत्पादन केंद्रे आहेत, ते कोणत्याही नफ्यावर नाहीत, येथे कामासाठी बाहेरून लोक येतात. [१२]

सरकारने अनेक लहान उद्योग–धद्यांना प्रोत्साहन देऊन त्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले. त्यामुळे अनेक लहान उद्योगधंदे निर्माण झाले. त्यात पेपर बनवणे, बेकरी, बादली बनवणे, फर्निचर, स्टील ट्रंक बनवणे. लाकडापासून वस्तू बनवणे, सॉ मिल, धागा बनवणे, मुद्रण, डाईंग, साबण बनवणे. मेणबत्ती बनवणे, विडीचे उत्पादन बर्फ फॅक्टरी, डेअरी, शेती असे काही लहान उद्योग ह्या उपनगरात स्थापन झाले. हे सर्व खाजगी विभागात होते जे निर्वासितांसाठी होते. सुमारे २५० लघुउद्योग आहेत, असा अंदाज आहे.[१३]

१०) सिंधी स्थलांतरित उल्हासनगरमधील आर्थिक घडामोडी–कारखाने –

इ. स. १९५५–५६मध्ये उल्हासनगरातील अर्थव्यवस्थेत बदल घडून आला. जवळजवळ २५० लघुउद्योग, एक डझन सॉ मिल, सात किंवा आठ होजिअरी कारखाने, रेशम कारखाने, पेंट आणि रंगामध्ये उत्पादन, कापड छपाई आणि डाईंग, थ्रेड, कार्ड बोर्ड बॉक्स,

रेडिमेड कपडे, भरतकाम आणि बॉम्बेमधील विक्रीसाठी मिठाई बनविण्याबरोबरच बेकरी, ऑईल रिफायनरीज, साबण उत्पादन, मेणबत्ती उत्पादन, मोटार काम, तेलाची मिल, अन्य उद्योग सर्वांत मोठ्या प्रमाणात आहेत.

उल्हासनगरच्या आसपास अनेक कारखाने आहेत. ह्या उपनगरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या वाढली. येथे पाच महत्त्वाचे कारखाने होते. द नॅशनल रेयॉन, सेंच्युरी रेयॉन, अमरडाय, उल्हासनगर कॅम्पच्या जवळ आहेत. अंबरनाथजवळ ऑर्डनन्स फॅक्टरी आहे. सरकारने नवीन कारखाना सुरू करण्यासाठी मान्यता उशिरा दिली. निर्वासित उल्हासनगर उपनगरात सुरुवातीस पैसे गुंतवणूक आणि कारखाने सुरू करण्यासाठी उत्साही नव्हते. थोडे कारखाने निर्वासितांशी संबंधित होते. ठाणे येथील १९५६–५७ च्या रेकॉर्डनुसार खालील नोंदणीकृत कारखाने होते –

१. लघुउद्योग आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, उल्हासनगर
२. सरदार उद्योग काम, कल्याण कॅम्प नं. ३
३. नवीन सिंध वीण कारखाना, कल्याण कॅम्प नं. ३
४. एक्स्प्रेस उद्योग पवई चौक, कॅम्प नं. ३
५. राणे कार्य केंद्र
६. महिला कला विभाग (लघुउद्योग आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र शिबिरे)
७. शिवाजी वीण कारखाना, कॅम्प नं. २
८. प्रकाश वीण कारखाना
९. जी. के. तेल आणि साबण कारखाना, कॅम्प नं. ४

लघु आणि मध्यम उद्योग आरक्षित केले गेले. तीन मध्यम उद्योग आधी सुरू करण्यात आले. त्यात सेंच्युरी रेयॉन, अमरडाय स्टाफ आणि भारतीय रंग सामग्री होय. [१४]

उल्हासनगर उपनगरातील काही कारखाने पुढीलप्रमाणे सांगता येतील. सुरुवातीला घरामधून उद्योगाला सुरुवात होऊन कालांतराने मोठ्या उद्योगांमध्ये त्याचे पर्यवसान झालेले आढळते. तर काही कारखाने हे मूलतःच मोठ्या स्वरुपात निर्माण करण्यात आले. उदा. सेंच्युरी रेयॉन कारखाना

अ) भारत डाईंग वर्क्स कारखाना –

उल्हासनगर कॅम्प क्र. ५ मध्ये भारत डाईंग वर्क्स सुत रंगविण्याचा कारखाना, याचे संस्थापक आणि प्रमुख भागीदार रामचंद्र रोचलदास हे मूळचे सिंध मधील सक्करचे होते. इ.स. १९४८ मध्ये त्यांनी घरच्या घरी थोडे–थोडे सूत आणून रंगवायला सुरूवात केली. इ.स. १९५८ मध्ये फॅक्टरी निर्माण केली. पुढे त्यांच्याकडे मोठमोठ्या गिरण्यांमधून रंगविण्यासाठी सूत येत असे.

ब) रतन सोप फॅक्टरी –

उल्हासनगरमध्ये साबण कारखाने अनेक आहेत. ह्या साबण कारखान्यांपैकी रतन सोप फॅक्टरी हा मोठा कारखाना १९४७ साली झाला. याचीही सुरुवात घरगुती स्वरुपात झाली. १९५९ मध्ये कारखाना स्थापन झाला. प्रारंभी दिवसाला ५०–१०० वड्या बनविणारा हा उद्योग नंतर हळूहळू नऊ लाखाचे उत्पादन करू लागला. याचे जे. बी. रतन आणि मटका हे ब्रँड फार लोकप्रिय आहेत. यापैकी 'रतन' या नावाचा संबंध मालकाच्या मुलाशी रतन वाधवानी नावाशी आहे. 'मटका' मात्र मटक्याच्या लोकप्रियतेशी संबंधित आहे.

अ) महावीर टीन इंडस्ट्री –

उल्हासनगर मधील कॅम नं. ५ मध्ये घरातील अर्ध्या भागात ही इंडस्ट्री चालत असे. इथे स्टोव्ह बर्नर बनविले जात. या व्यवसायाची सुरूवात मालकाने एकट्याने केली. घरातील माणसे थोडी मदत करीत असत. काम वाढल्यानंतर गृहउद्योगाचा कारखाना झाला. [१५]

आ) सेंच्युरी रेयॉन कारखाना –

सेंच्युरी रेयॉन हा कारखाना बिर्ला ग्रुप कंपनीचा. बिर्ला ग्रुप ही कंपनी भारतातील सर्वात मोठ्या औद्योगिक समूहापैकी एक. त्यांचा कापड, सिमेंट, चहा, टायर्स यासारख्या विविध उत्पादनात अग्रक्रम आहे. सेंच्युरी रेयॉनची स्थापना १९५२ साली संस्थापक आणि अध्यक्ष वसंतकुमार बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली झाली. प्रत्यक्ष उत्पादन निर्मितीला सुरुवात १९५६ मध्ये झाली. इ.स. १९६० मध्ये कॉस्टिक सोडा विभाग स्थापन करण्यात आला. त्यानंतर अनेक सुविधांमध्ये वाढ करण्यात आली. ही कंपनी आजही बाजारात अनेक उत्पादन वितरित करते.[१६]

इ) फर्निचर कारखाना –

फर्निचर कारखाना उल्हासनगरमध्ये अतिशय महत्त्वाचा उद्योग आहे. लाकडी किंवा स्टील फर्निचर बनविण्याचे तसेच फर्निचरचे वेगवेगळे पार्ट बनवून एकत्र केले जात. या कारखान्यांमध्ये अनेक कारागीर काम करत. [१७]

ई) बिस्कीटे, बेकरी उत्पादन –

उल्हासनगर बिस्कीट व्यवसायामध्ये देखील अग्रेसर आहे. बिस्कीट मॅन्युफॅक्चरर्स हे प्रत्यक्षात बेकरीवाले आहेत. त्यांचा प्रमुख व्यवसाय पाव बनविणे हा होय आणि त्या बरोबरच खारी, लिमजी प्रकारची बिस्किटे बनवतात. गरीब लोकांच्या मुलांना ही बिस्किटे ग्लुकोजसारखी वाटतात. उच्चभ्रू लोकांच्या आवडीची बिस्किटे बनविणारे कारखाने आहेत. त्यांचा माल स्वतःच्या ट्रेडमार्क लेबलखाली बाजारात विकला जातो. सन १९७६ मध्ये जेमको प्रॉडक्टस्चा भव्य कारखाना वर्षाला ६० लक्ष रुपयांची उलाढाल करत असे. त्यांच्या प्रत्येक बिस्किटाचे डिझाईन ट्रेड्मार्क कायद्याखाली रीतसर नोंदविलेले आहे. बिस्किटाचे प्रत्येक प्रकार इथे बनतात. बहुतेक सर्व काम यंत्रावर चालते. जेमको बिस्किटे प्रदर्शनातही ठेवली जात. त्याचा खप ग्रामीण भागात विशेषतः कोकणात फार मोठ्या प्रमाणावर चालत असे.

उ) कन्फेक्शनरी –

कन्फेक्शनरी (गोळ्या, बिस्कीटे) हा एक येथील मोठा व्यवसाय. यामध्ये छोटे–छोटे अनेक कारखाने आहेत. ते कोणाच्या स्पर्धेत येण्याचा कधी प्रश्नच नसतो. रेल्वेमध्ये, रस्तोरस्ती खूप सारे लोक गोळ्या, बिस्कीटे विकण्याचे काम करतात. गोळ्या बिस्कीटे कन्फेक्शनरी फॅक्टरीत बनविणे, तसेच पॅकिंग करण्याचे काम घरातील स्त्रिया करतात.

बिस्कीट फॅक्टरीमध्ये लासी गीतनदास फॅक्टरी १९६० पासून कार्यरत आहे. आधुनिक प्रकारचे निरनिराळे बिस्कीटाचे उत्पादन घेतले जाते. [१८]

ऊ) इलेक्ट्रीक सामान –

इलेक्ट्रीकचे सामान, पाईप, इलेक्ट्रीक बटन, स्वीच, इलेक्ट्रीक साठी लागणाऱ्या वायरचे नमुने, ६वार, ५वार, १०वार ॲल्युमिनियम, तांबे सर्व प्रकारच्या इलेक्ट्रीक वस्तू येथे बनविल्या जातात.

ए) गृहउद्योग (लोणची, पापड) –

गृहउद्योगामध्ये लोणची, पापड तसेच बटाट्याचे वेफर्स, शेव या सारख्या वस्तुंचे उत्पादन घरातील स्त्रिया करत. ज्यामुळे त्यांना काम मिळत असे. तसेच हे उत्पादन पूर्ण देशामध्ये ही पाठविले जाई. त्याच बरोबर बाहेरील देशातही या वस्तुंना मागणी आहे.[१९]

इ.स. १९५६ मध्ये 'शंकर पिकल प्रॉडक्टस्' ह्या व्यवसायाला सुरुवात झाली. सर्वप्रथम घरात मग स्वतःच्या दुकानात वेगवेगळ्या जागेत नंतर त्याहून मोठ्या जागेत हा व्यवसाय सुरू झाला. मुरली बजाज हा सारा कारभार पहायचे. १९६१ सालापासून त्यांनी परदेशी माल पाठवायला सुरूवात केली. एकूण उत्पादनाच्या ८० ते ९०% माल सुमारे पाच ते सहा लाख रुपयांचा मध्य पूर्वेतील देश कॅनडा, युनायटेड किंग्डम, वेस्ट इंडीज, देशात जात असे. लोणचे बनवण्याच्या हंगामात त्यांच्याकडे १५ ते २० स्त्रिया कैऱ्या कापण्याचे काम करत. मसाला तयार करणे, लोणची घालणे, लेबल लावणे ही कामे करण्यासाठी ही माणसे होती. शंकर पिकल्स ने त्यावेळी स्थानिक लोकांना रोजगार देण्यावर भर दिला. त्यात काम करणारे स्त्री, पुरुष हे विशेष करून मराठी होते. त्याच आधारावर हा उद्योग सुरू करण्यात आला.[२०]

ऐ) प्लॅस्टिक आणि कापडी पिशव्या –

उल्हासनगरमध्ये सर्व प्रकारच्या पॅकींग करण्याच्या प्लॅस्टिक पिशव्या तसेच कापडी पिशव्या मशीनवर बनवल्या जात. त्याची उत्पादन संख्या लाखात असे.

ओ) जीन्स पॅन्ट कारखाना –

जीन्स पॅन्ट बनवण्याचा कारखाना कॅम्प नंबर ५ मध्ये सुरू झाला आणि हे कारखाने हजारोमध्ये सुरू झाले. जीन्स पॅन्ट बनविण्यासाठी कापडाची पहिली कटींग केली जाते. साईज नुसार त्या शिलाईसाठी प्रत्येक व्यापाऱ्याद्वारे संबंधित कारखान्यामध्ये पाठविल्या जातात. अशा प्रकारे हजारो मशीनवर कारागीर लाखोंच्या संख्येने जीन्स पॅन्टवर शिलाई करत. मशीन एम्ब्रॉयडरी केल्यानंतर शिलाईसाठी पाठविली जाते. जीन्स पॅन्ट शिलाई केल्यानंतर वॉशिंग मशीनमध्ये धुण्यासाठी पाठविली जाते. प्रत्येक जीन्स पॅन्ट साईज, गुणवत्ता आणि उत्तम दर्जाच्या प्रमाणात बनविली जाते. वॉशिंग मशीनमध्ये धुतल्यानंतर जीन्स पॅन्टला सुकविले जाते. सुकविल्यावर इस्त्री केली जाते आणि नंतर विक्रीसाठी दुकानात आणली जाते. या सर्व प्रक्रियेसाठी वेगवेगळे युनिट असतात. जसे जीन्स पॅन्टसाठी कपड्याचे कटिंग करणे, कटिंग

केल्यावर मशीन एम्ब्रॉयडरी करण्यासाठी कारागीर शिलाई मशीन वर एम्ब्रॉयडरी करतात. ह्या कामासाठी चायना आणि जपानवरून एम्ब्रॉयडरी मशीन मागविल्या आहेत. आणि शेकडो कपड्यांवर एम्ब्रॉयडरी केली जाते. त्यानंतरचे काम म्हणजे शिलाई करण्याचे. मग जीन्स पॅन्ट धुलाईसाठी वॉशिंग मशीन मधून वॉश केली जाते. जीन्स पॅन्टला धुतल्यानंतर सुकविले जाते व नंतर प्रेस करण्यासाठी प्रेसवाल्याकडे पाठविली जाते. प्रेस झाल्यानंतर पॅकिंगसाठी पाठविल्या जातात.[२१]

औ) रेडिमेड कपड्यांना शिलाईचे काम –

औद्योगिक उत्पादनात सर्वांत महत्त्वाचे काम रेडिमेड कपड्यांना शिलाई. उल्हासनगरमध्ये हजारो कारखाने आहेत. जिथे रेडिमेड कपड्यांना शिलाई करण्याचे काम केले जाते. हजारो कारागीर सर्व प्रकारचे पंजाबी सुट तसेच सर्व प्रकारच्या लहान मुलांच्या कपड्यांना शिलाई केली जाते.

अं) लाल चुनरीचा कारखाना –

लाखोंच्या संख्येत लाल चुनरी जी लग्नामध्ये वधू अंगावर घेते तसेच मंदिरात देवीला वाहण्यासाठी ज्या चुनरी बनतात त्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते. ह्या चुनरी दुबई आणि इतर देशांमध्ये निर्यात केल्या जातात.

चुनरींना शिलाई मारण्याचे काम घरातील स्त्रिया करतात.[२२]

११) उल्हासनगरमधील बाजार –

अ) प्रेस बाजार –

शिवाजी चौकाच्या उजव्या बाजूला नेहरू चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रेस बाजार आहे. जिथे छपाईची सर्व कामे होतात. वर्तमानपत्र छापणे, पुस्तके छापणे, नोटबुक, बील बुक, रजिस्टर, स्क्रीन प्रिंटींगदेखील होते. लग्नाच्या पत्रिका देखील छापून मिळतात. प्रिंटींग प्रेससाठी लागणारे पार्ट, शाई इत्यादी सर्व मिळते. प्रिंटींग एक कलर, दोन कलर, आणि चार कलर सर्व कामे करून मिळतात. मोठ–मोठे डिजिटल बॅनर बनविण्याचे साधन आहे. जशी मागणी येते तसे बनवून दिले जातात. शिवाजी चौक प्रेस बाजारात रबर स्टॅम्प बनवून मिळतात. प्रेस बाजारानंतर फर्निचर बाजार, सुरू होतो. इथे लाकूड आणि स्टीलचे फर्निचर अनेक प्रकारचे

मनपसंद फर्निचर मिळते. मागणीनुसार लाकडी आणि स्टील फर्निचर बनवून दिले जाते. फर्निचर भाग बनविण्याचे काही छोटेछोटे कारखाने आहेत. स्टील कपाट बनविण्याचे भरपूर कारखाने आहेत. इथे सर्व प्रकारचे पलंग, सोफासेट, डायनिंग टेबल, खुर्च्या सर्व प्रकारचे फर्निचर मिळते.

नेहरू चौकावरून पाच रोड जातात –

१) फर्निचर बाजार २) सेंट्रल हॉस्पिटल ३) गोल मैदान ४) अमन टॉकीज रोड ५) नेहरू चौकावरून सिरू चौक आणि १ नंबर पासून दुसरा खेमानी रोड.

अमन टॉकीज रोडवर प्लॅस्टिकची खेळणी आणि स्टोअरमध्ये सामान विकण्याची दुकाने आहेत. जिथे होलसेलमध्ये माल विकला जातो. प्लॅस्टिकची दुकान आहेत जिथे सामान पॅकिंग करण्यासाठी प्रत्येक मापाच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या मिळतात. सर्व दुकानात होलसेल दराने माल मिळतो. हॉस्पिटल रोडवर घर, इमारतीला रंगविण्यासाठी रंगाचे सामान आणि हार्डवेअर दुकाने आहेत. पुढे सेंट्रल हॉस्पिटल जे सरकारकडून गरीब वर्गाला विनामूल्य मध्ये सेवा दिली जाते. त्याच्या समोरच छोटी–मोठी सायकलची दुकाने आहेत. जिथे प्रत्येक प्रकारची सायकल मिळते. पुढे टाऊन हॉल आहे. जिथे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी लोकांना भाडे तत्त्वावर उपलब्ध करून दिला जातो. जवळ सेंट्रल पोलीस स्टेशन आहे. शोरुम नेहरू चौकापासून गोल मैदानापर्यंत जाताना रोडवर तयार कपड्यांची मोठ्मोठी दुकाने आहेत.

आ) साडी होलसेल बाजार –

बँक ऑफ बडोदाच्या समोर हिरा मंगल कार्यालयाकडे रस्त्यावर साडीचे होलसेल दुकान आहे. सर्व प्रकारच्या प्रिंटेड, प्लेन, बेंगलोर जरीच्या साड्या आणि साड्यांच्या शेकडो व्हरायटीजची होलसेल दुकाने आहेत. नेहरू चौकाच्या पॉचो रोडवर फटाक्याचे दुकान आहे. जिथे बाराही महिने मनपसंद फटाके मिळतात.

इ) जापानी बाजार –

नेहरू चौकापासून सिरु चौकापर्यंत जाणाऱ्या मार्गावर जापानी बाजार आहे. येथे सर्व प्रकारचे कपडे, मोठमोठे शोरुम (दुकाने), तयार कपड्यांचे शोरुम, साड्यांचे शोरुम आणि अन्य सर्व सामान ज्यामध्ये बुटाची दुकाने, भेटवस्तू देण्यासाठी लागणारे सामान, शाळेच्या पुस्तकांची दुकाने आहेत.

ई) शहाड फाटक ते मुरबाड रोडवरील बाजार –

शहाड फाटकापासून पुढे मुरबाड हायवे रोड आहे. जिथे जवळ सेंच्युरी रेयॉन कंपनी आहे. सिरू चौकापासून एक नंबर कॅम्पपर्यंत येणाऱ्या रस्त्यावर कपडे आणि रेडिमेड कपडे यांची मोठी दुकाने आहेत. एक नंबरवर पोलीस स्टेशन आहे. तसेच ट्रॅफिक पोलीस कार्यालय आहे. शिव रोड आहे जो बाहेर सेंच्युरी रेयॉन कंपनी पर्यंत जातो.

उ) हिल लाईनवरील बाजार –

हिल लाईन बाजार जेथे आहे तेथे आज पोलीस स्टेशन आहे. तिथे पहिले कॅम्प कमांडर कार्यालय होते. त्याच्या देखरेखीखाली भाजी, धान्य, दूध पावडर, रॉकेल सिंधी समाजाला सरकारकडून दिले गेले. या पाच नंबरमधील कारखान्यात अनेक कारागीर असून जीन्स पॅन्टला लागणारे सामान, बटण, धागा सर्व काही उपलब्ध होते. या सर्वांची मोठमोठी दुकाने आहेत.

उल्हासनगरमधील कॅम्प नं. ५ मध्ये तहसिल कार्यालय जे गांधी रोडवर आहे. त्याच बरोबर रजिस्ट्रार कार्यालय आहे. १) महिला बाल समाज केंद्र २) सेतू कार्यालय ३) दशहरा मैदान आहे. उल्हासनगर चार–पाचच्यामध्ये नेताजी चौक आहे. एक रोड कॅम्पकडे जातो. हा रोड भाटिया रोड आणि पाच नंबर कॅम्प दूध नाक्याकडे जाऊन मिळतो. स्वामी शांती प्रकाश आश्रम पासून नेताजी चौकजवळ योग आश्रम आहे. नेताजी पासून उल्हासनगर चार ओटीपर्यंत एक मोठी बाजारपेठ आहे. जिथे स्थानिक लोकांच्या गरजेचे सर्व सामान मिळते. तसेच भाजी बाजार आहे. व्हिनस टॉकीज पासून एक रोड उल्हासनगर स्टेशनकडे तीन नंबर ओ.टी.पासून दोन नंबरकडे जातो. दुसऱ्या बाजूकडील रोड मौर्यनगरी पासून व्ही.टी.सी. मैदानापासून श्रीराम टॉकीजकडे जातो. श्रीराम टॉकीजपासून पवई चौकपर्यंत बॅग बनविण्याचे उत्पादन क्षेत्र येथे वेगळ्या प्रकारच्या शाळेच्या बॅग, ऑफिस बॅग, प्रवासी बॅग बनविण्याचे क्षेत्र आहे, जेथे हजारो कारागीर गृहउद्योग आणि बॅग्ज शिलाई करून विक्रीसाठी दुकानात पोहोचवतात. इथे एक छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा आहे. आणि एक मोठे विशाल शिवमंदिर दर्शनीय आहे. पवई चौकात शेकडो दुकाने असून येथे मनपसंद बॅग्ज मिळण्याची सुविधा आहे. हा बाजार होलसेल मालाची विक्री करतो. इथे बनवलेल्या बॅगा स्वस्त, सुंदर आणि टिकाऊ असतात असे मानतात. म्हणून इथल्या बॅग्जला प्रत्येक शहरात, प्रदेशात मोठी मागणी आहे.

ऊ) विठ्ठलवाडी स्टेशन बाजार –

पवई चौकाच्या उजव्या बाजूला विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन आहे. विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन परिसरात गोळ्या, बिस्किटे, जनरल स्टोअर्स तसेच सर्व वस्तू होलसेल दरात मिळण्याची शेकडो दुकाने आहेत. येथूनच छोट्या–छोट्या गावात आणि शहरात विक्रीसाठी सामान नेले जाते. इथे पवई चौकात प्रांत कार्यालय आहे.

विठ्ठलवाडीपासून एक रोड कल्याणकडे जातो. दुसरा रस्ता कल्याण–अंबरनाथ रोड या नावाने प्रसिध्द आहे. हा साईबाबा मंदिर परिसर 'शांतीनगर' नावाने प्रसिध्द आहे. इथे लहान–मोठी स्टीलची कपाटे बनविण्याचा कारखाना आहे. चारचाकी गाड्या व दुचाकी मोटार सायकलचा मोठा बाजार आहे. जिथे नव्या–जुन्या कार आणि दुचाकी मोटार सायकलचा मोठा बाजार आहे.

१२) ट्रान्सपोर्ट कार्यालय –

संपूर्ण भारतभर पाठविण्यासाठी किंवा माल मागविण्यासाठी ट्रान्सपोर्ट कार्यालय आहे. पूर्ण भारतात माल पाठविण्यासाठी अथवा मागविण्यासाठी ह्या बाजारात जाणारे आणि येणारे वाहनांसाठी संपर्क कार्यालय आहे. स्थानिक आणि आसपास मुंबईचा विभाग, उपनगर, नवी मुंबई, भिवंडी, नाशिक, पुणे, पिंपरी आसपासच्या सर्व शहरातून रोज माल मागविला आणि पोहोचविला जातो. त्याचे देखीलसंपर्क कार्यालय आहे. सतरा सेक्शनमध्ये टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्ससाठी लक्झरी बसेस, बेंगलोर, कोल्हापूर, अहमदाबाद, सुरत, नाशिक इ. सर्व ठिकाणी जाणाऱ्या बसेस येथे आहेत. स्थानिक मुंबई दर्शन, नाशिक, शिर्डी, शनी–शिंगणापूर यासाठी लक्झरी बसेस आहेत. त्यासाठी वेगवेगळे टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स कार्यालय आहे.[२३]

१३) वाहतूक व दळणवळण –

कल्याण रेल्वे स्टेशनपासून काही बसेस आणि उपनगरातील कॅम्पमध्ये जातात. नंतर उपनगरात शहर बस छावणीत (कॅम्प) एक ते पाच नंबर कॅम्पपर्यंत आहेत. याशिवाय कल्याण, अंबरनाथ बससेवादेखील काही प्रमाणात चालू आहे. येथे सायकलदेखील अतिशय लोकप्रिय आहे. निर्वासितांना ज्यांना गाडी चालविण्याचे परवाना पाहिजे त्यांना आर.टी.ओ. कार्यालयात कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते. प्रादेशिक परिवहन कार्यालय तात्पुरता परवाना नुतनीकरण

करण्यासाठी व्यवस्थापित आहे. बस ह्या कधीच चांगल्या स्थितीत नाही, हे त्यांचे मालक देखील मान्य करतात. विविध सेवेची निश्चित अशी वेळ नाही. कामगार व्यस्त असतो. मालकाच्या कामातील कामगारांच्या वेळा अतिशय विचित्र असतात. विशिष्ट ट्रेन गाडी पकडण्याच्या हेतूने ते आधीच बसमध्ये प्रवास करताना आढळतात. परिणामी प्रवासामध्ये गर्दी आढळून येते.

काही व्यक्ती उल्हासनगरात प्रामुख्याने व्यवसाय करतात, ते स्वतःच्या गाडीने प्रवास करतात. संपूर्ण उल्हासनगर हे अत्यंत जडवाहतुकीसाठी एक शहरी क्षेत्र म्हणून महत्त्वाचे आहे.[२४]

१४) स्वयंरोजगार तत्त्व, संकल्पना –

स्वयंरोजगार संकल्पना सर्वप्रथम कोठे उदयास आली असेल तर ती उल्हासनगर उपनगरात. हजारो संधी निर्वासित निराधार होऊन उल्हासनगरात वसविण्यात आले. त्या वेळी आपल्याला अग्रक्रमाने नोकऱ्या मिळतील की नाही? याची वाट न पाहता स्वतःचा रोजगार स्वतःच निर्माण केला. येथे आले तेव्हा कोणाकडे दोन रुपये तर कोणाकडे पन्नास रुपये होते. त्या त्या प्रमाणात धंदा सुरू केला. उल्हासनगर नगरपलिकेचे प्रशासक श्री. रेड्डी १९७६ मध्ये म्हणाले की, सिंधी नोकरी करणारा असला तरी तो येता–जाता चार पीस कापड तरी विकून येईल, अशी ही माणसे उद्योगी.

उल्हासनगरातील उद्योगधंद्यात साबणाचे कारखाने, एम्ब्रॉयडरी हा त्या खालोखाल मोठा व्यवसाय. रेडिमेड कपडे, कन्फेक्शनरी, बेकरी, प्लास्टिकच्या विविध वस्तू, कर्टन्स, विजेचे साहित्य, बिस्किटे, लोणची, फर्निचर, यंत्रमाग, सूत रंगवणे, फोटो स्टुडिओ इ. अनेक उत्पादन करणारे कित्येक लहान–मोठे कारखाने आहेत. पेन, बॉलपेन बनविण्याचा उद्योग करून प्रगती केलेले आढळतात. धंदा हा त्यांचा प्राण आहे. तो अगदी किमान फायदा मिळाला तरी करतो, वाढवितो व हळूहळू उद्योगपती बनतो. [२५]

स्वयंरोजगारामुळे–स्वतःचा तर विकास होतोच पण त्याचबरोबर आजूबाजूच्या परिसरातील गरीब व्यक्तींसाठीही रोजगार उपलब्ध होतो.

उल्हासनगरातील व्यवसायामध्ये विविध प्रकारच्या उद्योगामध्ये प्रचंड प्रगती झाली आहे. तथापि उल्हासनगर जीन्सनिर्मिती, विवाहसामुग्री आणि फर्निचरसाठी प्रसिध्द आहे. शहराच्या नावाची डुप्लिकेट उत्पादने म्हणून प्रसिद्धी असलेल्या उल्हासनगरावरील आरोपाव्यतिरिक्त व्यावसायिक नेत्यांनी असे म्हटले आहे की त्याचे नफा व अधिक समृध्दी ही त्यांची तत्त्वे आहेत. उल्हासनगरात कमी किंमतीत उच्च दर्जाचे उत्पादन देण्याचा प्रयत्न करतात. कारण ते उत्पादन खर्च कमी करतात.

उल्हासनगरात उत्पादित केलेल्या विविध वस्तूंमध्ये कापड, कृत्रिम कापड मोठ्या प्रमाणावर होते. तसेच फर्निचर, ऑटोमोबाईल, धान्य, आभूषण याला राज्यातील वेगवेगळ्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. आणि विशेषतः जीन्स उल्हासनगर हे भारतातील सिंधींसाठी सर्वांत मोठे खरेदीचे ठिकाण आहे. विवाहसामुग्री खरेदीसाठी महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश या प्रदेशातील विविध भागातील लोक विवाहाशी संबंधित खरेदीसाठी शहराला भेट देतात. उल्हासनगर कॅम्प नं. २ आणि ३ सर्वांत व्यस्त व्यावसायिक खरेदी केंद्र आहे. उल्हासनगर कॅम्प नं. ५ जीन्ससाठी प्रसिध्द असून येथून भारतातील विविध बाजारपेठेत तयार कपडे पाठविले जातात. [२६]

सिंधी जनतेने उल्हासनगरमध्ये प्रत्येक गल्लीमध्ये कॉटेज इंडस्ट्री निर्माण केली आहे. मेहनत, आत्मविश्वास, आलेल्या परिस्थितीला धैर्याने तोंड देणे हे ह्या समाजाचे वैशिष्ट्य होय.[२७]

१५) उल्हासनगरातील अर्थव्यवस्थेत आदिवासींचे योगदान –

सिंध प्रांतातील निर्वासित १९४७ साली उल्हासनगर येथील ब्रिटिशकालीन मिलिटरीच्या बॅरेकमध्ये प्रस्थापित झाले. त्या वेळी उल्हासनगर हे झुडपे, गवत, जंगलयुक्त होते. मिलिटरीने केलेले रस्ते नादुरुस्त होते. त्यासाठी त्यांना मनुष्यबळाची तातडीची गरज होती. आदिवासी समाज हा अत्यंत कष्टाळू इमानदारीने काम करणारा. त्यांचा उपयोग पहिल्या वेळेस उल्हासनगरची साफसफाई, रस्ते बांधणे यासाठी झाला. आजूबाजूच्या परिसरात राहणारे आदिवासी समाजाचे लोक उल्हासनगरमध्ये येऊ लागले.

उल्हासनगरमध्ये सुरुवातीला काही कामधंदा नसल्यामुळे उल्हासनगरच्या घराघरामध्ये निर्वासित म्हणून आलेल्या सिंधी समाजाने आपापल्या घरात लहान गृहउद्योग सुरू केले. गोळ्या, बिस्कीटे, चॉकलेट, कपडे शिलाई, लोणची, पापड असे उद्योग सुरू केले. गृह उद्योगांना सुरुवात केली. प्रत्येक कामाला मनुष्यबळाची गरज असते, ती गरज आजूबाजूच्या परिसरातील आदिवासी समाजाने पूर्ण केली व त्याबरोबर आदिवासी समाजाच्या हातातही पैसा आला. उल्हासनगरच्या मनुष्य बळाचा प्राथमिक कामाच्या गरजा येथील आजूबाजूच्या गावांचा विकास आदिवासींमुळेच शक्य झाले. प्रत्येक छोट्या मोठ्या कारखान्यात मजूर म्हणून त्यांनी काम केले. वीटभट्टीवर पूर्ण मजूर म्हणून आदिवासीच काम करत होते. ठेकेदार कोणीही असला तरी येथे मजूर आदिवासीच. ते मेहनतीने काम करीत असत. त्यांच्यासाठी शासकीय योजना कार्यान्वित केल्या. परंतु वास्तविक योजना माहीत नसल्यामुळे ते जंगल आणि झोपडी याशिवाय दुसरी अपेक्षा करीत नाहीत.

सुरुवातीला स्वयंपाकासाठी रॉकेलचा वापर करत. परंतु रॉकेल कमी मिळत असल्यामुळे कोळशाचा वापर कुटुंबाला करावा लागत असते. बहुतेक आदिवासीच कॉन्ट्रॅक्टरकडे जंगलाचा उत्कृष्ट कोळसा तयार करण्याचे काम करीत होते. त्याचा फायदा उल्हासनगरच्या लोकांना होत होता.

जंगलाच्या ठेकेदाराकडे बहुसंख्य आदिवासीच काम करत असत. जंगल तोडणे, त्यापासून वीटा माल तयार करणे, कोळसा तयार करणे व नवीन माल तयार करणे. उल्हासनगरचे सर्व सॉ– मिलवाले तोच माल उल्हासनगरमध्ये आणून सॉ– मिल चालवत होते. त्याचा उपयोग उल्हासनगरमधील दरवाजे, खिडक्या, फर्निचर, अनेक प्रकारचे लाकडी काम करीत. या जंगलातून लाकूड घेत असत. जे लाकूड येत असे त्यापासून घराला लागणारे लाकडी साहित्य तयार करीत होते. उल्हासनगरच्या प्रगतीमध्ये आदिवासी समाजाचे फार मोठे योगदान आहे. आजही बांधकाम ठेकेदाराकडे बहुसंख्य आदिवासी मजूर काम करीत आहेत.[२८]

१६) किंमत आणि नफानिश्चिती यांचा अद्वितीय सिद्धान्त (Unique theory of Price and Profit Determination) –

सामान्य सिद्धान्त सांगतो की, मागणी आणि पुरवठ्याचा प्रभाव बाजारातील उत्पादनाची किंमत ठरवितो. आणि उद्योजक नेहमी जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतो. स्थलांतरानंतर स्थलांतरित सिंधी अत्यंत गरिबीपासून ग्रस्त होता. स्थलांतर केल्यानंतर सिंधींना अर्थव्यवस्थेत नवीन बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी आणि आपल्या स्वतःच्या समुदायाची मागणी पूर्ण करण्यासाठी 'कमी किंमतीला' आर्थिक साधन म्हणून स्वीकारले. स्वस्त दराने म्हणून लोक त्याचवेळी या कमी किंमतीच्या धोरणामुळे त्याचा स्थानिक बाजारपेठेवर परिणामकारक परिणाम झाला आणि हेच त्यांचे धोरण झाले.

या संबंधित विन्टर बर्लोव्हने सिंधी कम्युनिटी स्पर्धा मजबूत असल्याचा उल्लेख केला आहे. आणि सिंधी थोड्याफार लाभानेदेखील समाधानी असल्याचे म्हटले आहे. याबद्दल ते एक लोकसाहित्याचा मनोरंजक भाग सांगतात. सिंधी व्यापारी ज्याने साबणाचे चारशे बॉक्स आणले त्याने पेटीतून साबण घेतला आणि किंमत दराने साबण जो घेतला तो त्याच किंमतीत विकला. त्याच्या प्रतिस्पर्ध्याला त्याने नफा कसा बनवला हे ते पाहू शकले नाही. उत्तर आहे की, सिंधीने तो रिकामा बॉक्स पुन्हा साबण विकत घेतलेल्याला एक आण्याला विकला आणि त्याचा नफा त्याने घेतला.[२९]

खालील एक उदाहरण 'सिंधी व्यापारीचे नफा व मिळकतीचे त्याचे संक्षिप्त रुप पुढीलप्रमाणे –

आर्थिक क्षेत्र दररोज विक्री करणारे सिंधी व्यापारी आणि प्रतिस्पर्धी –

तपशील	अधिकृत बाजार	सिंधी व्यापारी
पेनाचा खर्च (१ नग)	रु. ०९/–	रु. ०९/–
पेनाची किंमत (१ नग)	रु. १२/–	रु. ११/–
एकूण विक्री केलेल्या पेनांची संख्या	६०० नग	१०५० नग
एकूण उत्पन्न प्राप्त	रु. ७२००/–	रु. ११,५५०/–
एकूण नफा	रु. १८००/–	रु. २,१००/–
नफ्याची तुलना		रु. + ३००

वरील उदाहरणावरून असे स्पष्ट होते की, कमी किंमतीच्या बाजारातील अधिकृत किंमतीची तुलना करता उत्पादनातील पेनांची संख्या अधिक विकली गेली आणि रु. ३००/– फायदा झाला.

कमाल नफा आणि जास्तीत जास्त विक्री ही सिंधी व्यापारी समाजाचे जास्तीत जास्त नफा मिळविण्याचे अत्यंत साधे धोरण आहे.

कोणत्याही आर्थिक सिद्धान्ताचा अभ्यास करत नाहित. ते ज्ञान आणि कृतीवर विश्वास करतात. सिंधी फक्त जास्तीत जास्त वस्तुनिष्ठपणे विक्री या गोष्टीला प्राधान्य देतात.

कौटिल्याने अर्थशास्त्रात सांगितले की, एखाद्याने एखाद्या उत्पादनाची किंमत निश्चितपणे ठरवता कामा नये तर केवळ किंमतीचा विचार करून व्यवसायातील कर्मचाऱ्यांना ५ ते १० टक़्के नफा मिळवून देण्याचे प्रोत्साहन दिले आहे. कौटिल्याने राज्याच्या शासनासाठी हा निकष सांगितला तो येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. सरकारसाठी कौटिल्याने तयार केलेल्या किंमतीबाबतचे निकष सिंधी अर्थव्यवस्थेत आढळून आले आहेत. सिंधी उत्पादनाच्या किंमतीच्या आधारावर आणि मागणीच्या पुरवठ्याचे गुणोत्तर तसेच उत्पादनाच्या किंमती कमी करण्याचा प्रयत्न करतात. यामुळे हे त्या ग्राहकांना कमी दराने उत्पादने प्रदान करू शकतात. कौटिल्याच्या सिद्धान्तात पाच ते दहा टक्के लाभ हाच सिंधी अर्थव्यवस्थेवर देखील लागू आहे.

किंमत निर्धार सामान्यतः व्यापारी वापरतात. ग्राहकाच्या आर्थिक स्थितीच्या आधारावर सिंधी व्यापारकर्ते ग्राहकांकडून किंमत आणि नफा घेतात. जर त्यांना असे आढळले की ग्राहक गरीब वर्गात आहे तर त्यांना फक्त ४ ते ५ टक्के नफा मिळतो आणि ग्राहक मध्यमवर्गाचे असल्याने ते ७ ते ८ टक्के घेतात आणि जर ग्राहक धनवान असेल तर दहा किंवा त्यापेक्षा जास्त नफा ते घेऊ शकतात आणि निराधार असल्यास ते उत्पादनाच्या खर्चापेक्षा कमी किंमत घेतात.

१७) सिंधींचे अर्थव्यवस्थेतील वेतन धोरण –

कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये श्रमिक उत्पादन हे एक सक्रिय आणि महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यांनी एक सामाजिक, आर्थिक उद्दिष्ट म्हणून एक वेतन धोरणाची माहिती दिली आणि कामगारांच्या कामकाजातील स्थिती सुधारण्यासाठी कायदे केले.

१. कामगाराला वेतन ठरविल्याप्रमाणे दिले पाहिजे.

२. मजुरी पूर्वी ठरवून दिली नसल्यास काम पूर्ण करण्याच्या प्रमाणात आणि वेळेत खर्च करण्यात येणारा खर्च निश्चित करणे आवश्यक आहे.

३. जर कामगारांना सुट्टीवर काम करण्यासाठी तयार केले गेले तर विशेष मोबदला देण्याची गरज आहे.

४. उच्च उत्पादनासाठी कामगारांना प्रोत्साहन दिले जाते.

५. काम करत असताना अपघात किंवा मृत्यू झाल्यास भरपाई देणे गरजेचे आहे.

कौटिल्याचे वेतनाबाबतचे धोरण सिंधी अर्थव्यवस्थेत समाविष्ट केले जाऊ शकते. कारण ते लहान उद्योजकाचे उद्योजक आहेत आणि कामगारांच्या मजुरीसंबंधातील सर्व धोरणांचे पालन करतात. कामगारांची नेमणूक करण्यापूर्वी सिंधी कामगारांची मजुरी नेहमीच देतात. आणि त्यानुसार मजुरांकडून त्याची साक्ष दिली जाते.

सिंधी मजुरांना त्यांच्या कामानुसार आणि वेळेनुसार मजुरी दिली जाते. मजूर सुट्टीवर काम करतात किंवा अतिरिक्त वेळ देतात. तर ते त्यांना ओव्हर टाईम कामासाठी देतात. काही वेळेत कधी–कधी जर उत्पादनांची मागणी वाढली आणि सिंधी उत्पादन वाढवत असतील तर कामगारांना दुप्पट वेतन देऊन त्यांना मोबदला देऊन आकर्षित करतात.

१८) नक्कल हुबेहूब माल आणि दुय्यम माल (Duplicate Goods and Inferior Goods) –

भारतात सामान्यपणे छोट्या आणि मोठ्या उद्योगामधील उत्पादनांना भारतीय मानक संस्थेने त्यांच्या दर्जाचे दर्जा दिला आहे. त्यात प्रामुख्याने Indian Standard Institution (ISI) असलेले एक चिन्ह 'ए' मार्क गुणवत्तेचे मुख्य निर्देशक आहे. काही औपचारिक क्षेत्रांनी त्यांच्या स्वतःच्या गुणवत्ता नियंत्रण विभागाची स्थापना केली आहे. जसे (पारले–जी) (Parle-G) ने सर्व उत्पादन क्षेत्रातील स्वतःचे गुणवत्ता नियंत्रण विभाग स्थापन केले आहे. उत्पादन ओळखण्यासाठी ते त्या उत्पादनाच्या जाहिरातीसाठी जातात. अशाप्रकारे त्या उत्पादनांची विक्री किंमत वाढते आणि विक्री उत्पादकांना त्यानुसार उत्पादनाच्या किंमती निश्चित करणे आवश्यक आहे.

सिंधी अर्थव्यवस्थेत अशी धोरणे अवलंबित नाहीत. कारण कमी किंमत या आधारावर त्यांची स्थापना झाली आहे. जाहिराती वरील खर्च पैसा वाया घालवित आहे. कारण उत्पादनांची किंमत वाढते आणि बाजारावर वर्चस्व करण्याची समस्या निर्माण होते. परंतु याचा अर्थ असा होत नाही की ते मालाची देखरेख करत नाहीत. गुणवत्ता जर ते कमी किंमतीला उत्पादनाची विक्री करीत असतील तर त्यात त्यांना फायदा होतो.

सिंधी प्रॉडक्टस बहुतेकदा टॅग डुप्लिकेट देतात, हे एक वर्णन आहे जे सिंधी उत्पादकांना चिडवतात. हे सिंधी अर्थव्यवस्थेत आढळते. त्यांनी ब्रँडेड उत्पादनांप्रमाणे त्यांच्या उत्पादनांची नावे दिली आहेत, जसे की Parle-G हे नावाजलेले ब्रँडेड उत्पादन आहे. ज्याचे त्यांनी नाव त्यांच्या उत्पादनासाठी दिले आहे. Parle-Jee या सर्व प्रकरणात विक्रेता आणि सामान्य लोक त्यांच्या उत्पादनाचे ब्रँडेड उत्पादनाचे मॉडेल आणि शैली कॉपी करणे डुप्लिकेट मानतात. प्रत्येक जण 'प्रिमियम ब्रँड' घेऊ शकत नाही, असे सिंधी व्यापारी मानतात. ग्राहक कमी मध्यमवर्गीय गटातील आहेत, ते ब्रँडेड उत्पादन विकत घेण्यास असमर्थ. जर त्यांना कमी किंमतीत अधिक चांगले उत्पादन मिळत असेल तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या अर्थव्यवस्थेत ब्रँडेड अर्थव्यवस्थेपेक्षा चांगले योगदान आहे. कारण भारत अधिक लोकसंख्या, कमी मध्यमवर्गीय गटातील आहे.[३०]

सिंधी अर्थव्यवस्थेच्या उद्योगामध्ये उत्पादित केलेले उत्पादन नेहमी दुय्यम मानले जाते. परंतु (B.G.D.) (Allen) आणि J. R. Hicks यांनी तंत्रज्ञानाचा विकास ग्राहकांच्या वर्तनाबद्दल आहे. ते म्हणतात की, एक दुय्यम चांगले आहे जे कमी प्रमाणात वाढते. परंतु कमाई वाढते. सिंधी अर्थव्यवस्थेमध्ये दुकाने आणि उत्पादन क्षेत्रांची संख्या वाढत आहे आणि राज्य सरकारच्या नोंदीनुसार ग्राहक सातत्याने वाढत आहेत. या आधारावर या वस्तूंना दुय्यम वस्तू म्हणून दोष देऊ नये.[३१]

१९) अन्नधान्याचे व्यापारी द्वारकादास वरणमल मटलानी –

सर्वप्रथम १९६० च्या आसपास द्वारकादास वरणमल मटलानी यांनी उल्हासनगर व आजूबाजुचा परिसर पिंजून काढला. मुरबाड, कल्याण, शहापूर गावातील लोकांचे प्रमुख उत्पादन शेतीतील भात हे आहे, असे समजल्यावर आणि त्या परिसरात राईस मिल फक्त दोन

होत्या, ज्या चालू होत्या, मुरबाडमधील दोन राईस मिल काही कारणास्तव बंद होत्या. त्यांनी त्या विकत घेऊन नव्याने मिलची उभारणी केली. त्यावेळेस झिनी आणि कोलम ह्या तांदळाच्या जातीचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असे. द्वारकादास हे शेतकऱ्याकडून उत्पादित केलेला भात खरेदी करत. आपल्या राईस मिलमध्ये पुढील प्रक्रियेसाठी आणत असत. तेथूनच तो पॅकिंग व विक्रीसाठी जात असे. शेतकऱ्यांना ते योग्य तो मोबदला मिळवून देत असत. शक्यतो शेतातील सर्वच भात आपल्याकडे येईल, असा त्यांचा कल असे. त्यासाठी त्यांनी राईस मिलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान मशिनरी आणल्या होत्या.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू, पालघर, वाडा, भिवंडी, शहापूर, जव्हार, मोखाडा या ठिकाणाहून झिनी भात ते विकत घेत असत. इतर काही तांदळाच्या जाती विशेषतः हळवा जे भाकरीसाठी; महाडी लाल भाकरीसाठी; औषधासाठी बोडका; खिरीसाठी झिनी व कोलम ह्यामध्ये झिनी ह्या भात खरेदीवर त्यांचा कल दिसून येतो. हळूहळू त्यांनी इतर राईस मिलमधील प्रक्रिया केलेला तांदूळ खरेदी करून पुन्हा आपल्या राईस मिलमध्ये ते प्रक्रियेसाठी आणत. अशाप्रकारे ठाणे जिल्ह्यातील राईस मिल भरभराटीस आल्या. त्यांनी आपला माल द्वारकादास झिनी तांदूळ या नावाने इतर ठिकाणी, पाकिस्तान, दुबई, सौदी अरब देश, तसेच बॉम्बेतही विक्रीसाठी पाठविण्यात यश मिळविले. मालाची बाजारपेठेतील मागणी वाढली. परिणामी खपदेखील वाढला.

राईस मिलमध्ये पुढे झिनी या तांदळाचे बी–बियाणे शेतकऱ्यांसाठी काढून ठेवले जात असे. उत्पादन वाढविण्यासाठी तसेच बाजारातील आपली मक्तेदारी त्यांनी वाढविलेली दिसून येते. व्यापारात ते चांगलेच स्थिर स्थावर झाले.

मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा या प्रदेशातील प्रसिद्ध असा खांडवा गहूचा व्यापार विक्रीसाठी सुरू केला. खांडवा गव्हाचे वैशिष्ट्य म्हणजे चांगली चव, वजन, उत्तम दर्जा, यामुळे हा गहू उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, डोंबिवली ह्या आजूबाजूच्या परिसरात विक्रीसाठी उपलब्ध करून दिला. १९७४ पर्यंत द्वारकादास हे अन्नधान्याचे मोठे व्यापारी म्हणून नावारूपास आले. त्यांनी अन्नधान्याच्या बाजारपेठेत व ठाणे जिल्ह्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले. त्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य तो भाव उपलब्ध करून दिला. उत्तम असे तंत्रज्ञान विकसित करून आपल्या मालाचा जम बाजारपेठेत बसवला. हे सर्व

कार्य १९९०–१९९५ पर्यंत अखंड चालू ठेवले. नंतर हळूहळू तांदळाच्या इतर जाती उपलब्ध होत गेल्या. स्पर्धा वाढली. द्वारकादास वरणमल मटलानी ठाणे जिल्ह्यातील तांदळाचे व्यापारी म्हणून प्रसिध्द झाले. त्यांची तिन्ही मुले अन्नधान्याचे व्यापारी आहेत. उल्हासनगर कॅम्प नं. १ तेजूमल चक्कीजवळ सध्या होलसेलचे मोठे दुकान बाजारपेठेत आहे. स्वतःची मोठी इमारत आहे.

२०) गजानन मार्केट – रेडिमेड होलसेल तयार कपडे –

इ.स.१९६६–६७ मध्ये माननीय महसूल मंत्री भाऊसाहेब वर्तक यांच्या हस्ते 'गजानन मार्केट'चे उद्घाटन करण्यात आले. कॅम्प नं. ३ मध्ये स्थित असलेल्या ह्या बाजारपेठेत सुरुवातीला मुंबईतील कापड मिल मधील थोडा डिफेक्टीव्ह (खराब) असलेला माल वजनावर मिळत असे. तो देखील प्रत्यक्षपणे मिल मधून बॉम्बेला रिजेक्ट माल उल्हासनगरात आणून नव्याने तयार करून विकला जात असे. टाकाऊ वस्तूपासून नवीन टिकाऊ वस्तू तयार करणे हे तंत्र दिसून येते. आधुनिक पध्दतीने त्यात सुधारणा करून श्रम, मेहनत, चिकाटी व दूरदर्शीपणा ही वृत्ती दिसून येतो. उल्हासनगरमधील प्रत्येक घरामध्ये शिलाई मशीन ही असतेच असते. स्पर्धा कशी निर्माण करायची, त्याला तोंड कसे द्यायचे, याचेही कसब त्यांच्याकडे दिसून येते. सुरत ह्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात साड्या आणून होलसेल दराने त्या उल्हासनगरमध्ये तसेच आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर विक्री करत असत.

उल्हासनगरमधील घनश्याम रामचंद्र बठेजा, 'विद्या प्रकाशन' वृत्तपत्राचे संपादक म्हणून कार्यरत आहेत. सर्वप्रथम त्यांचे वडील रामचंद्र बठेजा पाकिस्तानातील लाडखाना जिल्हा सोडून महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात स्थायिक झाले. त्यांनी आपली तेथील मालमत्ता कमी भावात आपल्या नातेवाइकांना विकून महाराष्ट्रात आले व त्या पैशातून भाड्याने घर घेतले व कापडाचे दुकान टाकले. ग्रामीण भागात आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर गिऱ्हाईक आपलेसे करण्याची वृत्ती, स्थानिक लोकांचा विश्वास संपादन करणे व तेथील समाजाशी एकरुप होण्याचे कौशल्य आणि आपल्या गिऱ्हाइकाने ओळखीने आणलेल्या माणसांनादेखील विश्वासावर मदत करत गेले. माणसे आपलीशी करत जोडत गेले. लाखो रुपये त्यांचे उधार असायचे. तरी गिऱ्हाइकाला पुन्हा मदत करायचे. अशा पध्दतीने लोकांचा विश्वास संपादन केला. थोड्याच कालावधीत ते जालना

जिल्ह्यात नावारूपास आले. १९४७ ते १९८० हा कालखंड महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात गेल्यामुळे स्थानिक मराठी भाषा उत्तम अवगत होती.

घनश्याम बठेजा हे लहानपणापासून वडिलांचा व्यवसाय पाहत मोठे झाले. आपल्या वडिलांच्या व्यवसायात पैसे वसुलीचे कामकाज पाहत असत. १९८१ च्या सुरुवातीस त्यांच्या व्यवसायास प्रथम सुरुवात झाली. उल्हासनगरमध्ये जरीच्या कारखान्याच्या कामास कॅम्प नं. २ मध्ये त्यांनी सुरुवात केली. लग्नासाठी वधूला व देवीला लागणारी चुनरी बनविण्याचा त्यांचा कारखाना होता. त्यांचा व्यवसाय होलसेलने मोठ्या प्रमाणात चालत असे. वृध्दापकाळाने त्यांचा व्यापार पुढील पिढीकडे मुलाकडे आला. त्यांनीदेखील कापड व्यवसायात नावलौकिक मिळविला. आज ते रेडिमेड कापड व इतर कापड, हाँगकाँग, सिंगापूर, थायलंड, मलेशिया या ठिकाणी निर्यात करतात.

अशा प्रकारे परंपरागत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेला कापडाचा व्यापार भरभराटीस आला.

२१) फर्निचर मार्केट –

पूर्वीच म्हणजे १९४७ पासून उल्हासनगरच्या सभोवती अतिशय घनदाट जंगल होते. ठाणे त्या वेळी डोंगर, दऱ्याखोऱ्यात अतिशय घनदाट जंगल होते. अशा जंगलात साग, शिसव, ऐन असे इमारतीसाठी लागणारे लाकूड मुबलक प्रमाणात होते. त्यांना राहण्यासाठी बराकी मिळाल्या. त्याच्या मागे पुढे भरपूर मोकळ्या जमिनी होत्या. बांधकामासाठी लाकडाची गरज असते. अशा परिस्थितीत काही धनिकांनी सॉ मिलचे परवाना स्वस्तात मिळविल्या लाकूड ठेवण्यासाठी मोकळ्या जागा भरपूर असल्यामुळे त्या बळकावल्या गेल्या.

लाकडापासून बनविलेल्या कोळशावरच स्वयंपाक किंवा रॉकेलच्या स्टोव्हवर स्वयंपाक केला जात असे. गावोगावी मोठे 'जंगल कॉन्ट्रॅक्टर' होते. ते कोळसा, लाकूड स्वतः पुरवत असत. त्या काळात कायदे फार शिथिल होते. अधिकारी वर्गही चांगला होता. अनेक सॉ मिल उभ्या राहिल्या फर्निचरची गरज प्रत्येकालाच होती. सरदारजी लोकांनी प्रथम फर्निचरचा धंदा सुरू केला. त्याला मागणी वाढली तसतसे फर्निचरची दुकानेही वाढली. बेकायदेशीर बांधकामासाठी दरवाजे, खिडक्या, कपाटे असा माल तयार होऊ लागला.

'मातृभूमी' ही सर्वांत मोठी सॉ मिल होती. कॉन्ट्रॅक्टरला आधीच ॲडव्हान्स देऊन असे अनेक कॉन्ट्रॅक्टर त्याने तयार केले. भांडवल मिळते म्हणून अनेक धंदेवालेदेखील तयार झाले. पूर्वी बहुतेक सरदारजी फर्निचरच्या धंद्यात होते. पुढे यु.पी.चे कसबी सुतार या धंद्यात आले. मालक जरी कुणी असला तरी कारागीर मात्र यु.पी.चेच होते.

उल्हासनगरमधून विविध प्रकारचे फर्निचर गोवा, कर्नाटक, नागपूरपर्यंत सर्व महाराष्ट्रात जाते. खरेदीसाठी अनेक व्यापारी उल्हासनगरमध्ये येतात. ट्रकवर माल घेऊन जातात. लाकडाला वळण देण्यासाठी छोट्या सॉ मिल असतात. त्यावर बाक दिला जातो. बॉक्स, पलंग, डायनिंग टेबल वेगवेगळ्या डिझाईनच्या खुर्च्या, मंदिर, देवघरासाठी पूर्वी म्हैसूरमधून फर्निचर येत होते. आता इकडचे फर्निचर तिकडे जाते.

कारागिराला काम दिले जाते. ते सकाळपासून रात्रीपर्यंत मेहनत करतात. कातणाऱ्या व्यक्तींना डझनावर कातण्यासाठी १ इंचापासून ५ इंचापर्यंत लाकूड दिले जाते. त्यामुळे कारागीर जास्तीत जास्त माल तयार करतात.

सॉ मिलवर टनावर माल कापून दिला जातो. त्यामुळे फर्निचरवाल्यांनाच तो स्वस्तात पडतो. याच जोडीला नक्षीकाम करणारे कारागीर म्हणजे कार्व्हींग करणारे. त्यांना पण नगावर काम दिले जाते. त्यांना नगाचा भाव जास्त दिला जातो. आवड असणारे अनेक लोक येथूनच फर्निचर घेणे पसंद करतात.

फर्निचर बाजार एक स्वतंत्र पेठ आहे. लाकू ड फर्निचरबरोबरच आता स्टील फर्निचरही सुरू झाले आहे. त्यालाही चांगली बाजारपेठ आहे. उल्हासनगरचे फर्निचर तर गोव्यात रस्त्याचे कडेला सर्व शहरात पाहावयास मिळते. सुंदर फोमच्या गाद्या त्यावर रंगीत डिझाईनवाले कापड फारच आकर्षक वाटतात. त्यामुळे गिऱ्हाईक आकर्षित होतो.

फर्निचरची दुकाने, कटाई करण्याची लहान–लहान दुकाने पुष्कळ आहेत. उल्हासनगर नंबर २ पासून ५ नंबर पर्यंत कोणत्याही गल्लीत जा फर्निचरचे दुकान आहेच. माल तयार होतो. विकला जातो. या धंद्यात एक शाश्वती नाही. लाकूड कोणते वापरले आहे, कारण पॉलिश बेमालूमपणे केलेले असते, त्यामुळे फसवणूक होते. साग फारच महाग असल्याने ते फर्निचर स्वस्त देणे परवडणारे नाही. म्हणून चोखंदळ गिऱ्हाईक ऑर्डर देते. वस्तू तयार झाल्याशिवाय

पॉलिश करू देत नाही. पाहूनच पॉलिश केले जाते आणि मगच पूर्ण किंमत देऊन माल नेला जातो.

२२) घरामध्ये दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या आवश्यक वस्तू –

घरामध्ये दररोज वापरल्या जाणाऱ्या आवश्यक वस्तू अगदी स्वयंपाक घरात लागणाऱ्या स्टोव्ह, चहाची गाळणी, पोळपाट लाटणे, चमचे, ॲल्युमिनियम रॅक, कपडे अडकविण्यासाठी हँगर, प्लॅस्टिकच्या विविध वस्तू, टोपल्या, बादली, पायपुसणी, प्लॅस्टिकचे फर्निचर खुर्ची, टेबल, घरात सजावटीसाठी लागणारे नक्षीदार शो पीस असे विविध सामान स्वस्तात मिळतात.

२३) उल्हासनगर एक अति उद्योगी निर्वासित शहर–

सन १९४७ च्या फाळणीने विस्थापित झालेले आपली हजारो वर्षांची परंपरा, गावे शेतीवाडी, उद्योग व्यवसाय, नातेवाईक, घरेदारे, संसार सर्वस्व सोडून स्वतंत्र भारतात कफल्लक अवस्थेत आले. कित्येक मारले गेले, लुटले गेले, भुके कंगाल सगळ्यांची ताटातूट झालेले, अंगावरील वस्त्रानिशी आलेले सिंधी बांधव, काय वाटले असेल त्यांना? काय त्यांची मनःस्थिती असेल जेव्हा त्यांचे उल्हासनगरमधील ओसाड मिलिटरी कॅम्पमध्ये त्यांचे भारत सरकारने पुनर्वसन केले. जेव्हा माणसाजवळ काहीही नसते तेव्हा तो जिद्दीने कामाला लागतो. चिकाटी, धैर्य, परिस्थितीशी भिडणे, मनोबल, मेहनत, कौशल्य आधारित ज्ञान प्राप्त करण्याची बुध्दी, पडेल ते काम करण्याची तयारी, अशा दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर व गतकाळाच्या खाणाखुणा अंगावर व मनात जागवून अनेक गोष्टी, धंद्याचे नवे विचार या लोकांनी महाराष्ट्राला दिले. त्याची गणतीच नाही.

प्रत्येक कुटुंबाचे क्वार्टर म्हणजे एक औद्योगिक छोटेसे केंद्र. घरातील स्त्रिया कपडे शिलाई मशीन कामात पटाईत, लहान मुले, वृध्द घरात तयार माल गोळ्या, बिस्कीटे, लहान मुलांचे कपडे, अशा कितीतरी वस्तू रस्त्यावर शेजारील खेड्यात विकून भरल्या खिशाने घरात येत. प्रत्येक मनुष्य, स्त्रिया, मुले, म्हातारे आपल्यापरीने काम करून घराला मदत करीत. आजची त्यांची उन्नती ही त्यांचे जिद्दीची, चिकाटीची कार्यक्षमतेची निशाणी आहे. कोणताही धंदा करणे, त्यांना कमीपणा वाटला नाही. रिकामा माणूस सापडणे त्या काळात अशक्य होते.

धंदा वैध असो किंवा अवैध असो त्यात पैसा मिळत असेल तर त्यांना कधीच गैर वाटले नाही. १९४७ मध्ये बराकी विरळ होत्या. मोकळ्या जागेवर वर्चस्व करून त्याला कुंपणे घालून त्यामध्ये बिनधास्त बांधकामे करून नवनवीन व्यवसायाचे निरीक्षण करून आत्मसात करून, त्यातून त्यांनी अनेक उद्योग स्वतःच्या कौशल्याने उल्हासनगरमध्ये आणले.

आजूबाजूच्या परिसरातील मनुष्यबळ त्यांना अत्यंत स्वस्तात उपलब्ध झाले. ज्यांच्या हाताला काम नव्हते त्यांना काम मिळू लागले. परिसरातील गावांनाही खूप काम मिळू लागले. काही धनिकांनी अनेक शिक्षणसंस्था, धर्मदाय ट्रस्टच्या माध्यमातून मदत घेऊन उल्हासनगरच्या स्थैर्याला हातभार लावला.

उल्हासनगर, विठ्ठलवाडी व शहाड स्टेशन वरून त्यांना मुंबई जवळ वाटू लागली. धंदा, कच्चा माल, नोकऱ्या, रस्त्यावरील व्यापारास लोकलने त्यांना आधार दिला. नोकरीच्या मागे फार लोक पडले नाहीत. पण प्रॉडक्टीव्ह कंपन्यांमध्ये त्यांनी जरूर नोकऱ्या पत्करून तेथील ज्ञान आत्मसात करून त्या जोरावर त्यांनी अनेक धंदे, छोट्या प्रमाणात सुरू करून त्या कंपनीपेक्षा अधिक दर्जेदार माल तयार करून त्याच ब्रॅंडने ते कमी भावात विकू लागले. स्पर्धा निर्माण करू लागले. लोकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना प्राथमिकता दिली. फर्निचरचे कारखाने, सॉ मिल, फॅशन डिझाईन, रिजेक्ट कपड्यांपासून उत्तम प्रकारचे कपडे लोक हौसेने विकत घेत.

जागा मिळेल तिथे व्यवसाय, घर, दुकान या ठिकाणी नावीन्यपूर्ण नवीन लोकावश्यक उपयोगी वस्तू तयार करणे, कमी भावात म्हणजे 'कमी नफा पण विक्री जास्त' या रेशोने त्यांनी धंद्याचा जम बसवला. काहींनी व्यापाऱ्यांना कमी व्याजावर धंद्यासाठी पैसा उपलब्ध करून दिला. त्यासाठी एजंट नियुक्त केले गेले.

सर्वच धंद्यामध्ये कपड्याचा व्यापार खूप वाढला. उल्हासनगरहून थायलंड, मलेशिया, दुबई, सिंगापूर, बँकॉक, हाँगकाँग, श्रीलंका अशा छोट्या देशांत येथील माल जाऊ लागला.

उल्हासनगरला स्वस्त मिळते म्हणून महाराष्ट्रातून अनेक डिझाईनचे कपडे, वह्या, शाळेची दप्तरे, समाजाच्या असंख्य अशा गरजा ह्या लोकांनी पूर्ण केल्या.

सेंच्युरी रेयॉन, अमर डाय, आयडीआय, एन.आर.सी. ह्या कंपन्या आघाडीवर होत्या. महिन्याच्या पगारातील अर्धा हिस्सा उल्हासनगरला येऊ लागला. उल्हासनगरमधील मोकळ्या जागा झोपडपट्टीने वेढल्या गेल्या. आणि उल्हासनगर पुढे बकाल झाले. पण व्यापार वाढत गेला. गुंड, माफिया, भू–माफिया बेकायदेशीर वस्त्याही उभ्या राहिल्या. तेरा चौरस किलोमीटरच्या शहरात आज मोकळ्या जागा फारच कमी आहेत.

कोणत्याही उत्पादनाचे फॉर्म्युले त्यांनी हस्तगत केले. अगदी सोड्यापासून जी ब्रँडेड पेये बाजारात मिळतात ती सर्व अतिशय स्वस्तात उल्हासनगरमध्ये मिळतात. कुणीही ती इथे तयार केली आहेत, हे सिध्द करू शकणार नाही, अशी बेमालूम उत्पादने तयार करणाऱ्यांचा कुणीही हात धरू शकणार नाही.

सर्वच टॅक्स चुकवून येणारा माल, कॉपी केलेला माल, सर्व सरकारी यंत्रणेला हाताशी धरून हप्ते बांधून राजरोस हे धंदे चालतात. त्यात अमाप कमाई आहे. भीक मागणारा सिंधी माणूस तुम्हाला दिसणार नाही. जुगार, दारू, गावठी दारू असे अनेक धंदे हप्ते बांधून राजरोस चालतात.

रोड कॉन्ट्रॅक्टर ते बिल्डर येथील बाहेरचे आलेले भिकारीही लखपती आहेत. ते दुकानदारांना लाखो रुपये व्याजी पैसे देतात पण वसुलीही करतात. काही लेखीसुध्दा नसते. त्यांचे पुढे सरकारी यंत्रणा अमाप हप्ते वसूल करून श्रीमंत होते. उल्हासनगर म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे.

लाखो रुपये देऊन सरकारी नोकर उल्हासनगरमध्ये येतात. कोणी कोणावर कुरघोडी करीत नाहीत किंवा धंद्याच्या बाबतीत तक्रारी करीत नाही.

बेकायदेशीर म्हणजे उल्हासनगर 'मेड इन उल्हासनगर' म्हणजे USA हे प्रख्यात होते, ते आता बंद झाले आहे.

पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांमध्ये स्थिरस्थावर झाल्यावर काही कुटुंबे बांधकाम व्यवसायात आले. खाजगी तसेच सरकारी कामे घेऊन ती कामे करू लागले. त्यातूनच काही मोठे कॉन्ट्रॅक्टर उदयाला आले. त्यापी मेसर्स माधवदास आणि कंपनी, शंकर महादेव महाराष्ट्र

कन्स्ट्रक्शन कंपनी, भारत कन्स्ट्रक्शन कंपनी या व्यतिरिक्तही अन्य अनेक लहान कॉन्ट्रॅक्टर उल्हासनगरमध्ये असून कुठेही मोठे काम मिळत असेल तेथे जाऊन काम करण्याची तयारी असते. नावाजलेले कॉन्ट्रॅक्टर राजकारणी यांना बरोबर घेतात. पूर्वी कायदेशीर टेंडर भरून below किंवा above टेंडर भरून ज्याला काम मिळेल ते इमानेइतबारे चांगल्या प्रतीचे काम करतात की जे काम करतील त्याची गॅरंटी सात वर्षे तरी देतात. जर काम खराब झाले तरी ते आपल्या स्वतःच्या पैशाने करून देण्याची त्यांची तयारी असते. याचे कारण कंपनीचे नाव खराब होऊ नये हा उद्देश.

प्रत्येक कॉन्ट्रॅक्टरकडे स्वतःची मशिनरी, डंपर, जेसीबी, दगडखाण, खडी मशीन, हॉट मिक्स प्लान्ट याशिवाय नादुरुस्त मशिनरी दुरुस्त करणे, यासाठी मेकॅनिक, ड्रायव्हर, स्वतःचे गॅरेज ह्या गॅरेजमध्ये सर्व प्रकारचे कारागीर असत. रोजचे कामासाठी लागणारे डांबर वाहतुकीचे बोझर स्वतःचेच असतात. त्याचबरोबर पाण्याचे टँकरही असतात. या सर्व मोठ्या कॉन्ट्रॅक्टरची एकाच वेळी अनेक ठिकाणी कामे चालू असतात. सुपरवायझर मजूर, ड्रायव्हर,माणसे इ. असतात. काम व्यवस्थित व्हावे म्हणून मुदतीचे अगोदर काम पुरे करून मोकळे होतात.

नवीन काम सुरू केल्यावर बँकेकडून कर्ज घेऊन काम सुरू करून चालू कामाचे बिल कधीच लगेच घेत नाहीत. कारण नसताना सरकारी बांधकाम खात्याकडे सारखी ये–जा नसते. जून–जुलैमध्ये एकदाच कार्यालयात जाऊन बिले कधी, किती तारखेस देणार त्यांची तारीख घेऊन निघून जाणार दिलेल्या तारखेस येऊन चेक घेऊन जाणार. डिपॉझिट भरलेली रक्कम दुसऱ्या वर्षाला नियमाप्रमाणे मिळते. बिलातून टॅक्सची रक्कम कापून घेतलेली असते.

कंपनी बदनाम होऊ नये म्हणून कामाची गुणवत्ता उत्तम दर्जाची ठेवून पुढील कामे मिळण्याची कसरत करावी लागत नाही. अलीकडे प्रामुख्याने नव्वदच्या दशकात ह्या खात्यातील शिस्त आमदार–खासदारांनी वेगळी करून ठेवली आहे. आमदार निधी, खासदार निधीमधून जी कामे ठेकेदारांना देतात, त्यांचेकडून आमदार, खासदार २०% रक्कम घेतल्याशिवाय काम देत नाहीत. नंतर अधिकारीसुध्दा वर्क ऑर्डर देताना २०% रोकड पैसे घेतल्याशिवाय ऑर्डर देत नाहीत. त्यामुळे कामे योग्य गुणवत्तानुसार होत नाहीत. अधिकारी वर्ग त्यामुळे गब्बर झाला असून मुजोरपणाही वाढला आहे.

अनेक कॉन्ट्रॅक्टरांनी सरकारी काम न करण्याचा निर्णय घेतला असून अन्य व्यवसायात उतरले आहेत. काही कॉन्ट्रॅक्टर इतकी टक्केवारी देऊनही हा धंदा सोडू शकले नाहीत. लाखो रुपयांची मशिनरी, प्लॅन्ट भंगारमध्ये टाकावा लागेल आणि दुसऱ्या व्यवसायात जम बसविण्यास फार वेळ लागेल. निर्वासित होऊन आले आणि आता त्यांची तिसरी पिढी या व्यवसायात आहे. पण तिसऱ्या पिढीतील त्यांचे वारस हे सिव्हील इंजिनिअर आहेत. जिल्ह्यातील बहुतेक विभाग वाटून घेतलेले आहेत. त्या–त्या विभागात कोणताही कॉन्ट्रॅक्टर हस्तक्षेप करीत नाही.

कै. के.सी. चंदनानी यांची भारत कन्स्ट्रक्शन कपंनी ही व्यक्ती अतिशय धाडसी. एक काम त्यांना हवे होते म्हणून त्यांनी सर्वांना विनंती केली हे काम मला द्यावे. सर्वांनी ते मान्य केले. परंतु सख्या भाच्याने काही ऐकले नाही. त्यांनी अनेकांकडून त्यास विनंती केली. काम होते ३६ लाखाचे त्यांनी टेंडर भरलेच. के.सी.ने टेंडर ९९% बिलाने भरले म्हणजे ३६ लाखाचे काम ३६ हजारांनी करून द्यायचे. टेंडर खुले केल्यावर सर्व अधिकारी आणि टेंडर धारकांना आश्चर्याचा धक्काच बसला. सुपरिटेंडन्ट इंजिनिअरने विचारले के.सी. हे काय? त्यांनी उत्तर दिले 'इतने बरस काम करता हू एक काम सरकार को फोकट में करके दिया तो क्या होता है? सरकार सेही तो हमने कमाया । टेंडर रद्द झाले. आणि तेच काम त्यांना १५% जास्तीने दिले गेले, पण गमावले नाही. टेंडर मिळूनही ते काम त्यांनी १५% बिलाने भाचाला देऊन आरामशीर ३0% कमावले. असेच नॅशनल हायवेचे १९ कोटीचे काम दिल्लीला जाऊन मंजूर करून आणले. के सी सी चे निधन चार वर्षांपूर्वी झाले, त्यांचा मुलगा, नातवंडे त्यांच्या ह्या कामाचा वारसा चालवतात. असा हा सिंधी माणूस व्यापारात हुशार व जिद्दीही.

दिवस–रात्र करोडो रुपयांचे व्यवहार उल्हासनगरमध्ये चालतात. व्यवहारामध्ये पारदर्शकता असते. क्रेडिट एक आठवडा, १५ दिवस, महिना देऊन त्यांचा पैसा कोणीही बुडवित नाही.

आता तर कमी व्याजावर वाटेल तसा पैसा मिळतो. प्रामाणिकपणे दर महिना व्याज दिले जाते. मुद्दल वापरले जाते. कॉन्ट्रॅक्टरला फोन केला तर दलाल लाखो रुपये अर्ध्या तासात पैसे आणून देतात. शेकडा रु. १ : ५0, म्हणजे ५0 पैसे दलालाला आणि रुपया मालकाला. कुणाचा पैसा हे दलालास फक्त माहीत तो त्या तारखेला व्याजच घेऊन जातो.

एक महत्त्वाचे म्हणजे हा समाज इतका भाविक आहे. की समाजाचे अनेक ट्रस्ट आहेत. गरीब व्यक्तींना आजारपणात मदत, शैक्षणिक मदत, काही ट्रस्टचे दवाखाने पैसेच घेत नाहीत, हा उदारपणाचा गुण वाखाणण्यासारखा आहे.[३२]

२४) उल्हासनगर – व्यवसाय उद्योगधंद्यातील काही महत्त्वाचे व्यावसायिक –

I. रामलाल गिदनदास लासी –

रामलाल गिदनदास लासी राहणार नेहरू चौक, अमन टॉकीज रोड, उल्हासनगर – २. व्यवसाय लासी बिस्किट फॅक्टरी, लासी कंपाऊंड, शिक्षण हे फक्त सहीपुरते. पार्ले बिस्किट फॅक्टरीतील तीन वर्षाच्या नोकरीचा अनुभव. सुरुवातीला सरकारी सवलत व नोकरीचे पगारावर घर संसार चालवून सन १९५४–५५ मध्ये सरकारी पडीक जागा बळकावून फार कमी पैशात गोळ्या, बिस्किटे, चॉकलेट, पेपरमिंट व्यवसाय सुरू केला. पार्ले बिस्किटमधील अनुभव त्यांच्या गाठीशी आहे.

लासी यांच्या वडिलांनी पाकिस्तानातून आल्यावर पाच–सहा वर्षांनी व्यवसाय सुरू केला. त्या वेळी रामलाल शिक्षण घेत होते. कधीतरी फॅक्टरीत येऊन बसत असत. वडील गिदनदास यांनी नवे तंत्रज्ञान वापरून ॲरोमेटील मशीन बसवली. डिझेलवर चालणारी भट्टी, स्प्रेईंग मशीन सर्व कच्चा माल उल्हासनगरमध्ये मिळत होता. ग्लुकोजचे बॅरल मुंबईमधून ट्रकमधून होलसेल भावाने येत असत. यांची दुसरी पिढी या व्यवसायात आहे.

रामलाल यांच्या वडिलांनी प्रचंड मेहनत करून लहान धंद्याचा मोठा विस्तार करून ठेवला होता. दररोज एक बेलॅन्डचा ट्रक भरून भारतातील विविध शहरातून मागणीनुसार पुरवठा होत होता. सुरूवातीला काही मजूर होते. स्वयंचलित मशीनरी बसविल्याने मनुष्यबळही वाढविले. जोडीला डबे बनविण्याचा कारखानाही काढला. वडिलांच्या (गिदनदास) ह्यांच्या पश्चात रामलाल यांनी सांभाळला.

व्यवसायाची वेळ सकाळी ७ ते सायं. ७, बारा तासांची ड्युटी असते

व्यवसाय सुरू करताना स्वतःची जागा नव्हती. सरकारी जागा भरपूर होती. पुढे पैसे खर्च करून जागा ताब्यात ठेवली. अनधिकृत बांधकामात काही जागा दुसऱ्यांना विकून भरपूर

पैसा उभा केला. तोच पैसा गुंतवून मोठा कारखाना वडिलांनी काढून धंद्याची वाढ केली. अर्थातच चिकाटी व बाजारभावापेक्षा स्वस्त त्यामुळे खप जास्त, नफा जास्त झाला.

प्रत्येक प्रांतात आसाम, नागालँडपर्यंत माल पाठवला जातो. जाहिरातीची गरज भासली नाही. प्रत्येक प्रांतात एजंट होते. महिन्याची क्रेडिट असायची.

मालाची गुणवत्ता चांगली असेल आणि बाजारात मोठ्या ब्रँडेड कंपन्यांच्या तोडीचा माल आणि त्यापेक्षा स्वस्त यामुळे स्पर्धा करावीच लागत नाही. उलट मागणी वाढत जाते.

व्यापार असल्यामुळे पुढची पिढी शिकली तरी नवीन–नवीन कल्पना लढवून पुढची पिढीही हाच धंदा चालविणे श्रेयस्कर मानते.

उल्हासनगरला माल डुप्लिकेट असतो, याविषयी रामलाल यांचे मत पूर्ण उल्हासनगर हे याबाबत तरबेज आहे. कुठे काही बघितले आणि त्यात फायदा आहे, असे वाटल्यास, जागा असल्यास ते आपल्या धंद्याची मुहूर्तमेढ रोवित असत. तेथील प्रमुख कारागिरास जास्त पगाराचे आमिष दाखवून आणलेच म्हणून समजावे.[३३]

ii. **घनश्याम रामचंद्र बठेजा –**

सुरुवातीला महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात कपड्याचे दुकान होते. सन१९८१ मध्ये उल्हासनगरात त्यांनी व्यवसायास सुरुवात केली. फुटपाथवर सामान ठेवून दिनचर्या चालायची. वडिलांनी सन १९५७ मध्ये व्यवसायास प्रारंभ केला. स्वस्ताई असल्यामुळे बचत खूप केली जात असे. त्यांची पाचवी पिढी व्यवसायात आहे.

देवीजिनामल वाधुमल बठेजा हे आजोबा पाकिस्तानात शहादातकोट (लाडखाना) जिल्हा पश्चिम पाकिस्तानात होते. व्यवसायाची प्रेरणा आजोबा आणि वडिलांकडून घेतली.

कापड व्यवसायातील कामाची वेळ सकाळी ८ ते सायं. ८.३० पर्यंत. सण, उत्सव वेळेस पंधरा तास, अकरा तास दिला जात असे.

व्यवसाय सुरु करताना स्वतःची जागा नव्हती. भाड्याची जागा होती. भारताचे विभाजन होण्यापूर्वी आल्यामुळे सुरक्षित आले. आपली मालमत्ता पश्चिम पाकिस्तानातील नातेवाइकांना

अल्पदरात विकून आले. त्यामुळे व्यवसाय करण्यासाठी त्या पैशांचा वापर करण्यात आला. व्यवसायात समाधानी आहेत. कमी नफा जास्त व्यापार, हे व्यवसायाचे वैशिष्ट्य आहे.

उद्योगधंद्यामधील माल शेती करणारे, नोकरी करणारे, मध्यमवर्ग, गरीब वर्ग, सर्वसाधारण लोकांना दिला जात असे. प्रामाणिकपणे जास्त दर न लावत मदत करायची. चांगली वस्तू द्यायची. वरील सर्व कारणांमुळे विश्वास, आपुलकी निर्माण केली. सध्याचे व्यवसायाचे स्वरुप बदलले आहे, असे घनश्याम बठेजा यांना वाटते. कमी नफा, वस्तूंचा दर्जा चांगला, असा त्यांचा स्पर्धेला सामोरे जाण्याचा कयास आहे.

कापड व्यवसायात बठेजा यांची पिढी कार्यरत आहे. परंतु तरुण पिढीला व्यवसायात येण्याची इच्छा नाही. उल्हासनगरमधील माल डुप्लिकेट असतो हे योग्य नाही, असे त्यांना वाटते. आलेल्या परिस्थितीला सामोरे जाणे हे त्यांचे व्यवसायाचे महत्त्व आहे. मेड इन यु.एस.ए. ह्याचा सरळ अर्थ ते 'उल्हासनगर सिंधी असोसिएशन' स्पष्ट करतात.[३४]

iii. कै. कृपालदास छुगोमल चंदनानी –

कै. कृपालदास छुगोमल चंदनानी यांचा वारस मुलगा केशव कृपालदास चंदनानी, राहणार 'पद्म सुगम सागर', जुना टेलिफोन एक्स्चेंज, उल्हासनगर ३. इ.स. १९५० पासून बांधकाम कॉन्ट्रॅक्ट व्यवसायाला सुरूवात केली. १९५० सालापासून अत्यंत हालाखीची स्थिती. पाकिस्तानातून येऊन भारतात तीनच वर्षे झाली होती. सध्याच्या ठिकाणी उल्हासनगरात ह्या व्यवसायास ६७ वर्षे झाली. उद्योगधंद्यासाठी लागणारा माल स्वतःची दगडखाण, क्रशर यंत्र, डांबर प्लान्ट (हॉट मिक्स) स्वतः मिळविले. छोटी–मोठी कामे मिळवून स्वानुभव, जिद्दीच्या जोरावर भविष्याचा वेध घेऊन व्यवसायास सुरुवात केली. त्यांची तिसरी पिढी या व्यवसायात कार्यरत आहे. अनुभव हा सर्वश्रेष्ठ गुरू आहे.

जीवन चरितार्थासाठी माणूस काम शोधतो. त्या वेळेस जे काम हाती लागेल ते करणाऱ्याला कामाचा तोटा नसतो. ज्यातून दोन पैसे मिळतात माणूस त्यात रमतो. आकांक्षांना अंत नसतो, प्रयत्नांना सीमा नाही, तोच माणूस पुढे जातो. ह्या हेतूने त्यांनी कॉन्ट्रॅक्ट व्यवसायात पदार्पण केले. कुटुंबातील चारही बंधू ह्या व्यवसायात आहेत. प्रचंड मेहनत आणि २४ तास काम असे उद्योगधंद्याचे स्वरुप आहे. व्यवसाय सुरू करताना उसनवारी कर्ज काढावे

लागले. रजिस्ट्रेशन असल्याने टेंडर मिळाल्यावर त्या कागदपत्रांच्या आधारे बँक कर्ज देते. बिल मिळाले की कर्जफेड केली जाते. व्यवसायात ते समाधानी आहेत. टिकाऊ कामाची गॅरंटी, काम खराब झाल्यास स्वतःचे पैशाने भरपाई करून देण्याची तयार असते. कॉन्ट्रक्ट व्यवसायात रजिस्ट्रेशन असल्यामुळे जाहिरातीची गरज नसते. सर्व अधिकारी, पदाधिकारी यांच्याशी स्नेहपूर्ण संबंध असतात.

व्यवसायाचे पूर्वीचे व आताचे स्वरुप बदललेले आहे. प्रामुख्याने ९० च्या आसपास पूर्वी कोणीही टक्केवारी मागत नसे. त्यांची पुढील पिढी ह्या व्यवसायात आहे. पण त्यांना व्यवसाय टक्केवारीमुळे नको वाटतो. अनेक चांगल्या कॉन्ट्रॅक्टरांनी बिल्डींग क्षेत्रात आपला मोर्चा वळवला आहे. कॉन्ट्रॅक्ट व्यवसायात दगड लॅबोरेटरीमध्ये तपासला जातो. डांबराचेही तसेच असते. त्यामुळे उल्हासनगरमधील ह्या व्यवसायात डुप्लिकेटचा संबंध येत नाही.[३५]

उल्हासनगर शहर सुरुवातीपासून तेरा चौरस किलोमीटरवर वसलेले आहे. आजही तितकाच भूभाग आहे. या शहरात रोज करोडो रुपयांचा व्यवहार होतो. उल्हासनगरमधील प्रत्येक घरात काही ना काही छोटे–मोठे उद्योग चालू असतात. सिंधी समाजातील लोकांच्या आधी मुंबईतील व्यापारावर गुजराथी व इतर समाजाचे वर्चस्व होते. परंतु सिंधींचे व्यापारातील तत्त्व "**Low Price Policy**' त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत ते लोकप्रिय बनले. 'कमी नफा, जास्त विक्री' ह्या संकल्पनेला ते प्राधान्य देतात.

उल्हासनगरातील गृहउद्योगाला पुढे त्यांनी विकसित करून उद्योग, व्यवसाय वाढविला. बाजारात मेहनत आणि विश्वास यावर आपले स्थान निर्माण केले. त्यामुळे आजही त्यांची नवी पिढी ह्या व्यवसायामध्ये कार्यरत आहे. मालाची मोठ्या प्रमाणात निर्यातदेखील केली जाते. त्यात प्रामुख्याने उदा. कापड व्यवसाय – भरपूर मागणी आहे. लहान उद्योग असो अथवा मोठा उद्योग अनेक उद्योग–व्यवसाय उल्हासनगरमध्ये तेजीत आहेत. इ.स. १९७० नंतर भरभराट होण्यास सुरुवात झाली. भारतातील इतर राज्यांतून येणाऱ्या व्यक्तींनादेखील येथे काम मिळते. व्यवसायातील नव–नवीन विचार या सिंधी समाजाने उल्हासनगरात यशस्वी करून दाखविल्यामुळे त्यांचे अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान आहे.

उल्हासनगरमधील लघुउद्योगांची एकूण संख्या पुढीलप्रमाणे (२००१)

	श्रेणी	एकूण
१.	पॉवर लूम	५००
२.	कन्फेक्शनरी	३००
३.	लाकुड फर्निचर	२००
४.	मशीन एम्ब्रॉयडरी	१०९
५.	वायर आणि केबल	१००
६.	रेडिमेड कपडे	३००
७.	चॉक आणि फिक्स्चर्य	२००
८.	ऑटोमॅटिक बिस्कीट	५०
९.	लोणचे	३०
१०.	मशीन पार्ट	१००
११.	रबर	२५
१२.	प्लॅस्टिक	१००
१३.	स्टोव्ह बर्नर	१००
१४.	फेरस ॲन्ड नॉन–फेरस फाऊंड्री	५०
१५.	पी.व्ही.सी. पाईप	०५
१६.	शीट मेटल	३०
१७.	रंग आणि व्हार्निश	२५
१८.	इमिटेशन ज्वेलरी (दागिने)	२५
१९.	पेन	२५
२०.	सौंदर्य प्रसाधने	२०
२१.	डाईंग	१०
२२.	होजिअरी	७५
२३.	इनॅमिड वायर	१५
२४.	नोट बूक	४०
२५.	रेक्झिन उद्योग	५०
२६.	अगरबत्ती	१५
२७.	संकीर्ण	५३०
	एकूण	**३०९**

३६

स्वातंत्र्यानंतर स्थलांतरीत झालेल्या सिंधी बांधवांनी त्या काळात चॉकलेट आणि बिस्किटे तयार करून विकण्यास सुरुवात केली होती. रेल्वेमध्ये किरकोळ विक्री करत तो माल विकला जाई. पुढे चॉकलेट बिस्किटे तयार करण्याचे अनेक कारखाने उल्हासनगर शहरात उभे राहिले. स्वस्त आणि सहज उपलब्ध होणाऱ्या गोळ्या बिस्किटांनी अनेक मध्यमवर्गीय व्यक्तींना आकर्षित केले.

इलेक्ट्रिक वस्तू, त्यातही विद्युत वाहिन्या, बटण, पट्या अश्या अनेक महत्वाच्या गोष्टी उल्हासनगरात निर्माण केल्या जाऊ लागल्या. कपड्यांना पँट आणि इतर वस्तूंना लावली जाणारी चेन ही महत्वाची वस्तूही या शहरात उत्पादित केली जाऊ लागली ती देशभरातील विविध कापडउद्योग असलेल्या शहरात निर्यात होत होती. ऐंशीच्या दशकात सिमेंटनिर्मिती आणि पॅकेजिंगमध्येही उल्हासनगरातील काही उद्योजक कार्यरत होते. कापड उद्योगात उल्हासनगर शहरांचे महत्व मोठे होते. स्वस्त, सुंदर, कलात्मक कपडे, त्यात जीन्स कापडापासून विविध कपड्यांच्या निर्मितीत शहराने मोठी आघाडी घेतली होती. त्यानंतर प्लास्टिक, आवरण फर्निचर असे अनेक कारखाने शहरात उभे राहिले.

सिंधी समाजाचे व्यवसायातील एक वैशिष्ट्ये जाणवते ते म्हणतात की व्यवसायात स्पर्धा असते परंतु ते कमी नफ्यातदेखील समाधानी असतात असे विधान विक्टर यांनी केलेले अतिशय समर्पक आहे. उल्हासनगरातील सिंधी समाजातील व्यवसायाची माहिती घेताना हे वैशिष्ट्ये जाणवले.

उल्हासनगर शहरातील आर्थिक स्थितीचे ऐतिहासिक मूल्यमापन करताना सर्वप्रथम प्रतिकूल परिस्थिती असताना देखील स्वत:च्या आत्मविश्वास व चिकाटी या गुणांवर सिंधी समाजाने प्रगती केली. निर्वासित म्हणून उल्हासनगरमध्ये स्थायिक झाले तेव्हा दोन वेळा जेवणाची भ्रांत होती. तरी देखील आपल्याकडे जे काही थोडेसे पैसे शिल्लक आहे. त्यातून काहीतरी निर्माण करण्याची जिद्द होती. उल्हासनगरात स्थायिक झालेला सिंधी समाज व्यापारी मोठ्या प्रमाणावर होता. परंतू भांडवल नव्हते अश्या स्थितीत लहान उद्योग निर्माण करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला सरकारकडून काही प्रमाणात सुविधा मिळाल्या.

फॅक्टरी ॲक्ट कायद्यानुसार काही नोंदणीयुक्त कारखाने होते. कापड उद्योग, सुतारकाम , शिवणकाम चामड्याच्या वस्तूचे उद्योग, छपाईकाम, सुईकाम, भरतकाम, पापड बनविणे, हातमाग इत्यादी उत्पादन केंद्रे आहेत. प्रथमत: लघु उद्योग मोठ्या प्रमाणावर होते व ह्या पुढे लघुउद्योगाचे स्वरुप काही प्रमाणात विस्तारले. उल्हासनगरमधील व्यवसाय स्थिरस्थावर होण्यास कालावधी गेला. परंतु पुढे उल्हासनगर बाजारपेठ म्हणून नावारुपास आली.

प्रश्नावली आणि मुलाखत यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे एक निष्कर्ष सातत्याने जाणवतो तो म्हणजे इ.स.१९७० नंतर भरभराट घडून येण्यास सुरुवात झाली.या आधीचा कालावधी म्हणजे १९५० ते १९६० या कालखंडात सर्वप्रथम प्राथमिक गरज आणि उपलब्ध होईल असा रोजगार यातच संघर्ष करावा लागला. उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर एक पासून ते कॅम्प नंबर पाच पर्यंत विविध उद्योगधंदे नावारुपास आलेले दिसतात. कापड बाजार, रेडिमेड कपडे, फर्निचर मार्केट, जिन्स उत्पादन, अन्नधान्य होलसेल बाजार, गोळ्या बिस्किटे (कनफेक्शनरी), इलेक्ट्रिक सामान, गृहउद्योग व्यवसाय आढळून येतात.

व्यवसायाच्या बाबतीत उल्हासनगर शहरातील महत्वाची बाब म्हणजे बहुतांशी व्यवसाय वडिलोपार्जित आढळून येतात. सध्या व्यवसायात दुसरी ते तिसरी पिढी कार्यरत आहेत. सरकारी पडीक जागा ताब्यात घेऊन किंवा विकत घेऊन त्याठिकाणी पक्की दुकाने, घरे बनवण्यात आली. अनधिकृत बांधकाम, काही जागा दुसऱ्यांना विकून भरपूर पैसा जमा करण्यात आला. व्यवसाय सुरु असताना रस्त्यावर फूटपाथावर बसून किंवा आजूबाजूचा परिसर, मुंबईला जाऊन मालाची प्रथम विक्री केली जाऊ लागली.

कच्चा माल हा महत्वाचा घटक उद्योग व्यवसायास लागतो. साधारणपणे कच्चा माल व्यवसायावर अवलंबून असतो. उदा. फर्निचर मार्केटमध्ये लागणारे लाकूड काही व्यावसायिक मुरबाड जंगल तर काही स्थानिक बाजारपेठेतून मिळवतात. याला काही अपवाद ही फटाके हे तामिळनाडूतून आयात केले जातात जे उल्हासनगरातील बारामाही चालणारे दुकान आहे. कच्चा माल पक्क्या स्वरुपात तयार करणे किंवा व्यवसायाचे तांत्रिक शिक्षण हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिले जाते किंवा कारागीर ठेवून रोजगार उपलब्ध करून दिला जातो. अशाप्रकारे व्यवसायातील तांत्रिक शिक्षणाबाबत निदर्शनास आले.

उल्हासनगरमधील उद्योगधंद्याचे स्वरुप पहाता दिवसभर व्यस्त असलेले उल्हासनगर रात्रीदेखील उशीरापर्यंत व्यस्त असते. सकाळी दहा वाजता बाजारपेठा सुरु होऊन रात्री नऊ वाजेपर्यंत खुल्या राहतात. व्यवसायात त्यांना कुटूंबातील इतर सदस्यदेखील हातभार लावताना दिसतात. व्यवसाय हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत असल्यामुळे पूर्वीपेक्षा सध्या व्यवसायात झालेला बदल प्रकर्षाने जाणवतो.

कोणताही व्यवसाय उद्योगधंदा म्हंटले की त्यामध्ये समाधान हे अत्यंत आवश्यक असते. तसेच व्यवसायात नफा आणि तोटा आलेच हे व्यवसायातील एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. उल्हासनगरमध्ये निरनिराळे उद्योगधंदे कार्यरत आहेत. ह्या उद्योगांसाठी लागणारा माल देखील तेथेच उपलब्ध आहे. इतर बाजारभावापेक्षा स्वस्त आणि खप जास्त करणे हे उद्दिष्ट असते. खप जास्त असल्यामुळे नफादेखील होती. परंतु तो नफा फार मोठ्या प्रमाणावर नसतो. उदा. कै. कृपालदास छुगोमल चंदनानीचे वारस मुलगा केशव चंदनानी कॉन्ट्रॅक्टर व्यवसाय टिकाऊ कामाची गॅरंटी काम व्यवस्थित न झाल्यास स्वत:चे पैशाने करून देण्याची तयारी. असे असले तरी उल्हासनगरमधील व्यावसायिक हा समाधानी आहे.

बाजारपेठेतील माल हा स्थानिक व आजूबाजूचा परिसर तर काही व्यावसायिक प्रत्येक प्रांतात आसाम, नागालॅन्ड, गुजरात, मुंबई, ठाणे, रांची महाराष्ट्र तसेच भारतातील विविध ठिकाणी पाठविला जातो. समाजातील सर्व स्तरातील लोक नोकरी करणारे शेती, मध्यमवर्ग, सर्वसाधारण, गरीब वर्ग माल खरेदी करतात. जास्त पैसा (दर) न लावता जेमतेम नफा काढला जातो. त्यामुळे स्थानिक व आसपासच्या परिसरातील व्यक्ती खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात येतात.

उल्हासनगरमधील उत्पादीत केलेला माल विक्रीसाठी पाठविण्याकरीता जाहिरात क्षेत्राची मदत घेतली जात नाही, हे एक वैशिष्ट्य दिसून आले. आजच्या आधुनिक युगात जाहिरात क्षेत्र मोठे आहे परंतु आपला उत्पादित केलेला माल खपला पाहिजे यासाठी जाहिरातीची त्यांना आवश्यकता लागली नाही केवळ चांगली वस्तू द्यायची विश्वास हे देखील त्यांचे स्वरुप आहे. तर काही व्यवसायात प्रत्येक प्रांतात एजंट असतो तसेच काही ठिकाणी व्यवसाय वाढविण्यासाठी अधिकारी पदाधिकारी यांच्याशी स्नेहपूर्ण संबंध असतात. त्यामुळे सिंधी समाज उल्हासनगरातील उत्पादीत मालाची जाहिरात करताना आढळला नाही.

व्यवसायातील पूर्वीचे स्वरुप व आताचे स्वरुप फार बदलले आढळते. पूर्वी ही दुकाने छोटी होती आता ह्या दुकानाचे स्वरुप मोठ्या प्रमाणात आढळून येते. परिवर्तन हा नियम आहे ह्या कारणाने व्यवसायामध्ये देखील नवनवीन बदल घडून आलेले दिसतात. स्पर्धेला पूर्वी सामोरे जावे लागत नसे. मालाचे उत्पादन करायचे विक्री करायची पण आता स्पर्धा चायना वस्तू बरोबर देखील करावी लागते. त्यामुळे निश्चित बदल झालेला आढळून येतो. स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी मालामध्ये नाविन्यपूर्ण माल ठेवला जातो. मक्तेदारी देखील व्यवसायात पहावी लागते.

उल्हासनगरमधील माल डुप्लिकेट असतो याबाबत संमिश्र व मतभिन्नता आढळली. हे खरेच आहे की पूर्वी उल्हासनगर हे याबाबत तरबेज आहे. अजूनही काही ठिकाणी असे दिसून येते. एखाद्या प्रमुख कारागीरास जास्त पगाराचे प्रलोभन दाखवून आपल्या व्यवसायात सामील करून घेणे. असमानात आढळून येते ती प्रत्येक व्यक्तीच्या व्यवसायातील व्यवसायावरून असे काही व्यक्तींचे मत आहे. उल्हासनगरमधील सर्वच माल डुप्लिकेट असतो असा गैरसमज आहे. आलेल्या परिस्थितीला व्यवस्थित सामोरे जाणे हे उद्योगधंद्यातील स्वरुप आहे. तरीदेखील उल्हासनगरमधील बाजारपेठा सतत कार्यरत असताना दिसतात. उल्हासनगरमधील कॅम्प नंबर एक ते पाच यासर्व ठिकाणी काहींना काही व्यवसाय दिवसभर चालू असतात.

मेड इन यु.एस.ए. (Made in USA) उल्हासनगरमधील ही संकल्पना पाहिली असता विविध मतप्रवाह आढळून आले. एक मतप्रवाह म्हणजे ह्या संकल्पनेचा अर्थ 'उल्हासनगर सिंधी असोसिएशन' असा पूर्ण लावला जातो. तर दुसरा मतप्रवाह हा की ही संकल्पना बरेचसे व्यावसायिक फक्त ऐकून आहेत. त्यांनी कधीही आपल्या मालावर हे लेबल लावले नाही किंवा याचा वापरही केलेला नाही. काहीजण ह्या संकल्पनेबाबत तटस्थ आढळून येतात. मेड इन यु.एस.ए. ही संकल्पना पूर्णत: बंद झालेली आहे.

उल्हासनगरमधील विविध व्यवसायात दुसरी किंवा तिसरी पिढी कार्य करते ते आपला पूर्वीचा व्यवसाय संभाळताना दिसतात. नवीन येणाऱ्या पिढीला जर आपल्या व्यवसायात स्वेच्छेने यायचे असेल तर काही हरकत नाही किंवा दुसरा व्यवसाय नोकरी करण्यास आक्षेप नाही. कारण नवीन येणारी पिढी ही नवनविन कल्पना लढवून धंदा चालवणे श्रेयस्कर मानते.

परंतु असे देखील आढळून आले की, पूर्वापार चालत आलेला व्यवसाय चालविताना आजची पिढी पुढील पिढीला त्यांच्या इच्छा आकांक्षाना महत्व देते.

अशाप्रकारे उल्हासनगरमधील लहान व्यवसायापासून सुरुवात करून प्रगती केली. दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तू, इलेक्ट्रिक सामान, प्लास्टिकच्या विविध वस्तू, फर्निचर मार्केट, रेडीमेड कापडाचे मार्केट जीन्सचा कारखाना, प्रेस बाजार विविध सेवा उपयोगी समान ज्यामध्ये हॉटेल्स, धर्मशाळा ह्या काही वाजवी दरात देखील उपलब्ध आहेत. उल्हासनगरमधील व्यावसायिक एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगाची स्थापना देखील मोठ्या प्रमाणात करताना दिसून आले. प्रामुख्याने उल्हासनगरातील व्यवसाय पडताळणीबाबत असे आढळून आले की, विक्री जास्त नफा कमी किंवा जेमतेम हे स्वरुप आढळले. रोजगार उपलब्ध हा ह्यामागील हेतु असावा. सिंधी समाजाबरोबर इतर व्यक्तिही मग जे कामगार वर्ग असो त्यांनाही रोजगार उपलब्ध झाला. आसपासच्या परिसरातील खेरदी करणारा मोठा वर्ग बाजारपेठेत येतो.

– संदर्भ सूची –.

१. Karunakarn T. K., 'A Sociological Study in Urban Development,' M.A. Thesis, University of Bombay, 1958 Page no. 61

२. जोशी पं. महादेव शास्त्री भारतीय संस्कृतिकोश दहावा खंड पं. महादेव शास्त्री जोशी कार्यवाह प्रथमावृत्ती शके १९०१ एप्रिल १९७९, पृष्ठ क्र. १

३. Thakur U. T. Sindhi Culture, Delhi Sindhi Academy, 1997, Pg. 85.

४. Karunakarn T. K., OP Cit, Pg. 62, 63

५. Pinjani Hema Ravi, Sindhi Resettlement in Ulhasnagar Historicity Research Journal ISSN 2393 - 8900 Volume - 3, Issue - 4, December 2016 p.n. 7,8,9

६. Vakil and Cabinetmaker "Government and Displaced persos" 1953, पृष्ठ क्र. ७९

७. Economic and political weekly Vo. 39 No. 35 (Aug. 28 – Sept. 3, 2004) Page No. 3885

८. Karunakarn T. K., OP Cit, Pg. 65, 66, 67 Pg. 75, 76

९. Ibid P - 91, 92, 93, 94, 95, 96

१०. Ibid P - 96, 97

११. Ibid P - 75, 76, 77, 78, 79

१२. Ibid P - 83, 84, 88, 89

१३. Ulhasnagar Administrators office on 31.7.1956

१४. Karunakarn T. K., OP Cit, Pg. 89, 90, 91

१५. भुत्ता ललिता (संपादक) वसंत सोपारकर (संपादक प्रमुख) सावंत पंढरीनाथ, स्पेशल रिपोर्ट 'वडी जरा इधर देखो नी' उद्योगप्रिय सिंध्यांचे उल्हासनगर, श्री वर्षा पब्लिकेशन साप्ताहिक वर्ष – दहावे, अंक – नववा, दि. १ मे, १९७६ पृष्ठ क्र. १२

१६. Century Reyon - www.centuryrayon.co.in

१७. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' २०१२ पुस्तका का पहला भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. X

१८. भुत्ता ललिता उ. नि. पृष्ठ क्र. १२, १४

१९. बठेजा घनश्याम उ. नि. पृष्ठ क्र. X , G

२०. भुत्ता ललिता उ. नि. पृष्ठ क्र. १२

२१. बठेजा घनश्याम उ. नि. पृष्ठ क्र. X , M

२२. तत्रैव – पृष्ठ क्र. H

२३. तत्रैव – पृष्ठ क्र. ,Q R, S, N, O, P

२४. Karunakar T. K. Op-Cit, Pg. 98, 99

२५. भुत्ता ललिता उ. नि. पृष्ठ क्र. ५

२६. Ulhasnagar Factories, Business & Economy, m.ulhasnagar online.in

२७. बठेजा घनश्याम उ. नि. पृष्ठ क्र. ४१

२८. बठेजा घनश्याम उ. नि. पृष्ठ क्र. २९, ३०

२९. Victor Barnow's Social Structure of a Sindhi Refugee Community, Social Forces, Vol. 33 No. 2, December 1954, USA Page No. 148, 149 ed Subhadra Anand, p-93

३०. Dr. Pathak Manjulawani Relevance of Keynesian Trade. Theory with Sindhi Economy International, E Publication, ISBN 978-93-84648-80-0 2015, Page No. 58, 59, 60, 61, 62

३१. Johnson Dr. P. A. and AD Mascarehan's Business Economics Manan Prakashan, Mumbai III Edition – 2004, P.No. 114.

३२. मुलाखत – श्री.मल्हारी वामन भावार्थ

३३. मुलाखत – रामलाल गिदनदास लासी

३४. मुलाखत – घनश्याम रामचंद्र बठेजा

३५. मुलाखत – केशव कृपालदास चंदनानी

३६. उल्हासनगर मॅन्यूफॅक्चर्रर असोसिएशन, उल्हासनगर

प्रकरण – ४

सामाजिक जीवन

क) कुटुंबव्यवस्था –

I. **समाजरचना –** (Composition of Society) :

सिंधमध्ये सिंधी समाज मुख्यतः ज्या दोन गटात विभागला होता ते दोन मुख्य गट म्हणजे मुसलमान आणि हिंदू होय. मुसलमान हा गट प्रभावी असल्यामुळे परिणामी बरेचसे हिंदू मुसलमानात रुपांतरित झाले. धर्मांतर किंवा धर्मबदल यामुळे जातीय संरचना नसल्याने अखंड अशी जातप्रणाली, अस्पृश्यता नव्हती.[१]

सिंधमध्ये जे ब्रह्मखत्री होते त्यांचे पूर्वज गुजरातहून कच्छला आले. तेथून सिंधमधील सर्वप्रथम ठट्टा नगरमध्ये आले. त्यानंतर हैदराबाद, कराची आणि शिकारापूरला आले. सर्व देवीचे भक्त होते. त्यांची कुळनावे पुढीलप्रमाणे – अरोडा, आछरा, पछरा, टिडिण, जग, बांभण, काकू, कोकल, गना, मामतोरा, माधू, निंगो इ. भारताचे विभाजन झाल्यावर सिंध ब्रह्मखत्री सौराष्ट्र आणि अन्य ठिकाणी विखुरले गेले. सिंध ब्रह्मखत्री म्हणून ओळखले जातात. सौराष्ट्रमध्ये ब्रह्मखत्रीने जेतपूरमध्ये कापड रंगविणे व डाईंग व्यापारामध्ये विकास केला. सिंधमधील ठट्टानगरमध्ये ब्रह्मखत्री कापड रंगविण्याचा व्यवसाय करीत. तसेच कच्छ आणि भुजमध्ये ब्रह्म खत्री हा व्यवसाय करतात. हाताने बनवलेले कापड, तसेच त्याला रंगवून डिझाईन छापणे, ह्या कार्यात ते कार्यकुशल आहेत. कच्छमधील ब्रह्मखत्री मुसलमान झाल्यानंतर स्वतःला फक्त खत्री म्हणत. त्यांनी ब्रह्म हा शब्द काढला. त्याचप्रमाणे सिंधी ब्रह्मखत्री भारतात आल्यावर त्यांनी ब्रह्म हा शब्द प्रयोग कमी केला आणि स्वतःला खत्री म्हणून संबोधू लागले.

सिंधमधील ब्रह्मखत्री गुरुनानक, झुलेलाल यावर विश्वास ठेवतात. तसेच माताचे भक्त आहेत. हिंगलाज मातेचे भक्त गुजरातचे ब्रह्मखत्री 'वाराही' माताची पूजा करतात. सिंध कच्छ आणि गुजरात ब्रह्मखत्रींचे मूळ एक आहे. ते मुळातच सिंधचे सूर्यवंशी राजा रतनसेनचे वंशज आहेत. क्षत्रिय आहेत. परंतु कर्म आणि धंदा व्यापारात राहून वैश्य बनले. 'कच्छ तारी अस्मिता' यात ब्रह्मखत्री याबद्दल थोडेसे वेगळे सांगण्यात आले आहे. ब्रह्मखत्री सूर्यवंशी होते.

वैदिक धर्माचे पालन करीत असत. परंतु बौध्द धर्माचा प्रभाव वाढल्यामुळे बौध्द धर्माची दीक्षा घेऊन पंजाबकडे आले. पंजाबमध्ये क्षत्रियांचा उच्चार 'खत्री' असा झाला. ज्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला, परंतु जगद्गुरु शंकराचार्यांच्या आंदोलनाने पुन्हा हिंदुधर्मात आले व बिहार, अवधमध्ये येऊन 'खत्री' म्हणून संबोधण्यास सुरवात केली. त्यामध्ये ज्यांनी क्षत्रियासारखे कर्म केले जे लढाई स्वरुपाचे स्वभावाचे दिसले त्यांना क्षत्रिय राजपूत म्हटले गेले. तवारिख आईसफचे लेखक मौलवी इस्माईल इब्राहिम यांच्या म्हणण्यानुसार 'सिंधमधील लोहाणा' दक्षिण पंजाबमधील अरोडा आणि उत्तर पंजाबचे खत्री हे तीनही एकाच वंशाचे आहेत, ज्यांचे गुरु स्वारस्वत ब्राह्मण आहेत.

खत्री म्हणविल्या जाणाऱ्या लोकांचा कापड विणणे ते रंगविणे, छापणे इत्यादी कामात ते अग्रेसर होते.

II. भाटिया – भट्टी – भाटी

'सिंध के हिन्दुओं का इतिहास' या पुस्तकात भेरुमल महेरचन्द यांनी भाटिया लोक जैसलमेर, भट्टी राजपुताचे वंशज आहेत ते यादववंशी आहेत, ह्या वंशात गृहयुध्द झाल्यानंतर द्वारकेला गेले. वेगवेगळ्या ठिकाणी भाटिया जातीत ८४ गोत्र आहेत. गाजरिया, काजरिया, अदेसी, सोनी, गांधी इ. बऱ्याच गोत्रामध्ये पहिले 'राव' शब्दा लावला जातो. जसे राव रामैया; राव पद्मसी; राव पनपाल इत्यादी.

ब्रिटिश शासनकाळात जैसलमेरमध्ये भट्टी भाटी राजपुतांचे शासन होते. जैसलमेरचे शासक सिंधमध्ये आले. त्यामुळे भाषासंस्कृती सिंधी प्रमाणेच जशी आहे. कच्छमध्ये जसे गुजराती मिश्रित सिंधी भाषा बोलली जाते, तसाच प्रकार जैसलमेर मध्ये राजस्थानी मिश्रित सिंधी भाषा प्रचलित आहे. [२]

'लोहाणा' हे मुख्यतः उद्योग आधारावर विभागले होते. अमील हे सरकारी नोकरी, नागरी सेवेत उच्च पदावर होते. पूर्वी मुस्लीम राज्यकर्त्यांच्या वेळी त्यांनी जमीनदार किंवा जहागीरदार म्हणून जमिनी मिळविल्या होत्या. दुसरा गट हा 'लोहाणा व्यापारी' सिंधुवर्की (Sindhuwarkis) म्हणून उच्च पदावर होते. मूलतः त्यांचे काम तयार केलेला माल विकणे. हे व्यापारी संपूर्ण जगामध्ये स्थापित झाले. त्यांनी मोठ्या प्रमाणात संपत्ती जमविली. ह्या सिंधी

व्यापाऱ्यांना जागतिकीकरण ही संकल्पना नवी नव्हती. त्यांनी प्रामुख्याने ग्रेट ब्रिटन, युरोप ओलांडून जपान, सिंगापूर, हाँगकाँग, इंडोनेशिया, मलेशिया, आफ्रिका, जिब्राल्टमध्ये जगाच्या पाठीवर स्वतः व्यापार स्थापित केला.[३]

ठाकूर हे स्वामी झुलेलाल यांचे वंशज आहेत. ते सिंधी समाजाचे अधिकृत ब्राह्मण आहेत. हे सिंधी (Tikanas) ठिकाणा आणि (Darbars) दरबारप्रमुख होते.

III. **भागनरी (Bhagnaris) -**

बलुचिस्तानातील भाग (Bhag) आणि नरी (Nari) ही दोन छोटी गावे. या गावातील 'भागनरी' समुदाय जो आहे तो सुकामेवा, मसाल्याचे पदार्थ, तसेच द्राक्ष, मद्य हा व्यापार करीत असे. ते फक्त आपल्या समुदाय–समाजातच विवाह करीत असत.

IV. **मसंद (Masanda) -**

'मसंद' हे नियुक्त केले होते. सिख्खिजम् (शीख धर्म) पसरविण्यासाठी चौथे गुरु रामदास यांनी केला. त्यांनी आपला प्रचार गुरुबानीतून केला. लहान शहरे आणि गावामध्ये निधी गोळा केला. भारतात सध्या ३00 मसंद राहतात. त्यातील काही हुशार शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते आहेत.

V . **भाईबंद (Bhaibands) -**

व्यावसायिक वर्ग म्हणून 'भाइबंद' ओळखले जातात. व्यापार व्यवसायात ते कार्यरत होते. अमील वर्गह हा अमील वर्गात लग्न करत असे तर भाइबंद हा भाइबंद वर्गात लग्न करत असे. [४]

VI. **उल्हासनगरमधील निर्वासितांचे जातनिहाय विवरण -**

उल्हासनगरातील उपनगरात सिंधू हिंदू निर्वासितांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. त्याचबरोबर महाराष्ट्रीयन, गुजराती अन्य समुदायदेखील होता. ख्रिस्तीदेखील होते. बहुतेक सिंधी हे भाईबंद जातीशी संबंधित होते. त्यांनी आपल्यामध्ये सोयीस्कररीत्या बदल करून अमील वर्गात सहभागी झाले. विभाजनापूर्वीच मुंबईमध्ये सिंधमधील अमील वर्ग सरकारी अथवा खाजगी

कर्मचारी म्हणून स्थायिक झाले होते. अमील हा वर्ग उच्चशिक्षित होता. तो आपले सामाजिक जीवन आनंदाने व्यथित करीत होता.

A Journalist in Bombay City माहिती आधारे सिंधी समाज ९९% अधिकारी भारतीय शासकीय खात्यामध्ये अमील वर्गातील होते. साहजिकच भारतात आल्यावर भाईबंद ह्या वर्गाने स्वतःची ओळख अमील म्हणून करून घेतली. त्यावेळेस अमील वर्गाने पारंपरिक पोशाख धोती वापरण्याचे बंद करून युरोपियनसारखा ट्राऊजर पोशाख परिधान करण्यास सुरुवात केली. भाईबंदांपैकी त्यातील काहींनी आपल्या आडनावात बदल करून अमील आडनावाच्या शेवटी 'आनी' असते ते करून घेतले. मिरचंदानी, कृपलानी इत्यादी.

पुढील तक्त्याच्या आधारे २४० कुटुंबांची जातनिहाय वितरणाबद्दल माहिती समजण्यास मदत होते. ते C. N. Vakil आणि Dr. Miss Cabinet maker यांच्या माहितीआधारे –

जात	संख्या
भाईबंद	१००
अमील	५९
ब्राह्मण	०७
छुरी	०३
लोहाणा	०१
इतर जाती आणि वैश्य	१७
माहीत नसलेले	५३
एकूण	**२४०**

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons", Page-33)

अमील हे मूळचे सिंध प्रांतातील हैदराबादमधील अल्पसंख्यांक आहेत. स्थलांतर झालेला भाईबंद समुदाय व्यवसायाशी निगडित आहे.[५] सिंध परगणा मधून ४९; कराची शहरामधून २३; शिकरपूर २१; सक्कर १९; हैदराबाद आणि १८ शहरी विभागातील ज्यांची लोकसंख्या ५००० ते ५०,००० पर्यंत ५२ ग्रामीण भागातून आले. ३१ कुटुंबे उल्हासनगरातील कॅम्पमध्ये आहेत. कॅम्पमध्ये त्यांची राहण्याची व रेशनची सोय मोफत करण्यात आली होती.

इतर कुटुंबे विविध ठिकाणी स्थापित झाली. कुटुंबसंख्या जी ग्रामीण, ग्रामीण आणि शहरी भागातील अशा विभागाद्वारे विभागलेली असते. सर्वांची स्थलांतर करण्याची विविध कारणे आहेत, ती कारणे २७० कुटुंबांबाबत विभिन्न होती, ती पुढीलप्रमाणे सांगता येतात.

कुटुंबांची संख्या ग्रामीण, ग्रामीण आणि शहरी भागातील –स्थलांतराची कारणे

क्र.	**क्षेत्र स्वरूप**	**स्थलांतराची कारणे**	**कुटुंबांची संख्या**
१.	**ग्रामीण**	जीवन नुकसान भीती	४०
		मालमत्ता नष्ट होण्याच्या भीतीने	३४
		जीवन चरितार्थ नष्ट होण्याच्या भीतीने	२५
		इस्लाममध्ये रुपांतरित होण्याच्या भीतीने	२२
		हिंसा, अत्याचार निति–नियम भीतीने	०५
		सर्व हिंदू सोडून गेले	०१
		एकूण ग्रामीण मधील	**४८**
२.	**ग्रामीण शहरी**	जीवन नुकसान भीती	६२
		मालमत्ता नष्ट होण्याच्या भीतीने	५८
		जीवन चरितार्थ नष्ट होण्याच्या भीतीने	३२
		इस्लाममध्ये रुपांतरित होण्याच्या भीतीने	२९
		हिंसा, अत्याचार निति–नियम भीतीने	०१
		सर्व हिंदु सोडून गेले	२३
		एकूण ग्रामीण शहर	**७३**
३.	शहर	जीवन नुकसान भीती	१४१

		मालमत्ता नष्ट होण्याच्या भीतीने	९९
		जीवन चरितार्थ नष्ट होण्याच्या भीतीने	६३
		इस्लाममध्ये रुपांतरित होण्याच्या भीतीने	६७
		हिंसा, अत्याचार निति–नियम भीतीने	०६
		सर्व हिंदु सोडून गेले	०२
		एकूण शहर	**२६**

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons",)

ग्रामीण संख्या एकूण – ४८, ग्रामीण शहर एकूण – ७३,शहर संख्या – १४९ इत्यादी होय,. एकूण संख्या – २७० होय. [६]

VII. **लोकसंख्या व कुटुंब आकार** -

उल्हासनगरातील कॅम्पमध्ये सुरुवातीला निर्वासितांची अचूक लोकसंख्या स्पष्टपणे सांगणे कठीण आहे. कारण त्याबाबत विविध आकडेवारी दिसून येते. प्रशासकीय कार्यालयातील अंदाजे लोकसंख्या ८०,००० आहे व २०,००० कुटुंबे होती. १९५१ च्या जनगणनेनुसार ८०,८६१ व्यक्तींचा उल्लेख आहे. ही संख्या घर नसणाऱ्या व्यक्तींची होती. जनगणनेनुसार मोजणीच्या वेळी ४२,१९२ पुरुष तर ३८,६६७ स्त्रिया होत्या. सन १९५३ आयोजित चौकशीच्या आधारावर लोकसंख्या ८८,७८५ असल्याचे आढळून आले. सरकारमधील त्या वेळचे माननीय पुनर्वसन मंत्री ए.पी.जैन यांनी उल्हासनगरला भेट दिली. त्यावेळेस उपनगरात ९६,८८५ लोकसंख्या होती. हा कालावधी २७ एप्रिल, १९५४ होता. पुढे दोन वर्षांच्या कालावधीत ३१ जुलै १९५६ रोजी केंद्रीय पुनर्वसन मंत्री माननीय श्री. मेहरचंद खन्ना यांनी भेट दिली असता अंदाजे लोकसंख्या १ लाख १० हजार होती.

१ लाख १० हजार लोकसंख्या असलेल्या उपनगरात विविध प्रकारच्या संरचना आढळून आल्या. जुन्या बॅरेकचे नूतनीकरण करण्यात येऊन संपूर्ण लोकसंख्येची निवासव्यवस्था केली. ह्या व्यतिरिक्त उल्हासनगरात अनेक अनधिकृत छोटीसी घरे (टपरी) होती. अनेक निर्वासित त्यांच्या कुटुंबासह स्वतः भाडेतत्त्वावर निवास व्यवस्था करून राहत

होते. असंख्य सदनिका ह्या अनधिकृतपणे व्यापलेल्या होत्या. कुटुंबातील काही सदस्य हे त्याच हॉलमध्ये होते. परंतु हॉलमधील पुढील जागेत स्वयंपाक करण्यासाठी वेगळी व्यवस्था होती. कुटुंबातील अन्य सदस्य शेजारी–शेजारी राहत होते. पण स्वयंपाकासाठी वेगळी व्यवस्था आहे. खालील तक्त्यावरुन निर्वासितांनी व्यापलेल्या निवास व्यवस्था कशी होती यावरून कल्पना येते.

कुटुंबांनी व्यापलेले सदनिकेचे विविध प्रकार

तपशील	हॉल	बॅरेकचे विभाजन	नुतनीकरण करून बॅरेक	सदनिका	अनाधिकृतपणे निर्वासितांची बांधणी	कुटुंबाची एकूण संख्या
अधिकृत	९५	१०४	३१	२१	--	२५१
अनधिकृत	०१	०३	०२	०६	०७	१९
एकूण	९६	१०७	३३	२७	०७	२७०
निवास व्यवस्था विविध प्रकारच्या व्यापलेली टक्केवारी	३६	३९	१२	१०	०३	१००

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons" Page no.36)

VIII. **कुटुंब आकार** (**Size of the Family**)-

खालील तक्त्यावरून निर्वासितांच्या कुटुंबाचा आकार समजण्यास मदत होते.

२७० कुटुंबाची संख्या

संख्या	०१	०२	०३	०४	०५	०६	०७	०८	०९	१०	११-१५	१६-२०	एकूण
कुटुंबाची संख्या	१३	१६	२५	३७	३४	३८	३३	२१	१५	१२	१२	०४	२७०
सदस्य एकूण संख्या	१३	३२	१०५	१४८	१४०	२२८	२३१	१६८	१३५	१२०	१५६	७२	१५४८

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons" page 34)

नमुना अभ्यास पध्दतीनुसार कुटुंबातील एकुण सदस्य लोकसंख्या १५४८ आहे. १९८ सदस्य ५ वर्षे वयाखालील आहेत. ४६२ सदस्य ७ वर्षे वयाखाली आहेत. ७३५ सदस्य वय वर्षे ५५ व ९९ वर्षे खाली आहेत. यामध्ये ८१० पुरुष आहेत. ६८४ स्त्रिया आहेत. येथे १९५१च्या जनगणनेनुसार माहिती स्पष्ट होते. ८०,८६१ ही एकूण लोकसंख्या आहे. त्यामध्ये ४२,१९४ पुरुष आहेत व ३८,६६७ महिला आहेत. नमुना अभ्यास पध्दतीनुसार पुरुष–स्त्री संबंधित जवळ–जवळ समान प्रमाण आढळून येते. हा अभ्यास पुढील तक्त्यातील संख्येवरून पाहिला जाऊ शकतो.

२७० कुटुंबांचे १५४८ सदस्यांचे वयाचे वितरण पुढीलप्रमाणे –

लिंग	५ वर्षा खालील	६ ते १७ वर्षाखालील	१५ ते ५५ वर्षाखालील			एकूण
			लग्न झालेले	लग्न न झालेले	विधवा	
पुरुष	१०९	२६१	२५८	११४	१२	३८४
स्त्रिया	८९	२०१	२७५	३६	४०	३५१
माहिती नसलेले	––	––	––	––	––	––
एकूण	१९८	४६२	५३३	१५०	५२	७३५

लिंग	५ वर्षा खालील			एकूण
	लग्न झालेले	लग्न न झालेले	विधवा	
पुरुष	०१	१९	५६	८१०
स्त्रिया	०३	२३	४३	६८४
माहिती नसलेले	––	––	––	५४
एकूण	०४	४२	९९	१५४८

7

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons" (Page - 35)

IX. **स्त्रियांची स्थिती** (Position of Women) -

एखाद्या कुटुंबाबद्दल बोलताना एक समाज त्याच्या महिलांसह समाजातील आपले संबंध व आपल्या समाजाची रुपरेषा आणि स्वतःबद्दल जास्त बोलतो. आणि त्यामुळेच सिंधी समाजातील स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन केल्याखेरीज सामाजिक जीवन कसे होते हे पूर्ण होणार नाही. सिंधी महिलांना सर्व क्षेत्रात महत्त्वाचे व समान मानले होते. प्रशासन राजकारण किंवा कलेच्या क्षेत्रात कविता, कला, तत्त्वज्ञान आणि वास्तुकलेचे क्षेत्र ह्या स्त्रियांचे वर्चस्व सर्वात व्यापलेले दिसून येते. महिला ह्या त्यांच्या गुणवत्तेवर उच्च व सन्मानप्राप्त पदावर होत्या. धन्वंतरी तिचा पती ऋषि धन्वंतर इ.स. पूर्व ५00 मध्ये सिंधमध्ये वैद्य आणि उच्च सर्जन म्हणून देशभरात ओळखला जात होता.

इ. सन पूर्व ६000 मध्ये 'लीलावती' नावाचा ग्रंथ भास्कराचार्य यांनी आपल्या मुलीच्या नावाने लिहिला. गणितीय दशमान पध्दती आजही महत्त्वाची आहे. इ.स. पूर्व ५000 मध्ये प्राचीनकाळापासून आलेल्या प्रार्थनेतदेखील आपण अनेक देवतांची नावे जसे राधेश्याम, सीताराम खास विशेषप्रसंगी घेतो.[८]

उल्हासनगरमध्ये स्त्रियांची स्थिती फारशी सुसह्य नव्हती. विभाजनानंतर आपले घरदार, मालमत्ता सोडून आल्यानंतर तेथे स्थायिक होण्यासाठी संघर्ष चालू होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा, कुटुंबाला हातभार हवा यासाठी घरामध्ये छोटे उद्योगात सिंधी स्त्रियांनी पुरुषांबरोबर काम केले. हळूहळू व्यवसायात जम बसविण्याबरोबर शिक्षण घेण्यास सुरुवात केली. उल्हासनगरमध्ये सर्वप्रथम मुलींची शाळा परसराम मंसद यांनी सुरु केली होती. जनगणनेतील अहवाल निरीक्षण केले असता स्त्रियांची संख्या स्थिती ही पुरुषांपेक्षा कमीच आढळून आली.

सिंधी समाजाची समाजरचना पाहिली, तसेच समाजातील कुटुंबांची सुरुवातीची सदस्य संख्यादेखील अभ्यासली. त्या वेळी अनेक कुटुंबे ही विभक्त झालेली निरीक्षण व प्रश्नावली आधारे समजते. एकाच कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रितपणे भारतात आलेले दिसत नाही. नातेवाईक काही पाकिस्तानातील सिंध प्रांतात राहिलेले आहेत.

उदा. घनश्याम रामचंद्र बठेजा, ज्या वेळी पाकिस्तानातील (शहादातकोट) लाडखाना जिल्हा पश्चिम पाकिस्तान सोडून महाराष्ट्रात आले, त्या वेळी त्यांचे एक कुटुंब भाऊबंद हे तेथे

राहिले. अशी अनेक कुटुंबातील नातेवाईक पाकव्याप्त सिंधमध्येच राहिले. त्यामुळे पुढे कुटुंब व्यवस्थेतील सदस्य संख्या स्थायिक झाल्यानंतर विभक्त झालेली दिसून येते.

ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगरमधील शहर लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेनुसार ८०,८६१, होती. १९७१च्या जनगणनेनुसार १,६८,४६२ दुप्पटपेक्षा अधिक होती. २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४,७२,९४३ होती. [९]

ह्यावरून हे स्पष्ट होते की, उल्हासनगरमधील लोकसंख्या जी काही हजारांमध्ये होती ती पुढे २००० साला पर्यंत लाखाच्या घरात पोहोचली. लोकसंख्या वाढली. जमिनीचा भूभाग हा पहिल्या इतकाच आतापर्यंत आहे, त्यात बदल नाही. अनेक प्रश्न यातून सामाजिक व्यवस्थेत निर्माण झाले. अनधिकृत बांधकामे, झोपडपट्टी, पाण्याचा प्रश्न, बेकारी, भ्रष्टाचार, गुन्हेगारी वाढीस लागली. पूर्वीची पिढी ही आतापर्यंत बोटावर मोजण्याइतपतही शिल्लक राहिली नाही. काळाच्या ओघात गडप झाली. त्यानंतर येणारी पिढी थोड्याबहुत प्रमाणात शिल्लक आहे. आता चौथी पिढी उल्हासनगरमध्ये आहे. पण त्यांना त्यांच्या अस्तित्वाची लढाई फारसी करावी लागली नाही. पिढ्यांनी उभारलेले वैभव त्यांच्या समाज जीवनात त्यांना उपयोगी पडत आहे. त्यांना त्यांचा भूतकाळदेखील व्यवस्थित माहीत नाही. स्थानिक जनतेशी ते एकरुप झालेले आढळून येतात.

ख) आहार –

सिंधी समाजातील लोकांच्या आहारात शाकाहारी व मांसाहारी दोन्ही पदार्थांचा समावेश असतो. पारंपरिक पदार्थांबरोबरच आधुनिक बदलत्या काळानुसार नवीन पदार्थांचा समावेश दिसतो. त्यांच्या खाद्यपदार्थात स्वाद आणि मसाले यांचा समन्वय आढळतो. याचा अर्थ असा होत नाही की सिंधी पदार्थ हे मसालेदार असतात. गोड पदार्थांचादेखील त्यात समावेश असतो. पारंपरिक स्वरुपावरून सिंधी पदार्थ मसाला, स्वाद आणि गोडपणा ह्यावरून ओळखले जातात.[१०]

प्राथमिकता सिंधी संस्कृतीतील खाद्यसंस्कती ही स्थानिक उत्पादनावर अवलंबून होती. पण शेजारील प्रांतातील पंजाब, कच्छ, गुजरात, तसेच दीर्घकाळ असणारा इस्लाम संस्कृतीचा प्रभाव सिंधमधील खाद्यपदार्थात दिसून येतो तो म्हणजे अरब आणि पर्शियन

समाजाचा मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आगमनाने सिंधी खाद्यपदार्थात मांसाहार सुरू झालेला दिसतो. त्यात कबाब, बिर्याणी रान (raan) leg of Mutton असे मांसाहारी पदार्थ आढळतात.[११] सिंधी पाकशैलीवर असे अनेक प्रभाव पडलेले दिसतात. बलुचिस्तान प्रांत देखील सिंध सीमाजवळ आहे आणि पंजाब त्यामुळे ह्या दोहोचे संमिश्रण होणे स्वाभाविक आहे. सिंधी व भारतीय व्यंजन सारखे आहेत. सिंधमध्ये राहणारे सिंधी आणि भारतात राहणारे सिंधी दोन्ही समान आहेत.

दैनंदिन आहारात सिंधींच्या पदार्थात गव्हापासून बनवलेले फुलके, भात आणि दोन प्रक़ारच्या भाज्यांचा समावेश असतो. ज्यामध्ये एक भाजी रस्सेदार आणि दुसरी भाजी सुकी असते. सिंधींच्या खाद्यपदार्थात काही पदार्थ खूप लोकप्रिय आहेत. त्यामध्ये साई भाजी, दाल पकवान, पालेभाजी (व्हेजिटेबल) करी, पापड ह्या पदार्थांचा समावेश महत्त्वपूर्ण आहे.[१२] सिंधींच्या आहारातील महत्त्वाचे काही पदार्थ पुढीलप्रमाणे होय.

१. साई भाजी –

सिंधी समाजात साई भाजी अतिशय प्रसिध्द आहे. ती सिंधी पालक म्हणून देखील ओळखली जाते. सामान्यपणे ती खिचडी किंवा चपातीसोबत खातात. ही अतिशय पौष्टिक आहे. हिरवी पालक, मेथीची पाने आणि इतर भाज्या जसे टोमॅटो, कांदा, गाजर, बटाटा आणि वांगेसुध्दा ह्या सर्व भाज्यांचे मिश्रण आणि पालेभाजीबरोबर डाळ असे सर्व एकत्र मिश्रण की ज्यामध्ये कॅल्शियम, प्रोटीन, आयर्न (लोह), जीवनसत्त्व, 'अ' आणि सोबत पापड, दहीबरोबर साई भाजी आणि खिचडी.[१३]

२. डोडो –

'डोडो' म्हणजे बाजरीची भाकरी होय. ज्यामध्ये सर्व प्रकारचे मसाले टाकून तव्यावर ती साधारणपणे भाजली जाते. खासकरून लसूण आणि पुदिन्याची चटणीबरोबर खाल्ली जाते.

३. कोकी –

सिंधी कोकी तिच्या चवीसाठी खूप प्रसिध्द आहे. बनविण्यास अतिशय सोपी, कमी साहित्य असणारी अशी आहे. ती डाळ, रस्सेदार भाजी, दही, पापड, लोणचे किंवा चहा

नाहीतर तशी देखील खातात. प्रवासामध्ये किंवा पिकनिकला बरोबर घेऊन जातात. कोकी मुख्यतः गव्हाच्या पिठामध्ये बनवली जात असल्यामुळे शरीरस्वास्थ यासाठी उत्तम आहे. बहुतेक करून दररोज न्याहारीसाठी कोकी सिंधी घरात बनविली जाते.

४. दाल पक्कान –

पक्कान म्हणजे मैद्यापासून बनवलेली कुरकुरीत पुरी. ज्यामध्ये मीठ, अथवा ओवा घातलेला असतो. तर दाल म्हणजे चण्याची डाळ यासोबत हिरवी चटणी, गोड चिंचेची चटणी असते. अतिशय सुंदर न्याहारीचा पदार्थ सिंधींच्या सण आणि खास कार्यक्रमात असतो.[१४]

५. लोलो (Lolo)- Sweet Loli

'लोलो' हा पदार्थ गव्हाचे पीठ (कणीक) यामध्ये थोडे मीठ टाकून तसेच साखर किंवा गूळ याचे सिरप टाकून बनवतात. लोलो हे सामान्यपणे सणाच्या दिवशी बनवले जाते. उदा. नागपंचमी, थदडी (Thadree)

६. सिंधी कढी –

सिंधी कढी बेसन पीठ आणि चिंच यापासून बनवतात. यामध्ये पुष्कळ भाज्यांचा समावेश असतो, जसे वांगे, सुरण, भेंडी, बटाटा, शेवगा, इत्यादी. साधा सफेद भात आणि गोड बुंदीसोबत दिली जाते.

७. सेयल पालो (Pallo) –

सेयल पालो हे टोमॅटो, कांदा घालून बनवतात. चपाती बरोबर चांगली लागते. खूप थोड्या लोकांना हा पदार्थ बनवायचा माहीत आहे, जो त्याच्या मूळ स्वरुपात बनवतात. ह्या पदार्थात जो मासा 'पालो' असतो त्याला भरपूर तेल असते. नाहीतर रसदार भाजीत जास्त तेल होते.

८. सेयल डबरोटी ब्रेड (चपाती) –

सेयल डबरोटी ब्रेड हा नाश्त्याचा पदार्थ आहे. याचा मुख्य आधार लसूण, कोथिंबीर आणि टोमॅटो याचे मिश्रण आहे. टोमॅटो आणि कांदा या सोबत शिजविले जाते. सिंधी व्यंजन बनविण्याची ही परंपरागत पध्दत आहे.[१५]

९. ताहिरीन किंवा ताहिरी –

ताहिरीन किंवा ताहिरी/तायरी हे विशेष प्रसंगी उदा. विवाह, पूजा समारंभासारखे चेटीचंद, चलिया इत्यादी उत्सवात बनविले जाते. ताहिरीन चेटीचंद सणात प्रसाद म्हणून वाटले जाते. साई भाजी साधा बटाटा यासोबत खाल्ले जाते. हा पदार्थ गुळ किंवा साखर यामध्ये बनवतात. साधारणपणे फूड कलर भातात घातला जातो. किंवा केसर घालून बनविला जातो. गोड भात हा गूळ आणि घी घालून मुलांना दिला जातो. तो अतिशय पौष्टिक आहे. [१६]

१०. पंचरत्न दाल –

पंचरत्न दाल ही प्रामुख्याने पाच डाळींचे मिश्रण होय. ही पंजाबमधील खाद्य पदार्थातदेखील प्रसिध्द आहे. तिला 'दाल पंचमल' किंवा 'दाल पंचरत्न' असे म्हणतात. पाच डाळींमध्ये प्रामुख्याने चणाडाळ, मूगडाळ, मसूरडाळ, उडीद दाळ, तूरडाळ यांचा समावेश असतो. ह्या सर्व डाळींमध्ये स्वास्थ्यवर्धक असे प्रोटीन, खनिज पदार्थ, कर्बोदके मोठ्या प्रमाणात मिळतात. पंचरत्न दाल बनविण्याचे प्रकारदेखील भिन्न आहेत. यामध्ये काहीजण कांदा घालतात तर काहीजण घालत नाहीत. कधी कांदा, टोमॅटोचा वापर करूनही बनविली जाते. ती साधा भात किंवा चपातीसोबत दिली जाते.

११. मखनी दाल, पुरी –

मूग डाळीचा वापर करून मखनी दाल बनवितात. त्यामध्ये हळद, काळी मिरी पावडर, मीठ हे साहित्य असते. मखनी दाल पुरी किंवा कोकीसोबत खाल्ली जाते. मुलांसाठी हा उत्तम न्याहरीचा प्रकार आहे. पचण्यास आणि बनविण्यास अतिशय सुलभ अशी डाळ आहे. मखनी दाल म्हणजे मूगडाळीचा खरा आस्वाद होय.

१२. सना पकोडा –

सना पकोडा, बटाटा वडा आणि मिरची पकोडा हे तिन्ही पदार्थ एकत्र सामान्यपणे रस्त्यावरील पदार्थ (Sanna Pakora) म्हणून सिंधी लोकांमध्ये आढळून येतात. जेवणात डाळ, चपातीसोबतदेखील ठेवले जातात.[१७]

१३. कारो प्रसाद –

कारो प्रसाद हा पवित्र पदार्थ आहे. कारो प्रसाद नेहमी प्रत्येक पवित्र विधी नंतर वाटला जातो. शीख संस्कृतीचा तो एक अविभाज्य भाग आहे. गुरुद्वारा, मंदिरात किंवा घरी एखाद्या पवित्र समारंभात दिला जातो. अनेक सिंधी शीख गुरुंना मानतात. कारो प्रसाद हा त्यांच्या संस्कृतीच्या विधीतील धार्मिकतेचा भाग आहे.

१४. सुजीचा हलवा (Sooji Jo Seero) –

साधारणपणे प्रसाद म्हणून उत्सवात दिला जातो. हा एक अत्यंत लोकप्रिय गोड पदार्थ आहे. सुजीचा हलवा हा स्वादिष्ट पदार्थ मुलांच्या वाढीसाठी उत्तम आहे. [१८]

१५. शेवया (Seviyan - Vermicelli) –

शेवया हा गोडपदार्थ कधी दुधाचा वापर करून (Dessert) गोड म्हणून वापरात आणला जातो. मुस्लीम सिंधी बकरी ईद आणि ईद–उल–फितर ह्या धार्मिक सणाच्या प्रसंगी बनवितात.[१९]

१६. चुरीचा लाडू –

चुरी प्रामुख्याने सत्यनारायण कथेत प्रसाद म्हणून दिला जातो. हा लाडू पूर्णपणे गव्हाचे पीठ (कणीक) आणि तुपात बनविला जातो. हा लाडू बनविण्याचे दोन प्रकार आहेत. गव्हाचे पीठ तांबूस रंग येईपर्यंत भाजायचे व त्यात साखर, दूध मिसळायचे. दुसऱ्या प्रकारामध्ये गव्हाचे पीठ, तुप पाण्यात मळून घेऊन नंतर लहान–लहान गोळे करून तेलात तळायचे. नंतर तळलेल्या लाडूचा चुरा करून साखरेच्या पाकात घालून लाडू तयार करायचा, अशा प्रकारे हा लाडू बनविला जातो.

१७. बोरी कुट्टी (Bori Kutti)–

कुट्टी हा एक न्याहरीचा पदार्थ आहे. गव्हाच्या चपातीचा चुरा करून त्यामध्ये साखर टाकून गरम तूप तेलात एक त्रित केले जाते. त्यासोबत पापड किंवा लिंबाचे लोणचे यांचा समावेश केला जातो.

१८. थंडाई (Thandai) –

थंडाई हे उत्साहवर्धक पेय आहे. ज्यामध्ये दूध, खसखस बी, सुगंधी वेलची पावडर, काळी मिरी, कलिंगड बी, वाळलेल्या गुलाबाच्या पाकळ्या घालून तयार केलेल्या पेयाला 'थंडाई' म्हणतात.

थंडाई होळी, महाशिवरात्रीला प्रसाद म्हणून दिली जाते. काही वेळेस भांग मिसळली जाते. परंतु भांगेशिवाय उत्तम स्वास्थ्यासाठी शरीरात ऊर्जा येणारे पेय आहे. उन्हाळ्याच्या दिवसात उपयोगी असते. [२०]

१९. फालुदा –

यामध्ये शेवया, बर्फ आणि सर्वात वरचा भाग आईस्क्रीम असे थंड पेय होय.

२०. लस्सी –

लस्सी, दही पारंपरिक पेय आहेत.

२१. किरनी (Khirni)–

किरनी म्हणजे गरम दुधात वेलची, केशर घालून केलेले पेय होय.[२१]

सिंधी समाजातील हा आहार साधारणपणे पौष्टिक नावीन्यपूर्ण विविधता असलेला दिसतो. त्यामध्ये गोड, आंबट, मसालेदार पदार्थ असून मांसाहारी पदार्थ इस्लामिक संस्कृतीचा पडलेला प्रभाव यातून जाणवतो. सिंधी पदार्थांवर सिंधी प्रांताला लागून असलेला बलुचिस्तान पंजाब ह्या दोन प्रांतांचे मिश्रण जाणवते. भारतातील पदार्थांचा सिंधी पाकशैलीवर प्रभाव जाणवतो. पारंपरिक पदार्थांबरोबर घरात प्रक्रिया करून बनविल्या जाणाऱ्या पदार्थांचा समावेश असतो. उदा. पापड, शेवया, लोणचे, मुरंबा, इ. ह्या सर्व कामात मेहनती सिंधी महिला एकमेकांना मदत करून सामूहिकरीत्या बनवितात.

आधुनिक काळात बदलत्या जीवनशैलीत उल्हासनगरमध्ये (Street Food) रस्त्यावरील पदार्थ हा प्रकारदेखील लोकप्रिय झालेला आढळतो. परंपरागत घरात बनविलेल्या पदार्थांबरोबरच इतरही पदार्थ सहज उपलब्ध होतात. कोणताही आहार भारतीय संस्कृतीत गोड

पदार्थांशिवाय पूर्ण होत नाही. त्यातूनच सोना हलवा, कराची हलवा, चुरीचा लाडू, चिक्की असे अनेक विविध गोड पदार्थांचा आहारात कमी–अधिक प्रमाणात समावेश असतो.

ग) शिक्षणव्यवस्था –

ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची संख्या वाढली. सन १९५१ मध्ये माध्यमिक शाळांची संख्या ४१ होती. १९५६ मध्ये ५३ झाली. सन१९६१ मध्ये ८२ पर्यंत वाढली. ३१ मार्च १९६२ रोजी ही संख्या ९४ होती. माध्यमिक शाळा जिल्ह्यात सर्वत्र विखुरलेल्या आहेत. माध्यमिक़ शाळेतील पाठ्यक्रम संपल्यानंतर अखेरची परीक्षा पुणे येथील शालान्त परीक्षा मंडळ घेते. प्रत्येक वर्षी मार्चमध्ये व ऑक्टोबरमध्ये अशा दोन परीक्षा घेतल्या जातात. ह्या जिल्ह्यात वसई, डहाणू, कल्याण, ठाणे आणि उल्हासनगर ही परीक्षा केंद्रे आहेत.

I. उच्च शिक्षण –

१९६१–६२ पासून उल्हासनगरमध्ये एक महाविद्यालय आहे, त्याची व्यवस्था सेवासदन सोसायटी पाहते. ह्या महाविद्यालयातून वाङ्मय व वाणिज्य ह्याचे शिक्षण दिले जाते. विज्ञान विभाग १९६४ साली सुरू करण्यात आला आहे. माध्यमिक शिक्षणाची प्रगती लक्षात घेता ठाणे, उल्हासनगर, कल्याण शहराची वाढती संख्या यामुळे उल्हासनगरचे एक महाविद्यालय अपुरेच आहे.

II. तांत्रिक शिक्षण –

स्वातंत्र्योत्तर काळात ह्या जिल्ह्यात निर्वासित झालेले लोक मोठ्या संख्येने येऊन राहिले. आणि त्यांना शिक्षण देण्यासाठी एक उत्पादन केंद्र व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले. ह्या केंद्रातून वीजतंत्री (इलेक्ट्रीशिअन), वीज विलेपक (इलेक्ट्रोप्लेटर), सुतार, जोडारी, सीमाकंपाल (लाईनमन), तारतंत्रज्ञ (वायरमन), मोटार यांत्रिक, साचेकार, बांधकार, कातारी, संधाता वगैरे लोकांसाठी प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम घेण्यात येत असे. शिंपीकाम, वीणकाम, खिळे जुळविणे, मुद्रितशोधन हे विभागसुध्दा नंतर सुरु करण्यात आले. ह्या केंद्राची व्यवस्था केंद्र सरकार पाहत असे. १९५८ साली ह्या केंद्राची व्यवस्था पाहण्याचे काम राज्य सरकारकडे आले. ही दोनही केंद्रे एकत्र करून त्याचे रुपांतर राज्य सरकारने

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत केले. ठाणे व उल्हासनगर येथे ही सरकारी तांत्रिकी माध्यमिक शाळा आहेत.[२२]

III. निर्वासितांची शैक्षणिक कामगिरी –

सिंधींना साधारणपणे शिक्षणात स्वारस्य होते. म्हणून अनेक शैक्षणिक संस्थेत त्यांना संधी होती. सर्व सिंधी निर्वासितांना त्यांच्या उत्साही मुलांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. काही शैक्षणिक संस्था ह्या उपनगरात शिफ्ट वेळेनुसार होत्या. नियमित शिक्षण घेणारी, शाळेत जाणारी मुले संध्याकाळी हिंदी किंवा व्यावसायिकता समजून घेत. बहुतांश एक मोठा वर्ग जो मुंबईला काम करण्यास दररोज जात असे. ते मुंबई शहरात उपलब्ध असलेल्या उच्चशिक्षण सुविधांचा वापर करून घेत असे. विभाजनानंतर अनेक व्यक्तींना रोजगार मिळविण्यासाठी मुंबई शहरात यावे लागे. शिक्षणासाठी एकतर सकाळी अथवा संध्याकाळी वर्ग भरत असत. अगदी पदव्युत्तर अभ्यासासाठी जात, अशी अनेक उदाहरणे ह्या समुदायात होती. भारतात आल्यावर त्यांनी मोठ्या प्रमाणात मुलींना शिक्षणात सहभागी करून घेतले. तक्त्यात दिलेल्या खालील संख्यांचा विचार केला असता ठाणे जिल्ह्यातील उपनगराची शैक्षणिक पात्रता दिसून येते.

शहराचे नाव	व्यक्तींची एकूण संख्या	पुरुष	स्त्रिया	साक्षर		एकूण
				पुरुष	स्त्रिया	
अंबरनाथ	२१,५९८	१२,५०५	८,९९३	४,६५८	१,३९५	६,०५३
डोंबिवली	८,१०६	४,३७३	३,७३३	२,७७५	१,७४३	४,५१८
कल्याण	५८,९००	३२,३३०	२८,५७०	१८,६६१	९,७५८	२८,४१९
उल्हासनगर	८०,८६१	४२,१९४	३८,६६७	२३,७१९	११,१५१	३४,८७०

(Source : Thana District Census Hand Book, 1953 Page - 260)

वरील तक्त्यावरून सिंधी निर्वासितांची शैक्षणिक प्रगती समजण्यास मदत होते. तसेच विद्यालयीन शिक्षण, तांत्रिकी शिक्षण यामध्ये विविध कुटुंबातील सदस्य संख्या(शैक्षणिक पात्रता) समजण्यास मदत होते.

कुटुंबातील सदस्यांची शैक्षणिक कामगिरी (शैक्षणिकता)

संख्या	भारतीय भाषा		इंग्रजी माहीत असलेले		एस.एस.सी.		पदवी किंवा औपचारिक शिक्षण		व्यावसायिक शिक्षण		तांत्रिकी शिक्षण	
	संख्या		संख्या		संख्या		संख्या		संख्या		संख्या	
	कुटुंब	व्यक्ती	कुटुंब	व्यक्ती	कुटुंब	व्यक्ती	कुटुंब	व्यक्ती	कुटुंब	व्यक्ती	कुटुंब	व्यक्ती
१. पुरुष	८३	८३	८१	८१	५२	५२	१६	१६	३१	३१	१६	१६
२. पुरुष	६६	१३२	४०	८०	२२	४४	०३	०६	०३	०६	०१	०२
३. पुरुष	४९	१४७	१९	५७	०५	१५	–	–	०१	०३	–	–
४. पुरुष	२२	८८	११	४४	०२	१२	–	–	–	–	–	–
५. पुरुष	०४	२०	०१	०५	–	–	–	–	–	–	–	–
६. पुरुष	०४	२४	०१	०६	–	–	–	–	–	–	–	–
१. स्त्री	८५	८५	२८	२८	१४	१४	२	–	२	२	–	–
२.स्त्री	४७	९४	०८	१६	०१	०२	–	–	–	–	–	–
३. स्त्री	१७	५१	०१	०३	–	–	–	–	–	–	–	–
४. स्त्री	०४	१६	०१	०४	–	–	–	–	–	–	–	–
५. स्त्री	०७	३५	०१	०५	०१	०५	–	–	–	–	–	–
६. स्त्री	०१	०६	–	–	–	–	–	–	–	–	–	–

(Source : Vakil & Cabinet Maker; "Government and the Displaced Persons" page 135) 23

वरील तक्त्यामध्ये कुटूंबातील सदस्याची शैक्षणिक कामगिरी शैक्षणिकता दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये एकूणच उपलब्ध असलेल्या व्यक्तीची शैक्षणिक व्यावसायिक शिक्षण व तांत्रिकी शिक्षणाची माहिती समजते. तक्त्यातील औपचारिक शिक्षण व्यावसायिक शिक्षण व तांत्रिकी शिक्षण कमी प्रमाणात आढळून येते. उल्हासनगरमधील निर्वासित व्यक्तीची एकंदरित माहिती आहे. स्त्रियाच्या संख्येच्या तुलनेत पुरुषाचे औपचारिक शिक्षण, तांत्रिकी शिक्षण व व्यावसायिक शिक्षणाचे प्रमाण अधिक आढळून येते.

महाविद्यालये, माध्यमिक शाळा त्यातील विद्यार्थ्यांची संख्या, जिल्हा स्कूल बोर्ड, ठाणे व शिक्षणसंस्थांचे प्रमुख यांनी दिलेल्या माहितीवर आधारित १९६०–६१ सालातील पटावरील विद्यार्थ्यांची संख्या पुढीलप्रमाणे –

माध्यमिक शाळा	**१९६०–६१च्या पटावरील विद्यार्थ्यांची संख्या**
१. जयहिंद ॲकॅडमी न्यू टेनामेंटस, कल्याण कॅम्प नं. ३	४७१
२. एस.ई.एस.के.सी. हायस्कूल कल्याण कॅम्प नं.२	८१९
३. सिंध नॅशनल हायस्कूल, उल्हासनगर	७५३
४. बी.जी. टिळक हायस्कूल, उल्हासनगर	४८८
५. एस.ई.एस. हायस्कूल, उल्हासनगर	७००
६. दि न्यू ईरा हायस्कूल, उल्हासनगर – ३	८४०

२४

सन १९४९ मध्ये पहिल्या दोन शाळा उल्हासनगर – ५ मध्ये सुरू करण्यात आल्या.

१) बी.जी. तिलक स्कूल २) नेताजी स्कूल, नेताची चौक, हैदराबाद सिंध एज्युकेशन कडून विठ्ठलवाडी स्टेशनजवळ सिंध नॅशनल स्कूल १९५० मध्ये तसेच दि न्यू ईरा इंग्लिश स्कूल प्रायमरी आणि हायस्कूल सुरू झाले. १९६६ मध्ये आर. के.टी. कॉलेज, सेवा सदन कॉलेज, बी.एड्. आणि डी.एड्. ही महाविद्यालये, चांदीबाई हिंमतलाल मनसुखानी कॉलेज म्हणजेच सी.एच.एम.कॉलेज १९६५ मध्ये सुरू झाले. एस.ई.एस. संस्थेतर्फे उल्हासनगर शहर कॅम्प न. १ पासून ५ नंबर पर्यंत एक–एक स्कूल सुरू केले.[२५]

उल्हासनगरमधील शैक्षणिक विद्यार्थी संख्या २००१

शैक्षणिक विभाग	संख्या	विद्यार्थी
प्राथमिक शाळा	७९	५१८८१
माध्यमिक शाळा	३८	५३६७७
महाविद्यालय	०९	२८०४३

Source Education Department of Ulhasnagar Municipal Authority and Report of Institute of Social Science.

वरील तक्त्यावरून उल्हासनगरमधील प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन विद्याथ्यांची संख्या समजते. २००१ च्या पटावरील संख्येतून असे निदर्शनास येते की, विद्याथ्यांची संख्या वाढली आहे.[२६]

इष्ट देव झुलेलाल यांच्या आर्शिवादाने १९८३ मध्ये स्वर्गीय श्री. प्रेमचंद टायनीया यांनी दान केलेल्या भूमीवर झुलेलाल ट्रस्ट स्कूल बांधण्यात आले. उल्हासनगरच्या मुलामुर्लीना इंग्रजी माध्यम मिळवण्याच्या उद्देशाने कमी खर्चात १९८४ मध्ये इंग्रजी माध्यम आणि सिंधी माध्यम सुरु करण्यात आले. पहिली बॅच सिंधी माध्यम एस.एस.सी. १९९० मध्ये उत्तीर्ण झाली आणि इंग्रजी माध्यमाची पहिली बॅच १९९५ मध्ये उत्तीर्ण झाली. झुलेलाल ट्रस्टद्वारे २००० पर्यंत तीन शाळा होत्या.[२७]

१) सिंधी झुलेलाल प्रायमरी स्कूल स्थापना १९८४

२) सिंधी झुलेलाल सेकंडरी माध्यमिक स्कूल स्थापना १९८४

३) झुलेलाल इंग्लिश प्रायमरी स्कूल स्थापना १९८५ [२८]

IV. **चांदीबाई हिंमतलाल मनसुखानी ट्रस्ट द्वारा उल्हासनगरमधील स्कूल आणि कॉलेज पुढीलप्रमाणे –**

१. १९४८ – श्री. गंगाराम सिंध नॅशनल सिंधी प्रायमरी स्कूल, ओ.टी. उल्हासनगर– ४.

२. १९४९ – श्री. गंगाराम सिंध नॅशनल हायस्कूल – ४, ज्युनिअर कॉलेज, ओ.टी. उल्हासनगर– ४.

३. १९५४ – श्रीमती किशनीबाई सीतलदास पुनवारी – जयहिंद ॲकॅडमी हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज – चोपडा कोर्टसमोर, उल्हासनगर – ३.

४. १९५४ – जयहिंद ॲकॅडमी सिंधी प्रायमरी स्कूल के. सी. हॉस्पिटलसमोर, उल्हासनगर – ३.

५. १९६४ – श्री. जशनमल किशनचंद श्रींगी इंग्रजी प्रायमरी स्कूल, के.सी. हॉस्पिटलसमोर, उल्हासनगर – ३.

६. १९६५ – श्रीमती चांदीबाई हिंमतलाल मनसुखानी कॉलेज उल्हासनगर रेल्वे स्टेशनसमोर, उल्हासनगर – ३.

७. १९७१ – प्रिन्सीपल के. एम. कूदनानी फार्मसी पॉलिटेक्निक, उल्हासनगर रेल्वे स्टेशनसमोर, उल्हासनगर – ३.

८. १९८५ – इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज, सी.एच.एम. कॅम्प्स, उल्हासनगर – ३.

९. १९८६ – श्री. गंगाराम सिंध नॅशनल इंग्लिश स्कूल, ओटी, उल्हासनगर – ४.[२९]

उल्हासनगर नगरपरिषदेच्या अंतर्गत शिक्षण मंडळाची स्थापना केली. सन १९७६ मध्ये जिल्हा परिषदेच्या २६ आणि इतर चार शाळा मिळून ३० शाळा उल्हासनगर शिक्षण मंडळाच्या स्वाधीन केल्या. तेव्हा शाळांची संख्या ३० आणि विद्यार्थी संख्या २८ हजार. शिक्षण पहिली ते सातवी पर्यंत. आजपण सातवीपर्यंत शिक्षण दिले जाते. बालवाडी आणि १०वीपर्यंत क्लास वाढविण्याचे प्रयत्न केले गेले पण विद्यार्थी संख्या कमी झाली. उल्हासनगरमध्ये प्रायमरी विद्यालय, माध्यमिक विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, कॉलेज, डिग्री कॉलेज आहे. [३०]

V. उल्हासनगरमधील महत्त्वाची महाविद्यालये –

सेवासदन आर. के. तलरेजा कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स, ठाणे येथे स्थापन झाले. सन१९६१ मध्ये उल्हासनगरातील मुलींचे कॉलेज होय. त्याचे पुढे नव्याने नामकरण आ.के.तलरेजा सन१९६७ मध्ये करण्यात आले. रामचंद किंमतमल तलरेजा हे संपूर्ण नाव असलेल्या कॉलेजचे मुख्य उद्देश समग्र शिक्षण देण्यासाठी नियमित शैक्षणिक कार्यक्रमा व्यतिरिक्त व्यक्तीमत्व विकास, नैतिक विकासाला प्राधान्य दिले जाते. सेठ परसराम परुमल यांनी विभाजन वेळी पाकिस्तानात सिंधी स्थलांतरीत झाले, तेव्हा त्यांच्या शिक्षणासाठी सेवासदन संस्था स्थापन केली.

VI. सेवा सदन विश्वस्त संस्था (Seva Sadan Trust) –

१९४७ साली भारताचे विभाजन झाल्यावर श्री. परसराम पारुमल हे स्थलांतर करून सिंध पाकिस्तानातून भारतात आले. आणि मुंबईतील वडाळा येथे राहू लागले. त्यांना तीन मुले होती. ते साखरेचे व्यापारी होते. त्यांचा साखर कारखाना उत्तर प्रदेशमध्ये होता. त्यांना 'साखरेचा राजा' असे म्हटले जाते

परसराम हे अतिशय साधी राहणीमान आणि उच्च विचारांचे होते. त्यांनी धर्मादाय संस्था उभारून अनेक उपक्रम अंमलात आणले ते खऱ्या अर्थाने समाजसेवक होते. त्यांनी 'सेवासदन संस्था' स्थापन केली. जे सिंधी निर्वासित म्हणून भारतात येऊन राहिले त्यांच्या भविष्यासाठी शिवणकाम वर्ग सुरू केले. 'नारी शाळा' ह्या माध्यमातून वडाळा या ठिकाणी त्यामुळे त्यांच्या कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या हातभार लावला.

कै. श्री. परसराम पारुमल यांनी महत्त्वाकांक्षी योजना राबविली. म्हणजे शिक्षण जे सिंध पाकिस्तानातून भारतात आले. प्रथमतः त्यांचे ध्येय होते. उच्च शिक्षण ह्या उद्देशाने त्यांनी 'न्यू ईरा हायस्कूल' १९५० मध्ये प्रस्थापिले. श्री. मेघराज मनशरमानी हे पहिले शाळेचे मुख्याध्यापक, ज्यांनी वर्ग लष्करातील बॅरेक आणि लाकडाच्या केबिनमध्ये भरविले. नंतर भारत सरकारकडून तो प्लॉट खरेदी केला जो आता 'न्यू ईरा शाळेची' इमारत बांधण्यात आली. त्याचा पाया जनरल जे. के. भोसले ह्या पुनर्वसन मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. इ.स.

१९५७ मध्ये ह्या शाळेचा पहिला दहावीचा विद्यार्थी मार्च १९५८ मध्ये उत्तीर्ण झाला. श्री. जगतराय रीजसिंघानी हे शाळेच्या नवीन इमारतीचे पहिले मुख्याध्यापक होते.

'न्यू ईरा स्कूल' ही उल्हासनगरमधींल पहिली R.C.C. (Reinforced Cement Concrete होती . इमारतीच्या खोल्या उंच आणि खेळती हवा अशी होती. उल्हासनगरमधील ही एकमेव शाळा होती की, तिला नाटक हॉल होते. जे उच्चतम अशा आवाजप्रणालीसह सज्ज होते. उदा. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि लग्नासाठी हॉल. त्यामुळे हा हॉल प्रसिध्द होता. बुकींग सहा ते आठ महिने आधी करावे लागत असे. परसराम पारुमल यांचे लग्नदेखील या शाळेत झाले म्हणून त्यांना ह्या शाळेविषयी प्रचंड प्रेम आणि ओढ होती. ही त्यांची दूरदृष्टी होती की, उल्हासनगरमधील नामांकित शाळा आणि ठाणे जिल्ह्यातील ती एक महत्त्वाची शाळा होय.

कै. बाबाजी हे शाळेचे बांधकाम चालू असताना प्रत्येक रविवारी डबा घेऊन रविवारी शाळेत राहिले व बांधकामाची प्रगती पाहिली. त्याकाळात अनेक व्यक्तींची अवस्था आर्थिकदृष्ट्या गरीब होती. ते महिन्याची शाळेची फी तीन रुपये ते नऊ रुपये अशी पाचवी ते दहावी पर्यंतची फी भरू शकत नव्हते .त्यांना आपल्या पगारातून ते मदत करींत असत. आणि त्यांच्या पाल्याला शिक्षणासाठी मदत करत असत. उद्या भविष्यात ते जबाबदार व चांगले नागरिक व्हावेत यादृष्टीने १९६०च्या मध्यान्ह वर्षात बाबाजींना असे जाणवले की, उल्हासनगरमध्ये एकही महाविद्यालय हे मुलींसाठी नाही. त्याची प्रवेशसंख्याही कमी. उल्हासनगरपासून बांद्रा ते चर्चगेट असा प्रवास त्यांना करावा लागत असे. त्यांनी मुलींच्या समस्या जाणून पहिले मुलींचे विद्यालय उल्हासनगरमध्ये स्थापन केले. न्यू ईरा स्कूलच्या दुसऱ्या मजल्यावर ते होते. न्यू ईरा कॉलेज हे उल्हासनगरमधील आर्ट्स कॉमर्सचे होते. आता हे कॉलेज रामचंद किंमतराम तलरेजा कॉलेज आहे. याचे मुख्य सहभागी ज्यांनी ह्या संस्थेला दान केले ते सेठ जमनादास तलरेजा यांचे चूलत भाऊ श्री रामचंद तलरेजा. श्री. जमनादास तलरेजा हे व्यावसायिक संस्थेशी कै. परसराम पारुमल यांच्याशी संबंधित होते. त्यामुळे कॉलेज हे आज रामचंद किंमतराम तलरेजा म्हणून ओळखले जाते.

अशा प्रकारे त्यांच्या कृतीतून, शब्दांतून, स्वप्नांतून शैक्षणिक कार्य साकारले. उच्च शिक्षण हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांचे हे कार्य आपल्यासाठी उच्च प्रेरणादायी तत्त्व आहे. [३१]

श्रीमती चांदीबाई हिंमतलाल मनसुखानी कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स, कॉमर्स आणि व्यवस्थापन, जनसंपर्क, माहिती तंत्रज्ञान हे मुंबई विद्यापीठातील महत्त्वाचे कॉलेज आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारताचे विभाजन झाले त्या वेळी पाकिस्तानातील सिंध प्रांतातून के. एम. कुदनानी मुंबईमध्ये आले. ते सिंधशी जवळ होते. त्यांनी चौदा शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. ह्या कॉलेजचा पाया १ जानेवारी, १९६४ रोजी प्रिन्सिपल के. एम. कुदनानी सेक्रेटरी H.S.N.C. बोर्ड (Hyderabad Sind National Collegiate Board) बॅरिस्टर होतचंदजी अडवानी राष्ट्राध्यक्ष बोर्डचे कै. श्री. गंगाराम हिंमतलाल मनसुखानी होते. इ.स. १९६५ मध्ये कॉलेज स्थापन झाले त्या वेळेस २५० विद्यार्थी होते. चार प्रमुख विभाग होते. आता हे मुंबई विद्यापीठातील कॉलेजमधील एक महत्त्वाचे कॉलेज आहे. [३२]

VII. परसराम मंसद यांचे उल्हासनगरमधील शैक्षणिक कार्य –

परसराम मंसद यांचा जन्म सन १८९८ मध्ये पाकिस्तान मधील सक्कर शहरात झाला. सन १९४७ मध्ये विभाजन झाल्यानंतर उल्हासनगरमध्ये येऊन राहिले. सिंध (पाक) मध्ये असल्यापासून समाजसेवेचे कार्य करींत होते. सिंधमध्ये शास्त्री हिंदी विद्यालय, हिंदी शाळा सुरु केली. उल्हासनगरमध्ये एस.सी. बॅरेक मध्ये येऊन राहिले. श्री. परसराम मंसदसाहेब आणि रायसाहेब सितलदार खेमानी दोघांनी सिंधी एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन १९४८–४९ मध्ये पहिली शाळा बी.जी. तिलक नावाने सुरू केली. जिथे नववीपर्यंत शिक्षण होते. त्यानंतर नेताजी शाळा सुरू केली. जिथे अकरावीपर्यंत शिक्षण होते. विद्यार्थ्यांना कुठेहीं जाण्याची गरज नव्हती. हळूहळू एक–एक कॅम्प एक–एक शाळा सुरू झाल्या. तसेच मुलींसाठी कॅम्प क्र. २ मध्ये दि. २२ डिसेंबर १९७७ रोजीं झुलेलाल मंदिराजवळ गर्ल्स स्कूल सुरू केले. प़रसराम मंसद स्वर्गवासी झाले. त्यांच्या समाजकार्यामुळे, शिक्षणक्षेत्रातील योगदानामुळे 'परसराम मंसद रोड' असे उल्हासनगरमधील मार्गाचे नामकरण करण्यात आले.[३३]

अशा प्रकारे शिक्षणाला अतिशय महत्व सिंधी समाजाने दिले. काही नर्सरी शाळा बॅरेकमध्ये प्रथम भरवण्यात आल्या. नंतर प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सहा वर्षात ३२ आणि १३ माध्यमिक शाळा कॅम्पमध्ये भरविण्यात आल्या. [३४]

उल्हासनगर उपनगरात शिक्षण व्यवस्थेत झपाट्याने स्कूल, कॉलेजेसची संख्या वाढत आहे. १९४७ नंतर ते २००० पर्यंत व आजही अनेक शैक्षणिक संस्था खाजगी व सरकारी शाळा, कॉलेज महत्त्वाचे योगदान देतात. शिक्षणाचा पाया सर्व अर्थाने उल्हासनगरात मजबूत झालेला दिसून येतो. व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. जेणेकरून व्यक्ती स्वतःच्या स्वावलंबनाचे, जीवन चरितार्थाचे साधन उपलब्ध करू शकतो. आपण अभ्यासलेल्या शिक्षणातील तक्त्यावरूनदेखील आसपासच्या गावातील शिक्षणातील संख्येच्या उल्हासनगर ह्या उपनगरात स्त्री व पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण अधिक दिसून येते. आज शिक्षणातील सुविधांमध्ये १२९ प्राथमिक शाळा; ५६ माध्यमिक शाळा; ९ उच्च माध्यमिक शाळा; ३ महाविद्यालये व २ तांत्रिक विद्यालये ह्या सर्व शैक्षणिक शाळा महाविद्यालयांची संख्या उल्हासनगर महानगरपालिकेत येते.

महाविद्यालयात सिंधी हा विषय आवडीने घेऊन त्यामध्ये पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. आपली संस्कृती, परंपरा समजण्यासाठीची त्यांची महत्त्वाकांक्षा दिसून येते. शिक्षणव्यवस्थेत पूर्वीपेक्षा आधुनिक काळात काळानुसार बदल होत गेले. खाजगीकरण प्रचंड प्रमाणात वाढले. स्पर्धाही वाढल्या. त्यामुळे झालेला शिक्षण क्षेत्रातील बदल प्रखरतेने जाणवतो. बॅरिस्टर होतचंद आडवानी, प्राचार्य के. एम. कुदनानी, डॉ. एल.एच. हिरानंदानी यासारख्या सिंधी समाजातील सदस्यांनी मुंबई आणि उल्हासनगरमध्ये अनेक शिक्षणसंस्था स्थापन केल्या.

VIII. **सिंधी भाषा –**

सिंधी भाषा सिंध (पाकिस्तान), कच्छ (भारत) मध्ये बोलली जाते. २.५ करोड लोक ही भाषा बोलतात. ह्या भाषेचा परिवार हिंद–युरोपी, हिंद इरानी, हिंद आर्य, सिंधी असा आहे. लेखनप्रणाली ही नस्तालिक, देवनागरी, खुदाबादी अशी आहे. नस्तालिक (फारसी–अरबी), देवनागरी (संस्कृत, पाली, मराठी इ.) खुदाबादी (एक लिपी आहे. सिंधी भाषा लिहिण्यासाठी उपयोग होतो.) ह्या लिपीचा अविष्कार खुदाबंदचे निवासी सिंधी स्वर्णकार समुदायाच्या लोकांनी सन १५५० मध्ये केला. पाकिस्तान, भारतामध्ये जास्त उपयोग केला जातो. ही संधी भारतातील पश्चिम भागातील मुख्य रुप गुजरात आणि पाकिस्तानातील सिंध प्रांतात बोलली

जाणारी एक प्रमुख भाषा आहे. ह्या भाषेचा संबंध आर्य भाषेतील परिवाराबरोबर म्हणजे संस्कृत, हिंदी, पंजाबी आणि गुजराती ह्या भाषांचा समावेश होय. अनेक मान्यवर विद्वानांच्या मतानुसार आधुनिक भारतीय भाषांमध्ये सिंधी भाषेच्या जवळ संस्कृत भाषा आहे. सिंधीचे जवळजवळ ७० प्रतिशब्द संस्कृतपासून आहेत.

सिंधी भाषा सिंध प्रदेशातील आधुनिक भारतीय आर्य भाषा प्राकृत आणि व्राचड नावाशी अपभ्रंश सोबत जोडविली जाते. सिंधी पश्चिमेकडे बलोची, उत्तरेत लहॅदी, पूर्वमध्ये मारवाडी आणि दक्षिणेत गुजराती या विभागात बोलली जाते. इस्लाम शासनकाळात सिंध आणि मुलतान (लहॅदी भाषा) एक प्रांत होता आणि १८४३ ते १९३६ पर्यंत सिंध बॉम्बेचा एक प्रांत असल्यामुळे गुजराती ह्या भाषेशी विशेष संपर्क राहिला. [३५] भारतीय जनगणना १९६१ नुसार सिंधी भाषिक नागरी क्षेत्रात अधिक (१८.८७%) आहेत. ग्रामीण क्षेत्रात ते फारच थोडे (०.०२%) आहेत. पाकिस्तानातून आलेल्या निर्वासित सिंधी भाषिकांची सन १९५१ मध्ये एकूण भाषिकात भर पडली. १९५१ पेक्षा १९६१ मध्ये त्यांच्या प्रमाणात थोडीशी घट झाली. कारण उल्हासनगर येथील निर्वासित वसाहतीतून काही सिंधी बृहन्मुंबई व इतर जिल्ह्यांमध्ये स्थायिक झाले आहेत.[३६]

पाकिस्तानमध्ये सिंधी भाषा नस्तालिक (अरबी लिपी) मध्ये लिहिली जाते. परंतु भारतात देवनागरी आणि अरबी लिपीचा उपयोग केला जातो.

I. सिंधी भाषेच्या उपभाषा –

सिंधचे तीन भौगोलिक भाग मानले जातात. शिरो भाग (वरील), विचोली (मध्य), आणि लाड (खालील) भाग. शिरो भागातील बोलीला 'सिराईकी' म्हटले जाते. उत्तर सिंधमध्ये खैरपूर, दादू, लाडकावा, जेक्बाबाद ह्या जिल्ह्यांमध्ये बोलली जाते. ह्या ठिकाणी बलोच आणि जाट जातीचे लोक अधिक आहेत. दक्षिणेत हैदराबाद आणि कराची जिल्हा लाडी ह्या दोन्ही क्षेत्रात मध्यभागी विचोली ज्याचे क्षेत्र मीरपूर त्याच्या आजूबाजूचा भाग विचोली ही सिंध प्रांतातील सामान्य आणि साहित्यिक भाषा आहे. सिंधच्या बाहेर पूर्व सीमेच्या आसपास थडेली दक्षिणी सीमेवर कच्छी आणि पश्चिमी सीमेवर लासी नावाची मिश्र भाषा आहे. धडेली (धर–थल–मरूभूमी) जिल्हा नवाबशाह आणि जोधपूर सीमेपर्यंत व्यापलेला आहे. ज्यामध्ये मारवाडी

आणि सिंधीचे मिश्रण आहे. कच्छी (कच्छ–काठियावाड) गुजराती आणि सिंधी लासी (लासबेला,बलुचिस्तान) दक्षिणमध्ये बलुचिस्तान सिंधींचे संमिश्रीत रुप आहे. भारताचे विभाजन झाल्यावर ह्या सर्व बोलीचे क्षेत्र सिंधींचे वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याने संधी भाषेचे प्राधान्य वाढले. सिंधी भाषेचे क्षेत्र ६५ हजार वर्ग मैल आहे. [३७]

II. सिंधी भाषेतील लेखन (लिपी) –

सुरुवातीला सिंधी लिहिण्यासाठी चार लिपी प्रचलित होत्या. हिंदू पुरुष देवनागरी, हिंदु स्त्री गुरुमुखी व्यापारी लोक, (हिंदू मुसलमान दोन्ही) हटवाणी (ज्याला सिंधी लिपी म्हणतात) मुसलमान आणि सरकारी कर्मचारी अरबी, फारसी लिपीचा प्रयोग करीत असत. सन १८५३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या निर्णयानुसार लिपीच्या स्थिरीकरणासाठी सिंधचे कमिशनर मिनिस्टर एलिस यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. ह्या समितीने अरबी–फारसी–उर्दू लिपीच्या आधारे अरबी–सिंधी लिपी तयार केली.

III. सिंधी भाषेचा इतिहास –

सिंधी ही एक अशी भाषा आहे की, जिचा दोन लिपींमध्ये वापर संविधानाने मान्य केला आहे. भारत सरकारने १० एप्रिल १९६७ मध्ये सिंधी भाषा संविधानात्मकरीत्या मान्य केली. त्याबरोबर दोन लिपी अरबी–फारसी किंवा देवनागरी लिपी मंजूर केली.

सन १९४७ मध्ये भारताचे विभाजन झाल्यावर सिंधचे हिंदू सिंधी भारतातील अनेक राज्यांमध्ये येऊन स्थायिक झाले. डिसेंबर १९४२ मध्ये मुंबईमध्ये एक सिंधी साहित्य संमेलन झाले तेव्हा सिंधी भाषा देवनागरी लिपीमध्ये लिहिली गेली पाहिजे, हा प्रस्ताव सिंधीचे सुप्रसिध्द ग्रंथकार लालचंद अमरडिनो मल यांनी ठेवला. त्याबरोबर पूर्व केंद्रीय मंत्री दादा जैयरामदास दौलतराम आणि अन्य कॉंग्रेस सिंधी स्वतंत्रता सेनानी यांनी भारतातील वस्तुस्थिती हिंदी देवनागरी लिपी यासाठी मागणी केली. अलवर मध्ये अखिल भारत सिंधी बोली साहित्य सभेत विद्वान पत्रकार कलाकारांनी अरबी लिपीचा प्रस्ताव ठेवला, ज्यामध्ये गोविंद माल्ही पोपटी हिरानंदानी प्रो. मंघाराम मलकानी आणि इतर भाषा पंडित व शिक्षाशास्त्री होते.

देवनागरी –

भारतात अरबी सोडून देवनागरी लिपीचा उपयोग केला जातो. देवनागरी लिपी जी हिंदीसारखी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते. सन १९४८ मध्ये भारत सरकारद्वारे ही भाषा आणली गेली.

अरबी फारसी लिपी –

सिंधी लिहिण्यासाठी अरबी–फारसी लिपीमध्ये ५२ अक्षरे असतात. यामध्ये अरबी वर्णमाला आणि काही फारशी वर्णमाला आणि काही नवीन १८ अक्षरे नवीन आहेत. स्वराची मात्र अनिवार्य नसल्यामुळे एका शब्दाचे अनेक उच्चार होतात.[३८] सिंधी भाषेतील पहिली व्याकरणाची पुस्तके व शब्दकोश मात्र देवनागरी लिपीत होते. याविषयी 'सिंधी व्याकरण' या आपल्या ग्रंथात कॅप्टन जॉन स्टॅक म्हणतात की, सिंधीच्या मूळ स्वभावाशी देवनागरी लिपीच अधिक मिळतीजुळती आहे. म्हणून कॅप्टन स्टॅक यांनी इंग्लिश.–सिंधी शब्दकोश (१८४९) व सिंधी–इंग्लिश शब्दकोश (१८५५) या आपल्या ग्रंथात देवनागरी लिपीचा वापर केला.[३९]

IV. सिंधी भाषेची ठळक वैशिष्ट्ये–

सिंधीचा शब्दसंग्रह निरनिराळ्या स्त्रोतातून आलेला आहे. सिंधीमधील ७०% शब्द संस्कृत प्राकृत मधून द्रविडी भाषेतील शब्दही सिंधीत सापडतात. नेहमीच्या संपर्कामुळे अरबी–फारसी शब्दांनीही सिंधीत भर घातलेली आहे. कोणतीही भाषा ती बोलणाऱ्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी शब्द घडवित असते. 'उंट' या शब्दासाठी सिंधीत पंधरा शब्द आहेत. कोणत्याही भारतीय भाषेत एवढे शब्द सापडणार नाहीत. शरीर अवयव, विविध प्राणी व वनस्पती यांचे वर्णन करण्यासाठी सिंधीत विपूल शब्द आहेत. किंबहुना व्याकरणाच्या दृष्टीने मराठीशी साधर्म्य साधणारी सिंधीच एकमेव भाषा आहे असे वाटते. उदा. 'ण' कारांत क्रियापदे मराठीप्रमाणे सिंधीतच सापडतात. (उदा. खाणे – खाणु, पिणे – पिअणु, उठणे – उथणु, करणे–करणु इ.) महत्त्वाचे म्हणजे 'आहे' हे क्रियापद फक्त मराठी आणि सिंधीतच वापरले जाते. जगातल्या इतर कोणत्याही आधुनिक भाषेत नाही. उदा. माझे नाव राम आहे. – मुंहिंजो

नांउ राम आहे. त्याचप्रमाणे मराठी सर्वनामे ही सिंधी सर्वनामांशी जवळीक साधणारी आहेत. उदा. हा, ही, हे या मराठी सर्वनामांना सिंधी पर्याय असे आहेत. हीऊ, हीअ

हीउ – (उदा. हे पुस्तक आहे – हीउ पुस्तक आहे. हा घोडा आहे – हीउ ही घोडी आहे. ही नदी आहे – हीअ नदी आहे.)

सिंधी आणि मराठीमध्ये विलक्षण साम्य आहे. सिंधीतील किमान ५000 शब्द मराठीशी साधर्म्य दर्शविणारी आहेत.

* **इतर काही ठळक वैशिष्ट्ये –**

A. प्राकृताप्रमाणे सिंधीचे सगळे शब्द स्वरान्त असतात.

B. अकारान्त, इकारान्त व उकारान्त शब्दांच्या शेवटच्या अक्षरांचा उच्चार पूर्ण होतो. उदा. 'खट' (खाट), मध्ये 'ट'चा उच्चार केला जातो. 'सत' (सात), 'अठ' (आठ), 'रामु' (राम) इ. शब्द असेच आहेत.

C. अकारान्त नामे बहुधा स्त्रीलिंगी असतात. उदा. नथ (नथ), लहिर (लहर), जिभ (जीभ), लीक (रेषा), संदूक (पेटी), खट (खाट)

D. ओकारान्त नामे पुल्लिंगी असतात.उदा. घोडो (घोडा), कुतो (कुत्रा), काको (काका), मामो (मामा), महीनो (महिना), डाडो (आजोबा)

E. आकारान्त आणि ऱ्हस्व–दीर्घ इकारान्त नामे बहुधा स्त्रीलिंगी असतात.उदा. माया (माया), छाया (छाया), जोइ (जाया, बायको), माई (बाई)

F. ऱ्हस्व–दीर्घ उकारान्त नामे बहुधा पुल्लिंगी असतात. उदा. ग्रंथु (ग्रंथ), घरु (घर), सिजु (सूर्य), रामू (राम), चंद्रु (चंद्र), रंगु (रंग), माव्हू (माणूस)

G. हिंदीप्रमाणे सिंधी भाषेत लिंगे दोनच आहेत – पुल्लिंग व स्त्रीलिंग

H. सिंधीत वचनेही दोनच आहेत – एकवचन, बहुवचन

I. 'त्र' आणि 'ड' ह्या वर्णाचा वापर सिंधीत आजही विपूल प्रमाणात होतो. उदा. अत्रा (अजुन), वत्रणु (जाणे), जत्र (वरात), चडो (चांगला), मुड (मुग), वाडणु (वांगे)

J. सिंधीमध्ये ग, ज, ड, ब यांचे नेहमीच्या ध्वनी व्यतिरिक्त निराळे ध्वनी आहेत. हे अंतःस्फोटक (Implosive), ध्वनी होत. ते त्या अक्षराखाली रेखा देऊन दर्शविले

जातात. ग, ज, ड, ब हे वर्ण फक्त सिंधी भाषेतच आहेत. जगातल्या दुसऱ्या कुठल्याही भाषेत सापडत नाहीत. ग, ज, ड, ब चा उच्चार करतेवेळी नेहमीप्रमाणे हवा बाहेर न सोडता आत घेतल्यास हे उच्चार सहजपणे होतात.

K. अकर्तृक क्रियापदे सिंधीशिवाय बहुधा दुसऱ्या कोणत्याही आधुनिक भारतीय भाषेत वा युरोपीय भाषेत नाहीत.

१) उदा. नदीअ में तरिजे थो. – नदीत पोहलं जातं.

२) पींघे में लुडिबो आहे. – झोपाळ्यात झोके खाल्ले जातात.

खरेतर अशा वाक्यांचे शब्दशः रुपांतर होऊ शकत नाहीत, हे रुप प्राचीन संस्कृतचे असून सिंधीत अजूनही कायम आहेत.

L. सर्वनामीय शेवट फक्त सिंधीत आणि काही प्रमाणात काश्मिरी भाषेत आहेत. काही वेळेला तर एकाच क्रियापदामध्ये दोन शेवट जोडून कर्ता किंवा कर्म यांचे अर्थ प्रकट केले जातात. असे शब्द जणू 'शॉर्ट हॅन्ड रायटिंग'चे कार्य साधणारे आहेत. हे सिंधीचे फार मोठे वैशिष्ट्य मानले पाहिजे.

उदा. मारायाईमि – त्याने मला दुसऱ्याकडून मारविले.

खारायाईमि – त्याने मला खाऊ घातले

सरहद्दीवर सिंध प्रांत असल्यामुळे नेहमीच आक्रमकांच्या पायाखाली गेला. आर्य, द्रविड, अतिप्राचीन आदिवासी, ग्रीक, अरब, इराणी, मोगल, पठाण व युरोपियन या सर्वांनी सिंधमधून प्रवास केलेला आहे. त्यांचा काही ना काही ठसा सिंधी संस्कृतीवर व भाषेवर आला.[४०]

V. सिंधी साहित्य –

सिंधी साहित्य गद्य आणि पद्य ह्या दोन्हीमध्ये आहे. सिंधी साहित्याची सुरुवात काव्य यापासून झाली. सिंधी कविता मुख्यतः सूफी फकिराची कविता आहे. ज्याचा सर्वात मोठा गुण आहे. सांप्रदायिकतापासून मुक्त होय. कोणत्याही प्रकारची कट्टरता त्यात नाही. काही कविता तर आपल्याला गोपी आणि परमात्मा याला 'कृष्ण' मानून आपली भावाभिव्यक्ती करतात. ते ईश्वराला पिता आणि मनुष्याला आपला भाऊ मानतात. पहिले दोहे आणि श्लोक लिहिले जात.

नंतर मात्र काव्यामध्ये सांप्रदायिकता दिसून येते. हिंदू मुस्लीम विचारधारा यांना समन्वित करणारी गोष्टी राहिली नाही.आता तर सिंध पाकिस्तानचा भाग बनला आहे.

प्रारंभी काळात सिंधींचे जुने दोहे अरबी फारसी इतिहास ग्रंथात पाहायला मिळतात. सिंधींची प्रथम कृती दोदे चनेसर मानली जाते. यामध्ये तत्कालीन सिंधींचे रीतिरिवाज, कबायली संगठन आणि आर्थिक, सामाजिक स्थितीचा अंदाज येतो. १८व्या शतकाच्या पूर्वाधाला सिंधी साहित्याचे सुवर्णयुग मानले जाते. ह्या दिवशी शाह इनायत, शाह लतीफ, मखदूम मुहम्मद जमान मखदूरा, अब्दुल हसन, पीर मुहम्मद बका यासारखे मोठे कवी होऊन गेले.

ब्रिटिश कालखंडात (१८४३–१९४७) सिंधी काव्य लिहिले तर गेले पण त्याचा स्तर फारसा उच्च नव्हता. काव्यात स्वच्छंदता होती. विषयात विविधता होती. पश्चिमी देशांचा प्रभाव वाढला होता. पश्चिमी साहित्याचा प्रभाव होऊन त्यामध्ये लिखाण करणाऱ्यांमध्ये डेवनदास, दयाराम, गिडुमल, नारायण श्याम, मंघाराम मलकाणी ही नावे उल्लेखनीय आहेत. करुण रस 'आँसुओंका बादशहा' गुलाम शहा यांना म्हटले जात असे. हैदरबख्श जतोई यांच्या कवितेमध्ये देशभक्ती दिसून येते.

गद्य नाटक –

सन १९०२ पर्यंत एकही नाटक उपलब्ध नाही. शेक्सपिअरच्या नाटकाचे अनुवाद किंवा रामायण व महाभारतातील काही घटनेवर आधारित नाटक दिसत आहे. शाह (लतीफ) यांच्या कवितेच्या आधारावर लालचंद अमरडिनमूल यांनी लिहिले 'उम्र मारुई' हे सर्वात प्रसिध्द नाटक आणि राम पंजवाणी याचे 'मूमल राणो' अभिनय नाट्क होय. मंघाराम मलकानी यांनी अनेक सामाजिक नाटके आणि एकांकिका लिहिल्या. ते निबंधकार व कवी होते.

गद्य साहित्य हे अनुवादित आहे. मिर्जा कलीच बेग आणि कौडोमत चंदनमल गद्यामध्ये लिखाण करणारे मानले जातात. मिर्जा यांनी २०० पुस्तके लिहिली. जीनत (१८९०) सिंधी जीवनाचे यथातथ्य चित्रण पहायला मिळते. प्रीतमदासकृत 'अजीब भेट'; आसानंदकृत 'शायर'; नारायण मंभाणी यांचे 'विधवा' उल्लेखनीय आहे. आधुनिक नाटककारांमध्ये

लुत्फउल्लाह कुरेशी, लालचंद अमरडिनूमल, नारायणदास मलकाणी, केवलराम सलामतराय अडवाणी आणि पसरराम की गिनती सिंधीमधील आधुनिक शैलीतील लेखनकार आहेत.

शाह अब्दुल लतिफ भटाई (१६८९–१७५२) –

सिंधीतील प्रसिध्द सूफी कवी ज्यांनी सिंधी भाषेला जागतिक स्तर प्राप्त करून दिला.

त्याचे 'शाह जो रसालो' सिंधी समुदायाची महत्त्वाची संकलन कृती होय. ते एक सूफी संत होते. संत कबीरसारखे शाह अब्दुल लतिफ प्रसिध्द होते.[४१]

उल्हासनगरमधील सिंधी समाज हा सिंध प्रांतातून होता. कवी शाह अब्दुल लतीफ सिंधविषयी म्हणतात की, एक अशी भाग्यशाली जमिन आहे की, मान्सुनचा पाऊस पडला नाही तरी सिंध ही स्वत:ची निर्मिती आहे. भौगोलिक विस्तार नदी सतत नियमिततेने जीवन देणारे पाणी पुरवते.[४२]

VI. सिंधी भाषा आणि संस्कृतीचे संवर्धन आवश्यक –

सिंधी भाषेचा प्रचार आणि लोकप्रिय बनविण्यासाठी तरुण पिढीने सहभागी झाले पाहिजे. त्यांना अध्ययन करण्यासाठी आकर्षित आणि प्रोत्साहित केले पाहिजे. ज्यामुळे सिंधी समाजाचे समृध्द साहित्य, इतिहास संस्कृती समजण्यास मदत होईल.[४३]

२६ मे, १९९४ रोजी 'राष्ट्रीय सिंधी भाषा संवर्धन परिषदे'ची स्थापना करण्यात आली. या परिषदेचे मुख्यालय दिल्लीत आहे. परिषदेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत – सिंधी भाषेला वाढविणे. या भाषेचा विकास, प्रचार व प्रसार करणे. सिंधी भाषेशी संबंधित शिक्षणातील समस्या शोधणे तसेच तांत्रिक पारिभाषिक ज्ञान आधुनिक संदर्भातील विकसित विचार सिंधी भाषेत उपलब्ध करून देणे.[४४]

दादा वासवानी यांची सिंधी भाषेविषयी संकल्पना –

भाषेतून इच्छा व्यक्त करणे ही आपली ओळख. भाषा हे आपल्या समाजाचे मूळ. भाषा हा आपला आत्मा आहे. आत्मा हरवला तर समुदाय किती काळ टिकून राहील ?

भारतामध्ये सिंधी –

भारतामध्ये आकाशवाणी आणि दूरदर्शनवर सिंधी कार्यक्रम होत असतात. जुन्या पिढीतील सिंधी माणसे रोजच्या व्यवहारात सिंधी भाषेचा आवर्जुन वापर करतात. आधुनिक युवा पिढी यांना सिंधी समजते पण अनेकांना ती बोलता, लिहिता येत नाही. उल्हासनगरमध्ये सिंधी समुदाय अधिक असला तरी नवीन येणारी पिढी भाषेविषयी उदासीन दिसते.

वर्तमानकाळात भारतामध्ये अधिक राज्यांमध्ये सिंधी माध्यमातील शाळा बंद होत आहेत. शाळा, महाविद्यालये या ठिकाणी सिंधी हा एक विषयाच्या रुपात शिकविला जातो. येणारी सिंधी पिढी ही आपल्या सिंधी भाषेपासून दूर होत चालली आहे. सिंधी लिपीचा व्यवहारातील उपयोग कमी होत आहे. त्यामुळे तिचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

ड. विवाहप्रथा पध्दती –

विवाह केल्याशिवाय मनुष्याला मोक्ष मिळत नाही, ही समजूत सर्वत्र प्रचलित असल्यामुळे बहुधा कोणी सिंधी अविवाहित राहत नाही. एखादा मनुष्य तसाच मरण पावला तर प्रेतयात्रेच्या वेळी त्याचा विवाह करतात. सिंधी लोकांच्या सर्व जातीमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त असल्यामुळे पूर्वी बऱ्याच पुरुषांना अविवाहित रहावे लागत होते. ब्राह्मण जातीत तर ही परिस्थिती फारच बिकट असल्यामुळे त्यांच्यात अदलाबदलीच्या विवाहाची प्रथा प्रचलित होती. इतर जातीच्या मुलीशी विवाह करीत.

पूर्वी या लोकांमध्ये बालविवाह रुढ होता. पण शारदा कायदा झाल्यानंतर त्याचे प्रमाण अगदी कमी झाले आहे. आता मुलगी वयात आल्यानंतरच तिचे लग्न केले जाते. सगोत्र व समदेवक असलेल्या कुटुंबांचा विवाह संबंध होत नाही. वाङ्निश्चय हा विवाह समारंभाचा पहिला भाग होय. मुला–मुलीचे आई–वडील विवाह संबंध जुळवतात.[४५]

सिंधी लोक हे मुळात सिंधी हिंदू सनातनी आहेत. हिंदू संस्कार काटेकोरपणे अनुसरतात. सिंधी लग्न हिंदूचे वैदिक संस्कारानुसार आयोजित केले जाते. सिंधी लग्न हिंदू आणि सूफी पंथ याचे एक मिश्रण परावर्तित. एखादा चांगला दिवस म्हणजे शुभ चांदसी किंवा सत्यनारायण असे पाहुन केला जातो. सिंधी लग्नाच्या पूर्वी व लग्नपध्दतीच्या वेळेस अनेक विधी केले जातात. [४६]

विवाहाची तयारी खरेदी, नातेवाइकांना आमंत्रण देणे, दररोजच्या मनोरंजनाची तयारी ही लग्नाच्या आधीच काही महिने सुरू होते. तसेच ढोलवादक, शहनाई वाजविणारे यांना त्यावेळेस मागणी असते. लग्न असणाऱ्या व्यक्तीच्या निवासस्थानाबाहेर लग्नाच्या आधी त्याच्या वादनाला तीन, चार दिवस आधी सुरूवात होते. त्यांनी केलेल्या त्याच्या कामाची प्रशंसा होऊन त्यांना त्याचे बक्षीसही दिले जाते.

A. **लग्नपूर्व सिंधी विधी** (Pre-Wedding Sindhi Rituals)–

१. **जान्या** (Janya) –

'जान्या' – ह्यामध्ये फक्त वराचा समावेश असतो. एक महत्त्वपूर्ण विधी आहे. हिंदूधर्मामध्ये याला अधिकृत असे महत्त्व आहे. एक पवित्र पिवळा धागा वराला बांधला जातो. जो त्याच्या आरोग्य, संपत्ती व समृध्दीसाठी असतो. एक गुरुमंत्र पुरोहित वराच्या कानात सांगतो. हा विधी मुलाच्या लग्नाच्या आधीही केला जातो.

२. **कच्ची मिशरी** (Kachhi Misri) –

कच्ची मिशरी ह्या शब्दाचा शब्दशः अर्थ कच्च्या वाङ्निश्चयाचे हे एक पहिले अनौपचारिक पाऊल आहे. ह्यावेळेस एक छोटी पूजा आणि विनिमय आयोजित केले जाते. (मिठाई, नारळ व फळे कधी रुपये किंवा दागिने) एकमेकांच्या कुटुंबांना ही एक प्रतीकात्मक स्वीकृती असते. सामान्यपणे शगून (Shagun) म्हणजे पाच वेगळ्या प्रकारची फळे आणि रुपये वधू आणि वरासाठी प्रसाद म्हणून, शिरा गोड शिजवलेला पदार्थ दिला जातो. दोघेही एकमेकांना मिशरी Misri (Rock Sugar) देतात. लग्न संमतीचे ते प्रतीक होय. वाङ्निश्चय निश्चित होतो. परंपरेने अंगठी घालतात. बहुतांश कुटुंबात ह्या समारंभानंतर सार्वजनिकरीत्या घोषणा केली जाते.

३. **पक्की मिशरी** (Pakki Misri) –

हा एक औपचारिक साखरपुड्याचा विधी आहे. ह्यावेळेस दोघांना पुरोहितांच्या उपस्थितीत अंगठी घालतात. गणेशपूजा केली जाते. वराकडील कुटुंब एका टोपलीत फळे, कपडे, सौंदर्यप्रसाधने, दागिने मुलगी सर्व आनंदाने हे समृध्दीपूर्वक स्वीकारते. मुलीचे कुटुंबदेखील

पाच किलो मिशरी एका मातीच्या भांड्यात आणतात. मुलाची आई ते उघडते. त्यानंतर सात विवाहित स्त्रिया लाल पावडरीने गणेशाचे प्रतीक काढतात आणि विनंती करतात. गणपतीला दोघांना आशीर्वाद देण्यासाठी संभाव्य पती–पत्नी एकमेकांना फुलाची वरमाला घालतात.

४. लाडा (Lada) **–**

'लाडा गाणे' हे उत्सवाचे विशेष प्रभावी आहे. ज्या वेळी समारंभात वराकडील कुटुंबातील स्त्रिया शेजारी त्या रात्री आनंदाने पारंपरिक लग्नामधील गाणी ढोलकीच्या तालावर गातात. संगीत गाणाऱ्या स्त्रियांना विशेषकरून बोलावले जाते. नृत्यदेखील सादर करतात. अशा प्रकारे सर्व वातावरण विविध प्रकारची गाणे गाऊन आनंदित होते. अनेक लोकगीतेदेखील 'लाडा गीतात' समाविष्ट आहेत. लाडा नृत्य विशेषकरून स्त्रिया करतात.

५. सान्त (Saanth) **–**

सिंधी लग्नाच्या एक दिवस अगोदर स्वतंत्रपणे वधू आणि वर यांच्या घरी हा समारंभ चालतो. हा समारंभ नवीन आशा आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त करण्यासाठी केला जातो.[४७] सात विवाहित स्त्रिया मुलीच्या डोक्यावर तेल लावतात. हे सर्व लग्नाच्या एक दिवस आधी होते.[४८]

६. मेहंदी (Mehandi) **–**

मेहंदीची रात्र हा एक आनंद दिवस साजरा केला जातो. स्त्रिया वधूच्या घरी एकत्र येऊन कौतुक करुन वधूला सुंदर बनवतात. व्यावसायिक कलाकार मेहंदीच्या दिवशी आमंत्रित केले जातात. वधूच्या हातावर क्लिष्ट व गुंतागुंतीचे डिझाईन हात आणि पायावर काढतात. गायन, वादन आणि नृत्याने वातावरण भरलेले असते. काही वधू रात्रभर गडद छाप हात आणि पायावर उमटवतात. कारण मेहंदी जितकी गडद होईल तितके प्रेम मजबूत, अशी यामागे भावना आहे.

७. संगीत समारंभ (Sangeet Party) **–**

मेहंदी रात्री नंतर संगीत समारंभ साजरा केला जातो. कधी–कधी मेहंदी आणि संगीत हे एकत्र मोठे कार्यक्रम केला जातो. व्यावसायिक मनोरंजन करणारे संगीत व नृत्यकार यांना अतिथीच्या मनोरंजनाकरिता बोलावले जाते. त्यादिवशी कॉकटेल आणि रात्रीचे जेवण असते.

८. सागरी (Saagri) **–**

हा एक समारंभ वधू आणि तिच्या नवीन कुटुंबाचे एकमेकांशी परिचय आणि मजबूत संबंध निर्माण व्हावे यासाठी वराची बहीण वधूच्या घरी येते. त्यांचे कुटुंब स्वागत करते. वधूला सौंदर्य प्रसाधने, पाच प्रकारची फळे, मिशरी, सुके खोबरे, मिठाई, साखरेची कँडी, सुवासिक अत्तर देतात. रात्री वर–वधूच्या घरी भेट देतो.

९. घरी पूजा (Ghari Pooja) **–**

घरी पूजा हा एक मोठा विधी वधू आणि वराच्या संबंधित सोयीनुसार आयोजित करण्यात येतो. पुरोहित घरी पूजेच्या दरम्यान प्रार्थना करतो. पुरोहिताबरोबर तांदूळ, नारळ, गहू, धान्य, तेल, सुपारी, काजू, मसाले असतात. विवाहित स्त्रिया गहू दळतात. ते प्रतीक आहे. समृध्दीचे नवीन घराचे[४९] पाणी भरलेले भांडे ह्या भोवती ही पूजा केली जाते.[५०]

१०. नवग्रह पूजा (Navgrahi Pooja) **–**

नवग्रह पूजा प्रथम वर घरात केली जाते आणि नंतर वधू घरी हिंदू देव, सूर्यमालेतील ग्रह यांचा नशिबावर प्रभाव म्हणून उपासना केली जाते.[५१] लग्नविधी शास्त्राचा नवग्रही पूजा कुलचिन्हाचा धार्मिक भाग म्हणून महत्त्वाचा आहे. त्या संदर्भात गणेशपूजा, ओंकार पूजा, लक्ष्मी पूजा, कैलास पूजा आणि नवग्रह पूजेपासून स्वर्गीय शरीरे मानवी नशिबावर प्रचंड प्रभाव पाडतात, असे मानले जाते. ह्या पूजा ग्रहाशी संबंधित देव ह्या दोहोंना विधी करून त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद द्यायला सांगितले जाते. विवाह विधी आधीच्या दिवशी सकाळी वर आणि वधू माता–पित्याचा काका, वधूचा भाऊ आवश्यक आहे.

११. **दिख** (Dikh) –

लग्नाआधी चार–पाच दिवस दिख हा विधी सुरू असतो. लोक अतिथींचे मनोरंजन करण्यासाठी नर्तक बोलवतात. प्रख्यात व्यावसायिक काही गायकांना आमंत्रित करतात.

B. **लग्नाच्या दिवशी सिंधी विधी** (Wedding Day Sindhi Rituals)–

१. **हळदी समारंभ** (Haldi Ceremony) –

हळदी समारंभ हा धार्मिक विधी जो वधू आणि वर ह्या दोघांचा समावेश असतो. तेल व हळद कुटुंबातील सदस्य वर–वधूच्या अंगाला, केसाला लावतात. शुध्दीकरणाचा हा एक धार्मिक विधी मानला जातो. हा समारंभ झाल्यानंतर दोघेही घर सोडून जाऊ शकत नाही.

एक लाल धागा वधू आणि वराच्या मनगटावर बांधतात. पालक आणि कुटुंबातील नातेवाईक ह्या समारंभात सहभागी होतात. तो एक पवित्र धागा त्या प्रसंगी शुभ मानला जातो.

२. **स्वागत** (Swagat) –

वधूच्या लग्नाचे कपडे यांचा एकत्रितपणे संचय केल्यानंतर वधूची बहीण इतर नातेवाईक स्त्रिया वराच्या घरी जातात. ते आपल्या घरात वधूचा एकूण साज झाल्यावर वधू बहीण वर आणि त्याच्या आईला चेहऱ्यावर सौंदर्यप्रसाधन लावते. वर डोक्यावर सोने किंवा चांदीचा मुकुंट आणि एक चाकू किंवा त्याच्या कमरेवर तलवार वापरतो.[५२]

स्वागत हे एक औपचारिक असते. वधूचे आई–वडील वराच्या कुटुंबातील व्यक्तीचे करतात. प्रामुख्याने पुरुष मंडळी स्वतः ओळख करतात. उदा. नवऱ्याकडील भाऊ हा वधूच्या भावाशी इ. वधूचे पुढील आयुष्य हे वराच्या म्हणजेच तिच्या पतीच्या घरी आहे. जेव्हा ती आपले पहिले पाऊल ठेवते, असा हा स्वागत कार्यक्रम होतो.

३. **वरात** (Barat) –

वर हा त्याच्या बरोबर इतर मोठ्या माणसांबरोबर (लवाजमा) घेऊन जातो. याला 'वरात' म्हणतात. इच्छित स्थळी पोहोचण्याआधी वराची आई देवाकडे प्रार्थना करते मग बाहेर जातात.

वर सहसा या प्रसंगी सजवलेल्या घोड्यावर प्रवास करतो. वर फेटा बांधून सेहरा बांधतो. त्याच्या बरोबर वाजंत्रीवाले, नृत्य मजा करत लग्नाला सुरुवात पुढे केली जाते.

४. **हाथीलो** (Hathialo) –

या समारंभात वधूच्या साडीचा कोपरा वराकडील गुलाबी दुपट्टा त्यांची गाठ बांधून त्यामध्ये एक सोन्याचे नाणे असते. दोघांच्या उजव्या हाताला बांधतात. (Moulin) पवित्र धागा त्यांच्या चिरकाल कराराचे ते प्रतीक असते. दोघेही देवाजवळ प्रार्थना करतात.

५. **पाय धुलाई** (Paon Dhulai) –

वधूचा भाऊ ह्या विधीमध्ये वधू आणि वराचे पाय धुतो. असे म्हटले जाते की, या क्षणी सामर्थ्य मोठे असते. सर्व प्रार्थना करून वर हा त्या दिवशी भगवान विष्णूचे मूर्त स्वरुप आहे. त्या दोघांच्या दरम्यान एक पडदा जेणेकरून ते एकमेकांना पाहू शकत नाहीत. त्याचे पाय कास्य धातूच्या थाळीमध्ये कच्च्या दुधाने धुतले जातात. [५३]

C. **सिंधी लग्न समारंभ** (The Sindhi Wedding Ceremony) –

१. **फेरा** (Phera) –

सिंधी लग्न हे मुख्यतः वैदिक परंपरेवर आधारित आहे. एक पवित्र आग (यज्ञ) या

सर्वप्रथम प्रार्थना केली जाते. मग गणेश प्रार्थना होते. हिंदू देवांना पुरोहित मंत्र म्हणून समृध्दी आणि शुभेच्छासाठी निमंत्रण देतात. पवित्र शास्त्रातील गणेश, (लक्ष्मीदेवी) संपत्तीची देवता आणि इतर ६४ देवांचे आशीर्वाद घेतात. यापुढील पध्दत म्हणजे वर आणि वधू पवित्र अग्नीभोवती फेरा घेऊन एकमेकांना वचन देतात. हिंदू लग्न विधीनुसार सात फेरे घेतात. चौथ्या फेऱ्याला वधू पुढे जाते. 'फेरा' हे सिंधी लग्नात मान्यता प्राप्त पध्दत आहे.

२. **कन्यादान** (Kanyadan) –

'कन्यादान' या समारंभात वडील वधूचा हात म्हणजे आपल्या मुलीचा हात पतीकडे देतात. वधूचे वडील पवित्र पाणी वराच्या हातावर सोडतात.

३. **सप्तपदी** (Saptapadi) –

हा सिंधी लग्नातील अंतिम विधी आहे. नवविवाहित दोघेही सात तांदळाच्या राशीवर उजवा पाय ठेवतात. यानंतर ते कुटुंबातील मोठ्या व्यक्तीच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घेतात.[५४]

D. **लग्नानंतर सिंधी विधी** (Post Wedding Sindhi Rituals) –

१. **विदाई** (Vidai) –

लग्न झाल्यानंतर वधूचा भाऊ वधूला वराकडे सोपवितो व वधूची काळजी घेण्यास सांगतो. आणि वरात वराच्या घरी जायला निघते. वधूचे वडील विदाईच्या वेळेस भेटवस्तू देतात. नवीन लग्न झालेले स्वतंत्रपणे येतात. ते घराच्या जवळ आले की, ढोल वाजवून त्यांचे आगमन जाहीर करतात. घरातील महिला त्यांना घरात घेऊन जातात.

२. **दातार** (Datar) –

'दातार' हा विधी सुरु होतो. तो म्हणजे वधूचे पहिले पाऊल नवीन घरात प्रवेश केल्यावर, घरातील सर्व कोपऱ्यांमध्ये दुधाचा शिडकावा करतात. नंतर नवीन वधू आणि पतीच्या हातात मीठ एक मूठभर देऊन घरातील सर्व भागातून जाऊन स्थगित न होता तिच्या हाती दिले जाते. हा विधी तीन वेळा याची पुनरावृत्ती होते. कुटुंबातील इतर सर्व सदस्य उपस्थित असतात.

३. **औपचारिक समारंभ** (Reception) –

मुलाकडील कुटुंब हा औपचारिक समारंभ हे संध्याकाळी लग्न झाल्यानंतर ठेवतात. काही कुटुंबे लग्नाच्या दिवशी औपचारिक समारंभ ठेवतात. परंपरेने ही छोटीसी एक भेट वधूचे वडील वराकडे येऊन देतात. नंतर दोघेही वधूच्या घरी भेट देतात.[५५]

४. **प्रसूतिप्रथा** (Birth) –

स्त्री गरोदर राहिली की तिचा अध्यात्मिक गुरु पाचव्या, सातव्या किंवा नवव्या महिन्यात तिला दोन गंडे (राखरी) देतो. ते गंडे लाल व पांढऱ्या धाग्याचे बनलेले असून त्यांना पाच व सात गाठी मारलेल्या असतात. एक गंडा सात गाठीचा, तिच्या कमरेला आणि दुसरा पाच गाठीचा गळ्यात बांधतात. मूल जन्मल्यानंतर त्याची आजी (वडिलांची आई) स्नान करून कणकेचे तेरा गोळे करते आणि त्यावर मुलाचा हात दाबून मग ते विहिरीत किंवा तळ्यात टाकते. मुलाला काही बाधा होऊ नये यासाठी घराच्या दाराला कांदा, आंब्याची किंवा कडुनिंबाची पाने बांधतात.

सहाव्या दिवशी षष्ठी देवीची पूजा होते. त्याच दिवशी मुलाचे नाव ठेवतात. यासाठी धार्मिक विधी व समारंभ करतात. सातव्या दिवशी मुलाला आंघोळ घालून नवे कपडे घालतात. एक ब्राह्मण गणेशपूजन व ग्रहपूजन करतो. मग आई–मुलासह घराबाहेर जाऊ शकते. चाळीसाव्या दिवशी गणेशपूजन वगैरे विधी करून मग बाळंतिणीला नेहमीप्रमाणे घरात वावरण्याची परवानगी देण्यात येते.

मुलगा तेरा महिन्याचा झाला की त्याचे जावळ करतात. वयाच्या पाचव्या ते बाराव्या वर्षी मुलाची मुंज करतात. [५६]

५. **सिंधी पोषाख** –

सिंधी पोशाख पाहिला तर पारंपरिक आणि आधुनिकता यामध्ये थोड्याबहुत प्रमाणात बदल झालेले आढळून येतात. पारंपरिक पोशाखात स्त्रिया प्रामुख्याने सलवार कमीज किंवा साडी परिधान करीत असत. पुरुषांच्या पोशाखात कुर्ता, पायजमा घालत असत. हा प्रामुख्याने सिंधी पारंपरिक पोशाख होय.

इ.स. १८४० मध्ये स्त्रिया लेहंगा, चोली आणि पुरुष लुंगी व सलवार घालत असत. ग्रामीण भागामध्ये पुरुष धोती कमरेखाली वर अंगरखा व विविध प्रकारच्या सिंधी टोपी परिधान करतात. पंजाबीसारखे पोशाख दोन्ही पुरुष आणि स्त्रिया सरळ रेषेत कापलेले सलवार कमीज स्थानिक आकृती व प्रिंट असलेले कपडे घालत असे. स्त्रिया दुपट्टा, ओढणी डोक्यावरून किंवा

खांद्यावरून घेत असे. मध्यमयुगीन काळात तरुणी चुडीदार, पायजमा यांसारखे पोशाख घालत असे.[५७]

ब्रिटिश सत्ता भारतात आल्यानंतर सर्वप्रथम आधुनिक बदल झालेले दिसतात. उच्चशिक्षित लोकांमध्ये हे बदल प्रामुख्याने आढळून आले जसे अमील वर्ग पुरुष वर्ग मोठा पायजमा पेहराव (Peheran) कोट आणि ट्राऊझर काळ्या रंगामध्ये असे. टोपी, इंग्लिश हॅट डोक्यावर असे. स्त्रियांच्या कपड्यात काही फारसा बदल आढळून येत नाही. साडी आणि ब्लाऊज असे.[५८]

सिंधींच्या उल्हासनगरातील पोशाखातदेखील फारसे काही बदल आढळून आलेले नाही. स्त्रिया सलवार, चुडीदार, घागरा, साडी असे पोशाख व आधुनिकतेनुसार बदल करून एम्ब्रॉयडरी दुपट्टा कारिगिरी करत असत. पुरुषांच्या पोशाखात ब्रिटिशांनंतर आलेले बदल आजतागायत सारखेच आहेत. उल्हासनगर गजानन मार्केट हे तर स्वतःच कपड्यांसाठी एक मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे खरेदीही मोठ्या प्रमाणावर स्थानिक भागात केली जाते. स्वतः स्त्रिया घरीच कशीदाकारी, ओढणी – दुपट्टा सजावटीचे कार्य करतात. सर्व प्रकारचे कपडे मार्केटमध्ये मिळतात. त्यात पंजाबी ड्रेस मटेरियल ते रेडिमेड कपडे, साडी, घागरा चोली हे स्थानिक ठिकाणी उपलब्ध होते.

पुरुष व्यक्तींच्या कपड्यांसाठीदेखील गजानन मार्केट मोठी बाजारपेठ आहे. शर्ट, पॅन्टपीस तसेच जीन्स पॅन्ट हे आधुनिक पोशाखही मोठ्या प्रमाणावर आहेत. पॅन्टवरदेखील कारिगिरी, रंगवणे असे प्रयोग केले जातात. उल्हासनगरमधील कॅम्प क्र. ५ तर जीन्स पॅन्ट बनविणे यासाठी प्रसिध्द आहे. तेथूनच हा माल इतर ठिकाणी विक्रीस जातो. त्यामुळे पोशाख हा फॅशनप्रमाणे काही अंशी बदललेला आढळतो.

– संदर्भ सूची –.

१. Vaswani Dada J. P., 'We the Sindhis', Published by Sleek Advertsing P. Ltd., June 2013, Isbn No. 978-81-927065-0-4, Page no. 33

२. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' २०१२ पुस्तक का पहिला भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र.१३, १४, १५, १६

३. Vaswani Dada J. P., 'We the Sindhis', उ. नि. पृष्ठ क्र.३३

४. Sindhishaan - Caste System - www.sindhishaan.com

५. Karunakarn T. K.,Ulhasnagar A Sociological Study in Urban Development, 1958 पृष्ठ क्र. ५५– ५६

६. तत्रैव – पृष्ठ क्र.४४

७. तत्रैव – पृष्ठ क्र. ४६, ४७, ४८, ५०, ५२, ५३, ५४

८. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ३३

९. Ulhasnagar - Wikipedia - https://en.m.wikipedia.org

१०. Sindhi Festival Receipes - googleweblight.com

११. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. १२८

१२. Sindhi Festival Receipes - googleweblight.com

१३. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. १३०

१४. तत्रैव – पृष्ठ क्र. १३६, १३९

१५. Hindi.sanjeevkapoor.com / hindi/cuisine/sindhi

१६. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. १५१

१७. तत्रैव –पृष्ठ क्र. १४६, १४८

१८. तत्रैव – पृष्ठ क्र. १६५, १६३

१९. Sindhi Cuisine - Wikipedia the free encyclopedia - https://en.m.wikipedia.org

२०. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. १६६, १३५, १५८

२१. Sindhi Cuisine - Wikipedia the free encyclopedia - https://en.m.wikipedia.org

२२. भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ ठाणे. संकलक महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई, पृष्ठ क्र. २९

२३. Karunakarn T. K., Ulhasnagar, उ. नि. पृष्ठ क्र. ५६, ५७, ५८, ५९, ६०

२४. भारतीय जनगणना १९६१, उ. नि. पृष्ठ क्र. २८२

२५. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' २०१२ पुस्तक का पहिला भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र.T

२६. उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभाग

२७. jhulelaltrustschoolandcollege.com

२८. उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभाग

२९. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' २०१३ पुस्तक का दुसरा भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. ८२

३०. तत्रैव – पृष्ठ क्र. ११८, ११९

३१. Seva Sadan Trust - googleweblight.com

३२. C.H.M. College Wikipedia - https://en.m.wikipedia.org

३३. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' २०१३ पुस्तक का दुसरा भाग, उ.नि.पृष्ठ क्र. ३९, ४०

३४. Historicity Research Journal, Volume-3, Issue - 4, December 2016 पृष्ठ क्र. ९,१०

३५. सिंधी भाषा विकीपीडिया - https:// hi.m.wikipedia.org

३६. भारतीय जनगणना १९६१, जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ ठाणे संकलक महाराष्ट्र जनगणना कार्यालय, मुंबई, पृष्ठ क्र. १९

३७. सिंधी भाषा विकीपीडिया - https:// hi.m.wikipedia.org

३८. सिंधी भाषा की लिपियाँ – https:// hi.m.wikipedia.org

३९. इर्दवाणी प्रा. लछमण 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक क्र. ३२९ एप्रिल ते जून २००९ प्रकाशक – डॉ. माधवी वैद्य, पृष्ठ क. १४

४०. तत्रैव पृष्ठ क्र. १४, १५, १६

४१. सिंधी भाषा का साहित्य – https:// hi.m.wikipedia.org

४२. Sorley, H. t. "Shah Abdul Latif of Bhit" Oxford University press London 1940, Page No. 109

४३. सिंधी भाषा एवं संस्कृतिक का संवर्धन आवश्यक परिचय – hindivivek.org

४४. राष्ट्रीय सिंधी भाषा संवर्धन परिषद – MHRD mhrd.gov.in

४५. जोशी पं. महादेवशास्त्री 'भारतीय संस्कृतीकोश' दहावा खंड, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, प्रकाशक – पं. महादेवशास्त्री जोशी प्रथमावृत्ती शके १९०१, एप्रिल १९७९, पृष्ठ क्र.३

४६. Sindhi wedding- sindhi wedding Rituals sindhi Marriage Traditions WWW. Cultural India.net

४७. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ८३, ८४

४८. Sindhi Wedding Rituals - All about Sindhis - https://sindhisbysurnames wordpress.com hindu sindhi wedding

४९. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ८२, ८३, ८४

५०. Hindu Sindhi Wedding - googleweblight.com

५१. Hindu Sindhi Wedding - googleweblight.com

५२. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ८५, ८६

५३. तत्रैव पृष्ठ क्र. ८६

५४. Hindu Sindhi Wedding - googleweblight.com

५५. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ८८

५६. जोशी पं. महादेव शास्त्री, उ. नि. पृष्ठ क्र. ३, ४

५७. Sindhi Dress - Wikipedia - https://en.m.wikipedia.org

५८. Ghurye Govind Sadashiv 'Indian Costume', Popular Prakashan, First 1957, 1961, 1995, Isbn - 81-7154-403-7 पृष्ठ क्र. १४३

प्रकरण – ५

धार्मिक जीवन

च) धर्मव्यवस्था –

सिंधमधील मूळ निवासी ज्याची भाषा सिंधी आहे त्यांना 'सिंधी' असे म्हटले जाते. हिंदू–आर्य प्रजाती आहेत. सन १९४७ मध्ये भारत आणि पाकिस्तान विभाजनाच्यावेळी सिंधमधील अधिक हिंदू आणि शीख सिंधमधून भारत आणि अन्य देशांमध्ये गेले. १९९८ च्या जनगणनेनुसार सिंध ६.५ हिंदू आहे. सिंधी संस्कृती वर सूफी सिध्दान्ताचा प्रभाव पडलेला दिसून येतो.[१]

सिंधमध्ये हिंदू व मुस्लीम लोकांच्या भक्तिपंथात सरमिसळ झालेली दिसते. हिंदू व मुस्लीम दोघेही अनेक साधुसंतांचे सामायिक भक्त होते. सूफी संतांच्या प्रभावामुळे सिंधी मुसलमानात संतांची पूजा सुरू झाली. सिंधी हिंदूंच्या प्रत्येक धार्मिक विधीच्या प्रारंभी गणेशपूजन केले जतो. गणेशचतुर्थी हा सण ही ते साजरा करतात. स्वस्तिक हे गणेशाचे प्रतीक मानले जाते. सूर्याची उपासनादेखील सिंधी लोकांमध्ये प्रचलित आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी हे लोक सूर्याची पूजा करतात.

शीख पंथाचे वेगळे रुप म्हणजे 'नानकशाही पंथ' होय. ह्यामध्ये हिंदू व शीख धर्माची सरमिसळ झालेली आहे. हे लोक जातीभेद मानत नाहीत. 'लोहाणा' जातीतील बहुतेक लोक हे 'नानकशाही पंथा'चे अनुयायी आहेत.

छ) सिंधी सण व उत्सव –

सिंधी हिंदू लोकांमध्ये काही सण व उत्सव पूर्वीपासून प्रचलित आहेत. त्यातील सण व उत्सव पुढीलप्रमाणे सांगता येतील.[२]

१. भगवान झुलेलाल यांचा जन्मोत्सव –

भारतामध्ये विभिन्न धर्म, समुदाय, जातींचा समावेश आहे. म्हणून अनेकतेमध्ये एकतेचे दर्शन घडते. सर्व धर्मांचे सण प्रमुख म्हणून साजरे केले जातात. दीपावली, ईद, ख्रिसमस आणि भगवान झुलेलाल जयंती.

सिंधी समुदाय हा उत्सव भगवान झुलेलालचा जन्मोत्सव 'चेटीचंड' स्वरुपात संपूर्ण देशामध्ये आनंदाने साजरा करतात. सिंधी समुदाय हा व्यापारी वर्ग असल्यामुळे व्यापारासाठी जेव्हा जलमार्गावरून प्रवास करावा लागतो तेव्हा त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. जसे समुद्री तुफान, जीवजंतू, पर्वत, समुद्री डाकू तर लूटमार करून व्यापाऱ्यांचा सर्व माल लुटतात. म्हणून त्यांच्या यात्रेच्या वेळी जाताना स्त्रिया वरूण देवतेची स्तुती करतात. निरनिराळ्या इच्छा व्यक्त करतात. भगवान झुलेलाल जलदेवता आहे आणि म्हणून हे सिंधी लोकांचे आराध्यदैवत मानले जाते. पुरुषवर्ग सकुशल घरी येतो तेव्हा 'चेटीचंड उत्सव' साजरा केला जातो.

आजही समुद्रकिनारी राहणारे जलदेवता भगवान झुलेलाल यांना मानतात. त्यांना अमरलाल व उडेरोलाला ही नावे दिली आहेत. भगवान झुलेलाल यांनी धर्माचे रक्षण करण्याकरिता खूप साहसी कार्ये केली आहेत म्हणून त्यांची मान्यता उत्तुंग शिखरावर पोहोचली आहे.

अखिल भारतीय सिंधी बोली आणि साहित्य यांनी ह्या दिवसाला 'सिंधीयत दिवस' घोषित केला. आजदेखील सिंधी घरांमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. तेव्हा 'आयोलाल झुलेलाल'या नावाने जयघोष केल्याने सर्व संकटे दूर होतात, दुःख दूर होतात.[३]

विभाजन झाल्यानंतर जेव्हा सिंधी समुदाय भारतात आला, त्या वेळी तो एकसंघ नव्हता. म्हणून सन १९५२ मध्ये प्रोफेसर राम पंजवानी यांनी सिंधींना एकजूट करण्याचा प्रयत्न केला आणि पुन्हा दुसऱ्यांदा भगवान झुलेलाल पर्व आनंदाने साजरा करण्यास सुरुवात झाली.

भगवान झुलेलाल यांना ज्या मंत्रांनी आवाहन केले जाते त्याला 'लाल साई जा पंजिडा' म्हणतात. वर्षामध्ये एक वेळ सतत चाळीस दिवस त्यांची पूजा केली जाते. त्यांना 'लाल साई

जो चाली हो' असे म्हणतात. त्यांना ज्योतिस्वरूप मानले जाते. म्हणून झुलेलाल मंदिरात अखंड ज्योती असते. ज्योत अखंड राहण्याची जबाबदारी पुजाऱ्याची असते. संपूर्ण सिंधी समुदाय या दिवशी आस्था, भक्ती–भावनेमध्ये तल्लीन होतो. [४]

- **संत झुलेलाल –**

सिंधी समाजाचा 'चेटीचंड' विक्रम संवत् पवित्र शुभारंभ दिवस आहे. विक्रम संवत् १००७ ते ९५१ ई. मध्ये सिंध प्रांतात नसरपूर नगरात रतनराय यांच्या घरी माता देवकीच्या घरी तेजस्वी बालक उदयचंद्रच्या रुपात अवतार घेऊन जन्मास आले. पापी लोकांचा नाश करून धर्माचे रक्षण केले. धार्मिक महत्त्वच नाही तर सिंधू सभ्यतेचे प्रतीक आहे. [५]

२. चालिया महोत्सव – सिंधींचे सर्वात मोठे पर्व – चाळीस दिवसीय अखंड ज्योति महोत्सव–

सिंधी समुदायाचे चाळीस दिवस अखंड ज्योती महोत्सव (चालियापर्व) या वेळेस सिंधी समाज चाळीस दिवस व्रत–उपवास करतात. पूजा–अर्चे बरोबर सकाळपासून संध्याकाळपर्यंत झुलेलाल कथेचे श्रवण करतात. ह्या महोत्सवात झुलेलाल मंदिराला विशेषकरून सजवतात. मंदिरामध्ये कथा, आरती, भजन, कीर्तनाबरोबर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

व्रताच्या प्रत्येक दिवशी महिला कणकेच्या गोळ्यापासून तयार केलेला दिवा घरातून आणून देवाची पूजा करतात. जीवन सुखी करण्यासाठी आणि लोककल्याणासाठी हे व्रत महोत्सव साजरा करतात.

भगवान झुलेलालच्या पर्वात जलदेवतेची आराधना केली जाते. हे सिंधी समुदायाचे सर्वात मोठे पर्व मानले जाते. भगवान झुलेलाल वरुणदेवतेचा अवतार घेऊन आपल्या भक्तांचे सर्व कष्ट दूर करतात. जे लोक चाळीस दिवस विधी–विधानानुसार पूजा–अर्चना करतात त्यांचे सर्व दुःख दूर होतात. सिंधी समुदायाचा सर्वात मोठा झुलेलाल 'महोत्सव' धर्मव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग मानला जातो.

सिंधी समाजाच्या अनुषंगाने भगवान झुलेलाल यांचा अवतार हा सिंधी धर्मासाठी झाला आहे.

पौराणिक कथेनुसार सिंधचा शासक 'मिरक' आपल्या प्रजेवर खूप अत्याचार करीत असे, ह्या शासकाच्या अत्याचारापासून मुक्ती मिळविण्यासाठी धार्मिक अनुष्ठान, जप, तप, व्रत–उपवास केले. मग ह्या प्रभावावरून एक विशालकाय मासा ज्यावर भगवान झुलेलाल प्रकट झाले. त्यांनी भक्तांना सांगितले की, ''मी चाळीस दिवसांनंतर सिंधमध्ये जन्म घेईन.''

भगवान झुलेलाल यांनी सांगितल्यानुसार चैत्र महिन्यात एका मुलाने जन्म घेतला, त्याचे नाव 'उदय' ठेवण्यात आले. त्याच्या चमत्कारावरून नंतर त्यांना 'झुलेलाल' या नावाने ओळखले जाऊ लागले.'चालिया' पर्वात या दिवशी विशेष करून मंदिरातील अखंड ज्योतीची पूजा–अर्चना केली जाते. तसेच प्रत्येक शुक्रवारी अभिषेक आणि आरती होते. भगवान झुलेलाल यांना भगवान विष्णू किंवा सूर्याच्या ज्योती स्वरूप अवतारात मानले आहे. म्हणून 'चालिया महोत्सवा'त झुलेलाल अखंड ज्योती स्वरूपात पूजन केले जाते. [६]

३. एरवण –

नदीदेवतेचे प्रतीक म्हणून एक घट पाण्याने भरून ठेवतात, तो बाहेरून शेणाने सारवतात आणि घटावर एक नारळ ठेवतात. घटाच्या भोवती सातू पेरतात. अष्टमीला पुजारी भवानी देवीसमोर नारळ फोडतो व खोबऱ्याचा प्रसाद सर्वांना वाटतो. त्यानंतर भोजन होते. मग पुजारी तो घट तळ्यात किंवा कालव्यात सोडतो. हा सण एकदा पूर ओसरण्यास प्रारंभ होतो तेव्हा व पुन्हा नववर्षदिनी करतात.

४. सतण –

'सतण' हा सण श्रावण शुध्द दशमीला सुरू करतात. त्यासाठी एका मातीच्या कुंडीत सात प्रकारची धान्ये पेरतात आणि त्यांना पाणी घालून कोंब आणतात. पौर्णिमेपर्यंत रोपे चांगली वाढली की त्यात एक मातीची 'बाहुली' ठेवतात. कुमारिका तिची पूजा करतात व रात्रभर जागतात. दुसऱ्या दिवशी बाहुली बाजूला काढून कुंडी तळ्यात सोडतात. मातीचे पाच कावळे करून ते आणि थोडा शिजवलेला भात त्या बाहुलीपुढे ठेवतात. सहाव्या दिवशी ब्राह्मण पुरोहित

एक मातीची होडी व चार मातीचे बैल तयार करतात. कुमारिका ह्या सर्व वस्तू एकत्र ठेवून त्यांची पूजा करतात. तिथे एक दिवा लावून ठेवतात व मिष्टान्नाचा नेवैद्य दाखवितात.

५. सेस –

ज्येष्ठ वद्य त्रयोदशीला हा सण असतो. हा सण नदी देवतेच्या सन्मानार्थ असतो. या वेळी नदीला खाद्यपदार्थ अर्पण केले जातात. रविवारी व अमावस्येला स्त्रिया तळ्याच्या किंवा कालव्याच्या काठी देवतेची पूजा करतात. पती व पुत्र यांना दीर्घायुष्य लाभावे म्हणून स्त्रिया नदी देवतेला विविध प्रकारचे गोड पदार्थ अर्पण करतात. [७]

६. सागरा (Sagra - Sacred Thread) **–**

सिंधी भाऊबंद प्रामुख्याने परदेशात राहतात. त्यासाठी त्यांच्या पत्नी आपल्या पतीच्या स्वास्थ्यासाठी चिंतेत असतात. म्हणून श्रावण महिन्यातील चार सोमवारी उपवास करतात. पूजा करतात. त्या वेळी गोड भातात करतात आणि पुजाऱ्याकडून पवित्र धागा बांधतात.

७. तीजरी (Teejri) **–**

हा सण श्रावण महिन्यात येतो. तेव्हा विवाहित स्त्रिया आणि मुली आपल्या हातावर व पायावर मेहंदी काढतात. पूर्ण दिवस उपवास करतात. त्या दिवशी खेळ खेळतात. झोक्यावर बसून प्रेमाचे गीत गातात. काही पारंपरिक पध्दतीनुसार सिंधी स्त्रिया उपवास सोडेपर्यंत पाणीही घेत नाहीत. चंद्राचे दर्शन झाल्यावर उपवास सोडतात. ह्याला सिंधींच्या भाषेत 'करवा चौथ' असेही म्हणतात.

८. अखन तीज (Akhan Teej) **–**

'अखन तीज' ही अक्षय्य तृतीया अखंडी साजरी करतात. वैशाख महिन्यात या दिवशी नवीन मातीच्या भांड्यातून प्रत्येकाला स्वच्छ व थंड पाणी दिले जाते. तहानलेल्या सर्वांना पाणी दिले जाते. प्रत्येक ठिकाणाहून येणाऱ्यांना सरबत आणि सफरचंदाचे तुकडे प्रसाद म्हणून दिले जाते. हे मातीचे भांडे, फळे गुरुद्वारा धर्मगुरुंकडे पाठविले जातात.

९. उन–माट्यो (Un-Matyo) –

श्रावण महिन्यात धान्यामध्ये बदल केला जातो. गहू आणि तांदळाऐवजी बेसनाची चपाती करून खाल्ली जाते.

१०. जन्माष्टमी, रामनवमी आणि शिवरात्री –

भगवान कृष्णाचा जन्म मध्यरात्री झाला म्हणून मंदिरात मध्यरात्रीपासूनच भजन, कीर्तन सुरु होते. रामनवमीच्या दिवशी रामाचा जन्म झाला होता. शिवरात्रीच्या दिवशी थंडाई भांगबरोबर घेतली जाते. ही बनविल्यावर पहिल्यांदा महादेवाच्या मंदिरात अर्पण केली जाते. ह्या दिवशी अभिभावक लाडू आणि तिळापासून तयार केलेली चिक्की लग्न झालेल्या मुलीच्या घरी पाठवितात.

११. दियारी –

दिवाळीच्या दोन दिवस आधी लोक दिवा लावण्यास सुरुवात करतात. 'धनतेरस'च्या दिवशी बाजार भरलेला असतो. मित्र–नातेवाइकांच्या घरी लोक भेटायला जातात. मिठाईचे आदान–प्रदान करतात.

१२. काटी का गियारस –

या दिवशी लोक दान करतात. पूर्ण बाजार भिकारी आणि गरज असणाऱ्या लोकांनी भरलेला असतो. जे मदतीसाठी कापड अंथरुण बसतात. त्यांना लोक आपल्या कुवतीनुसार रुपये, फळे देतात.

१३. लाल लोई –

'लाला लोई' या दिवशी मुले आपल्या आजी, आजोबा, आत्या यांचेकडून काठी घेऊन रात्रभर बोनफायर करतात आणि नाचतात, गातात, खेळून आनंद घेतात. ज्या स्त्रियांची इच्छा पूर्ण झाली आहे, त्यात नारळ टाकून त्याचा प्रसाद म्हणून वाटप करतात.

१४. व्रत (Fasts) **–**

सिंधमध्ये साधारणतः सोमवार आणि शनिवार जियारस (Giyaras) आणि उमास (Umaas) यासाठी व्रत केले जाते. सत्यनारायण उपवासाच्या दिवशी नऊ दिवसाचा एकान्यास फक्त एका वेळेस भोजन घेतले जाते.[८]

१५. सिंधी समुदाय थदडी पर्व

थदडी पर्व – परंपरा आणि श्रध्देचे प्रतीक –

सिंधी समाजाचे थदडी. 'थदडी' या शब्दाचा सिंधी भाषेतील अर्थ होतो थंड, शीतल. रक्षाबंधनानंतर आठव्या दिवशी सिंधी समुदाय आनंदाने हा सण साजरा करतात. देवीला प्रसन्न करण्यासाठी स्तुती केली जाते. आणि थदडी पर्व साजरा करून थंड अन्न खाल्ले जाते.

सणाच्या एक दिवस आधी प्रत्येक सिंधी परिवारात वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ बनविले जातात. कोकी, सुकी तळलेली भाजी – भेंडी, कारले, बटाटे, दही, पुरी तसेच मैद्याच्या पिठात मोहन घालून वेलची साखर टाकून वेगवेगळ्या आकारात बनवला जातो. रात्री झोपण्याच्या आधी चुलीवर पाणी शिंपडून हात जोडून पूजा केली जाते. अशा प्रकारे चूल थंड केली जाते.

दुसऱ्या दिवशी पूर्ण दिवस चूल पेटवली जात नाही. आदल्या दिवशी बनवलेले थंड पदार्थ खाल्ले जातात. ह्या अगोदर परिवारातील सर्व सदस्य नदी, विहिरी,. बावडी या ठिकाणी एकत्र येतात. आणि विधीवत आई शीतलादेवीची पूजा करतात. बदलत्या काळानुसार शहरातील सीमित साधनांमुळे पूजेचे स्वरुप बदलले आहे.

आता नदी, विहिरी या सर्वांचे अस्तित्व कमी होत चालले आहे. आज घरातच पाणी उपलब्ध होते. त्यामुळे पूजाही घरीच केली जाते. ह्या पूजेत घरातील लहान मुलांना विशेषकरून सहभागी केले जाते आणि मातेचे स्तुतीगान करून आशीर्वाद मागितला जातो. मातेचा प्रकोप होऊ नये, ही या मागील भावना आहे. प्राकृतिक घटनेला देवीचा प्रकोप मानले जाते. जसे समुद्रातील तुफान याला जलदेवेचा प्रकोप, जसे पाऊस न पडणाऱ्या ठिकाणी इंद्र देवतेची नाराजी, इत्यादी.

थदडी पर्वाच्या दिवशी घरातील मोठ्या व्यक्तींकडून घरातील सर्व लहान मुलांना भेटी स्वरूप काही ना काही दिले जाते. त्याला 'खर्ची' म्हणतात. थदडी पर्वाच्या दिवशी बहीण आणि मुलींना खासकरून माहेरी बोलावून त्या सण–उत्साहाने साजरा करतात. त्याच बरोबर तिच्या सासरी लहान सदस्याद्वारा पदार्थ, फळे भेट स्वरुप दिले जाते. त्याला 'थदडीचे ठिण' असे म्हटले जाते.

दैवीशक्ती असलेला 'थदडी पर्व' आज हजारो वर्षांनंतरही सिंधी समाजाचा महत्त्वाचा उत्सव आहे. आजही ह्याला पारंपरिकतेनुसार मिळूनमिसळून साजरा केला जातो. आस्थेचे प्रतीक हा उत्सव समाजाची आपली विशिष्टता उपस्थिती दाखविते आणि पुढेदेखील उत्सव साजरा केला जाईल.[९]

१६. **मकर संक्रांत** (Tirmoori) –

'मकर संक्रांत' या दिवशी सूर्य दक्षिणेकडून उत्तरेकडे भ्रमण करतो, त्याला 'उत्तरायण' असे म्हणतात. या दिवशी पारंपरिक पध्दतीनुसार लाडू आणि चिक्की हे तिळापासून बनविलेले पदार्थ विवाहित मुलीच्या घरी पाठविले जातात.

१७. **नारळी पौर्णिमा** (Nariyal Poornima) –

श्रावण महिन्यातील 'नारळी पौर्णिमे'ला बहीण भावाला राखी बांधते. त्याला 'रक्षाबंधन' असे म्हणतात. बहीण खासकरून राखी बांधण्यासाठी भावाच्या घरी येते. हा सण बहीण भावाच्या प्रेमाचे प्रतीक आहे.

१८. **होळी** –

होळी हा रंगाचा उत्सव आहे. ज्यामध्ये तरुणांपासून ते वृध्दांपर्यंत सर्वजण आनंद व्यक्त करण्यासाठी ह्या सणाच्या दिवशी एकत्र येतात. शेजारील, आजूबाजूची मुले एकत्र गोळा होऊन समूहाने नावीन्यपूर्ण पोशाख करून येतात. स्वतःबरोबर संगीत वाद्य, ड्रम आणून रंगमंचावर सादर करतात. ह्या सणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे अल्पप्रमाणात पाण्याचे रंग वापरून स्त्रिया, पुरुष, मुले हा सण साजरा करतात.

१९. श्राध्द (Shraadh) –

कुटुंबातील एखाद्या सदस्याचा एका दिवशी मृत्यू झाला तर (तिथीनुसार) मृत आत्म्याला शांती मिळण्यासाठी श्राध्द केले जाते. त्यादिवशी ब्राह्मणांना दक्षिणा आणि अन्नदान केले जाते.[१०]

सिंधी लोक गायीला पवित्र मानतात. तसेच नंदी, सिंह, गाढव, कुत्रा इ. पशू–देवतांची वाहने असल्यामुळे त्यांनाही पूज्य मानतात. नागपूजा ही प्रचलित आहे. जलातील देवाने विश्व व अन्न निर्माण केले. अशी त्यांची श्रध्दा आहे. जल, दीप रुपात पूजन केले जाते. उल्हासनगरातील दर्शनी स्थळ खालीलप्रमाणे –

१. चालिया साहेब मंदिर (उल्हासनगर–५)

२. झुलेलाल मंदिर (उल्हासनगर–५, २)

३. साधु वासवानी गार्डन, गोल मैदान (उल्हासनगर–२)

४. संत मधुसुदन आश्रम (उल्हासनगर–२)

५. सच्चो सतराम आश्रम (उल्हासनगर–३)

६. निजधाम आश्रम (उल्हासनगर–५)

७. संत जीवनघोट आश्रम (उल्हासनगर–५)

८. स्वामी शांतिप्रकाश आश्रम (उल्हासनगर–५)[११]

सिंधींचा 'चालिया' हा महत्त्वाचा उत्सव, त्या दिवशी झुलेलाल देवाची प्रार्थना केली जाते. एक विशेष ज्यात जी सिंधी लोकांचे रक्षण करते प्राचीन काळापासून सिंधी लोकांची ही संस्कृती इ.स. १८९७ च्या आसपास चालीसाहेब मंदिर पीरगोथ जे सिंधमध्ये आहे. सन १९४७ मध्ये भारताची फाळणी झाली. त्या वेळी ही अखंड ज्योत उल्हासनगरमध्ये झुलेलाल मंदिरात आजपर्यंत आहे. ही ज्योत सिंधमधील ज्योतसारखी आहे. येथे जगातील सर्व सिंधी येतात भक्तीभावाने झुलेलालची प्रार्थना करतात आणि चाळीस दिवसांचे व्रत करतात.[१२]

उल्हासनगरातील ह्या झुलेलाल साहिब मंदिरात कॅम्प नं. १ ते ५ पासून दोन लाख सिंधी मंदिराला भेट द्यायला येतात. परदेशातील निर्वासित सिंधीही भेट द्यायला येतात. ह्या शुभ उत्सवात त्याची यावर श्रध्दा आहे.[१३]

२०. स्वामी शांतिप्रकाश आश्रमव्यवस्था उल्हासनगर (Swami Shanti Prakash Ashram Trust, Ulhasnagar) –

स्वामी शांतिप्रकाश महाराजांनी सन १९५० मध्ये आश्रम स्थापन केला.

१. इ.स. १९७० मध्ये स्वामी सर्वानंद महाराजांनी श्री टेऊँराम आश्रमाचे उद्घाटन केले.

२. राधेश्याम गोशाला आश्रम इ.स. १९६० मध्ये स्थापन केला.[१४] त्यामध्ये १२०० गायी होत्या.[१५] राधेश्याम गोशालाचे उद्घाटन पूज्य प्रभुपाद महाराजांनी केले.

३. उल्हासनगर कॅम्प नं. ४ मध्ये वृध्दाश्रमाची स्थापना ४ मे, १९७० मध्ये केली. त्या सर्वांना राहण्याची, खाण्याची, दवापाणीची साहाय्यता श्री टेऊँराम आश्रमातील तत्वाधान जनता जनार्दन परिषदेद्वारा देखभाल केली जाते.

४. जनता जनार्दन परिषद सन १९७५ मध्ये स्थापन केली.

५. १९८३ मध्ये सर्वानंद हॉस्पिटलचे उद्घाटन स्वामी शातिप्रकाश महाराजांनी केले

६. श्री स्वामी शांतिप्रकाश यांनी इ.स. १९८७ मध्ये श्री स्वामी टेऊँराम धर्मशाळेचे उद्घाटन केले. जिथे बाहेरून येणारे यात्रेकरूंसाठी सामान्य दरामध्ये सुविधा दिली जाते.

७. १९७२ मध्ये श्री स्वामी टेऊँराम अन्नक्षेत्रामध्ये गरिबांना रोज ताजे अन्न दिले जाते. प्रत्येक वर्षी स्वामी शांतिप्रकाश महाराजांच्या जन्मदिनी १०५ व्यक्तींचे डोळ्यांचे ऑपरेशन मोफत केले जाते. मुर्लीच्या लग्नासाठी ड्रेस, साड्या भेट म्हणून दिली जातात व आर्थिक साहाय्यताही केली जाते.

८. १९७८पासून ते प्रत्येक वर्षी सामुदायिक विवाह करतात. ज्यामध्ये वधूला लागणाऱ्या सांसारिक वस्तू दिल्या जातात.

९. इ.स. १९९१ मध्ये अखिल भारतीय सिंधी साधू संमेलन ज्यामध्ये भारतातून ५०० साधूंनी भाग घेतला. ते श्री स्वामी टेऊँराम सिंधी धर्मशाळेत उल्हासनगरमध्ये केले. स्वामी शांतिप्रकाश महाराजांच्या तत्त्वज्ञानात संमेलन तीन दिवस चालले.

१०. १९८५ मध्ये स्वामी शांतिप्रकाश स्कूलची स्थापना केली जी इंग्रजी, सिंधी भाषेत शिक्षण देते. आज ही संस्था १ ली ते १० वीपर्यंत शिक्षण देते. प्रत्येक वर्षी ९००० गरीब विद्यार्थ्यांना जूनच्या पहिल्या आठवड्यात वह्या, युनिफॉर्म (शाळेचा ड्रेस), इ. मदत केली जाते. प्रत्येक महिन्याला विधवांना अन्न दिले जाते. तसेच वर्षभर येणाऱ्या सणांसाठी मिठाई, आर्थिक मदत केली जाते.

११. इ.स. १९९५ मध्ये सकाळी १० ते ११ मेडिकल जाहिरात दिली जाते. ह्यावेळेस धर्मशाळेत औषधे मोफत दिली जातात.[१६]

स्वामी देवप्रकाशजी महाराज अध्यक्ष असलेल्या उल्हासनगर मधील त्यांच्या काही धर्मादाय संस्था पुढीलप्रमाणे –

१. स्वामी सर्वानंद हॉस्पिटल, उल्हासनगर
२. स्वामी संतप्रकाश विद्या संस्था
३. श्री राधेशाम गोशाला
४. जनता जनार्दन परिषद
५. स्वर्गदार स्मशान भूमी
६. स्वामी शांतिप्रकाश प्राकृतिक शिक्षालय
७. स्वामी शांतिप्रकाश ऑडिटोरियम
८. स्वामी देवप्रकाश जनकल्याण ट्रस्ट, उल्हासनगर [१७]

अशा प्रकारे स्वामी शांतिप्रकाश आश्रम, उल्हासनगर – ५ द्वारा संचलित विविध प्रकारची मदत गरजू व्यक्तींसाठी केली जाते.

२१. उल्हासनगरमधील मंदिरे –

उल्हासनगरमध्ये मंदिरे फक्त उपासनेसाठी प्रसिध्द नाहीत तर ती ऐतिहासिक स्थळे म्हणून त्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि बांधकाम म्हणूनदेखील प्रसिध्द आहेत. या परिसरातील

आणि मंदिरातील बहुतेक मंदिरे सिंधी संतांचीही आहेत. ज्याचे सिंधी पूजा करतात. याशिवाय हिंदू देव–देवता आणि देवतांचे अनेक मंदिरे आहेत जे मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील काळात उदयास आली.

अ. उल्हासनगरमधील प्रसिध्द मंदिर – विठ्ठल मंदिर

विठ्ठल मंदिर हे उल्हासनगरमधील प्रसिध्द पर्यटन स्थळांपैकी एक आहे. ते बिर्ला मंदिर म्हणूनही ओळखले जाते. हे मंदिर कल्याणच्या पुढे आहे. कल्याण चॅरिटी ट्रस्टने निर्वासित शिबिर भगवान विठ्ठल भव्य मंदिर उभारले होते.

आ. स्वामी शांतिप्रकाश मंदिर –

स्वामी शांतिप्रकाश मंदिरातील स्वामी शांतिप्रकाश यांचा पुतळा आहे. शांतिप्रकाश हे उल्हासनगरमधील प्रसिध्द संत आहेत. असे म्हटले जाते की, उल्हासनगरमधील लोकांमध्ये स्वामी शांतिप्रकाश यांचे स्थान महत्वाचे आहे. शहराच्या संपूर्ण परिसराचे नावही एक नामवंत स्वामी शांतिप्रकाश चौक आहे जे या संताच्या नावावरून ओळखले जाते.

इ. संत सतराम धाम –

संत सतराम धाम उल्हासनगरमध्ये सर्वात लोकप्रिय उपासनेचे एक केंद्र आहे. जेथे संपूर्ण भारत आणि सिंधी लोक भेट देतात व आशीर्वाद प्राप्त करतात. लोक सद्गुरु सतरामदास साहिब यांचे आशीर्वाद घेण्यासाठी या पवित्र जागेला भेट देतात.

ई. अंबरनाथ मंदिर –

अंबरनाथ मंदिर हे मुंबईतील पुणे रेल्वे मार्गावरील स्थानक आहे. भारतातील हे मंदिर इ.स. १०६० मध्ये बांधले गेले. याची कलाकृती अतिशय नाजूक आणि गुंतागुंतीसाठी प्रसिध्द आहे. असे मानले जाते की राजा महामंडालेश्वर याने आपल्या पूर्वपुरुषाच्या स्मृत्यर्थ हे मंदिर बांधले आहे. शिवरात्रीच्या वेळी अनेक हजारो यात्रेकरू यावेळी भेट देतात आणि उत्सवाचे आयोजन करतात.

उ. पूज्य झुलेलाल मंदिर –

झुलेलाल हे एक सिंधी मंदिर आहे आणि ते चालियासाहिब यांना समर्पित आहे. पूज्य झुलेलाल पाण्याची देवता मानली जाते. या मंदिराची बहुतेक मंदिरे शहराच्या मध्यवर्ती भागात सिंधींनी बांधली आहेत. तेथे दूरदूरच्या ठिकाणाहून भेट देणारे अनेक लोक येतात. तसेच येथे अतिथी लॉज, पंचतारांकित हॉटेल्स आहेत, जे विविध दरावर उपलब्ध आहेत.[१८]

२२. झुलेलाल विश्वस्त, उल्हासनगर–

उल्हासनगर कॅम्प नं. १ मध्ये झुलेलाल मंदिर स्थापन होऊन झुलेलाल विश्वस्त कार्यास सुरुवात झाली. इ.स. १९६० मध्ये उल्हासनगरमधील झुलेलाल विश्वस्त कार्यास सुरुवात झाली. मोठे मंदिर, सर्व चांगल्या सुविधा सामान्य लोकांसाठी लग्नाचा हॉल, अतिशय कमी खर्चात उपलब्ध करून दिला.

प्रत्येक सण हा धार्मिकतेने मोठ्या उत्साहाने साजरा करतात. सोळा सोमवार व्रत, तीजरी थदडी, महालक्ष्मी, गुरुनानक जयंती, दिवाळी, चेटीचंद यासारखे सण भंडारा करून साजरे करतात. १४ मार्च प्रत्येक वर्षी भजन, कीर्तन, भंडारा असतो.[१९]

उल्हासनगर शहरातील सर्वात अधिक जनसंख्या सिंधी समाजाची आहे. सिंधी समाजातील लोक यात्रेसाठी स्वतःच्या वाहतुकीच्या साधनांतून किंवा ट्रॅव्हल्सद्वारे जातात. तसेच उपनगराच्या आसपासदेखील अनेक मंदिरे आहेत. भगवान शंकराचे प्राचीन काळातील हेमाडपंती मंदिर अंबरनाथ येथे आहे. सेंच्युरी मिलच्या जवळपास बिर्ला मंदिर, विठ्ठल–रखुमाई मंदिर आहे.[२०] 'धार्मिकनगरी' अशीदेखील ओळख उल्हासनगरची आहे.

अशा प्रकारे उल्हासनगरात मंदिरांबरोबरच, गुरुद्वारा, धर्म दरबार आणि मस्जिद आहे. कॅम्प नं. ५ मधील 'चालिसा मंदिरा'त देश–विदेशातून अनेक व्यक्ती भेट देण्यास येतात.

कॅम्प नंबर ३च्या जवळ हिराघाटकडे गुरुद्वार भाईसाहेब मेहरबान सिंह दरबारात गुरुनानक जयंतीच्या वेळेस सकाळी ३ वाजता शहरातून जाणारी प्रभातफेरी ही ऐतिहासिक प्रभातफेरी असते. धार्मिकतेबरोबर समाजसेवेत देखील हे उपनगर मदत करते. परसराम मसंद

यांनी उल्हासनगर नंबर ५ मध्ये दशहरा मैदान बनवले. तेथे समाजाचे प्रत्येक कार्यक्रम साजरे केले जातात.

परमानंद प्यासी सारख्या गायकांनी धार्मिक गायनात आपल्या समाजातील महापुरुषांचे जीवनचरित्र, त्यांचे संदेश समाजाच्या हितासाठी ज्या महापुरुषांनी दिले ते प्रस्तुत केले आहे. ज्यामुळे नवीन पिढी त्यांचे संदेश महापुरुषांची वाणी जाणून आत्मसात करतील.

सिंधी समाजातील आध्यात्मिकतेचे दर्शन आपल्याला त्यांच्या उत्सव–सणांतून समजते. सिंधी लोक त्याचबरोबर प्राणी, पशू यांनाही पूज्य मानतात. गाय, नंदी, सिंह, गाढव, कुत्रा नागपूजाही प्रचलित आहे. जलदेवाने विश्व, अन्न निर्माण केले अशी त्यांची श्रध्दा आहे. म्हणून जल, दीप रुपात पूजन केले जाते.

मर्तिक प्रथा –

मरणोन्मुख मानवाला जमिनीवर बिछाना टाकून त्यावर निजवतात. त्याच्या मुखात गंगाजल व सरबत घालतात. नंतर प्रेताला स्नान घालतात.[२१] मृत व्यक्तीच्या नावाने गरीब व्यक्तींना दान केले जाते. गीतेचे अठरा अध्याय म्हटले जातात. वयस्कर व्यक्तीच्या मृत्याच्या कारणाने अगोदर कुटुंबातील पुरुष व्यक्ती मुंडण करतात. त्या व्यक्तीचा मुलगा शवाला खांदा देऊन नंतर संस्कार करून चितेला अग्नी देतो. बाकीचे विधीपूर्वक नमस्कार चालू असताना एकसुरात पुन्हा पुन्हा 'राम नाम संग है', असे बोलतात.[२२]

प्रेतदहन पूर्ण झाल्यानंतर सर्वजण स्नान करून अंत्यक्रिया संपवून झाल्यानंतर परत गेल्यानंतर घरात जिथे प्रेत ठेवलेले होते तिथे एक दिवसा लावून ठेवतात.

दुसऱ्या दिवशी स्मशानात जातात व प्रेत पूर्ण जळाले आहे, अशी खात्री करून घेऊन जळत्या चितेवर दूध व गोमूत्र शिंपडतात. तिसऱ्या दिवशी तेथे जाऊन पुन्हा दूध व गोमूत्र शिंपडतात. आणि अस्थी गोळा करतात. बरीचशी राख एका पोत्यात भरून घेतात. उरलेल्या राखेचे पाच ढीग करून त्यावर एक दिवा एक–एक वेळू व कथलाची एक–एक देवप्रतिमा ठेवतात. मातीचे पाच वाडगे घेऊन त्यात भात व वडे घालून प्रत्येक ढिगाऱ्यावर एक–एक ठेवतात. राखेच्या ढिगात वेळू खोचून ठेवतात व त्याच्या भोवती दोरा गुंडाळतात.[२३]

चौथ्या दिवशी पागरी (Pagri) धार्मिक विधीच्या वेळी संपूर्ण समाज एकत्र गोळा होऊन श्रध्दांजली दिली जाते. ब्राह्मणाला दान म्हणून फळे, कपडे, छत्री, भांडी, रुपये व पादत्राणे भेट दिली जातात.[२४]

काही लोक हरिद्वारला जाऊन राख व अस्थी यांचे गंगेत विसर्जन करतात. आणि तिथे अकराव्या दिवशी श्राध्दविधी पार पाडतात. बाराव्या दिवशी ब्राह्मण भोजन घालतात. मात्र सर्वजण आपापल्या गावीच पिंडदान तर्पण करतात. सर्व अंत्यविधी झाल्यानंतर ब्राह्मणभोजन होते.

सधवा स्त्री मरण पावली असेल तर तिच्या अंगावरील सर्व अलंकार (नाकातील सोडून) काढून घेतात आणि त्याऐवजी कथलाचे दागिने घालतात. मग तिचे केस विंचरून तिला कुंकू लावतात ते स्वस्तिकाकृती असते. मनुष्याचा आत्मा दोन–तीन दिवस घरात वावरतो, अशी समजुत आहे. म्हणून तोपर्यंत एक दिवा लावून ठेवतात. तिसऱ्या दिवशी दिवा मालवतात. कारण मग तो आत्मा पितृलोकी निघून जातो. अमावस्येला सर्व पितरांच्या नावे पिंडदान करण्यात येते. संध्याकाळी घराच्या अंगणात पिठाची पोळी व चार किंवा अधिक वातीचा कणकेचा दिवा शेणाने सारवलेल्या जमिनीवर ठेवतात. नंतर पितरांना धान्याचा नैवेद्य दाखवतात. सर्वजण त्यांना नमस्कार करतात. आणि अंगणात ठेवलेली पोळी व दिवा तळ्यात सोडून देतात. काही पितरांना तृप्त करण्यासाठी ब्राह्मणाला किंवा कुमारिकेला भोजन घालावे लागते. ब्राह्मणाला गाय दान दिली तर ती आत्म्याला पितृलोकापर्यंत पोहोचवते. अशी श्रध्दा आहे कावळ्याला वाढलेला पदार्थही पितृलोकी पितरांना पोचतो, असे समजतात.[२५]

संदर्भ सूची

१. सिन्धी लोग विकीपीडिया - https:// hi.m.wikipedia.org

२. जोशी पं. महादेवशास्त्री 'भारतीय संस्कृतीकोश' दहावा खंड, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, प्रकाशक – पं. महादेवशास्त्री जोशी प्रथमावृत्ती शके १९०१, एप्रिल १९७९, पृष्ठ क्र. १

३. Lord Julelal / भगवान झुलेलाल का जन्मोत्सव चेटीचंड/ hindi.webdunia.com

४. चेटीचंड Wikipedia - https:// hi.m.wikipedia.org

५. Cheti Chand Festival चेटीचंड पर्व–भगवान झुलेलाल वेबदुनिया / hindi.webdunia.com

६. Chalia Festival चालिया महोत्सव – सिंधीयों का सबसे बडा पर्व / hindi.webdunia.com

७. जोशी पं. महादेवशास्त्री उ. नि. पृष्ठ क्र. २

८. सिंधी पाकशैली/ Receipes/Chef Sanjeev Kapoor - sanjeevkapoor.com hindi.sanjeevkapoor.com

९. सिंधी लोग Sindhi Festival Thadadi Parv सिंधी समुदाय का थदडी – वेबदुनिया hindi.webdunia.com

१०. Vaswani Dada J. P., 'We the Sindhis', Published by Sleek Advertising P. Ltd., June 2013 Isbn No. 978-81-927065-0-4 पृष्ठ क्र. ७६, ७७, ७८

११. Ulhasnagar - Wikipedia https://en.m.wikipedia.org

१२. Jhulelal Chaliha Festival Chaliha Festival - General Knowledge Today - www.gktoday.in

१३. 40 Day Chaliha Fast - Sai Jhulelal Sahib - Google sites : https://sites.google.com

१४. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' पुस्तक का पहिला भाग, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र.८०

१५. Swami Shanti Prakash Ashram, Ulhasnagar Satnam Sakhi swamishantiprakas.com

१६. बठेजा घनश्याम, उ.नि. पृष्ठ क्र. ८०

१७. Swami Shanti Prakash Ashram, Ulhasnagar Satnam Sakhi swamishantiprakas.com

१८. Ulhasnagar temple Famous Temples in Ulhasnagar temple, Religious Spots in Ulhasnagar m.ulhasnagar online.in

१९. History Bhau parsram Jhulelal Mandir of Ulhasnagar -2.

jhulelalmandir.in

२०. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' पुस्तक का भाग दुसरा २०१३, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. ९८

२१. जोशी पं. महादेव शास्त्री भारतीय संस्कृतिकोश दहावा खंड पं. महादेव शास्त्री जोशी कार्यवाह प्रथमावृत्ती शके १९०१ एप्रिल, १९७९, पृष्ठ क्र. ४

२२. Vaswani Dada J. P., 'We the Sindhis' Published by Sleek Advertising P. Ltd., June 2013, ISBN No. 978 81 927065-0-4 पृष्ठ क्र. ८९

२३. जोशी पं. महादेवशास्त्री, उ. नि. पृष्ठ क्र. ४

२४. Vaswani Dada J. P., उ. नि. पृष्ठ क्र. ८९

२५. जोशी पं. महादेव शास्त्री, उ. नि. पृष्ठ क्र. ४

प्रकरण – ६

राजकीय जीवन

ज) प्रशासन व्यवस्था –

सिंधू सभ्यतेचे नाव आहे सिंधी समाज. ह्या सिंधी समाजाने भारताला इंग्रजांच्या गुलामीपासून स्वतंत्र करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. तन, मन, धन देश स्वतंत्र होण्यासाठी लाखो रुपये देऊन आपले योगदान दिले. सिंध हा प्रांत मुंबई प्रभागाला १९०९ ते १९३५ पर्यंत एकत्रित होता.[१] उल्हासनगर मिलिट्री कॅम्पची स्थापना ब्रिटिश सरकारद्वारे १९३८ मध्ये करण्यात आली. मिलिट्री कॅम्पच्या अगोदर पूर्ण भागात अनेक गावे होती. ज्यामध्ये शहाड नावाचे गाव दोन होते. ह्या शहाड गावाचे स्थलांतर तीन वेळा करण्यात आले. पहिले शहाड गाव दोन आजच्या उल्हासनगर एक नंबरच्या पोलीस स्टेशनच्या जागी आहे. मिलिट्रीद्वारा त्या गावांना आजच्या सेंच्युरी रेयॉन मिलच्या जवळ स्थलांतरीत करण्यात आले.

मिलिट्रीची स्थापना दुसऱ्या महायुध्दाच्या अगोदर सन १९३८ मध्ये झाली. सन १९४२ मध्ये दुसऱ्या महायुध्दात सहभागी झाल्यामुळे मिलिट्री कॅम्प संपूर्ण खाली झाला. आणि हा विभाग जंगलमय झाला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ४.२.१९४८ सिंध पाकिस्तानातून आलेले सिंधी निर्वासितांना प्रस्थापित करण्याचे काम करण्यात आले. सरकारद्वारे आणण्यात आलेल्या समाजात ९०% लोक सिंधी समाजाचे होते.

पहिला समूह जो भारत सरकारद्वारा मुंबई गोदीतून रेल्वेद्वारे आजच्या विठ्ठलवाडी स्टेशन तेव्हाचे जेम्स साईडवर उतरविण्यात आले तेव्हा त्या निर्वासितांना ट्रकद्वारे मिलिट्रीतील बॅरेकमध्ये आणले गेले. पहिल्या समूहातील पहिल्या ट्रकमधून उतरविण्यात आलेली पहिली व्यक्ती श्री. नारायणदास सुखेजा होते. (ही व्यक्ती आजही उल्हासनगरमध्ये कॅम्प नं. ५ मध्ये प्रभात गार्डनच्या जवळ रहात आहे. विभाजनाचे व निर्वासित व्यक्तींचे साक्षीदार) ते लोक अदालतमधील पॅनेलचे सदस्य होते. तेव्हा ४.२.१९४८ मध्ये आजच्या ३८/३९ सेक्शन आजच्या साईबाबा मंदिराजवळ त्यांना उतरविण्यात आले आणि सांगण्यात आले की, ज्यांना जिथे जागा मिळेल तेथे जाऊन राहू शकतो. त्या वेळी मिलिट्री बॅरेकची अवस्था फारशी चांगली

नव्हती. रेल्वेतील डब्यासारखा मोठा हॉल, अर्धी भिंत तुटलेली, वरचे छतदेखील चांगले नव्हते. छत हे कुठे पत्र्याचे तर सिमेंटचे तुटलेल्या अवस्थेत आहेत. निर्वासित परिवारांना त्याठिकाणी राहायला सांगितले. रेल्वे स्टेशन विठ्ठलवाडी १९५६, उल्हासनगर १९५७ तर शहाड स्टेशन १९५८ मध्ये बनविण्यात आले.

उल्हासनगरचे नामकरण कॅम्प नंबर तीनमध्ये देशाचे प्रथम गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी यांच्या हस्ते ८ ऑगस्ट १९४९ रोजी करण्यात आले. उल्हासनगरचे नाव हे उल्हासनदीच्या नावावरून ठेवण्यात आले आणि सांगण्यात आले की, ''जीवनभर उल्हासित राहा.'' [२]

ऑक्टोबर १९६० मध्ये उल्हासनगर नगरपालिका अस्तित्वात आली. केंद्रशासनाने या पालिकेची स्थापना केली. नेवेंद्रम गुरबाणी हे या शहराचे पहिले 'नगराध्यक्ष'. हे शहर निर्वासितांची वस्ती असल्यामुळे सुरुवातीची पाच वर्षे या नगरपालिकेला केंद्रशासनाकडून अनुदान मिळत होते. १९६५ नंतर केंद्रशासनाने हे अनुदान बंद केले. त्यानंतर स्थानिक प्रशासनाने विविध कर आकारण्यास सुरुवात केली.[३]

१) महानगरपालिका –

ज्या मोठ्या शहराची लोकसंख्या तीन लाखाहून अधिक असते तेथील नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेचे रुपांतर महानगरपालिका या वरच्या दर्जाच्या संस्थेत केले जाते.

२) उल्हासनगर महानगरपालिका –

उल्हासनगर शहराचे काम उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे चालते. याचे मुख्यालय उल्हासनगर येथे आहे. भारत–पाक फाळणीनंतर पाकिस्तानातून आलेल्या निर्वासित हिंदू सिंधी बांधवांना मानवतेच्या दृष्टिकोनातून भारतामध्ये काही ठिकाणी निर्वासित छावण्या बनवून आश्रय देण्यात आला. उल्हासनगर ही त्यापैकीच एक निर्वासित छावणी मुंबईजवळ मध्ये रेल्वेच्या कल्याण जंक्शनच्या आसपास पडीक जमिनीवर स्थापित केलेल्या या छावणीचे लोकसंख्या क्षेत्र वाढून एक स्वतंत्र महापालिका असलेले नगर बनले आहे.

अल्पसंख्यांक असलेल्या या लोकांचा मुळातीलच स्वभाव चिवट आणि अहिंसक स्थायिभाव या लोकांच्या समुदायास भराभर वाढीस कारणीभूत झाला. राजकारण क्षेत्रातही सिंधी समुदायाचा शिरकाव झाला. मुळात हिंसक वृत्ती नसल्याने गोड बोलून गोडीने आपले काम मार्गी लावणे या वृत्तीमुळे आपला स्वतंत्र राजकीय पक्ष न तयार करता कोणत्या तरी प्रस्थापित राजकीय पक्षाच्या बरोबरीने जाण्याचे सूत्र त्यांनी नेहमीच अंगीकारले. म्हणूनच उल्हासनगरमधील राजकारण व महानगरपालिकेची सत्ता फक्त सिंधी समाजाभोवती मर्यादित राहिली.[४]

परसराम मसंद – उल्हासनगरचे जे. पी. (Justice of the Peace) उल्हासनगर शहराचे सर्वात पहिले जे.पी. बनले. ज्यांना सरकारकडून कोर्टाद्वारे मान्यता मिळाली होती. कोणत्याही गुन्हेगाराला सहा महिन्यापर्यंत शिक्षा देऊ शकत असे. नंतर सरकारने जे.पी. शब्दाऐवजी (S.E.M.) स्पेशल एज्युकेटेड मॅजिस्ट्रेट नंतर काळानुसार उच्चतम न्यायालयातील एका केस संदर्भात जजमेंट महाराष्ट्र सरकारने शब्द काढून S.E.O. हा शब्द बनवला याचा अर्थ स्पेशल एज्युकेटेड ऑफिसर परसराम मसंद उल्हासनगरमध्ये होते. न्याय देणे आणि दंड देण्याचा त्यांना अधिकार होता.

शरणार्थी कॅम्प पासून नगरपरिषद, नगरपालिका मग महानगरपालिका, विधानसभा क्षेत्र आणि आता उल्हासनगर शहर विधानसभा, उल्हासनगर, अंबरनाथ आणि कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्रामध्ये विभाजन झाले आहे. राजनैतिक क्षेत्रामध्ये महत्त्व वाढले आहे.

उल्हासनगर तालुक्याची स्थापना सन १९६९ मध्ये झाली. परंतु स्वतंत्र तहसील १९८३ मध्ये निर्माण झाले. तोपर्यंत कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर ह्या सर्वांचे एकच तहसील कार्यालय होते. पहिले कल्याण शहर तालुका बनले सन १९८३ मध्ये उल्हासनगर स्वतंत्र तहसिल कार्यालय झाले. [५]

तहसीलदार उल्हासनगर पदावर काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या नावाची यादी व कामाचा कालावधी सन २००० पर्यंत तो पुढीलप्रमाणे –

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	कालावधी
१.	श्री. पी. बी. सोनार	०१.०८.८३ ते १५.०६.८४
२.	श्री. डी. एस. पाटील	१७.०६.८४ ते १७.०९.८४
३.	श्री.एस. एल. पिसाळ	१८.०९.८४ ते १९.०५.८५
४.	श्री. एस. ए. भलावडे	१२.०५.८६ ते ०६.०६.८६
५.	श्री. एस. पी. परांजपे	०७.०६.८६ ते ०३.०५.८७
६.	श्री. ए. बी. गायकवाड	०४.०५.८७ ते ३०.०६.८७
७.	श्री. एस. जी. खत्रा	०१.०७.८७ ते ३१.०७.८८
८.	श्री. एस. आर. वेलवणकर	०१.०८.८८ ते ०८.०१.८९
९.	श्री. व्ही. डी. साळवी	०९.०१.८९ ते ०३.०२.८९
१०.	श्री. के. एस. पार्टे	०४.०२.८९ ते ०२.०४.८९
११.	श्री. पी. जे. कुलथे	०३.०४.८९ ते २४.०५.९२
१२.	श्री. यशवंत गायकवाड	२५.०५.९२ ते ३१.०१.९३
१३.	श्री. एम. बी. देवस्थळी	०१.०२.९३ ते १२.०५.९३
१४.	श्री. नरेंद्र ग. दुर्वे	१३.०५.९३ ते २९.०३.९४
१५.	श्री. व्ही. बी. मोरे	३०.०३.९४ ते ३१.०५.९४
१६.	श्री. नरेंद्र ग. दुर्वे	०१.०६.९४ ते ११.०९.९४
१७.	श्री. व्ही .जे साठे	०२.०७.९४ ते ११.०९.९४
१८.	श्री. व्ही. बी. मोरे	१२.०९.९४ ते १८.०९.९४
१९.	श्री. पी. पी. जाधव	१९.०९.९४ ते २२.१०.९४
२०.	श्री. व्ही. जी. नाईक	१४.१०९४ ते २२.१०.९४
२१.	श्री. राजेंद्र ब. भोसले	२३.१०.९४ ते २४.०२.९५
२२.	श्री. चंद्रकांत सुगंधी	२५.०२.९५ ते ३१.०८.९५
२३.	सौ. सुनिता वाघमारे	०१.०९.९५ ते १०.०९.९५
२४.	श्री. दत्ता भडकवाड	११.०९.९५ ते १५.०६.९८
२५.	श्री. वाय. डी. कुलकर्णी	१८.०६.९८ ते ३०.०६.२००१

०१.१०.१९६० रोजी नगरपालिकेची स्थापना झाली. सन १९६३ मध्ये 'नगरसेवक' पदासाठी मतदान झाले. त्या वेळी १६ नगरसेवकांचा उमेदवार म्हणून सहभाग होता. पहिली नगरसेवक मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जिल्हा कलेक्टर कार्यालयाकडून श्री. मल्हारी भावार्थे यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत उल्हासनगर मधील मतदान प्रक्रियेचे पालन केले.[७]

नगराध्यक्ष/प्रशासक पद भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकालावधीचा तपशील–

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	कालावधी		भूषविलेले पद
		पासून	पर्यंत	
१.	श्री. एन. व्ही .गुरबानी	०१.१०.१९६०	२५.०५.१९६२	नामनिर्देशित
२.	डॉ. श्री. एस.एच. खालसा	२६.०५.१९६२	१५.०९.१९६३	प्रभारी
३.	श्री. आर. सी. सदारंगानी	१६.०९.१९६३	१४.०६.१९९४	नामनिर्देशित
४.	श्री. के. बी. आचरा	१५.०६.१९६४	२३.०६.१९६५	निर्वाचित
५.	श्री.सरदार एस.डी.ओचानी	२४.०६.१९६५	१५.०७.१९६५	प्रभारी
६.	श्री. आर. सी. सदारंगानी	१६.०७.१९६५	१४.०६.१९६६	निर्वाचित
७.	प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत	१५.०६.१९६६	०१.०७.१९६६	शासन नियंत्रणाखाली
८.	श्री. आहुजा यु. एल.	०२.०७.१९६६	०१.०७.१९६७	निर्वाचित
९.	श्री. आर. सी. सदारंगानी	०२.०७.१९६७	२१.११.१९६८	निर्वाचित
१०.	श्री. एल. डी. बठिजा	२२.११.१९६८	०७.१२.१९६८	निर्वाचित
११.	श्री. के. बी. आचरा	०८.१२.१९६८	१०.१०.१९६९	निर्वाचित
१२.	श्री. एल. डी. बठिजा	१०.१०.१९६९	३१.१०.१९६९	प्रभारी
१३.	श्री. पी. एच. आडवानी	०१.११.१९६९	०३.०२.१९७०	निर्वाचित
१४.	श्री. मखिजा एल. सी.	०४.०२.१९७०	१४.०२.१९७०	प्रभारी
१५.	श्री. आहुजा डी. ए.	१५.०२.१९७०	०३.०७.१९७०	निर्वाचित
१६.	श्रीमती मसंद कला एन.	०३.०७.१९७०	२१.०७.१९७०	प्रभारी
१७.	श्री. अडवानी पी. एच.	२१.०७.१९७०	०३.१०.१९७०	निर्वाचित
१८.	श्री. एम. एस. रामचंदर	०४.१०.१९७०	१९.११.१९७०	प्रभारी
१९.	श्री. एस.डी. अजबानी	२०.११.१९७०	०७.०४.१९७१	निर्वाचित
२०.	श्रीमती मुलचंदानी सी.एल.	०८.०४.१९७१	२८.०४.१९७१	प्रभारी

२१.	श्रीर. आहुजा यु. एल.	२९.०४.१९७१	०३.१२.१९७१	निर्वाचित
२२.	श्री. जी. सी. गोकलानी	०४.१२.१९७१	०२.०५.१९७३	शासन नियंत्रणाखाली
२३.	श्री. एम. जी. काळे	०३.०५.१९७३	२८.०८.१९७३	शासन नियंत्रणाखाली
२४.	श्री. ए. एम. रेड्डी	२९.०८.१९७३	०१.१०.१९७६	शासन नियंत्रणाखाली
२५.	श्री. ए. जी. तारे	०२.१०.१९७६	०२.१०.१९७७	शासन नियंत्रणाखाली
२६.	श्री. डी. आर. जग्यासी	०३.१०.१९७७	३०.०६.१९७८	शासन नियंत्रणाखाली
२७.	श्री. अडवानी पी.एच.	०१.०७.१९७८	३१.०३.१९८४	निर्वाचित
२८.	श्री. जे. एल. वालेकर	०१.०६.१९८४	३१.०५.१९८४	शासन नियंत्रणाखाली
२९.	श्री. आर. एस. सावंत	०१.०६.१९८४	०२.०९.१९८५	शासन नियंत्रणाखाली
३०.	श्री. बी. व्ही.बाडकर	०२.०९.१९८५	०२.१०.१९८५	शासन नियंत्रणाखाली
३१.	श्री. राहुल अस्थाना	०२.१०.१९८५	१४.०१.१९८६	शासन नियंत्रणाखाली
३२.	श्री. बी. व्ही. पाटील	१४.०१.१९८६	२९.०१.१९८६	शासन नियंत्रणाखाली
३३.	श्री. आर. जी. बनसोड	२१.०१.१९८६	०५.०३.१९८६	शासन नियंत्रणाखाली
३४.	श्री. टी. एस. भालेराव	०६.०३.१९८६	१०.०७.१९८६	--
३५.	श्री. सुरेश कलानी	१०.०७.१९८६	१०.०१.१९९३	निर्वाचित
३६.	श्री. गोप बहरानी	११.०१.१९९३	०६.०२.१९९३	प्रभारी
३७.	श्रीमती ज्योती कलानी	०७.०२.१९९३	०९.०२.१९९३	प्रभारी
३८.	श्री. शिवाजी भैरव	२०.०२.१९९३	०४.०५.१९९४	प्रशासक
३९.	श्री. एस. पी. जाधव	०५.०५.१९९४	१०.०५.१९९५	प्रशासक
४०.	श्रीमती ज्योती कलानी	१०.०५.१९९५	१३.०१.१९९६	निर्वाचित
४१.	श्री. हरदास माखिजा	१४.०१.१९९६	२४.०१.१९९६	प्रभारी
४२.	श्रीमती ज्योती कालानी	२५.१.१९९६	२०.१०.१९९६	नगराध्यक्ष
४३.	श्री. पृथ्वीराज बायस	२०.१०.१९९६	२२.१०.१९९६	प्रशासक
४४.	कॅप्टन एस.एच. शुल	२२.१०.१९९६	२०.१२.१९९६	प्रशासक
४५.	श्री. आर. के. सोनावणे	२१.१२.१९९६	१९.०१.१९९७	प्र. आयुक्त
४६.	कॅप्टन एस.एच. शुल	२०.०१.१९९७	०९.०३.१९९७	प्र. आयुक्त
४७.	श्री. जोगळेकर	१०.०३.१९९७	०५.०९.१९९७	प्र. आयुक्त

८

इ.स. १९६० पासून १९९६ पर्यंत नगरपालिका होती. ऑक्टोबर १९९६ मध्ये उल्हासनगर शहराला महानगरपालिकेचा दर्जा मिळाला.

उल्हासनगर महानगरपालिका 'महापौर पद' भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकाल सन २००० पर्यंत –

अ.क्र.	नाव	आरक्षणाचा संवर्ग	कालावधी	
			पासून	पर्यंत
१.	श्री. गणेश रामचंद्र चौधरी	मागासवर्ग	०५.०४.९७	०६. ०४.९८
२.	श्रीमती यशस्विनी लहू नाईक	महिला	०६. ०४.९८	२०. ०४.९९
३.	श्री. कुमार उत्तमचंद आयलानी	सर्वसाधारण	२०. ०४.९९	०३. ०५.९९
४.	श्री. हरदास सन्मुखदास माखिजा	सर्वसाधारण	०३. ०५.९९	५.४.२००२

९

आजतागायत उल्हासनगरमधील महानगरपालिका स्थानिक कारभार पाहते.

उल्हासनगरात मुख्याधिकारी पद भूषविलेल्या अधिकाऱ्यांची नावे व त्यांचा कार्य कालावधीचा तपशील

अ.क्र.	नाव	कालावधी	
		पासून	पर्यंत
१.	श्री. जी. एन. तलरेजा	०४.०३.१९६८	१८.११.१९७६
२.	श्री. डी. एन. श्रुंगारपूर	१९.११.१९७६	१९.०९. १९७७
३.	श्री. के. एन. हजारे	०४.०४.१९७८	१२.१०.१९७८
४.	श्री. एल. बी. सालवी	१३.१०.१९७८	२२.०८.१९७९
५.	श्री. बी. एच. भाटे	२३.०८.१९७९	३०.०४.१९८१
६.	श्री. आर. व्ही. जोशी	०१.०५.१९८१	२८.०७.१९८१
७.	श्री. जे. एस. रिगे	२९.०७.१९८१	०७.०२.१९८२
८.	श्री. एन. टी. गुरुमुखी	०८.०२.१९८२	३१.०३.१९८४
९.	श्री. जे. एन. वालेकर	३१.०३.१९८४	१६.०६.१९८५
१०.	श्री. श्री. पी. बी. चानवानी	१७.०६.१९८५	०८.१०.१९८५
११.	श्री. एस. एस. देशमुख	०९.१०.१९८५	११.०७.१९८६

१२.	श्री. एम. एस. मुंडे	१४.०७.१९८६	३०.१२.१९८६
१३.	श्री. पी. बी. भंडारी	३०.१२.१९८६	२९.०६.१९८७
१४.	श्री. एस. वाय. रणदिवे	३०.०६.१९८७	१३.०७.१९८७
१५.	श्री. पी. बी. भंडारी	१४.०७.१९८७	१५.११.१९८७
१६.	श्री. एस. जे. खन्ना	१६.११.१९८७	०९.०३.१९८८
१७.	श्री. ए. ए. भिसे	१०.०३.१९८८	०२.०२.१९८९
१८.	श्री. बी. आर. कांबळे	०३.०२.१९८९	१३.०३.१९८९
१९.	श्री. व्ही. एम. अग्निहोत्री	१४.०३.१९८९	२०.०४.१९८९
२०.	श्री. आर. वाय. वंजारवाडकर	२१.०४.१९८९	०५.१२.१९८९
२१.	श्री. व्ही. एम. जोशी	०५.१२.१९८९	१५.०२.१९९०
२२.	श्री. बी. एन. माली	१६.०२.१९९०	०४.०४.१९९०
२३.	श्री. एस. डी. शिंदे	०५.०४.१९९०	३०.०४.१९९२
२४.	श्री. व्ही. सी. नांदगावकर	०१.०५.१९९२	०२.१२.१९९४
२५.	श्री. बी. जी. तुमडे	०५.०९.१९९४	१७.१०.१९९४
२६.	श्री. जे एन. थदानी	१८.१०.१९९४	१६.११.१९९४
२७.	श्री. बी. जी. तुमडे	१७.११.१९९४	०५.१२.१९९४
२८.	श्री. डी. एस. छ्वार	०५.१२.१९९४	२८.०८.१९९५
२९.	श्री. जे. एम. ढाकरे	२८.०८.१९९६	२१.१०.१९९९

१०

उल्हासनगर महानगरपालिकेत उपमहापौर पद भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकाळ–

अ.क्र.	नाव	कालावधी	
		पासून	पर्यंत
१.	श्री. कुमार आयलाणी	०५.०४.१९९७	०६.०४.१९९८
२.	श्री. कुमार आयलाणी	०६.०४.१९९८	२०.०४.१९९९
३.	श्री. धनंजय बोडारे	२०.०४.१९९९	०५.०४.२००२

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पद भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकाळ–

अ.क्र.	नाव	कालावधी	
		पासून	पर्यंत
१.	श्री. नरेंद्र रामचंद्र राजाणी	२४.०४.१९९७	३१.०३.१९९८
२.	श्री. प्रकाश पहलाजराय मखिजा	०६.०४.१९९८	३१.०३.१९९९
३.	सौ. भगवंती बी. रुपचंदाणी	२०.०४.१९९९	१८.०२.२००२
४.	श्री. ठाकूरदास बेहरानी	२५.०२.२०००	३१.०३.२०००

उल्हासनगर महानगरपालिका सभागृहनेता पद भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकाळ–

अ.क्र.	नाव	कार्यकाळ
१.	श्री. राजेंद्रसिंह भुल्लर	१४.०५.१९९८
२.	श्री. किशोर वनवारी	२०.०४.२०००

विरोधीपक्ष नेता हा अतिशय महत्त्वाचा घटक प्रशासनातील महानगरपालिकेतील त्या व्यक्तींची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील

उल्हासनगर महानगरपालिका विरोधी पक्ष नेता पद भूषविलेल्या व्यक्तींची नावे व त्यांचा कार्यकाळ–

अ.क्र.	नाव	कार्यकाळ
१.	श्रीमती ज्योती कालाणी	०५.०४.१९९७ ते १९९८
२.	श्रीमती ज्योती कालाणी	१४.०५.१९९८ ते १९९९
३.	श्री. भिमसेन मोरे	१९९९ ते २०००

उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त पद भूषविलेल्या अधिकाऱ्यांची नावे व त्यांचा कार्यकाळ–

अ.क्र.	नाव	कालावधी		भूषविलेले पद
		पासून	पर्यंत	
१.	श्री. पी.एम. बायस	२२.१०.१९९६	२०.१२.१९९६	प्रशासक आयुक्त
२.	श्री. आर. के. सोनावणे	२१.१२.१९९६	१९.०१.१९९७	आयुक्त
३.	श्री. एस. एच. एुळ	२०.०१.१९९७	०९.०३.१९९७	आयुक्त
४.	श्री. व्ही. एस. जोगळेकर	१०.०३.१९९७	२३.०४.१९९७	प्रभारी आयुक्त
५.	श्री. एस. एच. एुळ	२४.०४.१९९७	०५.०९.१९९७	आयुक्त
६.	श्री. व्ही. एस. जोगळेकर	०६.०९.१९९७	१५.०५.१९९८	प्रभारी आयुक्त
७.	श्री. एस. एच. एुळ	२०.१०.१९९७	१५.०५.१९९८	आयुक्त
८.	श्री. व्ही. एस. जोगळेकर	१६.०५.१९९८	२३.०८.१९९८	प्रभारी आयुक्त
९.	श्री. अ. द. काळे	२४.०८.१९९८	१९.१०.१९९८	आयुक्त
१०.	श्री. व्ही. एस. जोगळेकर	२०.१०.१९९८	१३.११.१९९८	आयुक्त
११.	श्री. अ. द. काळे	१४.११.१९९८	१९.१२.१९९८	आयुक्त
१२.	श्री. व्ही. एस. जोगळेकर	२०.१२.१९९८	३०.०१.१९९९	आयुक्त
१३.	श्री. अ. द. काळे	३१.०१.१९९९	१४.०७.१९९९	आयुक्त
१४.	श्री. टी. चंद्रशेखर	१५.०७.१९९९	१५.०१.२०००	आयुक्त

११

३) उल्हासनगर विधानसभा –

इ.स. १९५२ पासून उल्हासनगरात गोपालदास खानचंद १९५७ ला नेवंदराम विशनदास कॉंग्रेस, परचो विद्यार्थी १९६२ मध्ये सन्मुख इसरानी १९६७ ते १९७२ आणि १९७८ पासून १९८५ पर्यंत शीतलदास हरचंदानी जनता पार्टी आणि १९९० ते १९९९ सुरेश (पप्पू कलानी) कॉंग्रेस तर कधी स्वतंत्र असा संपूर्ण कार्यकाल विधानसभेचा दिसून येतो.

उल्हासनगरमधील मतदान ५० ते ६० प्रतिशतमध्ये होत असते. परंतु १९९९ मध्ये २५% मतदान झाले, ज्यामध्ये ६५% मत पप्पू कलानीच्या पक्षास मिळाले व पप्पू कलानीला ५६% मत मिळाले. ह्या दोन्ही मतदानाची स्थिती पाहता मतदान कमी झाले. मतदान जिंकलेले प्रत्यक्ष पप्पू कलानी हे मतदान जेलमध्ये राहून लढले. वर्ष १९९० पासून १९९९ पर्यंत विधानसभेतील मतदानात प्रतिद्वंदी भारतीय जनता पार्टीला ३०%हून कमी मतदान मिळाले.[१२]

मिलिट्री कॅम्पचे दोन हजार बॅरेक्स केंद्र व राज्य सरकारने खोल्यांमध्ये बदलले, एकतीस हजार खोल्यांमध्ये बदलण्यात आले. तेव्हा ते शरणार्थींना विभागण्यात आले. परंतु संपूर्ण कागदपत्रे आणि सनद अकरा हजार लोकांना मिळाली. उरलेले १९ हजार घरमालकांना सनद व मालकीचे कागदपत्र मिळालेच नाहीत. इ.स. १९६० पासून अवैध बांधकाम बनविण्याचे काम चालू होते. कारण सरकारी कार्यालयाकडून बांधकाम करण्यासाठी परवानगी लवकर मिळत नव्हती आणि १९७१/७४मध्ये तर अवैध बांधकाम सर्रासपणे वाढले. ८०% बॅरेक बिल्डींगमध्ये बदलण्यात आले. हे बांधकाम अवैध मानले जात होते. तरी त्यामध्ये पाण्याची तसेच वीज हे मात्र सरकारी विभागाद्वारे महानगरपालिकेकडून दिले जाते जी सरकारी विभागात आहे. पाण्याची लाईन विजेचे कनेक्शन, रेशनकार्ड, वोटर कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, आयडी ह्या सर्वांसाठी पुरावा लागतो तो म्हणजे राहण्याचे ठिकाण, टेलिफोन, मोबाईल कनेक्शन, बँक अकाऊंट, जन्म–मृत्यू प्रमाणपत्र ही सर्व कार्यालये स्थानिक प्रशासन, राज्य सरकार, केंद्र सरकार यांच्या अखत्यारित आहेत.[१३]

उल्हासनगर शहरातील जनता महानगरपालिकेच्या मतदानात मत देऊन आपला नगरसेवक निवडून आणतात आणि आपल्या समस्या सोडवितात. ह्या शहरासाठी दोन वेळा विकास आराखडा बनविण्यात आला. पहिला आराखडा इ.स. १९४८ मध्ये व दुसरा आराखडा इ.स.१९७४ मध्ये. परंतु तेथील स्थानिक जनतेच्या विरोधामुळे विकास आराखडा पुन्हा फेरबदल करण्यासाठी पाठविण्यात आला.[१४]

४) उल्हासनगर महानगरपालिका कार्यालय –

महानगरपालिका कार्यालय १७ सेक्शन आणि चोपडा कोर्ट मध्ये आहे. येथे स्थानिक कार्यालयामध्ये टॅक्स विभाग, जन्म–मृत्यू प्रमाणपत्र विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग, तोडफोड विभाग, पाणी विभाग, आरोग्य विभाग आणि इतर विभाग आहेत. तसेच महापौर, उपमहापौर, स्थायी समितीचे अध्यक्ष, म.न.पा. सचिव कार्यालये आणि इतर आठ समिती अध्यक्ष (सभापतीचे) कार्यालय आहे. तसेच विरोधी पक्ष आणि इतर पार्टीचे कार्यालय आहे. महानगरपालिकेच्या मागे ऑक्ट्राय कार्यालय, अग्निशामक दल कार्यालय तसेच जवळच पाणी कार्यालय, स्विमिंग पूल पण आहे. ह्या जागेवर पहिल्या मजल्यावर कामगार सहआयुक्त कार्यालय तसेच त्या कार्यालयात शहरातील दुकाने, कारखाने लायसन्स बनविले जातात. ह्याच कार्यालयाच्या अंतर्गत बालकामगारांना कामावर ठेवण्यावर कानूनी कारवाई केली जाते. त्याच्याजवळ चोपडा परिसरात कोर्ट कार्यालय (न्यायालय) आहे.[१५]

उल्हासनगर महानगरपालिका महाराष्ट्र राज्यातील मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली इत्यादी महानगरपालिकेशी तुलना करते परंतु स्थानिक विकास व आर्थिक विकास प्रक्रियेची तुलना करता आर्थिक विकासाची भूमिका प्रशंसनीय आहे. उल्हासनगर महानगरपालिकेतील महसूल उत्पन्नाचे मुख्य स्रोत आहे. १९६५ च्या महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्ह्यात १५ जून १९६६ पासून मुख्य परिषदेच्या नियंत्रणाखाली होते. बॉम्बे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट बॉम्बे महानगरपालिकेच्या कामकाजाच्या आधीन होते. प्रत्येक नगरपालिका परिषदेत निर्वाचित नगरसेवकांचा समावेश असतो. महानगरपालिकेतील निवडून आलेल्या सदस्याची मुदत पाच वर्षे आहे. प्रत्येक परिषदेची अध्यक्षपदाची निवड अध्यक्षाद्वारे केली जाते. प्रत्येक परिषदेचा उपाध्यक्ष असतो. ज्यास राष्ट्रपतींनी परिषदेच्या सदस्यामधून नामांकित केले असते. अध्यक्षांना आर्थिक आणि कार्यकारी प्रशासनात मार्गदर्शन करावे लागते आणि परिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यावर नियंत्रण ठेवावे लागते. परिषदेची कर्तव्ये अनिवार्य आणि पर्यायी विभागात विभागली जातात. आरोग्य आणि सुरक्षा सुविधा इत्यादी नागरिकांच्या आरोग्यासाठी आवश्यक सर्व बाबींचा समावेश आहे.

नगरपालिका परिषदेला करामधून उत्पन्न मिळते. तसेच राज्य सरकारकडून अनुदानदेखील दिले जाते. महाराष्ट्र नगरपालिका कायदा पास होण्यापूर्वी विभागीय आयुक्त

आणि राज्य सरकारमधील कलेक्टरचे नियंत्रण असते. महाराष्ट्र महापालिका अधिनियम पारित करण्याआधी नगरपालिकेवर नियंत्रण जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि राज्य सरकार यांच्याकडे होते. नगरपालिका प्रशासनाचे संचालक आताही असेच करतात. उल्हासनगर महानगरपालिका ही महाराष्ट्र राज्यातील लहान निगमापैकी एक आहे.

महानगरपालिका आणि नगरपालिका परिषद ठाणे जिल्हा २००१

महानगरपालिका	लोकसंख्या	नगरपालिका परिषद	लोकसंख्या
ठाणे	१२,६२,५५१	वसई	४९,३३७
कल्याण डोंबिवली	११,९३,५१२	विरार	१,१८,९२८
नवी मुंबई	७,०४,००२	नालासोपारा	१,८४,५३८
उल्हासनगर	४,७३,७३९	डहाणू	४४,४०१
भिवंडी निजामपूर	५,९८,७४१	पालघर	५२,६७७
मिरा भाईदर	५,२०,३८८	जव्हार	११,२९८
		नवघर – मणिकपूर	१,१६,७२३
		कुळगाव बदलापूर	९७,९४८
		अंबरनाथ	२,०३,८०४

Source : Report on Urban Bodies all India institute of local Self Government, Mumbai 2004

२००१ च्या जनगणना अहवालानुसार ठाणे जिल्ह्याच्या अधिपत्याखाली सहा महानगरपालिका आहेत. त्यामध्ये ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी निझामपूर आणि मीरा भाईंदर महानगरपालिका आहे. नऊ नगरपालिका परिषद आहेत. वसई, विरार, नालासोपारा, डहाणू, पालघर, जव्हार, नवघर, मणीकपूर, कुळगाव, बदलापूर आणि अंबरनाथ एकूणच ठाणे जिल्ह्यातील नागरी शासनाची भूमिका महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यापेक्षा शक्तीशाली आहे.[१६]

उल्हासनगर महानगरपालिका लोकसंख्यावाढ :

२००१ मध्ये उल्हासनगर शहराची लोकसंख्या ४,७२,९४३ इतकी आहे. १९५१ पासून उल्हासनगरातील आर्थिक आणि शहरी वाढ जलद झाली. १९९१-२००१ च्या दरम्यान दशकातील लोकसंख्या वाढ २८.४४ आहे. १९८१-१९९१ च्या लोकसंख्या वाढीच्या तुलनेत ३४.७७ इतकी घट झाली आहे. समाजाच्या आर्थिक विकासासाठी सकारात्मक असल्याचे दर्शविते. तथापि १९७१-८१ दरम्यान ६३ टक्के आणि १९६१-७१ ही ५७ टक्के होती. जे लोकसंख्येचा प्रवाह दर्शविते. १९५१-६१ दरम्यान उल्हासनगर शहराची लोकसंख्या ३३ टक्के वाढली.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत १३३४ हेक्टर क्षेत्र जमिनीचा वापर दर्शविणारे आहे. त्याचे दोन विभाग पडतात. विकसित क्षेत्र व अविकसित क्षेत्र होय. विकसित क्षेत्रासह निवासी क्षेत्र (५४ टक्के) व्यावसायिक क्षेत्र (४.३) वाहतूक क्षेत्र (७.७७ टक्के) सार्वजनिक उद्देश क्षेत्र (४.५३टक्के) सार्वजनिक उपयोगिता क्षेत्र (१.८२ टक्के) आणि खुली जागा, बाग इत्यादी (१.०९ टक्के) त्यात समाविष्ट १०८५.२० हेक्टर क्षेत्र (८१.३५टक्के) शिल्लक २४८.८ हेक्टर क्षेत्र (१८.६५ टक्के) दर्शविते. अविकसित क्षेत्र मुक्त रिक्त जमीन, जलसंस्था संरक्षणव्याप्त जमिन अशाप्रकारे उल्हासनगरव्याप्त जमीन संदर्भात माहिती दर्शविते. पुढील तक्त्यात उल्हासनगर जमीनव्याप्त तक्ता क्षेत्र हेक्टर व टक्के पुढीलप्रमाणे सांगता येईल.

उल्हासनगर महानगरपालिका जमीनव्याप्त विभाग २००१

विकसित क्षेत्र	क्षेत्र हेक्टर	टक्के
निवासी क्षेत्र	७२१.४	५४.०८
व्यावसायिक हेतू	५७.३५	४.३
औद्योगिक हेतू	१०३.३७	७.७५
वाहतूकीसाठी वापर	१०३.७१	७.७७
सार्वजनिक हेतू	६०.४६	४.५३
सार्वजनिक उपयोगिता	२४.३३	१.८२

खुली जागा, बाग इ.	१४.५८	१.०९
एकूण	**१०८५.२**	८१.३५
अविकसित क्षेत्र		
रिक्त जागा	२१९.५	१६.४५
पाणी संस्था	११.६	०.८७
संरक्षण जमीन	१७.७	१.३३
एकूण	**२४८.८**	**१८.६५**
एकूण	**१३३४**	

आरोग्य सुविधामध्ये रुग्णालये आरोग्य केंद्रे आहेत. उल्हासनगरमधील वैद्यकीय सुविधा खालीलप्रमाणे आहेत.

उल्हासनगरमधील सरकारी आणि खाजगी रुग्णालये पुढीलप्रमाणे

१) रुग्णालये

- केंद्रीय रुग्णालय – उल्हासनगर ३
- सरकारी मातृत्व रुग्णालय – उल्हासनगर ४
- इ.एस.आय.एस. रुग्णालय – उल्हासनगर २

२) चॅरिटेबल ट्रस्ट रुग्णालय

- भगवानदास रुग्णालय – उल्हासनगर ५
- महेश्वरी रुग्णालय – उल्हासनगर ५
- शीला एन जागीयासी – उल्हासनगर ३
- स्वामी सर्वानंद रुग्णालय – उल्हासनगर ५
- डॉ. सतरामदास रुग्णालय – उल्हासनगर ४

- सेंच्यूरी रेयॉन रुग्णालय – उल्हासनगर ३
- महालक्ष्मी नर्सींग होम – उल्हासनगर ३
- केवलाराम रुग्णालय – उल्हासनगर ३

३) ४१ खाजगी रुग्णालय – उल्हासनगर क्षेत्र

एकूण ५२ रुग्णालय – उल्हासनगर क्षेत्र

Source - Health Department documentation of UMC.

१) दवाखाना : सरकारी, खाजगी, नगरपालिका, ट्रस्ट

२) दवाखाना : खाजगी, महापालिका

३) मातृत्व होम, खाजगी, ट्रस्ट महापालिका

उल्हासनगर महापालिकेत तीन सरकारी रुग्णालये असून ३५० खाटांची संख्या असून सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. आठ रुग्णालये चॅरिटेबल ट्रस्ट असून २१७ खाटांची संख्या आहे. ४१ रुग्णालये खाजगी असून ५३८ खाटांची संख्या आहे आणि एक दवाखाना महापालिका प्राधिकरण चालवतो. यापैकी बहुतेक रुग्णालये मुख्य रस्त्यावर असून रस्ते व्यस्त आहेत. शहरातील आरोग्यसेवेची उपलब्धता म्हणजे एकूण ५२ रुग्णालये ज्यांची खाटांची क्षमता ११०५ आहे. उल्हासनगर शहरातील निवासीसाठी ही आरोग्य सुविधा उपलब्ध आहे.[१७]

उल्हासनगर महानगरपालिका उत्पन्नाचे स्रोत तीन विभागात विभागले गेले आहे. त्यामध्ये पहिला विभाग हा उत्पन्न महसूल खाते महापालिका कर पासून महसूल, मालमत्ता कर, ऑक्ट्रॉय ड्यूटी, एस्कॉर्ट फी, पाणी बिल भाड्याने किंवा रिक्त भूखंड पासून मिळणारे उत्पन्न, महापालिका रुग्णालये आणि क्लिनिक पासून उत्पन्न परवाना शुल्क देखील समाविष्ट आहे. बांधकाम विभाग, ग्रंथालय शुल्क इतर फी जसे जन्म, मृत्यू प्रमाणपत्र फी ड्रेनेज कनेक्शन फी महत्वाचा स्रोत म्हणजे सरकारी अनुदान पासून मिळणारे उत्पन्न. दुसरा विभाग मिळकत बाजूला महसूल समाविष्ट आहे. उदा. विशेष योजनेसाठी अनुदान जमिनीखाली ड्रेनेज योजनेअंतर्गत रहिवाशांकडून कर्ज वसूल करणे. झोपडपट्टी अनुदान इत्यादी तिसरा विभाग गुंतवणूकी आणि

बचत खात्यातील भविष्य कर्मचारी निधी, बचत खाते, कर्मचारी कल्याण निधीसारखे विशेष निधी, विकास निधी विविध ठेव पासून उत्पन्न, लायब्ररी ठेव, पाणी पुरवठा कनेक्शन ऑक्ट्राय ठेव, ड्रेनेज कनेक्शन ठेव, शिक्षण शुल्क कर अधिभार इत्यादी. त्यापैकी कर वसूली प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष विविध स्रोत जसे की, शुल्काची कमाई, गुंतवणूकीवरील महापालिका मालमत्ता व्याज, सरकारी अनुदान आणि कर्ज घेण्याची साधने वास्तविक अर्थाने उत्पन्नाचा स्रोत आहेत आणि उर्वरित गोष्टी खात्याच्या उद्देशासाठी असतात.[१८]

अशी विविध कार्यालये महानगरपालिकेच्या अखत्यारित येतात.

उल्हासनगर शहराच्या आजही अनेक अशा समस्या आहेत. बेसुमार लोकसंख्या, रस्ते, वीज, पाणी या मूलभूत सोयी–सुविधांचा अभाव आहे. शहराचे क्षेत्रफळ ४५४ हेक्टर पहिल्या इतकेच आहे. त्यात कोणताही बदल नाही. उल्हासनगर कॅम्प नं. १ पासून ५ पर्यंत कॅम्प विभागून आहेत. पण वेगळे नाहीत. गेल्या ५० वर्षात केंद्र सरकार, राज्य सरकार, नगरपालिका, महानगरपालिका यांचे शासन प्रशासनाद्वारे जमीन जास्त मिळावी यासाठी प्रयत्न केला गेला नाही.[१९]

५) उल्हासनगर उपनगरासाठी महत्त्वाचे योगदान दिलेल्या व्यक्ती –

A. चक्रवर्ती राजगोपालाचारी (१० डिसेंबर, १८८७ ते २५ डिसेंबर, १९७२) –

राजगोपालचारी यांचा जन्म १० डिसेंबर १८८७ मध्ये दक्षिण भारतातील सलेम जिल्ह्यात थोरापल्ली गावामध्ये तमिळ ब्राह्मण परिवारात झाला. ते 'राजाजी' या नावानेदेखील ओळखले जात असत. वकील, लेखक व राजनीती तज्ञ होते. स्वतंत्र भारताचे पहिले व अंतिम गव्हर्नर जनरल होते. १० एप्रिल, १९५२ ते १३ एप्रिल, १९५४ पर्यंत मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री होते. २१ जून, १९४८ ते २६ जानेवारी, १९५० पर्यंत ते 'गव्हर्नर जनरल' या पदावर कार्यरत होते. ८ ऑगस्ट, १९४९ रोजी गव्हर्नर जनरल राजगोपालचारी यांच्या हस्ते उल्हासनगर महानगराची स्थापना झाली.[२०]

B. आचार्य कृपलानी (११ नोव्हेंबर १८८८ ते १९ मार्च १९८२) –

भारतातील स्वातंत्र्य संग्रामातील सेनानी होते. गांधीवादी, समाजवादी, पर्यावरणवादी राजनेता हेाते .त्यांचे वास्तविक नाव जीवटराम भगवानदास होते. सन १९४७ मध्ये ते भारतीय

राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. प्रधानमंत्री होण्यासाठी काँग्रेसमध्ये मतदान झाले. त्या वेळी सरदार पटेल यांच्यानंतर सर्वात अधिक मत त्यांना मिळाले. परंतु गांधींनी सांगितल्यामुळे सरदार पटेल आणि आचार्य कृपलानी यांनी आपली नावे मागे घेतली आणि जवाहरलाल नेहरूंना प्रधानमंत्री बनविले.

आचार्य कृपलानी यांचा जन्म हैदराबाद (सिंध)तील उच्च मध्यमवर्गीय परिवारात .सन १८८८ मध्ये झाला. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमधून इंग्रजी आणि इतिहासाचे प्राध्यापक बनून अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी 'विजिल' नावाचे साप्ताहिक पत्र सुरू केले. कृपलानी यांनी १९७७ मध्ये जनता सरकारबरोबर महत्त्वाची भूमिका बजावली. कृपलांनी गांधीवादी दर्शनचे एक प्रमुख व्याख्याता होते. त्यांनी पुस्तके लिहिली.[२१]

सन १९४७ मध्ये आचार्य कृपलानी काँग्रेसच्या राष्ट्रीय पदावर विराजमान होते. स्वतंत्र भारताच्या अन्य प्रांताचे ते यात्रा करत होते. त्या वेळी ते सिंध प्रांतात गेले. जिथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. स्वतंत्र भारतातील पापरूपी पाकिस्तानात सिंधींचे हाल ऐकून त्यांनी काँग्रेसच्या राजनैतिक भाषेतून बोलले. ''काँग्रेस पार्टीने देशाची सेवा केली. आम्ही अखंड भारताच्या आजादीसाठी लढलो म्हणून आम्हाला जेवढे दुःख विभाजन आणि सिंधचे नाव बदलून पाकिस्तान होणार या एका कारणाने ह्याहून अधिक दुःख कोणाला नाही होणार.''[२२]

C. अमरजी ठाकूर – वरिष्ठ समाजसेवी, संस्थापक – मोनार्क युनिव्हर्सल

अमरजी ठाकूर यांनी व्यावसायिक दृष्टिकोनातून व्यापार प्रस्थापित केला. नंतर विभिन्न समाजसेवी संस्थांद्वारे प्रेम, सद्भावना याद्वारे मदत करण्यास सुरुवात केली. 'ग्लोबल सिंधी वेलफेअर असोसिएशन', 'सिंधू सेवा संस्थान' आणि 'एन.ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट' मार्फत समाजातील गरिबांसाठी वैद्यकीय सेवा, मुलांसाठी शिक्षण, अनाथ आश्रमासाठी आर्थिक मदत करतात.

ग्रामीण भागात जिथे औषधोपचार, मेडिकल कॅम्प, लावून लोकांसाठी मोफत सुविधा देण्यात आल्या. कला–साहित्य क्षेत्रातील व्यक्तींचा सन्मान करून त्यांना प्रेरणा देण्यात आली. 'सर्वधर्म समभाव' यासाठी सण–उत्सवाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. लोकांची निःस्वार्थ सेवा आणि दुःखी, गरीब जनतेची सेवा ज्यामधून समाजाची उन्नती होऊन

सामाजिक, धार्मिक प्रगती होईल याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले, हे त्यांचे कार्य अखंड चालू आहे.[२३]

D. अशोक खटुजा – सामाजिक कार्यकर्ता

सिंधी समाजाचे अशी व्यक्ती ज्यांनी निःस्वार्थ सेवा केली. इ.स. १९८७ पासून ते आजपर्यंत त्यांनी ४०० ब्लड डोनेशन कॅम्प करून हजारो व्यक्तींना रक्तदान शिबिराद्वारे जीवनदान देण्यात आपले योगदान दिले आहे. महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे त्यांना सन्मानित केले आहे. आज पण निःस्वार्थ सेवेसाठी ते ओळखले जातात. उल्हासनगर कॅम्प नं. ५ मध्ये राहतात.

E. श्री कुमार आयलानी – उल्हासनगर शहराचा विकासासाठी समर्पित व्यक्ती –

स्वतंत्र भारतात जन्म १६.१२.१९५९. श्री. कुमार आयलानी यांचा परिवार देश विभाजनानंतर सिंध (पाकिस्तान) प्रदेश सोडून हिंदू सिंधी शरणार्थींच्या रुपात भारतातील महाराष्ट्रात, उल्हासनगरमध्ये स्थायिक झाला. त्यांचे शिक्षण दहावी, आय.टी.आय.चे तीन वर्षे तांत्रिक शिक्षण. पण पुढे परिवाराची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध क्षेत्रात कार्य केले. इलेक्ट्रॉनिकच्या दुकानामध्ये ऑडिओ, व्हीडिओ क्षेत्रातील शहरातील पहिली व्यक्ती बनली. नंतर बिल्डींग कन्स्ट्रक्शन क्षेत्रात प्रवेश केला. १९८८ ते १९९३ या काळात लोणावळा येथे राहून धीरज हॉटेल सुरू केले.

सन १९९३ मध्ये आपली कर्मभूमी उल्हासनगरात समाजसेवा करण्यासाठी उल्हासनगर शहरात विभिन्न समाजसेवी संस्थांमध्ये समाजसेवा कार्य सुरू केले. सामाजिक आणि राजनैतिक कार्य करून जीवनात सन १९९७ मध्ये उल्हासनगरातील २५ नंबर वॉर्ड यातून नगरसेवक म्हणून जिंकून आले.

पहिल्याच वर्षी उपमहापौर बनण्याचा मान त्यांना त्यांच्या काळात मिळाला. मुख्य बाजार उल्हासनगर–४ तसेच नेहरू चौक ते गोल मैदानपर्यंत सिमेंट–कॉंक्रिट रोड बनविले.

नगरसेवक पदापासून उपमहापौर तसेच महापौर आणि आज उल्हासनगर शहरातील विधायक रुपात अजून आपले कार्य करीत आहेत. जनतेची सेवा करणे हे त्यांचे ध्येय आहे.[२४]

F. श्री. मल्हारी वामनराव भावार्थे –

श्री. मल्हारी वामनराव भावार्थे एक अशी व्यक्ती जिचे पूर्ण जीवन परमार्थ आणि सर्वांना कामाला येणारे, अथवा कार्य संपूर्ण करण्यासाठी दिवसरात्र मदतीसाठी असणारी व्यक्ती, अशी ओळख. त्यांनी लोकांना तन, मन, धन यथाशक्ती साहाय्यता केली. मुरबाड तालुक्यातील प्रथम ग्रॅज्युएट व्यक्ती. इ.स. १९६३ मध्ये कलेक्टर श्री. एस.एस.तीनईकर यांच्या बरोबरीने कलेक्टर कार्यालयात कार्याला सुरुवात केली. बंदुकीचे लायसन्स, सिनेमा–नाटकाचे परमिशन, पासपोर्ट, फटाके तसेच सिमेंटसाठी मदत, अशा अनेक कामात मदत करण्यासाठी स्थानिक उल्हासनगरातील व्यक्तींना मदत केली. वडिलांच्या मृत्युनंतर काकांनी आंबो तुकाराम भावार्थे यांनी त्यांचे पालनपोषण केले. पूर्ण परिवार पहिला एकत्र होता १९६५ नंतर सर्व वेगळे झाले.

उल्हासनगर शहरातील पहिला नगरसेवक मतदानाच्या वेळी कलेक्टर कार्यालयातून श्री. तीनईकर साहेबांनी एक गट ज्यामध्ये श्री. मल्हारी वामन भावार्थे यांच्याबरोबर नगरपालिकेतील प्रथम नगरसेवक मतदान पूर्ण झाले. ज्यात सोळा नगरसेवक जिंकून आले.

नागरिकांच्या मूलभूत सेवेसाठी त्यांनी कार्य केले. यांनीच उल्हासनगर शहरातील सिंधी समाजासाठी निःस्वार्थ सेवा केली आहे. आज ते आपल्या शेतात अनेक प्रकारचे आधुनिक संशोधन करतात. ज्यासाठी त्यांना महाराष्ट्र सरकारने 'शेतीनिष्ठ ॲवॉर्ड' सन्मान देऊन सन्मानित केले. हा सन्मान इ.स. १९७३ मध्ये गव्हर्नर ऑफ महाराष्ट्र सरकारातील हंगामी चीफ जस्टीस यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक होते.

प्रशासनाने जनतेला सोयी, सुविधा मिळवून देणे शासनाचे कर्तव्य आहे. शहराची दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या व त्यानुसार आवश्यक मूलभूत सुविधा मिळविण्यासाठी योजनांची अंमलबजावणी होणे हे सरकारचे कार्य आहे. जे उल्हासनगर सुरुवातीला जंगल होते, त्याला औद्योगिक शहर बनविण्यासाठी ५० वर्षे लागली.[२५]

G. श्री. सन्मुख इसरानी –

इ.स. १९६७ व १९७२ दोन वेळा प्रत्यक्ष विजयी विधानसभेत काँग्रेस पक्षाचे अतिशय साधी राहणी व्यक्तिमत्त्व, हसतमुख जनतेची मने जिंकणारा काम करण्यास तत्पर श्रीमंतही होते. उल्हासनगरमध्ये स्वतःचे आर.सी.सी.चे घर असणारा एकमेव आमदार. वॉको रेडिओचा

कारखाना असणारा माणूस. त्या काळात सर्वच बराकी होत्या. एकही घर उल्हासनगरमध्ये नव्हते इसरानी सोडून मदत करण्यास आजारी माणसांना तत्पर असे.

H. कै. परचो विद्यार्थी

उल्हासनगर विधानसभेत इ.स. १९६२ मध्ये विजयी. राजनैतिक दल फॉरवर्ड ब्लॉक सामान्य माणसासाठी त्याचे काम करणारे ते झाले नाही, तर स्वतः जातीने लक्ष देणारे सामान्य माणसाला न्याय देणारे नेहरू चौकात त्याचे कार्यालय होते. रस्ता रुंदीकरण यामध्ये ते पाडले गेले. सामान्य जनता त्यांचे मागे असायची. राहणी अत्यंत साधी होती. दिवसभर पायी फिरणे, समस्या सोडविणे असा हा आमदार कायम जनतेच्या स्मरणात आहे.

I. श्री. शितलदास हरचंदानी –

शितलदास हरचंदानी उल्हासनगर विधानसभेत १९७८ व १९८० दोन वेळा निवडून आले ते जनसंघ जनता पार्टीचे होते. त्यांनी एका सहकारी बँकेची स्थापना केली.[२६]

उल्हासनगर प्रशासनात अशा व्यक्तीने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कार्यभार पाहिला. त्यांचे योगदान हे अतिशय महत्त्वाचे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची संक्षिप्त लोकसंख्या बदल पुढीलप्रमाणे –

	श्रेणी	वर्ष (१९९१)	वर्ष (२००१)
१.	विभाग स्क्वेअर किलोमीटर	१३.३४	१३.३४
२.	लोकसंख्या	३,६८,८२२	४,७२,९४३
३.	छुरुष	१,९३,६४७	२,५१६१०
४.	स्त्रिया	१,७५,१७६	२,२१,३३३
५.	एकूण साक्षरता	२,४४,३४४ (६६.२४%)	३,५७,४१५ (७५.५७%)
६.	स्त्री साक्षरता	१,३८,६३७ (७१.५९%)	२,०१,६३३ (८०.१४%)

७.	पुरुष साक्षरता	१,०५,७०७ (६०.३४%)	१,५५,७८२ (७०.३८%)
८.	घराची मागणी	७३,८१५	८३,४६०
९.	एकूण कामगार	१,११,९७३	१,५५,१६८
१०.	पुरुष कामगार	१,०२,९९६	१,३६,७७०
११.	स्त्री कामगार	८,९७७	१८,३९८
१२.	घनता प्रति हेक्टर	२७७	३५५
१३.	लिंग गुणोत्तर (१०००)	९०५	८७९.६७
१४.	लोकसंख्या वाढीचा दर	३४.७७	२८.४४
१५.	साक्षरता प्रमाण (टक्के)	६६.२५	८६.०७
१६.	पुरुष साक्षरता प्रमाण (टक्के)	७१.५९	९१.२०
१७.	स्त्री साक्षरता प्रमाण (टक्के)	६०.३४	८०.२३

जनगणना अहवाल महाराष्ट्र १९७१,१९८१,१९९१,२००१ [२७]

संदर्भ सूची

१. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' पुस्तक का दुसरा भाग २०१३, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. १९

२. तत्रैव पृष्ठ क्र. ११६, ११७

३. कोचरेकर संजय 'पन्नाशीतली उल्हासनगरी', रविवार नवशक्ती१५ ऑगस्ट, १९९९, पृष्ठ क्र. १

४. महानगरपालिका – Wikipedia - https:// googleweblight.com

५. बठेजा घनश्याम, उ. नि. पृष्ठ क्र. ११८

६. मामलेदार कल्याण कार्यालय, तत्रैव पृष्ठ क्र. ७२, ७३

७. बठेजा घनश्याम, उ. नि. पृष्ठ क्र. ११९

८. उल्हासनगर महानगरपालिका सचिव कार्यालय

९. उल्हासनगर महानगरपालिका सचिव कार्यालय

१०. उल्हासनगर महानगरपालिका सचिव कार्यालय

११. बठेजा घनश्याम, 'हमारा शहर उल्हासनगर' पुस्तक का पहला भाग २०१२, श्री प्रकाशन, पृष्ठ क्र. ४९, ५०, ५१

१२. बठेजा घनश्याम, २०१३, उ. नि. पृष्ठ क्र. १५३

१३. तत्रैव पृष्ठ क्र. ९५, ९७

१४. तत्रैव पृष्ठ क्र. १२०

१५. बठेजा घनश्याम, २०१२, उ. नि. पृष्ठ क्र.E

१६. Report on Assessment of the impact of the 74th Constitutional Act: "Ministry of Urban Development Govt. of India, New Delhi, 2004"

१७. Report, Development plane for Ulhasnagar, Ambernath, Kulgaon-Badlapur and surrounding Notified Area 1996-2016, Kalyan 2000.

१८. Budget of Ulhasnagar Municipal Corporation.

१९. बठेजा घनश्याम, २०१३, उ. नि. पृष्ठ क्र. ११०, १११

२०. चक्रवर्ती राजगोपालाचारी विकीपिडीया – https//hi.m.wikipedia.org

२१. आचार्य कृपलानी – Wikipedia - https:// googleweblight.com

२२. बठेजा घनश्याम, २०१२, उ. नि. पृष्ठ क्र. ३३

२३. बठेजा घनश्याम २०१३, उ. नि. पृष्ठ क्र. १२९, १३०

२४. तत्रैव पृष्ठ क्र. ११३, १३७

२५. बठेजा घनश्याम, २०१३, उ. नि. पृष्ठ क्र. १७०, १७२, १७३

२६. मौखिक इतिहास स्त्रोत – प्रत्यक्षात त्या व्यक्तीसोबत कार्यरत व वावरत असलेले श्री. मल्हारी वामनराव भावार्थे

२७. जनगणना अहवाल महाराष्ट्र १९७१,१९८१,१९९१,२००१

प्रकरण – ७

समारोप

सिंधू संस्कृती ही भारतातील प्राचीन संस्कृतीतील महत्त्वाची संस्कृती. सिंधू नदीच्या काठावर या संस्कृतीचा उगम झाला. सिंधू नदीचा उल्लेख ऋग्वेदात सर्वात मुख्य व महत्त्वाची नदी म्हणून केला आहे. महाभारतात अनेक प्रदेश व जनपदे यांची नावे आढळतात. त्यात 'सिंधू–सौवीर' संयुक्त उल्लेख आहे. सिंधू देशाच्या लगत पूर्वेकडील प्रांताला 'सौवीर' म्हणत असत. सध्याचा सिंध प्रदेश पूर्वीही 'सिंधू प्रदेश' म्हणून ओळखला जात असे. प्राचीन सिंधू देश हा भारताच्या वायव्य भागात आहे. सिंध प्रांत हा भारतातील महत्त्वाचा प्रांत म्हणून ओळखला जातो. परंतु १९४७ साली भारताची फाळणी झाली. त्याचा परिणाम सिंध प्रांत पाकिस्तानात गेला. लाखभर हिंदू पाकिस्तान सोडून भारतात आले. त्या वेळी निर्वासितांसाठी अनेक कॅम्प सरकारकडून मदत स्वरुपात वसविण्यात आले होते. त्यापैकी कल्याणजवळील उल्हासनगर हा एक विभाग होय.

'उल्हासनगरमधील सिंधी समाजाचा आर्थिक व सामाजिक इतिहास इ स १९४७ ते २०००' हे माझ्या प्रबंधाचे शीर्षक. सिंधी समाज जो उल्हासनगरमध्ये वसविण्यात आला त्या आधी त्या जागेत मिलिट्रीचे बॅरेक होते, जे रिकामे करण्यात आले होते आणि मोकळी जागा, घनदाट जंगलाने वेढलेली होती. त्याठिकाणी सरकारकडून पुनर्वसन करण्यात आले. सर्वात पहिली उल्हासनगरात येणारी पिढी अस्तित्वात नाही. आहेत. ते फक्त बोटावर मोजण्याइतपत दोन–तीन व्यक्ती. दुसरी पिढीदेखील फारशी नाही. तिसरी पिढी सध्या उल्हासनगरात आढळते. ८ ऑगस्ट, १९४९रोजी श्री. सी. राजगोपालाचारी, गव्हर्नर जनरल यांनी 'उल्हासनगर' हे नाव दिले. उल्हास नदीच्या नावावरून 'उल्हासनगर' हे नाव ठेवण्यात आले. उल्हासनगर हे कल्याण तालुक्यात, ठाणे जिल्ह्यात व मुंबई राज्यात आहे. कल्याणमधून नियमित उपनगरीय रेल्वेसेवा उपलब्ध आहे. ह्या सर्व सोयीमुळे उल्हासनगर हे मुख्य रस्त्याशी जोडले गेले आहे.

१३ किलोमीटरवर वसलेले उल्हासनगर सुरुवातीला पहिले कल्याण मिलिट्री नावावरून ओळखले जात असे. तो कॅम्प सिंधी शरणार्थींना खुला करून देण्यात आला. सिंध प्रांत पाकिस्तानात गेल्यानंतर सिंधी भारतीय भूभागावर जे सामान हातात येईल ते बरोबर घेऊन

आले. परंतु मोठ्या प्रमाणावर लूटमार करण्यात आली. हजारो माणसे मृत्युमुखी पडली. जमिनीमार्गाने येणारे सिंधी समाजाचे लोक गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यात स्थायिक झाले. जलमार्गाने आलेला सिंधी समाज मुंबई बंदरावर येऊन मुंबईतील इतर भागात स्थायिक झाला .असंख्य परिवार पुणे, कोल्हापूर, सोलापूर यासारख्या शहरात स्थायिक झाले.

सिंधी शरणार्थींना सरकारकडून काही महिन्यांपर्यंत बनलेले तयार जेवण दिले जात असे. नंतर सरकारकडून प्रत्येक व्यक्तीला रेशनकार्ड बनवून रेशन देण्यात आले.त्या रेशनकार्डवरुन रेशन दिले जात असे. ज्यादिवशी ते दिले जात असे त्या दिवसाची तारीख नोंद केली जात असे. मातृभूमीपासून दूर झालेले दुःखी सिंधी समाजाचे लोक कामाच्या शोधासाठी बाहेर जाऊ लागले. रोजगार मिळवू लागले. छोटे व्यवसाय सुरू केले. जवळपासच्या गावात जाऊन सामान विकत असत. अशा रितीने सिंधी समाजाने स्वतःला रोजगार प्राप्त करून घेतला.

उल्हासनगर एक नंबर पासून पाच नंबर कॅम्पपर्यंत विभागून असले तरी ते एकत्रच आहे. पश्चिम पाकिस्तानातून निर्वासितांचे लोंढे भारतात आले. त्यातील काही उल्हासनगरमधील शहर वसाहत छावणीत वसविण्यात आले. हा निर्णय केंद्रशासनाचा होता. इ.स. १९६६ ते १९७१ या कालावधीत अतिक्रमणाचा सर्व्हे करून सर्व्हे खात्यामार्फत अनधिकृत बांधकामे निदर्शनास आली. विस्थापितांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत सनद देणे या बाबत शिफारस करण्याकामाबाबत छाननी समितीची नियुक्ती केली. उल्हासनगर शहर वसाहतीचा विकास आराखडा १९४७ मध्ये अंमलात आला. केंद्रशासनाने निर्वासितांच्या पुनर्वसनाचे उर्वरित काम १ ऑगस्ट, १९७१ पासून संबंधित राज्य सरकारकडे सुपूर्द केले. उल्हासनगर ह्या शहराचा विकास हळूहळू झाला. व्यापारात प्रगती केलेली आढळते. भारत देशात राहणाऱ्या संपूर्ण सिंधी समाजाला ते एका हरिद्वाराच्या रुपात दिसते. खरेदीसाठी पहिली आवड उल्हासनगर असते. म्हणून उल्हासनगरला 'मिनी भारत' व 'मिनी जपान' या नावाने ओळखले जाते.

उल्हासनगरच्या आर्थिक जीवनाबाबत त्यांना सरकारकडून मिळालेल्या सुविधांवर अवलंबून राहावे लागले. सरकारने बेघरांना सोयी देण्याकरिता लक्ष केंद्रित केले. सिंधी लोक

पूर्वीपासून व्यापारी असल्यामुळे त्याचे कौशल्य उद्योग–व्यवसायात होते. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तयारी सुरू केली होती. सिंधी समाज व्यापारी असल्याने मुंबई हे निवासस्थान असावे, जिथे त्यांना व्यापाराकरिता संधी उपलब्ध होईल. पण सरकार असाहाय्य होते. त्यामुळे त्यांना उल्हासनगरात व्यवसाय–उद्योग करण्यास समजावले. रहिवाशांना उपजिविकेसाठी काहीतरी करावे लागले. त्यांना दुकाने, सेवाकेंद्रे उपलब्ध झाली. लहान उद्योग, उत्पादन केंद्रांची संख्या वाढू लागली. याचा परिणाम असा झाला की, हे उपनगर औद्योगिक क्षेत्रात एक केंद्र म्हणून सिध्द झाले.

सुरुवातीला निर्वासितांच्या कामाची निश्चित अशी वेळ व अटी नव्हत्या. सकाळपासून ते रात्री उशीरापर्यंत सक्रिय होते. नोंदणीकृत कारखाने, सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था सोडल्या तर इतर सर्व कामाच्या ठिकाणी मालकाची इच्छा व मागणीनुसार काम करावे लागत असे. सहकारी संस्था निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले जाते. सिंधी लोक प्रामुख्याने व्यापारी वर्गातील असल्यामुळे सरकारने उपनगरात स्वतः क्रमवार व्यापार केंद्र स्थापन करून प्रोत्साहन दिले. त्यासाठी कर्ज मंजुरी दिली. व्यवसायासाठी कर्ज, भाडेतत्त्वावर दुकाने उपलब्ध करून दिली. दुकाने काही मुख्य रस्त्यालगत तर काही तात्पुरती स्वरुपाची होती. ग्राहकोपयोगी वस्तू वाजवी दरात उपलब्ध होत्या. शेजारील शहरी भागातील अनेक लोक खरेदी केंद्र म्हणून उल्हासनगरकडे आकर्षिले गेले. कारण येथील माल तुलनात्मकरीत्या इतर ठिकाणापेक्षा अधिक स्वस्त उपलब्ध होता. व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे आणि नारी सेवा सदन उत्पादन केंद्र संलग्न आहेत. नारी सेवा सदनतर्फे सुईकाम, भरतकाम, पापड बनविणे, हातमाग इत्यादी उत्पादन केंद्रे आहेत. ते कोणत्याही नफ्यावर नाही.

उल्हासनगरच्या आर्थिक जीवनात रेल्वे स्टेशनचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. सुरुवातीला प्रथम कल्याण रेल्वे स्थानक होते. अंबरनाथ रेल्व स्थानकाचाही लाभ निर्वासितांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी झाला. प्रत्यक्षात उल्हासनगर उपनगराचा फायदा व महत्त्व कल्याण जंक्शनलाही झाला.दुसरे स्टेशन, शहाड, उल्हासनगर, विठ्ठलवाडी आणि अंबरनाथ स्टेशनही सेवा देतात, हे त्याचे एक अद्वितीय वैशिष्ट्य आहे.

जून १९५७ मध्ये 'द सिंध नॅशनल बँक लिमिटेड' कल्याण कॅम्प नं. तीन ही उपनगरातील सर्वात पहिली बँक. या बँकेची स्थापना १९३५ मध्ये हैदराबाद (सिंध) येथे होती.

१९४९ नंतर ती तेथून उल्हासनगरला आली. ही बँक संयुक्त भांडवल कंपनी सिंधी व्यापारी यासाठी प्रामुख्याने फायद्याची आहे. ही बँक उल्हासनगरमधील व्यवसाय समुदायाला फायदेशीर आहे. कॅनरा बँकदेखील उल्हासनगर शाखा सिंधींमध्ये प्रसिध्द झाली. बचत खाते सुविधा उपलब्ध होती.

उल्हासनगरातील अर्थव्यवस्थेत ट्रान्सपोर्ट कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावते. पूर्ण भारतभर माल पाठविण्यासाठी किंवा मागविण्यासाठी ट्रान्सपोर्ट कार्यालय आहे. स्थानिक आणि आसपासचा मुंबईचा विभाग, उपनगर, नवी मुंबई, भिवंडी, नाशिक, पुणे, पिंपरी आसपाच्या सर्व शहरातून रोज माल मागविणे, पोहोचविणे चालते.

सिंधी मालाला बहुतेक (Duplicate) 'हुबेहूब नक्कल करणारा' असे म्हटले जाते. ते उत्पादनाचे टॅग डुप्लिकेट देतात, असे बोलले जाते. परंतु त्याचे याबाबत वेगळे मत आहे. ते फक्त उत्पादनाचे मॉडेल, शैली कॉपी करतात. प्रत्येक जण प्रिमियम ब्रँड घेऊ शकत नाही, असे सिंधी व्यापारी मानतात. ग्राहक कमी मध्यमवर्गीय गटातील आहेत ते ब्रँडेड उत्पादन विकत घेण्यास असमर्थ असतील आणि जर त्यांना कमी किंमतीत अधिक चांगले उत्पादन मिळत असेल तर कारण भारत हा अधिक लोकसंख्या असलेला कमी मध्यमवर्गीय गटातील आहे. कमी किंमत हे धोरण त्यांनी स्वीकारले. कमी किंमतीच्या धोरणामुळे स्थानिक बाजारपेठेवर परिणामकारक परिणाम झाला.

उपनगरातील व्यवसायाबाबत बोलायचे तर गृह उद्योगापासून सुरुवात होऊन त्याचे मोठ्या उद्योगात रुपांतर झाले. माल परदेशी निर्यातदेखील केला जाऊ लागला. व्यापार, व्यवसाय हा त्याचा प्राण आहे. किमान फायदा मिळाला नाही तरी करतो, वाढवतो, हळूहळू उद्योगपती बनतो.

T. K. Karunakaran mentions ".... Sindhis are not used to living on charity and they preferred to have a decent living by their own efforts; That is they started their own business to recover from the poverty. ..... Many shops and establishment Industrial Centers Cropped up..... the number of shops of different varieties. Service Centers, Small Industries and Production Centers """" Came up suddenly..

पुनर्स्थापनेच्या काळात म्हणजे तीन ते चार वर्षात अनेक उद्योग कापड, साबण, सूत रंगविणे, कँडी, बिस्कीट, अन्न, पापड, लोणचे, गोड पदार्थ (मिठाई), ह्या सर्वांमध्ये ते व्यवसाय करताना आढळले कारण आहे 'कमी किंमत' परंतु त्यांच्या उत्पादनांची मागणी दिवसेंदिवस वाढत होती. ह्या सर्वांमुळे सुधारणा जलद झाली.

'स्वयंरोजगार' ही संकल्पना तिचा उगम झालेला असेल तर तो उल्हासनगरात निर्वासितांना उल्हासनगरात वसविण्यात आले. तेव्हा आपल्याला नोकऱ्या मिळतील याची वाट न पाहता स्वतःचा रोजगार स्वतःच निर्माण केला. आपल्याजवळ जे काही थोडे रुपये असतील त्याप्रमाणात धंदा सुरू केला. शून्यातून विश्व निर्माण केले. कोणता असा व्यवसाय नाही की ज्यात सिंधी माणूस नाही. कष्ट, मेहनत, चिकाटी या जोरावर फार थोड्या अवधीत स्थिरस्थावर झाला आहे. गोळ्या, बिस्कीटे, चॉकलेट, रेडिमेड कपड्यांपासून सुरवात करून अगणित व्यवसायात त्यांनी प्रगती केली. उल्हासनगरमधील सिंधी माणसांचे घर म्हणजे एक छोटा कारखानच. प्रत्येकाला आवश्यक असणाऱ्या लहान वस्तू तयार करून इतरांपेक्षा किफायतशीर भावाने विकून जास्त माल कसा विकला जाईल, याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले.

उल्हासनगरातील समाजव्यवस्थेत फारशी जातीय संरचना सिंधी समाजात आढळली नाही. अखंड अशी जातप्रणाली होती. अस्पृश्यता नव्हती. हिंदू व मुस्लीम दोघेही अनेक साधुसंतांचे सामायिक भक्त होते. सूफी पंथाच्या प्रभावामुळे सिंधी मुसलमानात संतांची पूजा सुरू झाली. शीख पंथाचे वेगळे रुप म्हणजे 'नानकशाही पंथ' होय. ह्यामध्ये हिंदू व शीख धर्माची सरमिसळ झालेली आहे. लोहाणा जातीतील बहुतेक लोक हे नानकशाही पंथाचे.

उल्हासनगरमधील संपूर्ण परिसराचा अभ्यास केला. तेथील लोकांच्या प्रमुख गरजा काय आहेत? कोणता कच्चा माल या परिसरात स्वस्त मिळू शकेल, तयार केलल्या पक्क्या मालासाठी त्यांना बाजारपेठ होती, त्याचा फायदा त्यांनी उठवला. साधारण शेती आणि जंगल यापासून व्यापाराला चांगलाच फायदा झाला. गावोगावी किराणा मालाची दुकाने, राईस मिल, भरपूर जंगल असल्यामुळे इमारती माल स्वस्त भावात उपलब्ध होत होता. शेतीबरोबर जे अतिरिक्त जंगल त्याचा फायदा करून घेऊन त्याचमुळे फर्निचर बाजार अस्तित्वात आला. उल्हासनगरातील प्रगतीत आदिवासी समाजाचे योगदान फार मोठे आहे. सिंधी समाजाने

आपल्या घरात लहान उद्योग सुरू केले. या गृह उद्योगाला लागणाऱ्या कामासाठी मनुष्यबळाची पूर्तता आदिवासी समाजाने पूर्ण केली.

अनुयायी आहे. सिंधी हिंदूच्या प्रत्येक धार्मिक विधीच्या प्रारंभी गणेशपूजन केले जाते. भाटीया–भट्टी, लोहाणा, ठाकूर, भागनरी, मसंद, भाइबंद असे विविध गट होते. सिंधी हिंदू लोकांमध्ये अनेक सण व उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करतात. उल्हासनगरमध्ये अनेक मंदिरे आहेत. त्याचबरोबर बहुतेक सिंधी संतांची मंदिरे आहेत. उल्हासनगर कॅम्प नं. ५ मध्ये स्वामी शांतिप्रकाश महाराज यांनी सत्संग सुरू केला. आज जिथे स्वामी टेऊँराम आश्रम त्या ठिकाणीआहे. शांतिप्रकाश महाराजांद्वारे गरीब, लाचार आणि जरुरतमंद असणाऱ्या लोकांची मदत केली जाते, असे अनेक आश्रम आहेत. ज्यामध्ये सत्संग व देवाची उपासना केली जाते. त्यामुळे अध्यात्मिकता देखील दिसून येते.

सिंधी समाजातील लोकांच्या आहारात शाकाहारी व मांसाहारी दोन्ही पदार्थांचा समावेश असतो. काही सिंधी पारंपरिक पदार्थांबरोबरच आधुनिक बदलत्या काळानुसार नवीन पदार्थांचा समावेश दिसतो. सुरुवातीला स्थानिक उत्पादनांवर सिंधी संस्कृतीतील खाद्य संस्कृती अवलंबून होती. दैनंदिन आहारात सिंधींच्या पदार्थात गव्हापासून बनविलेले फुलके, भात आणि दोन प्रकारच्या भाज्यांचा समावेश असतो. साई भाजी, सिंधी कढी, दालपक्कान, डोडो, कोकी असे अनेक पदार्थ, गोड पदार्थांचा देखील आहारात समावेश असतो. घरात प्रक्रिया करून बनविलेल्या पदार्थांचाही समावेश असतो. उदा. मुरांबा, लोणचे, पापड, इत्यादी. आधुनिक काळात बदलत्या जीवनशैलीत (Street food) ही संकल्पनादेखील लोकप्रिय झालेली आहे. त्याचबरोबर त्यांच्या काही खास पदार्थांनाही Street food मध्ये त्यांनी सहभागी करून घेतले आहे. खाद्यपदार्थांची अनेक उपाहारगृहेदेखील आहेत.

सिंधींना साधारणपणे शिक्षणात स्वारस्य होते. म्हणून अनेक शैक्षणिक संस्थांत त्यांनी योगदान दिले. कै.श्री. परसराम पारुमल यांनी महत्त्वाकांक्षी योजना राबविल्या. सन १९५० मध्ये 'न्यू ईरा हायस्कूल' स्थापन केले. सेवासदन ट्रस्ट, चांदीबाई हिंमतलाल मनसुखानी ट्रस्ट द्वारे उल्हासनगरमध्ये स्कूल आणि कॉलेजेसची स्थापना केली. तांत्रिकी माध्यमिक शाळा आहेत. उल्हासनगर नगरपरिषदेअंतर्गत शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली.

सिंधी भाषा ही एक अशी भाषा आहे की जिचा दोन लिपीमध्ये वापर भारतीय संविधानाने मान्य केला आहे. भारत सरकारने १० एप्रिल, १९६७ रोजी सिंधी भाषा संविधानात्मकरीत्या मान्य केली. त्याचबरोबर दोन लिपी अरबी फारसी किंवा देवनागरी लिपी मंजूर केली. भाषेतून इच्छा व्यक्त करणे ही आपली ओळख. भाषा हे आपल्या समाजाचे मूळ. सिंध भारतातील पश्चिम भागातील गुजरात पाकिस्तानातील सिंध प्रांतात बोलली जाणारी भाषा होय. सिंधी भाषेचा प्रचार आणि लोकप्रिय होण्यासाठी तरुण पिढीने सहभाग घेतला पाहिजे. सिंधी भाषेचे संवर्धन होणे गरजेचे आहे.

